TEXT FLY WITHIN
THE BOOK ONLY

brown
book

UNIVERSAL
LIBRARY

OU_192646

UNIVERSAL
LIBRARY

OUP—391—29-4-72—10,000.

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M823 D173 Accession No. M2141

Author दांडेकर, गो. नी.

Title स्मरणगाथा.

This book should be returned on or before the date last marked below.

# श्री महाभारत

[ भाग द्वितीय ]

निवेदक

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

रा म कृ ष्ण बु क डे पो

गि र गां व : मुं ब ई ४

प्रथमावृत्ति १९५५
मूल्य दोन रुपये

सर्वाधिकार स्वाधीन

मुद्रक : व्यं. रा. शिंगरे, सर्वोदय मुद्रणालय, ४५० बुधवार, पुणें २.
प्रकाशक : वि. र. बाम, रामकृष्ण बुक डेपो, मुंबई ४

## घोषयात्रा—

कितीही संकटें का ओढवेनात, धैर्यशील पुरुष त्यांच्याशीं झुंज खेळून पैलथडी गांठतात.

बारा वर्षांचा वनवास हें जणूं एक अग्निदिव्यच. पण पांडव धर्ममार्गाचा अवलंब करून त्या दिव्यांतूनही पलिकडे निघाले होते. रम्य अरण्यें, नद्या, पर्वत, ऋषिजनांचा सहवास, त्यांनीं सांगिलेल्या उद्बोधक कथा हें पांडवांचें पाथेय झालें होतें.

पण पांडवांच्या या धैर्यशीलतेमुळें तिकडे हस्तिनापुरीं दुर्योधनाचा मत्सर अधिकाधिक वाढूं लागला. कंदमुळें भक्षून राहणाऱ्या पांडवांचा मनस्ताप वाढेल कसा, याविषयीं तो विचार करूं लागला. तों कर्णानें त्याला एक युक्ति सुचविली. तो म्हणाला,

" दुर्योधना, कांहींतरी निमित्त काढून तूं आपल्या सर्व वैभवासह पांडव राहतात त्या वनांत जा. वल्कलें ल्यालेल्या पांडवांना तुझें हें अपूर्व ऐश्वर्य बघून खचितच अपरंपार खेद होईल. अलंकारांनीं नटलेल्या तुझ्या भार्या जेव्हां अजिनें पांघुरलेल्या द्रौपदीसमोर उभ्या राहतील तेव्हां तिला होणाऱ्या दुःखानें तुझा हर्ष शतगुणित होईल. "

दुर्योधनाची मुद्रा उजळून निघाली. पण पुनः किंचित् सचिंत होऊन तो म्हणाला,

" मित्रा, तुझी युक्ति तर सुरेखच आहे. पण तातांची अनुज्ञा ? पांडवांच्या वसतीस्थानीं जायला त्यांची अनुमति मिळेल काय ? "

" तें तूं मजकडे सोंपीव म्हणजे झालें. "

दुसरे दिवशीं हे सर्व जण धृतराष्ट्राजवळ बसले असतां पूर्वसंकेताप्रमाणें एक बल्लव तिथें आला, आणि त्यानें राजाला त्याच्या गोधनाचें कुशल सांगितलें. लगेच शकुनि व कर्ण राजाला म्हणाले,

" राजन् ! वनांत असलेले आपले गौळीवाडे तूर्त गोधनानें समृद्ध झाले आहेत. त्यांतल्या वासरांवर खुणा करून त्यांची मोजणी करायचा काळ प्राप्त झाला आहे. तेव्हां दुर्योधनानें तिकडे जावें हें इष्ट. "

" वत्सांनों, मी तुमच्या या म्हणण्यास अनुमति देऊं शकत नाहीं. "

" कां ? "

" तिथें पांडवांचें वास्तव्य आहे. क्रोधानें फुसफुसत असलेले ते महानाग—"

" आम्हाला त्यांच्याशीं काय करायचें आहे ? केवळ वांसरांची मोजणी करून आम्ही परतू. "

" असें असेल तर तुम्ही जाऊं शकतां. "

पडत्या फळाची आज्ञा समजून ते सर्व राजे आपल्या वैभवानिशीं द्वैतवनाकडे निघाले. बरोबर प्रत्येकानें आपापल्या स्त्रियांनाही घेतलें होतें. तो सर्व मार्ग त्यांच्या हत्तींच्या आणि रथांच्या धडधडाटानें भरून गेला.

घोषांतील वांसरांची गणना करून त्यांतले तीन वर्षांवरील खोंड दुर्योधनानें आपल्या बरोबर घेतले. नंतर मनांतील दुष्ट हेतूच्या पूर्तीसाठीं तो मृगयेच्या आणि वनसंचाराच्या निमित्तानें पांडव राहात त्या वनप्रदेशाकडे निघाला. द्वैतवन सरोवरांत जलक्रीडास्थले निर्माण करण्यासाठी त्यानें आपले सेवक पुढें धाडले.

पण दैव वेगळाच डाव मांडून बसलें होतें. कौरवांच्या या दुष्ट हेतूचा वास लागून इन्द्रानें चित्ररथ गंधर्वास सैन्यानिशीं त्या वनांत अगोदरच पाठविलें होतें. द्वैतवन सरोवरांत चित्ररथ गंधर्वस्त्रियांसह क्रीडा करीत असतां दुर्योधनाचे दूत तिथें पोंचले. गंधर्व सैनिकांनीं त्यांस धुडकावून हांकून दिलें.

हें कळतांच क्रुद्ध होऊन दुर्योधनानें कर्णाच्या आधिपत्याखालीं आपलें सैन्य गंधर्वांवर धाडलें. पण गंधर्वसेनेनें सहजच त्याचा संहार केला. शेवटीं कर्णही निरुपाय होऊन युद्धभूमि सोडून पळून गेला.

दुर्योधनापर्यंत ही वार्ता पोहोंचली. तो दुर्मती बलाबलाचा विचार न करतां अवशिष्ट सैनेसह गंधर्वांवर चालून आला. तें त्याचें साहस पाहून गंधर्वांस हंसू आलें. त्यांनीं दुर्योधनाचा पराभव करून त्याला गंधर्व पाशांत बांधलें, आणि त्यांच्या स्त्रियांचा अपहार केला !

पराभूत झालेल्या कौरव सेनेस क्षणभर काय करावें तें सुचेना. शेवटीं त्यांतील कांहीं वृद्ध धांवत युधिष्ठिर आपल्या आश्रमाजवळील यज्ञवेदीवर यज्ञ करीत होता, तिथें आले. धरणीवर लोळण घेऊन ते म्हणाले,

" वनवासी राजा, आतां कौरवांचें यश मिळूं न देणें तुझ्याच हातीं आहे !"

" कां ? काय झालें ? "

जेव्हां त्या सैनिकांकडून दुर्योधनाच्या दुर्दशेचें वृत्त कळलें, तेव्हा अत्यानंदित होऊन भुजा थोपटीत भीम म्हणाला,

" असेंच ! हेंच ! "

" हेंच काय भीमा ? "

" क्षुद्र वृत्तीच्या कौरवांना हेंच प्रायाश्चित्त योग्य आहे. आम्हाला जें काम करावें लागलें असतें, तें करून टाकल्याबद्दल गंधर्वांना धन्यवाद द्यायला हवेत ! "

युधिष्ठिरानें अग्नींत समिधा समर्पित करीत असलेला आपला हात तसाच धरून ठेवून गंभीर स्वरांत म्हटलें,

" भीमा, काय बोलतोस हें ? अरे प्रसंग कसा आहे ? कुणी एक परका आपल्या कुलावर अत्याचार करीत असतां आपापसांतले हेवेदावे क्षणमात्र बाजूला ठेवून कुलाच्या संरक्षणास धांवून जाणें हेंच सज्जनांचें कर्तव्य आहे. आणि जरी कौरव तुझे शत्रु असले, तरी शत्रूंना भयमुक्त करणें, हें तर पुत्रजन्माहून अधिक सुखदायक असतें !

" मी हा यज्ञ सुरू करून बसलों आहें म्हणून. एरव्हीं मींच जाऊन गंधर्वापासून दुर्योधनाची मुक्तता केली असती. आणि कौरवांच्या भार्या या तुझ्या कोणीच नव्हेत काय ? "

अर्जुन आपलें धनुष्य सज्ज करून उठला, हें पाहून मग भीमानेंही त्याचेंच अनुकरण केलें. कांहीं क्षणांतच अर्जुनानें आपल्या अपूर्व अस्त्रविद्येनें भंवतालचें आकाश बाणांनीं झांकून टाकीत गंधर्वसेनेवर चाल केली. त्याच्या अद्भुत शरवर्षावापुढें गांधर्वी मायाहि लटकी पडूं लागली. आपल्या सेनेची गांठ अर्जुनाशीं पडली आहे, हें जेव्हां चित्ररथानें पाहिलें, तेव्हां धनुष्य खालीं ठेऊन तो ओरडला,

" मित्रा अर्जुना, तूं तुझ्या स्नेह्याला ओळखत नाहींस काय ? "

मग अर्जुनानेंही त्याला ओळखलें. पण शंकीत होऊन तो म्हणाला,

" सुहृदा चित्ररथा, तूं कौरवांची अशी वाताहात कां केलीस ? "

" भगवान् सुरेश्वराच्या आज्ञेमुळें. "

एकंदर वृत्त कळल्यावर काय तो निर्णय युधिष्ठिरानें द्यावा असा निश्चय होऊन ते सर्व यज्ञभूमीवर जाऊन पोंचले. सर्व प्रकार ऐकून सदय दृष्टीनें दुर्योधनाकडे बघत युधिष्ठिर म्हणाला,

" मित्रा चित्ररथा, दुर्योधनास सोडून दे. ऐकलेंस दुर्योधना, पुनः असलें साहस करूं नकोस. अरे, असें वृथा वैर जोडूं नये रे ! "

मुक्त झालेला दुर्योधन पराकाष्ठेचा खिन्न होऊन खालीं मान घालून चालता झाला.

## दुर्वास भोजन—

नाना परी करूनही दुर्योधनाच्या मनाचा दाह उणावेना. त्यानें कर्णास दिग्विजयास धाडून आणि त्याच्याकरवीं सर्व राजांस जिंकून त्यांच्याकडून करभार आणविला व वैष्णव यज्ञही केला. पण त्या यज्ञानेंही त्याचें मन शांत झालें नाहीं. तोंच अचानक महाकोपिष्ट दुर्वास ऋषि त्याच्याकडे आले.

दुर्योधनानें त्यांची मनोभावें सेवा केली. दुर्वास संतुष्ट झाले, आणि त्यांनीं वर मागण्यास सांगितलें. तेव्हां दुर्योधन म्हणाला,

" महर्षे, माझा ज्येष्ठ भ्राता युधिष्ठिर वनांत राहतो. आपण अवेळीं त्याच्याकडे जाऊन त्यांच्या अतिथ्याचा स्वीकार करावा. "

तथास्तु म्हणून दुर्वास द्वैतवनांत युधिष्ठिराच्या आश्रमाकडे आले. पांडव आणि द्रौपदी भोजनें उरकून सुखानें बसलीं होतीं, तोंच दुर्वास दारीं उभे ठाकले ! युधिष्ठिरानें उठून त्यांचें आतिथ्य केलें आणि तो म्हणाला,

" महर्षे, आपण स्नान उरकून यावें, भोजन सिद्ध आहे. "

दुर्वास शिष्यांसह नदीवर गेले, आणि इकडे द्रौपदीच्या मनांत चिंता झांकोळून आली. संकेताप्रमाणें सूर्यस्थाली पालथी घातली असून तिच्यापासून भोजन मिळणें शक्य नव्हतें. आतां लवकरच दुर्वास शिष्यांसह स्नान उरकून येतील, आणि मग अन्नाभावीं त्यांचा असह्य, जळजळीत शाप —

विगलित होऊन द्रौपदीनें श्रीकृष्णाला मनोमनीं साद घालीत म्हटलें,

" मुरारे ! आतां तूंच साह्यकारी ! अरे, आतां हा कोपिष्ट दुर्वास भुकेजून येईल ! आणि जेव्हां भोजन सिद्ध नाहीं, हें त्याला दिसेल, तेव्हां—

" श्रीहरि , कौरवांच्या सभेंत तुला आवाहन केलें असतां धांवून तूंच माझी लज्जा राखलीस. आतांही तुझा एकाचाच आसरा ! "

तोंच बाहेर श्रीकृष्णाचा ध्वनि ऐकूं आला. द्रौपदी धांवतच बाहेर गेली, आणि डोळ्यांतलीं आंसवें पुशीत तिनें त्याला समोर उभी ठाकलेली आपत्ति विस्तारून सांगितली.

श्रीकृष्ण हंसून बोलला,

" कृष्णे, तें मी मग ऐकेन. अगोदर मी फार भुकावलों आहें. माझ्या-साठीं कांहीं खायला आण. "

" श्रीकृष्णा, माझा अंत कां पाहतोस ? अरे मी तर– "

" तें नंतर सावकाश सांग. अगोदर माझ्या भुकेला कांहीं आहुति शोधून आण. "

" आतां काय आणूं ? स्थाली तर केव्हांच पालथी घातली आहे ! "

" बघ बघ ! तिच्यांत कांहीं अवशिष्ट असेल ! "

निरुपायानें द्रौपदीनें स्थाली उचलून आणली. तिच्या कांठाला भाजीचें एक पान राहिलें होतें. तें उचलून श्रीकृष्ण हंसत म्हणाला,

" बघ ! तूं तर म्हणत होतीस कीं सगळें संपलें ! "

तें पान भक्षून श्रीकृष्णानें तृतीची ढेंकर दिली, आणि मग तो सहदेवाला म्हणाला,

" सहदेवा, जा. ऋषींना आदरानें बोलावून घेऊन ये. "

इकडे आणीक एक आश्चर्य घडलें. स्नान करीत असतांच दुर्वास आणि त्यांचे शिष्य या सर्वांस आकंठ भोजन केल्यासारख्या ढेंकरांवर ढेंकरा येऊं लागल्या. शिष्य म्हणाले,

" गुरुदेव ! आतां कसें ? "

दुर्वासांच्या पोटींही भय निर्माण झालें. ते म्हणाले,

" वत्सांनों, भलत्या वेळीं येऊन या धर्मात्म्याला छळलें, याचा हाच परिणाम व्हायचा ! आतां त्यावर पळणें, हाच उपाय ! "

ते सर्व तापस दशदिशांना पळून गेले !

## द्रौपदीहरण––

धृतराष्ट्रकन्या दुःशलेचा पति जयद्रथ हा आणखी एक विवाह करण्याच्या इच्छेनें ससैन्य द्वैतवनांतून जात असतां अचानक आश्रमाच्या दारीं उभी

असलेली कृष्णा त्याला दिसली. पांडव मृगयेसाठीं वनांत गेले होते. दारच्या कदंब वृक्षाची फांदी हातानें धरून निर्भय कृष्णा मृगवत्सांची क्रीडा पाहात उभी होती. मोहित होऊन जयद्रथ आपला सखा कोटिकास्य यास बोलला,

" कोटिकास्या, तें अद्‌भुत लावण्य बघ. तिचें कुलशील विचारून येतोस काय ? "

कोटिकास्यानें कृष्णेजवळ येऊन पृच्छा केली. मर्यादेनें दाराआड उभी राहात कृष्णा म्हणाली,

" वस्तुतः अपरिचित परपुरुषांशीं स्त्रीनें बोलूं नये. पण माझे पती मृगयेस गेले आहेत. मी द्रुपदकन्या कृष्णा आहें. "

कोटिकास्याच्या मुखानें हें वृत्त श्रवण करून जयद्रथाच्या हातीं जणूं काय आकाशींचा चन्द्र आला. तो आश्रमांत येऊन द्रौपदीला म्हणाला,

" पांचाली, तुझे कष्ट पाहून मनाला क्लेश होतात. दास पांडवांबरोबर या आपत्ती सहन करण्यापेक्षां माझ्याबरोबर येशील, तर स्वर्गसुख उणें भासावें, अशा सुखांत विहार करशील. "

क्रुद्ध होऊन द्रौपदी म्हणाली,

" मंदा, जोंपर्यंत अर्जुनाच्या बाणाशीं आणि भीमाच्या गदेशीं गांठ पडली नाहीं, तोंपर्यंतच्च हे तुझे प्रलाप ! "

ती सुखासुखीं ऐकत नाहीं, हें पाहून जयद्रथानें बलात्कारानें तिला रथांत बसविलें, आणि तो वेगानें आपल्या नगराकडे निघाला. बिचारा धौम्य व्याकुळ होऊन त्याला शाप देत त्याच्यामागें धावूं लागला.

पांडव परतल्यावर द्रौपदीच्या दासीनें जेव्हां त्यांना रडत रडत हें वृत्त सांगितलें तेव्हां खादिरांगारासारखे पेटलेले पांडव ससाण्याच्या वेगानें जयद्रथावर

धांवले. वाटेंत धुळीनें माखलेला धौम्य धांवत असलेला त्यांना दिसला. त्याला अभय देत जों जयद्रथाचें सैन्य जवळ दिसूं लागले, तों भीमार्जुनांनीं त्यावर असीम शरवर्षाव सुरू केला. तो वर्षाव असह्य होऊन जयद्रथानें द्रौपदीला रथांतून उतरविलें, आणि तो एकटाच पळूं लागला.

द्रौपदीला जवळ घेत युधिष्ठिर म्हणाला,

" भीमा, जयद्रथाला मारूं नको, धरून आण. तो दु:शलेचा पति या नात्यानें आपला मेहुणा होतो !

शेवटी भीमार्जुनांनीं जयद्रथाला गांटलें. त्याला भुमीवर आपटीत भीमानें अक्षरश: त्याला तुडविलें. अर्जुन त्याला निवारूं जातां दांत खात भीम म्हणाला,

" धनंजया, युधिष्ठिर तर अस्थानीं दयाशील आहेच, आणि तूंही बालिश बुद्धीनें त्याचें अनुसरण करीत आहेस ! "

शेवटीं भीमानें एका तीक्ष्ण बाणानें जयद्रथाच्या केशाचे पांच पाट काढले, आणि त्याला रथस्तंभाला बांधून तो त्याला युष्ठिष्ठिराकडे घेऊन आला.

त्याला पाहून युधिष्ठिर म्हणाला,

" भीमा, आता याची अप्रतिष्ठा पुरे झाली. याला सोडून दे. "

भीम दांत कडकडा वाजवीत ओरडला,

" कृष्णे, ऐक ! हा तुझा दास जयद्रथ आणला आहे. "

दयावती कृष्णा म्हणाली,

" भीमा याचें दास्य मला पावलें. आतां याला सोडून द्या. "

कान कापलेल्या कोल्ह्यासारखा जयद्रथ तोंड न दाखवितां तिथून निघून गेला.

## कुंडलहरण—

पांडवांचीं वनवासाचीं बारा वर्षें भरत आलीं, हें पाहून इन्द्र त्यांच्या भावी विजयाची चिंता करूं लागला. कर्णाला जन्मजात कवच आणि सूर्यदत्त कुंडलें होतीं. तीं त्याच्याजवळ मागितलीं असतां तो नाहीं म्हणणार नाहीं, हें इन्द्रास ठाऊक होतें. हीं दैवी कवचकुंडलें नसल्यावर कर्णाचा वध घडणें सहज होईल, हें जाणून इन्द्र ब्राह्मण वेषानें कर्णाकडे निघाला.

सूर्याला ही बातमी कळतांच त्यानें कर्णाला सावध करून कवचकुंडलें न देण्याविषयीं बजावलें. पण कर्ण म्हणाला,

" ताता, कवचकुंडलांपेक्षां माझ्या कीर्तीला जपणें मी अधिक इष्ट समजतों."

" पुत्रा, कवचकुंडलें देणें म्हणजे आपल्याच प्राणांवर उदार होणें आहे, हें तुझ्या लक्षांत आहे काय ? "

" असेना का ! शरीर मर्त्य आहे, तर कीर्ति अक्षय्य राहील ! "

" तुझी इच्छा ! पण एक तरी करशील काय ? "

" काय ? "

" कवचकुंडलें देऊन त्यांचेऐवजीं इन्द्राकडून वासवी शक्ति मागून घे."

" केवळ तुझी आज्ञा, म्हणूनच मी तसें करीन."

इन्द्र ब्राह्मणाचा वेष धारण करून कर्णाच्या दारीं उभा ठाकला. कोणाही याचकानें दारून विन्मुख जातां कामा नये, असा कर्णाचा दंडक होता. कर्ण त्या ब्राह्मणाला म्हणाला,

" विप्रश्रेष्ठा, तुझी काय इच्छा आहे? माझ्या भांडारांत विपुल गाई, मध, रेशमी वस्त्रें, रत्नें—"

" राजा, माझी मागणी कदाचित् तुला विचित्र भासण्याची शक्यता आहे."

" तूं माग म्हणजे झालें."

" तर मग तुझें देवदत्त कवच आणि कुंडलें मला दे."

कर्णानें इंद्राला ओळखलें. तो हंसत म्हणाला,

" महात्म्या, वेष बदललास खरा, पण तूं आपलें अंतरंग बदलूं शकला नाहींस. ठीक आहे. तुझी इच्छित वस्तु मी तुला देईन. पण एका अटीवर."

" कोणती अट ? "

" तुझी वासवी शक्ति तूं मला दिली पाहिजेस."

" माझीहि एक अट आहे."

" कोणती ? "

" तिचा उपयोग तूं अत्यंत प्रबल शत्रूवर केवळ एकदांच करावास. त्या प्रयोगानंतर माझी शक्ति मजकडे परत येईल."

" ठीक आहे."

कर्णानें आपल्या हातांत शस्त्र घेऊन स्वतःच आपलें कवच आणि कुंडलें कापून इन्द्राला दिलीं. एवढा रक्तपात होत असतांही कर्णाच्या मुखावर विषादाची एक रेषाही उमटली नाहीं ! भोंवतालीं जमलेले लोक कर्णाचें तें अद्भुत साहस पाहून म्हणाले,

" धन्य अंगराज ! धन्य तुमचें साहस."

इन्द्र म्हणाला,

" कर्णा, तूं धन्य आहेस, प्रतिज्ञेप्रमाणें ही वासवी शक्ति तुला देतों. तिचें ग्रहण कर."

कर्णाला वासवी शक्ति देऊन इन्द्र कवचकुंडलांसमवेत चालता झाला.

## यक्ष प्रश्न—

पांडवांनीं काम्यकवनाचा त्याग करून पुनः द्वैतवनाचा आश्रय घेतला. तिथें एकेक दिवस मोजीत ते वनवासाचा काल संपायची वाट पाहात असतां एक अद्भुत घडलें.

एका वनवासी ब्राह्मणानें आपली अरणी व मंथा एका वृक्षावर अडकवून ठेविलीं होतीं. तो कंदमुळांच्या शोधांत भटकायला निघत असतां एक मृग त्या वृक्षाजवळ आला. तो वृक्षाला आपलें अंग घासूं लागला. तों अरणी व मंथा

त्याच्या शिंगांवर पडून तिथेंच अडकून राहिलीं. भयानें तो मृग धांवूं लागला, आणि कांहीं क्षणांतच दृष्टीआड झाला.

अग्निहोत्र खंडित होण्याच्या भयानें ब्राह्मण धांवत पांडवांकडे आला. तो म्हणाला,

" राजपुत्र हो ! माझ्या अग्निहोत्राचें रक्षण करा. "

" तुझ्यावर कसलें संकट आलें आहे ? " युधिष्ठिरानें विचारलें.

" एक मृग माझी अरणी व मंथा घेऊन पळून गेला आहे. "

" तूं निश्चिंत अस. आम्ही त्याचा शोध लावून तुझीं यज्ञपात्रें तुला परत करतों. "

पांचही पांडव मृगयेच्या छंदानें मृगाचा तपास करीत त्याच्या मागें धांवूं लागले. तो मृग अगदीं जवळ दिसून क्षणांत दिसेनासा होई.

दुपार झाली. ऊन्ह कडकून तापत होतें. श्रान्त होऊन पांडव एका वटवृक्षाच्या छायेंत बसले. सर्वांनाच तहान लागली होती. युधिष्ठिर नकुलास म्हणाला,

" वत्सा, या वृक्षावर चढून जवळ कुठें जल दिसतें काय हें पहा. "

नकुल वृक्षावर चढून म्हणाला,

" दादा, जवळूनच सारस पक्ष्यांचा ध्वनि ऐकूं येत आहे. "

" तर मग तिथें जल असलें पाहिजे. "

" मी जाऊन माझ्या भात्यांतून जल घेऊन येतों. "

नकुल तांतडीनें त्या दिशेनें निघाला. कांहीं अंतरावर एक निर्मल जलानें भरलेलें सरोवर त्याला दिसलें. तहानेला असल्यामुळें तो पाणी पिण्यास खालीं वांकला, तों त्याला गंभीर आकाशवाणी ऐकू आली,

" थांब ! "

आश्चर्यानें नकुलानें चहूंकडे पहात विचारलें,

" कां ? "

" हें सरोवर माझें आहे. माझ्या प्रश्नांचें उत्तर देऊन मगच तूं याचें पाणी पिऊं शकतोस. "

अवज्ञेनें नकुलानें जलास स्पर्श केला मात्र, आणि लगेच तो मूर्च्छित होऊन तिथेंच कोसळला !

इकडे बराच वेळ त्याची वाट पाहून युधिष्ठिर सहदेवास म्हणाला,

" वत्सा, जा तर ! नकुलाचा शोध घेऊन ये."

सहदेव तळ्याजवळ आला. नकुलाला तशा स्थितींत पाहून त्याच्या अंतरांत जणूं बाण घुसला. पण तृषेनें अतिशय पीडित झालेला असल्यानें त्यानें जलाच्या पृष्ठभागावर ओंठ टेकले. तोंच त्याला आकाशवाणी ऐकूं आली. तिची उपेक्षा करून सहदेव पाण्याचा घोट घेऊं जातांच तोही निश्चेष्ट होऊन कोसळला !

नकुलाचा शोध घ्यावयास धाडलेल्या भीम आणि अर्जुनाच्या बाबतीत याच प्रसंगाची पुनरावृत्ति झाली. शेवटीं स्वतः युधिष्ठिर काय प्रकार आहे तें बघण्यासाठीं त्या दिशेनें निघाला. जलाशयाच्या तटावर आपले चारी भ्राते निश्चेष्ट होऊन पडलेले पाहतांच युधिष्ठिरास अनिवार खेद झाला. तो अत्यंत दारुण शोक करीत म्हणाला,

" हा अर्जुना ! हा भीमा ! हा सहदेवा ! हा नकुला ! शेवटीं तुमची अशी अवस्था व्हावी ना ? आजपर्यंत ऋषिजनांनीं आणि इन्द्रादि देवांनीं दिलेले सर्व आशिर्वाद व्यर्थ व्हावे ना ! "

कांहीं वेळानें युधिष्ठिर त्यांच्या त्या अवस्थेचें कारण शोधूं लागला. पण कांहींच तपास लागेना. शेवटीं तृषा शमविण्यासाठीं तो जलाशयांत उतरला असतां त्याला घनगंभीर आकाशवाणी ऐकूं आली.

" थांब ! "

युधिष्ठिर आश्चर्यानें चहूंकडे पहात म्हणाला,

" हा गंभीर शब्द कुणी उच्चारला ? "

पुन्हां आकाशवाणी झाली,

" मी या सरोवराचा स्वामी यक्ष बोलत आहें. माझी अवज्ञा केल्यामुळेंच तुझ्या भावांवर हा प्रसंग ओढवला आहे. "

" तूं कोणी कां असेनास, तुझें सामर्थ्य अचिंत्य आहे, ही गोष्ट निर्विवाद. हे माझे पुरुषसिंह भ्राते केवळ तुझी अवज्ञा केल्यानेंच या अवस्थेला प्राप्त झाले, हें केवढें आश्चर्य ! तुझी इच्छा काय आहे ? "

" माझ्या प्रश्नांचीं उत्तरें दिल्यावांचून कोणींही या जलाचें प्राशन करूं शकत नाहीं. "

" तूं प्रश्न विचार. मी यथामति उत्तरें देईन. "

" आदित्य कां उगवतो ? "

" ब्रह्माच्या प्रेरणेनें. "

" ब्राह्मणांचें दैवत्य कोणतें ? "

" वेदाध्ययन. "

" आणि क्षत्रियांचें ? "

" धनुर्वेदाध्ययन. "

" पृथ्वीहून अधिक गुरु काय ? "

" माता ! "

" आकाशाहून अधिक उंच कोण ? "

" पिता. "

" वायूहून वेगवान् कोण ? "

" मन. "

" तृणाहून अधिक विपुल काय ? "

" चिंता. "

" उत्पन्न होऊनहि हालचाल कोण करीत नाहीं ? "

" अंडें. "

" हृदय कोणाला नाहीं ? "

" पाषाणाला. "

" गृहस्थाचा मित्र कोण ? "

" भार्या. "

" आतुराचा ? "

" वैद्य. "

" उत्तम लाभ कोणता ? "

" आरोग्य. "

" आणि उत्तम सुख ? "

" संतोष ! "

" ब्राह्मणाला दान कशासाठीं दिलें जातें ? "

" धर्मासाठीं. "

" नटाला ? "

" यशासाठीं. "

" सेवकांना ? "

" त्यांच्या पोषणासाठीं. "

" आणि राजांना ?"

" त्यांना केवळ भीतीच्या पोटींच दान दिलें जातें. "

" मनुष्य मृत कशानें होतो ? "

" मानहानीनें. "

" आणि राष्ट्र ? "

" योग्य नेत्यांच्या अभावानें. "

यक्षानें नाना प्रकारचे प्रश्न विचारले. युधिष्ठिरानें सावधान चित्तानें त्यांचीं उत्तरें दिलीं. शेवटीं त्याच्या धर्मबुद्धीची परीक्षा पाहण्याच्या हेतूनें यक्ष म्हणाला,

" युधिष्ठिरा, आतां या तुझ्या चार भ्रात्यांतील एक जिवंत होवो. कोणता तो सांग. "

क्षणाचाही विलंब न लावतां युधिष्ठिर म्हणाला,

" तर मग नकुल जिवंत होवो. "

" वेड्या ! अरे अर्जुन किंवा भीम, यांपैकीं एक जिवंत व्हावा अशी इच्छा कर ! या सापत्नाची इच्छा कां करतोस ? "

स्थिर शब्दांत क्षितिजाकडे पाहात युधिष्ठिर बोलला,

" यक्षराजा, कुंती आणि माद्री या दोघी- माझ्या माता. त्या दोघी पुत्रवती रहाव्यात ही इच्छा. म्हणून नकुलच जिवंत होऊं दे ! "

सानंद स्वरांत यक्ष बोलला,

" वत्सा, तुझे चारी भ्राते उठोत ! "

नंतर यक्षरूपानें प्रश्न करणारा यमधर्म युधिष्ठिरापुढें प्रगट होऊन म्हणाला,-

" पुत्रा, मी तुझा जनक यमधर्म. तुझ्या धर्मबुद्धीची परीक्षा पाहाण्या साठींच मी हें कौतुक केलें होतें. तुझ्यावर मी प्रसन्न आहें. वर माग. "

" तर मग हे ताता, ब्राह्मणाची अरणीमंथा त्याला परत मिळावीत."

" मिळतील. आणखी एक वर. "

" आम्हांला अज्ञातवासांत कोणीही न ओळखावें. "

" तसेंच होईल. तुम्ही विराटनगरींत कोणीही न ओळखतां राहूं शकाल. आणखी एक वर माग. "

" ताता, धर्मांत माझी बुद्धि स्थिर असावी. "

" राहील रे राहील. "

युधिष्ठिराला पोटाशीं धरून धर्म अन्तर्धान पावला. नंतर ब्राह्मणाची अरणी-मंथा घेऊन पांडव स्वस्थानीं परतले.

## अज्ञातवास—

रात्र झाली. भोंवतालीं असलेले सेवक, ब्राह्मण व दासी झोंपी गेलीं. अशा वेळीं पांडव कोणासही कळूं न देतां द्रौपदीसह एका वृक्षाखालीं जाऊन बसले. वृक्षाच्या विस्तारांतून चन्द्राचें चांदणें खालीं ओघळत होतें.

युधिष्ठिर म्हणाला,

" वत्सांनों, येऊं नये तसला प्रसंग प्राप्त झाला आहे. पण न डगमगतां आल्या प्रसंगास तोंड देणें, हें सज्जनांचें कर्तव्य आहे. तातांच्या इच्छेप्रमाणें

विराटनगरींत अज्ञातवासाचें एक वर्ष काढावें, असें मला वाटतें. अर्जुना, तुझा काय विचार आहे ? ''

'' श्रेष्ठा, तुझ्या म्हणण्याबाहेर आम्ही कोणीहि नाहीं. मला एकच गोष्ट वारंवार व्यथा देते.''

'' कोणती ? ''

'' सप्त सागरांच्या जलानें ज्यांच्या शिरावर अभिषेक झाला होता, असा तूं, व ही तुझी पट्टराणी कृष्णा, दोघांनाही कपटवेष धारण करून तोंड लपवीत एक वर्ष रहावें लागेल ! ''

भीम म्हणाला,

'' त्याला उपाय काय ? दुर्योधनाच्या दूतांनीं आपला शोध घेणें आतां-पासूनच सुरू केलें असेल. ''

युधिष्ठिर म्हणाला,

'' करीनात कां ! तातांच्या वरामुळें आपणास शोधून काढणें त्यांना शक्य होणार नाहीं. तर आपण कोणत्या वेषानें आणि कसा परिचय देऊन मत्स्य राजाकडे जाणार आहोंत ? ''

'' मला वाटतें, कीं तूंच प्रारंभ करावास. ''

'' ठीक आहे. मुनींनीं मला जी अक्षविद्या शिकविली, तिच्या बळावर कंक ब्राह्मण असा माझा परिचय देऊन द्यूतक्रीडापटु म्हणून मी विराटाच्या राज-सभेंत आपला प्रवेश करवून घेईन. ''

कांहीं क्षण विचार करून भीम म्हणाला,

'' श्रेष्ठा, पाकविद्येंत मी निपुण आहें, हें तुला माहीत आहे ना ? ''

'' होय. ''

'' तर मग मी पांडवांच्या स्वयंपाकगृहांतील बल्लव म्हणून विराटाला स्वतःचा परिचय करून देईन. शिवाय मी मल्लविद्येंतही निपुण आहें असें सांगेन. ''

'' आणि तूं अर्जुना ? ''

उर्वशीनें दिलेल्या शापाचें स्मरण होऊन अर्जुन किंचित् हंसून म्हणाला,

" कधीं कधीं शापही कल्याणाला कारणीभूत होत असतो. "

" कसा ? "

" उर्वशीनें मला एक वर्ष क्लीब होशील, असा शाप दिला होता—"

" मग ? "

" मी नृत्य आणि गायन विद्येंत कुशल, अशा बृहन्नलेच्या वेषानें विराटाच्या राजसभेंत प्रवेश मिळवीन ! "

द्रौपदी खेदानें म्हणाली,

" पुरुषत्वहीनाचा वेष धारण करून ! "

" होय कृष्णे ! पुढील उज्ज्वल भविष्याकडे लक्ष ठेवून पडेल तें सोसणें क्रमप्राप्तच आहे, असा श्रेष्ठाचा संदेश तूं मघांच ऐकला नाहींस काय ? "

युधिष्ठिरानें सहदेवाला विचारलें,

" सहदेवा, तूं काय सांगशील ? "

" दाद्दा, तुझ्या गोधनाचा मी उत्तम परीक्षक होतों—"

" होय. "

" तर मग तंतिपाल असा आपला परिचय देऊन मी विराटाच्या खिल्लारांचा प्रतिपालक होऊन राहीन. "

" आणि नकुला तूं ? "

" अश्वांची परीक्षा मला फार उत्तम आहे—"

" मग अश्वपाल म्हणून ? "

" होय. ग्रांथिक या नांवानें स्वत:चा परिचय करून देऊन मी विराटाच्या अश्वशालेवर देखरेख करीन. अश्वांच्या रोगावरील अनेक औषधी मला माहीत आहेत. त्यांचा उपयोग करून मी राजाचा आवडता होईन. "

शेवटीं युधिष्ठिर मोठ्या संकोचानें म्हणाला,

" कृष्णे, कशी विपरीत वेळ आली आहे—"

" असूं द्या. ऐकावें महाराज—"

" पण—"

" मीहि विराटाच्या पत्नीच्या इथं प्रवेश मिळवीन. "

" कोणत्या नांवानें ? "

" सैरंध्री म्हणून. "

उष्ण निश्वास सोडीत भीम म्हणाला,

" हाय हाय ! "

" असूं द्या नाथ, जर तुम्ही विराटाच्या स्वयंपाकगृहांत बल्लव म्हणून कणीक मळूं शकतां, तर सैरंध्रीच्या नात्यानें सुदेष्णेची वेणीफणी करणें मला जड वाटावयाचें नाहीं. "

" पण एकदां दासी म्हणून राहिल्यावर—"

" मी तीहि व्यवस्था करीन."

" कशी ? "

" माझे गंधर्व पती सदैव माझें रक्षण करीत असतात, असें सांगून. "

" ठीक आहे. " युधिष्ठिर म्हणाला, " एक वर्ष—केवळ एकच वर्ष—"

" होय दादा ! " भीम आपले पुष्ट बाहू उभवून म्हणाला, " एकच वर्ष ! त्यानंतर होणाऱ्या भीषण रणांत हे माझे पुष्ट बाहू कृतकार्य होतील ! "

अर्जुनानें साथ दिली,

" होय भीमा ! माझी ही अस्त्रविद्या—"

दुसरे दिवशीं बरोबरच्या सर्व आश्रितांची निरवानिरव करीत युधिष्ठिर त्यांना म्हणाला,

" मित्रांनो, आतां इथून पुढें एक वर्ष—"

" होय. आम्हांला माहीत आहे. "

" तुम्ही सर्वांनीं आम्हांलां हा बारा वर्षांचा काळ जाणवूं दिला नाहींत."

" आणि श्रेष्ठा, तुमचे आम्हांवर किंती उपकार झाले ते सांगतां पुरवत

नाहींत. नित्यशः हा युवराज भीम आम्हांला कन्दमुळें आणि मृगयेंत मारलेले मृग आणून देऊन आमची माध्यान्हीची चिंता दूर करीत असे. "

" तें तर आमचें कर्तव्यच होतें. "

" पण कर्तव्यच कधीं कधीं अलौकिक कृत्य म्हटलें जातें ! "

" असूं द्या. आतां भेट एक वर्षानें. "

सायंकाळीं डोळ्यांतून आंसवें वाहात असलेल्या त्या समुदायानें द्रौपदीसह पांच पांडवांना निरोप देऊन त्यांचें कुशल चिंतिलें. त्या रात्रीं हीं सहा जणें कुणालाही न कळतां आपलीं वाटचाल करूं लागलीं.

धौम्य कांहीं काल त्यांच्याबरोबर चालत होता. राजगृहीं भृत्यानें कसें वागावें यासंबंधीं त्यांना अनेक सूचना देऊन नंतर त्यांचे वारंवार कुशल चिंतीत धौम्य त्यांचीं अग्निहोत्रें बरोबर घेऊन पांचाल देशीं निघाला.

यमुनेच्या तीरावरील गहन अरण्यांतून वाट काढीत आणि मृगया करीत वेषांतरित पांडव वेगानें मत्स्य देशाकडे निघाले. त्यांचीं सुंदर शरीरें पाहून कोणी त्यांना विचारी,

" वीरहो ! तुम्ही कोण आहांत ? "

युधिष्ठिर उत्तर देई.

" आम्ही मत्स्य देशींचे व्याध. सहज तीर्थयात्रेसाठीं बाहेर पडलों होतों. आतां स्वगृहीं परतत आहोंत. "

शेवटीं विराट नगरी दिसूं लागली. बाहेर एक महाश्मशान होतें. तिथें एका शमीवृक्षाखालीं तीं सर्व जणें विसांवलीं.

युधिष्ठिर अर्जुनास म्हणाला,

" अर्जुना, या अमूल्य शस्त्रांना कुठें लपवावयाचें ? "

भीम सचिंत होऊन म्हणाला,

" होय. हाही अत्यंत चिंत्य प्रश्न आहे. "

अचानक अर्जुनाची दृष्टि शमीवृक्षाकडे गेली. तो वृक्ष विशाल असून त्याच्या खोडाला मोठमोठाल्या ढोली होत्या. अनेक शाखोपशाखांनीं गर्दी केली

असल्यामुळें त्यावर ठेवलेली वस्तु कोणालाही सहजासहजीं दिसणें शक्य नव्हतें. शिवाय त्या महाश्मशानांत फारसें कोणी येतही नसे.

अर्जुन म्हणाला,

" श्रेष्ठा, मला एक युक्ति सुचली आहे."

" कोणती ? "

" आपण हीं शस्त्रें या वृक्षावर ढोलींत लपवून ठेवूं या. त्यानंतर पलिकडे तें एका कुण्या वृद्धेचें प्रेत कोल्ह्यांनीं अर्धवट खाल्लें आहे, तें आपण या झाडावर टांगून ठेवूं या. "

" म्हणजे काय होईल ? "

" भयानें कोणीही या वृक्षाकडे येणार नाहीं. "

त्यानंतर अर्जुनानें आपलें आवडतें अव्यंग गांडीव धनुष्य स्कंधावरून खालीं उतरविलें. भीम, युधिष्ठिरादि चौघांनींही आपलीं खड्गें आणि धनुष्यें एकत्र केलीं. तीं एका ठिकाणीं बांधून अर्जुनानें शमीवृक्षावरील एका प्रचंड ढोलींत ठेवून दिलीं. तीं कोणाला दिसूं नयेत या हेतूनें त्यानें त्यांच्यावर पालापाचोळा व बारक्या डहाळ्या रचून ठेवून दिल्या. नंतर भीमानें पलीकडे पडलेलें म्हातारीचें प्रेत त्या झाडावर टांगून ठेवून दिलें.

तें प्रेत वर टांगत असतां गाई चारीत असलेल्या गोपालांनीं पाहिलें. कुतुहलानें त्यांतला एक पांडवांजवळ येऊन म्हणाला,

" या म्हातारीला तुम्ही इथें कां टांगलें आहे ? इनें तुमचा कांहीं अपराध केला आहे काय ? "

भीम चर्या उदास करून म्हणाला,

" नाहीं रे बाबांनो ! "

" मग ? "

" ती आमची आई आहे. "

आश्चर्यानें गोपाल म्हणाला,

" आई ? आणि झाडावर ? "

" होय. आमच्यांत तसाच प्रघात आहे. "

मग तीं सर्व जणें विराटनगराकडे निघालीं. वाटेंत मध्येंच थांबून युधिष्ठिर म्हणाला,

" भीमा, आपलीं सांकेतिक नांवें ? "

" होय होय. एकमेकांशीं बोलण्याचा प्रसंग आल्यास आपण कांहीं वेगळींच नांवें ठरविलीं पाहिजेत. "

अर्जुना म्हणाला,

" मी सुचवितों. "

" कोणतीं ? "

" युधिष्ठिराचें नांव जय, भीमाचें जयंत. "

" आणि तुझें ? "

" माझें विजय, नकुलाचें जयत्सेन आणि सहदेवाचें जयद्बल."

" उत्तम."

## राजसभा-प्रवेश—

विराट राजा आपल्या सभासदांशीं हास्यविनोद करीत बसला असतां त्यानें एक भव्य सुंदर पुरुष सभेंत येतांना पाहिला. तो आश्चर्यानें म्हणाला,

" अहो ! हा जणुं दुसरा इन्द्रच असा कोण येत आहे ? मात्र याचा वेश एखाद्या दरिद्री ब्राह्मणासारखा आहे."

तोंच युधिष्ठिर सभेंत येऊन उपस्थित झाला. राजाला प्रणाम करून तो म्हणाला—

" राजन्, मी आपला आश्रय इच्छित आहें."

" तुझें स्वागत आहे. पण तूं कोण आहेस ? "

" माझें नांव कंकभट. मी युधिष्ठिराचा सखा होतों. त्याचे दिवस फिरल्या-मुळें आश्रयहीन होऊन मी तुझ्याकडे आलों आहें."

" तूं कशांत प्राविण्य मिळविलें आहेस ? "

" मी द्यूत उत्तम खेळूं शकतों. त्या शास्त्रांत माझी अपूर्व गति आहे."

द्यूतप्रिय विराटाला हें ऐकून अत्यंत संतोष झाला. तो हर्षभरानें म्हणाला,

" वा वा ! तूं माझाहि सखा होऊन रहा."

" पण माझी एक अट आहे."

" कोणती ? "

" द्यूतांत मीं जिंकलेलें द्रव्य मला मिळेल, अशी चिंता तूं केली पाहिजेस. कारण द्यूतप्रिय लोक द्यूताच्या छंदांत मग्न असल्यावर काय वाटेल तें बोलून जातात. नंतर तें वचन पूर्ण करतेवेळीं ते अळंटळं करतात."

" एकदम मान्य. तूं जिंकलेलें सर्व द्रव्य मी तुला देववीन."

कांहीं वेळानें हातीं झारे व पळ्या घेतलेला आणि स्वयंपाक्यासारखीं मळकट वस्त्रें नेसलेला एक भव्यदर्शन पुरुष राजसभेंत शिरूं लागला. त्याला पाहतांच विराट विस्मित होऊन म्हणाला,

" अमात्य, हा कोण ? "

" कोण जाणे ! "

" याच्या चालण्याच्या ढबीवरून हा कोणी पृथ्वी पायतळीं तुडविणारा अजिंक्य मल्ल वाटतो. त्याचे खांदे पहा ! बाहू पहा, त्याचा आवेश पहा ! "

राजसेवकाकडे वळून विराट म्हणाला,

" जा. त्याला काय पाहिजे, त्याची चौकशी करा."

धांवतच सेवक भीमाजवळ गेले. ते त्याला थांबविण्याचा प्रयत्न करीत म्हणाले,

" भल्या माणसा, तुला काय हवें आहे ? "

पण त्यांच्याकडे यत्किंचितही लक्ष न देतां भीम सरळ विराटासमोर येऊन उभा राहिला. फारसा आदर दाखविण्याच्या भानगडींत न पडतां तो म्हणाला,

" राजा, मी स्वयंपाकी आहें."

" तें दिसलेंच. पण तुला काय काय येतें ? "

" मी षड्रसयुक्त पक्वान्नें आणि परोपरीचे भोज्य पदार्थ उत्तम रीतीनें सिद्ध करूं शकतों."

" तूं आजपर्यंत कुठें होतास ? "

" युधिष्ठिराचे पदरीं. तो महाराज मीं शिजविलेलें अन्न मोठ्या आवडीनें सेवन करीत असे."

" मीहि तसेंच करीन. पण बल्लवा, तूं मल्लयुद्ध करतोस ? "

आपल्या पुष्ट बाहूंकडे पहात भीम म्हणाला,

" होय ! केवळ मानवांशींच नव्हे. "

" तर मग ? "

" प्रमत्त गज आणि वनराज केसरी, यांच्याशींहि मी झुंजलों आहें. "

विराट राजा आनंदित होऊन म्हणाला,

" वा वा ! मग तर राणीवशांतील स्त्रियांसाठींही ही मोठीच करमणूक झाली ! बल्लवा, तूं माझ्या स्वयंपाकगृहांतला प्रमुख आचारी म्हणून मोठ्या आनंदानें रहा. "

भीम राजसेवकांबरोबर राजाच्या स्वयंपाकगृहाकडे जाता झाला.

त्याच वेळेस नागरिकांना एक अत्यंत सुंदर, पण मलिन वेषधारी स्त्री मार्गानें वेड्यासारखी इकडे तिकडे पहात चाललेली दिसली. तिचें अप्रतिम लावण्य पाहून नागरिक स्तिमित झाले. ते तिला म्हणाले,

" बाई, तूं कोण आहेस ? "

" मी आश्रय शोधीत असलेली एक सैरंध्री आहें. "

" सैरंध्रीना बालकांचें पालनपोषण आणि केशशृंगार उत्तम करतां येतो, हें आम्हांला माहीत आहे. पण तूं सैरंध्री दिसत नाहींस. "

" त्याला मी काय करूं ? "

सुदेष्णा राणी राजमंदिराच्या सौधावर अगरु आणि चंदनाच्या धुरानें आपला केशभार वाळवीत बसली असतां अचानक तिची दृष्टि राजमार्गावरील या गर्दीकडे गेली. ती दासीला म्हणाली,

" अगे, ती गर्दी कां जमली आहे ? "

दासी धांवत जाऊन पाहून आली, आणि म्हणाली,

" महाराज्ञी, एक अत्यंत सुंदर स्त्री तिथें उभी आहे. "

" माझ्यापेक्षां सुंदर ? "

दासीनें मान खालीं घातली. तो बाण तसाच सहन करून सुदेष्णा म्हणाली,

" जा तिला इकडे घेऊन ये. "

थोड्याच वेळांत सैरंध्री दासीसह राजमंदिरांत उपस्थित झाली. तिच्याकडे निरखून पहात सुदेष्णा म्हणाली,

" बाई, या नगरांत तुला यायला कुणी सांगितलें ? "

" माझ्या दुर्दैवानें. "

" पण तुझें हें रूप– "

" आतां मी त्याला काय करूं ? "

कांहीं क्षण विचार करून सुदेष्णा म्हणाली,

" तुला काय हवें आहे ? "

" आश्रय. "

" तूं एवढे दिवस कुठें होतीस ! "

" मी महाराज्ञी द्रौपदीची सेवा करीत होत्यें. "

" तुला काय काय येतें ? "

" मला मल्लिका, चंपक आदि पुष्पांच्या सुंदर माला गुंफतां येतात, अंग-प्रसाधनाचीं उत्तम उटणीं तयार करतां येतात. उत्तम केशशृंगार करतां येतो. लहानग्या राजबालकांची परिचर्या करतां येते. श्रीकृष्णपत्नी सत्यभामेकडेही मी कांहीं दिवस होत्यें. "

लोभावून सुदेष्णा म्हणाली,

" सैरंध्री, तुला इथेंच ठेवून घ्यावें असें मला वाटत आहे. पण– "

" पण काय ? "

" तुझें हें रूप ! या दासीहि लोभाविष्ट दृष्टीनें तुझ्याकडे पहात आहेत. तूं जर महाराजांच्या दृष्टीस पडलीस, तर– "

" श्रेष्ठे तूं चिंता करूं नकोस. पहिली गोष्ट, मी वर्षभर अत्यंत तीक्ष्ण व्रताचें आचरण करणार आहें. शिवाय मी कांहीं अनाथ नाहीं. "

" मग ? "

" माझे पांच गंधर्व पती रात्रंदिवस माझें रक्षण करीत असतात. माझ्याकडे वांकड्या दृष्टीनें पाहील, त्याला प्रायश्चित घडविण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं निश्चितच आहे ?"

" तर मग तूं इथें निश्चिंत मनानें रहा."

" पण माझें व्रत– "

" होय. तूं कसलें व्रत करीत आहेस ? "

" तें कुणाला सांगायचें नाहीं. मात्र त्यांतला एक भाग तुला सांगावा लागेल. "

" काय ? "

" मीं कोणाही पुरुषाचें उच्छिष्ट सेवन करणार नाहीं, आणि त्याची परिचर्या करणार नाहीं."

" ठीक आहे. "

द्रौपदीला आश्रय मिळाला.

विराट राजा आपल्या गोधनाची चौकशी करीत असतां त्यानें एक आश्चर्य पाहिलें. एक अपरिचित देखणा पुरुष गाईजवळ उभा होता, आणि गाई त्याच्याभोंवतीं गोळा झाल्या होत्या. विराटाला अत्यंत आश्चर्य वाटून त्यानें सेवकांस त्या पुरुषाला आपणाकडे बोलविण्यास सांगितलें. तो आल्यावर विराट म्हणाला,

" मित्रा, माझ्या गाई तुझ्याभोंवतीं गोळा होऊन कौतुकानें तुझा हात चाटीत आहेत. तूं कोण आहेस ?"

" मी तंतिपाल नामक वैश्य आहें. "

" या नगरास तूं आजच आलास काय ? "

" होय. "

" गाईच्या तुजवरील प्रेमाचें कारण—"

" सांगतों. मी युधिष्ठिराचा मुख्य गोपाल होतों. गाईचे सर्व रोग, त्यांवरचे उपाय, गाईबैलांची उत्तम परीक्षा, त्यांचे रोग न पसरण्याकरितां करावे लागणारे उपाय, या सर्व विषयांत माझा हात कोणीही धरूं शकत नाहीं. "

" मग तूं इथें कां आलास ? "

" मी राजाश्रय शोधीत आहें. "

" आणि मी तुला आश्रय देत आहें. माझ्याजवळ एक कोटि गोधन आहे. मी तुला माझ्या सर्व गोपालांचा मुख्य नेमीत आहें. "

त्याच दिवशीं सायंकाळीं नागरिकांना आणखी एक गंमत दिसली. पुरुष असूनही वेणी, लुगडें, चोळी, मनगटापर्यंत शंखवलयांचीं कंकणें, अशा वेशानें सलज्ज असलेला एक सुंदर पुरुष नगराच्या तटाजवळ उभा होता.

लोक त्याच्याभोंवतीं गोळा होऊन त्याला हंसत म्हणाले,

" तूं कोण आहेस ?

उत्तर न देतां नृत्यांचे पदन्यास करीत तो पुरुष राजमंदिराकडे निघाला. नागरिक धांवत राजसभेत गेले, आणि राजास सांगूं लागले,

" राजन्, एक क्लीब इकडे येत आहे. "

" केवळ त्याचा वेशच क्लीबाचा आहे—"

" पण चाल सिंहासारखी आहे. "

" अपूर्व असे नृत्यांतले पदन्यास करीत तो इकडे येत आहे. "

राजा उठून म्हणाला,

" असें ? तर मग त्याची चौकशी मला स्वतःलाच केली पाहिजे. "

तोंच तो स्त्रीवेषधारी पुरुष राजसभेत उपस्थित झाला. त्याला थट्टेनें राजा म्हणाला,

" वीर पुरुषा, तूं कोण आहेस ? "

उत्तर न देतां अर्जुन हनुवटीखालीं हात देऊन लाजून राजाकडे बघत उभा राहिला. मोठमोठ्यानें हंसत राजा म्हणाला,

" वा वा ! तुला अमात्य करून तुझ्याकडे राज्यकारभार सोंपवावा असें माझ्या मनांत आहे. "

" त्याऐवजीं असेंच कां कराना ? "

" कसें ? "

" मला तुमच्या नृत्यशाळेंत शिक्षक म्हणून ठेवा. "

" शिक्षक कीं शिक्षिका ? " एका सभासदानें विचारलें.

" नांव वाटेल तें दिलेंत तरी चालेल. "

" तुला नृत्य करतां येतें ? " राजा बोलला.

" माझ्यासारखें नृत्य पृथ्वीवर कोणालाही करतां येणार नाहीं. "

" आणखी काय येतें ? "

" मी उत्तम गातें. "

" गातेस कीं गातोस ? "

" हवें तें म्हणूं शकतां. "

" मला वाटतें कीं—"

" होय, मी क्लीब आहें. मला बृहन्नला म्हणतात. मात्र एवढें सांगतें, कीं माझ्यासारखी शिक्षिका तुला मिळायची नाहीं. "

मंत्र्यांचा विचार घेऊन त्या पुरुषाच्या क्लीबत्वाची परीक्षा पाहिल्यावर राजा त्यास म्हणाला,

" बृहन्नले, तूं राजकन्या उत्तरेला व तिच्या सखींना नृत्य शिकवशील ? "

" हा मी तुझा थोर अनुग्रह मानीन. "

" तर मग आजपासूनच. "

पार्थ गायन वादन आणि नर्तनानें कांहीं क्षणांतच अंतःपुराचें भूषण झाला.

दुसरे दिवशीं सकाळीं राजा अश्वशाळेंत हिंडत असतां तिथेंच अश्वांची परीक्षा करीत असलेला एक पुरुष त्याला दिसला. राजा म्हणाला,

" भल्या माणसा, तूं कोण आहेस ? "

" मी अत्यंत कुशल असा अश्वपरीक्षक आहें. "

" तूं आजपर्यंत कुठें होतास ? "

" राजा युधिष्ठिराकडे. "

" त्याचे अश्व—"

" होय. त्यांची परीक्षा मींच केली होती. वाटेल तसला खोड्याळ अश्व असला, तरी माझ्या देखरेखीखालीं तो सुतासारखा सरळ होतो. मीं शिकवलेला अश्व कधीं भित्रा निपजत नाहीं. उत्तम रीतीनें युद्धांत अगर मृगयेंत तो अश्वरोह्याच्या आज्ञेंत वागतो. शिवाय मला अश्वांचे रोग व त्यांवरील औषधी यांचें संपूर्ण ज्ञान आहे. "

" तुला काय म्हणतात ? "

" युधिष्ठिर मला ग्रंथिक या नांवानें हांक मारीत असे. "

" ग्रंथिका, मी तुला आजपासून माझ्या अश्वशालेचा अधिकारी नेमतों. मात्र तुझ्या येण्यानें माझ्या मनांतली एक व्यथा पुन्हां मला त्रास देऊं लागली आहे. "

" कोणती ? "

" पांडवांकडील गोपाल, कंकभट आणि बल्लव असे तिघे माझ्याकडे आले आहेत. "

" मग ? "

" बाबारे, तूं सामान्य अश्वपाल असल्यानें तुला राजपुरुषांचें दुःख कळणें शक्य नाहीं. ते बिचारे पांडव तुम्हां सर्वांवांचून वनांत कसे जगत असतील कोण जाणे ! "

ग्रंथिकानें राजाला नकळत एक निःश्वास टाकला.

## कीचकवध—

अशा रीतीनें त्या साही श्रेष्ठांस विराटाचे घरीं आश्रय मिळाला. एकमेकां-कडे गुप्तपणें ध्यान ठेवीत त्यांचा काळ व्यतीत होऊं लागला. मात्र दासभावानें विराटाची सेवा करतांना त्या सर्वांना जें काय सोसावें लागे, तें पाहून त्या सर्वांच्याच मनाला अत्यंत क्लेश होत.

विराटाच्या राजसभेंत त्याची वृत्ति पाहून युधिष्ठिराला वागावें लागे. राजा म्हणेल तेव्हां त्याच्या समोर उपस्थित होऊन युधिष्ठिराला जेव्हां द्यूताचे फासे टाकण्यांची पाळी येई, त्या वेळीं त्याच्या मनाला क्षणभर तीव्रतम वैराग्याचा झटका येऊन जाई. पण तो मोठ्या श्रमांनीं तें सर्व पिऊन जाऊन राजाला संतुष्ट ठेवी.

भीमाची स्थिति तर याहून अधिक अवघड होती. विराटाच्या नगरींत शरदृतूंतील ब्रह्मदेवाचा महोत्सव सुरू झाला. त्या उत्सवांत नाना देशांचे मल्ल एकत्र झाले होते. पैकीं जीमूत नामक मल्लाशीं मल्लयुद्ध करून भीमानें त्याला ठार मारलें.

हें पाहून त्याच्या बळावर राजा अत्यंत संतुष्ट झाला. एके दिवशीं राणी-वंशांतील स्त्रियांसमोर त्यानें भीमाला एका हत्तीशीं झुंज करायला सांगितलें. निरुपाय होऊन भीमानें त्या हत्तीचा प्राण घेतला. हें पाहून अधिकच प्रोत्साहित होऊन राजा त्याला म्हणाला,

“ बल्लवा ! ”

“ आज्ञा राजेन्द्र ! ”

“ आतां तूं एखाद्या सिंहाशीं झुंज घ्यावीस, अशी आमच्या राणीची इच्छा आहे. ”

संताप गिळून भीम म्हणाला,

“ जशी आपली इच्छा ! ”

निःशस्त्र भीमानें सिंहाचा वध केलेला पाहून राणी म्हणाली,

“ महाराज मी म्हणत्यें—”

" काय ? "

" हा बल्लव तर रानटी रेड्याशींही झुंजू शकेल! "

" हो हो ! काय बल्लवा ? तुझी याला संमति आहे ना ? "

बापडा संमति न देऊन करतो काय ? द्रौपदीच्या मनाला हें पाहून अपरंपार वेदना होत. तरी पण तिला विष पिण्याचा मोह होई, ती अर्जुनाची अवस्था पाहून !

उत्तरा आणि तिच्या सख्या, यांना भलत्याच वेळीं बृहन्नलेचें नृत्य पाहाण्याची इच्छा होई. नाहीं म्हणायची सोय नाहीं. मग स्त्रीवेष धारण केलेल्या त्या पुरुषोत्तमाला त्या मुलींसमोर नानाप्रकारचे हावभाव करीत नाचावें लागे !

अत्यंत बुद्धिमान सहदेवाला गोधनें सांभाळीत राहावें लागे, तर नकुलाला राजाबरोबर घोड्याचा लगाम धरून धांवावें लागे !

अशा स्थितींत कसे तरी दिवस ढकलीत असतां द्रौपदीसमोर आणखी एक महाविघ्न येऊन तिला आपल्या विकराळ दाढा दाखवीत उभें ठाकलें !

एके दिवशीं सुदेष्णेचा भाऊ आणि विराटाचा सेनापति कीचक बहिणीला भेटण्यासाठीं तिच्या प्रासादांत आला होता. अचानक त्याची दृष्टि सैरंध्री द्रौपदीवर गेली. आश्चर्यानें स्तिमित होऊन तिच्याकडे टक लावून पहात तो सुदेष्णेला म्हणाला,

" ताई, ही कोण ? "

" ती माझी दासी. "

" छे ! शक्य नाहीं ! "

" कां ? "

कामशरानें पीडित झाल्यामुळें कीचकाचा तोल सुटत चालला होता. तो सारासार विचार हारपून म्हणाला,

" तुझ्यासारख्या शंभर स्त्रियांनीं हिची परिचर्या करावी, असें हिचें रूप आहे ! "

" काय ? "

" होय ताई, आणि हिला तूं आपली दासी करून ठेवलीस ? "

उन्मत्त कीचक सैरंध्रीकडे गेला. शब्दांत शक्य तितकें मार्दव आणून तो म्हणाला,

" हे कोमलांगी, तूं इथें केव्हां आलीस ? आणि असा दासीभाव पत्करून तूं कां रहात आहेस ? "

खालीं मान घालून द्रौपदीनें विरक्त स्वरांत उत्तर दिलें,

" माझें दुर्दैव कोपलें म्हणून. "

" नव्हे सुमुखी ! तुझें सुदैव म्हणून तूं माझ्या दृष्टीस पडलीस. "

" म्हणजे ? "

" म्हणजे काय तें कळलें नाहीं ? ऐक. इथून पुढें हें तुझें कोमलतेच्या बाबतींत कमलदलाशीं स्पर्धा करणारें शरीर मी दास्यांच्या योगानें असें झिजूं देणार नाहीं. "

" मग ? "

" हे मृगलोचने, तुझी कमनीय आकृति पाहून माझे प्राण तृषाक्रांत झाले आहेत. तुझ्या अधरसंपुटांत सांठवलेलें अमृत प्याल्याविना त्यांचें समाधान होणार नाहीं. "

द्रौपदी संतापानें तप्त झाली. स्वरावर शक्य तितका संयम ठेवून ती म्हणाली,

" भल्या माणसा, लक्षांत घे, मी परस्त्री आहे. "

" परस्त्री ? दासी असून पुन्हां परस्त्री ? "

" होय रे होय. माझे गंधर्वपति माझें रक्षण अदृश्यरुपानें करीत आहेत. "

कीचक अधीरतेनें म्हणाला,

" आणि तरी तूं या सुदेष्णेची सेवा करीत आहेस ? छे छे ! हे शुभे, तूं जर माझ्या म्हणण्याला संमति देशील, तर मी माझ्या सर्व स्त्रियांना हांकून देऊन तुझा – केवळ तुझाच होऊन राहीन. लक्षांत घे, कीं

विराट केवळ नांवापुरताच राजा आहे. या देशावर खरा अधिकार माझाच चालतो. ”

“ कशाला प्रौढी गातोस ? माझ्या पतींच्या अंगीं त्रैलोक्यालाही शिक्षा लावण्याचें सामर्थ्य आहे. शहाणा असशील, तर माझा नाद सोडून दे. नाहींतर इहलोकींच काय, पण स्वर्ग लोकांत जरी तूं लपलास, तरी माझ्या पतींच्या क्रोधापासून तुला वांचविण्याचें सामर्थ्य असलेला कोणी मला दिसत नाहीं. ”

त्याचा तिरस्कार करून सैरंध्री निघून गेली खरी, पण त्यामुळें कीचकाचा कामज्वर कमी न होतां उलट त्यांत भरच पडली.

सुदेष्णेकडे जाऊन तो म्हणाला,

“ सुदेष्णे, मी जिवंत रहावेंसें तुला वाटतें कीं नाहीं ? ”

ती आश्चर्यानें म्हणाली,

“ तूं हा असा भलताच प्रश्न काय करतोस ? ”

“ मग सैरंध्री माझी झाली पाहिजे ! ”

“ अरे पण— ”

“ मी कांहींही ऐकून घेणार नाहीं. तिच्यावांचून मी प्राण धारण करूं शकत नाहीं. ”

कांहीं क्षण विचार करून सुदेष्णा म्हणाली,

“ भ्रात्या, एक करशील ? ”

“ काय ? ”

“ येत्या चतुर्दशीला तुझ्या घरीं तूं उत्तम सुरा तयार कर. ”

“ आणि ? ”

“ मी माझ्यासाठीं तें पेय आणण्यासाठीं सैरंध्रीला तुझ्या प्रासादांत पाठवीन. मग एकांतांत ती तुला कशा रीतीनें वश होऊं शकेल तें तुझें तूं पाहा ! ”

अत्यंत आनंदित होऊन कामोन्मत्त कीचक आपल्या प्रासादांत गेला, आणि त्यानें उत्तम मदिरा सिद्ध करविली, आणि तो कामातुर अत्यंत उत्सुक होऊन सैरंध्रीची वाट पाहूं लागला.

इकडे सुदेष्णा सैरंध्रीला म्हणाली,

" सैरंध्री माझें एक काम कर."

" आज्ञा व्हावी. "

" मला मदिरापान करण्याची अत्यंत तीव्र इच्छा झाली आहे. "

" मग भांडारांतून उत्तम मदिरा आणूं काय ? "

" नको. कीचकानें अत्यंत श्रेष्ठ मदिरा सिद्ध केली आहे असें मी ऐकतें. तेव्हां त्याच्याकडे जाऊन माझ्यासाठीं सुवर्णपात्रांत मदिरा घेऊन ये. "

सुदेष्णेची आज्ञा ऐकतांच द्रौपदी भयाच्या आशंकेनें जागींच खिळल्यासारखी उभी राहिली. तें पाहून सुदेष्णेनें विचारलें,

" तुला ऐकूं आलें नाहीं काय ? "

" आलें— "

" मग उद्धटासारखी उभी कां आहेस ? "

" देवि, आपण कीचकाच्या घरीं माझ्याऐवजीं दुसऱ्या एखाद्या दासीला धाडा. "

" कां ? "

" तो नीच परस्त्रीलंपट आहे. माझ्यावर त्याची कामुक दृष्टि जडलेली आहे. मी प्राणांतीही त्याला वश होणार नाहीं, हें मी आपल्याला सांगितलेंच आहे. "

सुदेष्णा संतापून म्हणाली,

" तुझी एवढी धृष्टता अं ? तो कांहीं तुला खाऊन टाकीत नाहीं. जा ! नीघ ! "

सुदेष्णेनें द्रौपदीला हात धरून काढून लावलें ! बिचारी मूकपणें आसवें गाळीत कीचकाच्या निवासस्थानाकडे निघाली. जातांना तिचे पाय थरथरत

होते. मुद्रा मलूल झाली होती. सर्वांगाला कम्प सुटला होता. मात्र तिला हा विश्वास होता, कीं जर माझ्या मनीं आजपर्यंत कांहींही अनिष्ट निर्माण झालें नसेल, तर कीचक माझें अहित करूं शकत नाहीं.

उतावळा होऊन सैरंध्रीची वाट पहात असलेल्या कीचकाच्या दृष्टीस जेव्हां हातीं मद्यपात्र घेऊन येत असलेली ती दिसली, तेव्हां अत्यंत हृष्ट होऊन तो प्रासादाच्या दाराशीं आला, आणि म्हणाला,

" ये ये ! सुंदरि, तुझें स्वागत आहे ! "

आशंकेनें थरथरत सैरंध्री प्रासादाच्या पायऱ्या चढूं लागली. कीचक उन्मत्तासारखा बरळला,

" ये ये ! खरोखरीच माझ्या जीवनांत आजचा दिवस अत्यंत धन्य आहे ! "

धांवत मद्यानें भरलेली भली थोरली सुरई उचलीत तो म्हणाला,

" हें बघ, तुझ्यासाठीं अत्यंत श्रेष्ठ मद्य मुद्दाम सिद्ध करविलें आहे ! "

शेजारींच मंचकावर ठेवलेलीं आभरणें हातांत घेत तो म्हणाला,

" हीं कंकणें बघ ! हीं कुंडलें, हीं रेशमी वस्त्रें ! हें सर्व तुझेंच आहे—ये ! याची स्वामिनी हो ! "

द्रौपदीच्या अंगीं कुठून आवेश संचारला कोण जाणे; ती म्हणाली,

" हे सुता, मी तुझ्यासाठीं इथें आलेली नाहीं. "

" मग ? "

" राजमहिषीला मद्य हवें आहे. "

" एवढेंच ना ? "

" तें नेण्यासाठीं "

" उं : ! हीं सामान्य कामें करण्यासाठीं ही असामान्य रूपसंपदा निर्माण झालेली नाहीं. तें काम कोणी बटकी करील. तूं ये. या मंचकाची शोभा वृद्धिंगत कर ! "

लंपट कीचकानें पुढें होऊन द्रौपदीचा हात धरला. ती त्याला झिडकारीत म्हणाली,

" कामांधा, तुला या तुझ्या अपकृत्याचें प्रायश्चित्त मिळाल्याशिवाय कधींही राहाणार नाहीं ! "

तरी पुढें होऊन हंसत कीचकानें तिच्या वस्त्राला हात घातला. तों तिनें त्याला असा जबरदस्त हिसडा दिला कीं, तो कोलमडून खालीं कोसळला. आपला असा अपमान झालेला पाहतांच तो संतापला, आणि उठत सैरंध्रीला उद्देशून नाहीं नाहीं ते अपशब्द बोलूं लागला.

तो आपला पाठलाग करणार हें उमगतांच ती तिथून धांवत विराटाच्या सभेकडे निघाली. त्या वेळीं सभेंत विराट आणि इतर सभासद यांचेबरोबर कंकभट आणि बल्लव हे दोघेंही उपस्थित होते. अचानक त्या दोघांचें लक्ष द्रौपदीकडे गेलें.

अपमानित झालेल्या कीचकानें धांवत दांत खात द्रौपदीचे केश धरून तिला हिसडा दिला, आणि तिच्या पाठींत लाथ मारली. ती भूमीवर कोसळून पडली.

हें पाहतांच बल्लव संतापानें थरथरत आणि मुठी वळीत स्थानावरून उठूं लागला. त्वरित कंकभटानें त्याचा हात धरून त्याला विचारलें,

" बल्लवा, तूं तिकडे कां पहात आहेस ? "

" मला–"

" होय. लांकडें हवीं आहेत स्वयंपाकासाठीं. पण बाहेर पुष्कळ वृक्ष आहेत, त्यांचीं तोडून घेतलींस तरी चालेल. "

तोंवर आक्रोश करीत असलेली द्रौपदी राजसभेंत उपस्थित झाली, आणि म्हणाली,

" राजा, तुझ्या डोळ्यांदेखत या कुत्र्यानें मला लाथ मारून खालीं पाडलें–"

कंकभट म्हणाला,

" ऐक सैरंध्री ! "

उसळून ती म्हणाली,

" काय ऐकूं ? अत्यंत प्रबल अशा माझ्या गंधर्व पतींना धिःकार असो ! एखाद्या क्लीबाप्रमाणें त्यांनीं हा सर्व प्रकार सहन केला—"

" पण सैरंध्री—"

" राजा, तूं जर आतां या अपराधाबद्दल कीचकाला शासन करणार नसशील, तर व्यर्थ गेलें तुझें राजपद आणि व्यर्थ झाली तुझी राज्यसत्ता ! "

खजील झालेला विराट म्हणाला,

" सैरंध्री, तुझ्या वादाचें कारण जर मला माहीत नाहीं, तर मी निर्णय करूं कसा ? "

सैरंध्रीनें लज्जेनें आणि क्रोधानें व्याकुल होऊन सर्व वृत्त सांगितलें. सभासद म्हणाले,

" सैरंध्री, तूं धन्य आहेस ! "

" खरोखरच कीचकानें हें अपकृत्य केलें आहे. "

" याबद्दल त्याला शासन झालेंच पाहिजे. "

" नाहीं तर न्यायाची प्रतिष्ठा उणावेल. "

कंकभट कपाळावरचा घाम पुशीत सैरंध्रीला म्हणाला,

" सैरंध्री, आतां तूं इथें थांबूं नको. "

" मग ? "

" सुदेष्णा राणीच्या प्रासादांत जाऊन तिचा आश्रय घे."

" आणि माझ्या या असह्य अपमानाचा प्रतिशोध ? "

" तोही घेतला जाईल. "

" केव्हां ? "

" कदाचित् ही वेळ योग्य नाहीं, म्हणून तुझे गंधर्व पति योग्य समयाची वाट पहात असावेत. तसा समय प्राप्त होतांच कदाचित् ते या कृत्याचा जाब विचारतीलही. आतां तूं जा. "

अपमानानें लांछित झालेली द्रौपदी मान खालीं घालून आंसवें पुशीत सुदेष्णेच्या प्रासादांत गेली. एकंदर प्रकार कळल्यावर सुदेष्णेनें तिचें समाधान

करायचा प्रयत्न केला. पण तिचा क्रोधाग्नि केवळ शब्दांनीं विझूं शकला नाहीं.

वारंवार ती मनाशीं म्हणे,

" एवढे प्रबल पराक्रमी पति उपस्थित असतांहि माझी एखाद्या स्वैर वर्तनाच्या बटकीसारखी अवस्था व्हावी ना ? "

तिनें सर्वांग जलानें धुऊन काढलें. पण तेवढ्यानें अपमानाच्या खुणा बुजेनात. ती रात्र होण्याची वाट पहात तळमळत बसून राहिली.

प्रहर रात्र उलटून गेली. पाकशाळेंतील आपल्या स्थानीं बल्लव शय्येवर पहुडला होता. तोंच त्याला अंधारांत कुणी आपल्याकडे येत आहेसें दिसून आलें. घोगऱ्या आवाजांत तो बोलला,

" कोण ? "

उत्तर न देतां सैरंध्री त्याच्याजवळ आली, आणि लतेनें वृक्षाचा आश्रय घ्यावा, तशी ती त्याच्या विशाल वक्षःस्थलावर डोकें ठेवून मुसमुसून रडूं लागली. तिच्या पाठीवर हात फिरवीत बल्लव म्हणाला,

" उगी ! रडूं नये ! "

" रडूं नये ? मग काय करावें ? "

" कृष्णे— "

" ऐका महाराज ! एका क्षुद्र कुत्र्यानें मला अपमानित केली असूनही जर माझे पति स्वस्थपणें झोंपा काढूं शकतात तर मी रडण्यापलीकडे काय करावें ? "

" ऐक सैरंध्री ? मला सर्व कांहीं सांग, आणि इतर सेवक जागे होण्यापूर्वी तूं आपल्या स्थानीं जा. "

" काय सांगूं ! युधिष्ठिरासारखा धर्मनिष्ठ पुरुष जिचा पति, तिच्या वांट्याला सुख कुठून येणार ? "

" दादाची निंदा कां करत्येस कृष्णे ? "

उसळून द्रौपदी म्हणाली,

" केवळ दादांची नाहीं तर तुमचीही करत्यें ! "

" पण—"

" अहो पराक्रमी वीरपुंगव, असें कां करीत नाहीं ? "

" काय ? "

" मला थोडं विष आणून द्या ! "

" कृष्णे ! "

" होय ! अशा अपमानित स्थितींत जगण्यापेक्षां विष खाणेंच मला बरें वाटतें ! एवढे प्रबल पराक्रमी माझे पति ! पण ते काय करीत आहेत ? ऐकायचें आहे ? "

" नको कृष्णे ! "

" छे ! आज तुम्हाला ऐकलेंच पाहिजे ! ज्यांनीं भरतखंडाचा सम्राट ही बिरुदावली एकदां मिरविली ते महाराज युधिष्ठिर आज विराटाच्या नेत्रसंकेता-प्रमाणें फांसे टाकण्यांत धन्यता मानीत आहेत ! ज्यांनीं एकदां जरासंधाला पायाखालीं तुडविलें, ते महाराज भीम आज विराटाच्या पाकशाळेंत कणीक तिंबीत आहेत ! ज्यांनीं एकदां प्रत्यक्ष भगवान् शंकराला युद्धांत विचार करायची पाळी आणली, ते महाराज अर्जुन आतां या मुलीपुढें कोणता नृत्य-विन्यास करूं अशा चिंतेंत मग्न आहेत ! स्त्रीवेषानें हो महाराज ! स्त्रीवेषानें ! बाळ्या, बुगड्या, कंकणें, वेणी ! छी छी छी ! "

" अगे कृष्णे ! "

" अजून झालें नाहीं. सत्यप्रतिज्ञ सहदेव आज गोचर्मांच्या संभारांत स्वस्थपणें झोंपूं शकत आहेत ! अपूर्व रूपवान् महाराज नकुल आज विराटाच्या घोड्यांच्या शिंग्यांना धरून मैदानांत पळवीत आहेत ! आणि—आणि—"

" नाहीं द्रौपदी ! आतां माझ्यानें ऐकवत नाहीं ! "

" महाराज, आपल्याला ऐकलेंच पाहिजे ! " आपले अत्यंत मृदु असलेले हात भीमासमोर धरून द्रौपदी म्हणाली,

" हे हात पहा महाराज ! "

भीमानें ते मृदु हात आपल्या हातीं घेतले. द्रौपदी म्हणाली,

" या हातांवरून एकदां लक्ष लक्ष सुवर्ण मुद्रांच्या दानाचें पाणी खालीं ओघळलें आहे ! आणि आज—"

" बोल द्रौपदी ! "

" आज त्यांना घट्टे पडले आहेत ! "

" घट्टे ? "

" होय ! चंदन उगाळून ! या क्षुद्र विराट राजासाठीं ! त्याला माझ्या-शिवाय कुणींही उगाळलेलें चंदन आवडत नाहीं म्हणे ! "

तिचे ते हात आपल्या गळ्याभोंवतीं लपेटून घेत भीम म्हणाला,

" सांग कृष्णे ! मी काय करूं ? "

" कीचकाला शासन करा ! "

" ऐक कृष्णे. आज रात्रीं त्याला त्याच्या अपराधाचें प्रायश्चित्त मिळेल. तूं त्याच्याशीं संकेत करून त्याला आज मध्यरात्रींच्या सुमारास नृत्यशाळेंत धाड. तिथें—एकान्तांत—आतां तूं जा ! "

दुसरे दिवशीं सकाळीं पुन्हां कीचक निर्लज्जपणें द्रौपदीजवळ आला, आणि तिला म्हणाला,

" सैरंध्री, पाहिलेंस ना ? कुणीही माझ्या हातून तुझा बचाव करूं शकत नाहीं ! तूं माझें ऐकशील तर—"

एकदां द्रौपदीला वाटलें, धरित्री दुभंग झाली तर बरें ! पण कशीबशी ती म्हणाली,

" वीरा, मला माझ्या पतींची भीति वाटते ! "

" असें ? तर मग एकांतांत—"

" होय. नृत्यशालेंत रात्रीं कुणीही नसतें—"

हर्षभरित कीचक म्हणाला,

" मग आज रात्रीं—"

द्रौपदी पुटपुटली,

" होय ! "

त्या रात्रीं कीचक देखणा वेष करून नृत्यशालेकडे निघाला. अंगाला सुगंधी उटी लावून त्यानें चम्पक पुष्पांच्या माला व अलंकार धारण केले होते. सैरंध्रीच्या अपूर्व रूपाचें चिंतन करीत तो नृत्यशालेंत पोंचला. तिथें एक पर्यंक आहे, हें त्याला माहीत होतें. अंधारांत त्या पर्यंकाच्या दिशेनें चांचपडत जात तो हळू आवाजांत म्हणाला,

" सैरंध्री, मात्प्रिये, तूं आली आहेस ना ? "

उत्तर आलें,

" हो ! "

" कुठें आहेस ? "

" ही इकडे ! "

आतुर कीचक पर्यंकाजवळ गेला, तोंच त्याच्या गळ्याभोंवतीं भीमाची वज्रमिठी पडली ! कीचकानें ओळखलें कीं, प्रसंग असामान्य आहे ! तो अस्फुट स्वरांत म्हणाला,

" कोण ? "

" सैरंध्रीचा गंधर्वपति ! तुझा काळ ! "

आणि त्या दोघांची झुंज सुरूं झाली ! कधीं भीमाचा जोर अधिक होई, कधीं कीचकाचा. एकदां तर कीचकानें भीमाला गुडघ्यावरही बसविलें. बरेच दिवस नाना प्रकारच्या चिंतांनीं भीमाचें शरीरबल किंचित् उणावलें होतें.

पण आपल्या पत्नीचा कीचकानें केलेला अपमान ध्यानीं येतांच भीमांतलें सुप्त बल जागें झालें. त्यानें आपल्या पुष्ट भुजांमध्यें कीचकाला धरून अशा वेगानें आवळलें कीं, त्याची शुद्ध हारपत चालली ! हें पाहून त्याला उचलून गरगरां फिरविलें, आणि भूमीवर आपटून त्याच्या छातीवर पाय देत तो हें त्याचें भीषण कृत्य पहात उभी राहिलेल्या द्रौपदीला म्हणाला,

" बघ पांचाली ! तुझी अप्रतिष्ठा करणाऱ्याला मिळणारें हें प्रायश्चित बघ ! "

नंतर भीमानें त्याचा गळा दाबून त्याचा प्राण घेतला. कीचकाचे दोन्ही नेत्र भयासूनपणें बाहेर लोंबले होते. त्याचे हात व पाय हिसडून तोंडीत भीमानें ते त्याच्या रक्तानें लथपथलेल्या शरिरांत कोंबले, आणि तो बोलला,

"द्रौपदी, आतां तूं निश्चिन्त झाली आहेस!"

ती म्हणाली,

"आपण आतां पाकशालेंत निघून जावें!"

"कां?"

"युद्धाचा कोलाहल ऐकून राजसेवक इकडे येत आहेत."

भीम गेल्यावर बाहेर गोळा झालेल्या राजसेवकांना द्रौपदी म्हणाली,

"इकडे येऊन एकदां पहा—"

"काय?"

"माझा अपमान करणाऱ्याला माझ्या गंधर्वपतींनीं केलेलें शासन!"

कीचकाचा तो तुडवून टाकलेला देह पाहून चकित झालेल्या सेवकांनीं तांतडीनें कीचकाचे संगीसाथी जे एकशें पांच अनुकीचक, त्यांना ही बातमी सांगितली. आक्रोश करीत ते सर्व कीचकाच्या प्रेताभोंवतीं गोळा झाले. तिथें उभी असलेल्या द्रौपदीला पाहून दांत खात ते म्हणाले,

"हिला ठार करा!"

"होय! या चांडाळणीला ठार मारलेंच पाहिजे."

"हिच्यामुळें आमचा हा नेता मृत्यूस पात्र झाला आहे!"

"थांबा!"

"कां?"

"आपण हिला आपल्या नेत्याबरोबर जिवंत जाळूं या."

"होय, होय!"

नंतर द्रौपदीला बलात्कारानें बांधून ते संतापलेले अनुकीचक श्मशानाकडे निघाले. ती बिचारी आक्रोश करूं लागली,

"अहो जय! जयंत! विजय! जयत्सेन! जयद्बल! तुमच्या पत्नीला हे अनुकीचक जाळण्यासाठीं नेत आहेत!"

तिचा हा आक्रोश पाकशालेंत भीमाच्या कानीं गेला. तो तसाच उठून

तटावर उडी मारून एका वृक्षावर चढला. त्याला अनुकीचकांचा समुदाय द्रौपदीसह श्मशानाकडे येत असलेला दिसला.

तत्क्षणीं खालीं उतरून त्यानें एक प्रचंड वृक्ष मोडून हातीं घेतला. अनुकीचकांच्या अगोदर श्मशानांत पोंचून तो विकराळ मुद्रेनें त्यांची वाट पहात उभा राहिला. ते येतांच त्यानें त्या सर्वांना झाडानें झोडपून ठार मारलें. आणि द्रौपदीची मुक्तता केली.

द्रौपदीनें स्नान केलें, आणि पवित्र होऊन प्रसन्न मुद्रेनें ती राजमंदिराकडे चालली. नागरिकांना जेव्हां हा भीषण प्रकार कळला, तेव्हां भीतीनें त्रस्त होऊन ते राजाकडे आले.

" महाराज !"

" काय आहे ?"

" द्रौपदीच्या गंधर्व पतींनीं कीचक आणि अनुकीचक—सर्वांचा वध केला आहे. ती प्रसन्न मुद्रेनें राजमंदिराकडे येत आहे. "

आश्चर्यचकित विराट म्हणाला,

" खरें ? "

" होय महाराज ! आम्हांला हिचें भय वाटतें. आम्हांवरही काय प्रसंग येईल कोण जाणे ! "

राजा त्वरेनें सुदेष्णेच्या प्रासादांत गेला, आणि तिला म्हणाला,

" प्रिये, सैरंध्री तुझी दासी आहे. "

" मग ? "

" तिच्यामुळें केवढा आकांत झाला याची तुला कल्पना नाहीं. "

कीचक आणि अनुकीचकांच्या वधाचें वृत्त तिला सांगून राजा म्हणाला,

" तूं तिला आजच्या आज हें राज्य सोडून जायला सांग. ती सुखी असो, पण दुसरीकडे ! "

सैरंध्री येतांना पाकशाळेजवळ थांबली आणि भीमाकडे पाहात म्हणाली,

" माझ्या गंधर्व पतींचा विजय असो. "

ती नृत्यशाळेजवळ येतांच विराटाच्या मुलींनीं तिला पाहिलें. बृहन्नलेला बरोबर ओढीत नृत्य शिक्षा अर्धवट सोडून त्या बाहेर धावल्या आणि सैरंध्रीला म्हणाल्या,

" सैरंध्री, तुझें कुशल असो. तुला छळणारे नाश पावोत. "

बृहन्नला म्हणाली,

" सैरंध्री, तूं त्यांच्या हातून कशी सुटलीस ? "

तिच्याकडे कृतककोपानें पहात सैरंध्री म्हणाली,

" त्याच्याशीं तुझा संबंध काय ? तूं सुखानें मुलींना नृत्य शिकवीत रहा."

" असें ग काय बोलत्येस ? "

" मग कसें बोलूं ? तूं मला मोठ्या कौतुकानें सुटकेची वार्ता विचारीत आहेस. स्त्रियांना कसें दुःख भोगावें लागतें, याची तुला कशी कल्पना येऊं शकणार ? "

सैरंध्री त्या घोळक्याबरोबर राणीच्या आवारांत शिरली. तिला पाहतांच राणी म्हणाली,

" बाई सैरंध्री, आतां तूं इथें राहूं नकोस. "

" कां ? "

" तुझें आम्हां सर्वांना भय वाटतें. "

" भय ? "

" होय. तुझे गंधर्व पती आणखी कोणाकोणाचा वध करतील कोण जाणे ! त्यापेक्षां तूं मनाला येईल तिकडे जा ! "

चिंतित सैरंध्री काकुळतीनें म्हणाली,

" थोडें माझेंही ऐकाल काय ? "

" बोल. "

" माझें गंधर्व पती अविचारी नाहींत. उलट ते फार विचारी आहेत. आजपासून तेरा दिवसांनींच ते मला येथून घेऊन जाणार आहेत. तेव्हां हे तेरा दिवसच आपण मला आपल्या छायेंत राहूं द्यावें. "

" केवळ तेराच दिवस ? "

" होय ! एवढे दिवस कृपा केलीत तशी आणखी तेरा दिवस—"

" ठीक आहे. "

गोहरण—

कीचकवधाची ही वार्ता नाना आकार धारण करून देशभर पसरली. ती हस्तिनापुरींही जाऊन पोंचली.

पांडवांच्या शोधासाठीं जे दूत दुर्योधनानें देशोदेशीं धाडले होते ते निराश होऊन परतले. राजसभेंत ते पोंचले असतां दुर्योधन त्यांना म्हणाला,

" कांहीं वार्ता ? "

" हे युवराज ! नाना देश आणि वनें कसोशीनें शोधूनही ज्या अर्थी पांडवांचा कांहींच मागमूस लागला नाहीं, त्या अर्थी ते मृत झाले असावेत, अशीच शंका आम्हांला येत आहे. पण एक शुभ वार्ता मात्र आम्हीं आणली आहे."

" कोणती ? "

" आपला शत्रु विराट राजा, याचा सेनापति कीचक गंधर्वांकडून ठार मारला गेला ! "

सर्व कौरव एकत्र झाले. दुर्योधन म्हणाला,

" मित्रा कर्णा, पांडवांचा कुठेंही शोध लागूं शकला नाहीं, ही गंभीर घटना आहे. "

" गंभीर कशी काय ? "

" तूं एक गोष्ट लक्षांत घे कीं, जर अज्ञातवास सुखरूपपणें संपवून पांडव परतले, तर– "

" तर काय ? "

निःश्वास सोडून दुर्योधन म्हणाला,

" त्यांना त्यांचें राज्य परत देणें भाग पडेल ! "

“ आपण देऊं नये म्हणजे झालें ! ”

“ नाहीं कर्णा ! वृद्ध भीष्म, द्रोण, कृप, विदुर, हे म्हातारे स्वस्थ बसणार नाहींत. ”

“ तर मग त्यांचा कसून शोध करावा. अत्यंत कुशल दूत पाठवून चहूं खंडांचा धांडोळा घ्यावा. एकही स्थान शोध न घेतां रितें राहूं देऊं नये. ”

पण दुर्योधनाची चिंता दूर होईना. त्याला त्या चिंतेनें झोंप येईनाशी झाली. काय केलें म्हणजे दुर्योधन पुन्हां: एकदां पूर्वीसारखा प्रसन्न होईल, अशा चिंतेंत असतां कौरवांचा स्नेही त्रिगर्ताधिपति सुशर्मा याला एक युक्ति सुचली. तो व कर्ण दुर्योधनाकडे गेले. सुशर्मा म्हणाला,

“ राजा, तुझें चित्त थोडें मोकळें व्हावें, म्हणून मी एक युक्ति सुचवीत आहें. ”

“ काय ? ”

“ मागें मत्स्याधिप विराटानें त्याचा सेनापति कीचक याच्या सहाय्यानें अनेकदां माझा पराभव केला. आतां विराट वृद्ध झाला आहे, आणि कीचकाचा गंधर्वांनीं वध केला आहे. ”

“ मग तुझा काय विचार आहे ? ”

“ विराटाजवळ उत्तमोत्तम अशीं गाईचीं खिल्लारें आहेत, हें तुला माहीत आहेच. आपण सर्वजण त्याच्या राज्यावर स्वारी करून त्याचें तें गोधन हिरावून घेऊं. ”

“ वा: ? चांगली कल्पना ! ”

कर्ण उत्साहानें म्हणाला,

“ राजा, आतां पांडवांचा व्यर्थ विचार करीत बसण्यापेक्षां विराटाचें गोधन जिंकून आणणें मला अधिक युक्तिसंगत वाटतें. हा जीवनांतला बदल घडून आल्यानें तुझी वृत्तीही उल्हासित होईल. ”

लगेच भीष्म व द्रोणांचा विचार घेऊन त्यांच्यासह कौरव विराटाच्या राज्याकडे ससैन्य निघाले. त्यांनीं आपल्या सेनेचे दोन भाग केले. एक भाग

सुशर्म्याबरोबर देऊन त्याला एका बाजूच्या खिल्लारांवर आक्रमण करायला सांगितलें, तर शेष सैन्य बरोबर घेऊन कौरव दुसऱ्या खिल्लाराच्या रोखानें निघाले.

अत्यंत वेगानें आक्रमण करून सुशर्म्यानें विराटाच्या गोपालांस पळवून लावलें, आणि तो गोधन घेऊन परत फिरला. त्या गोपालांनीं आक्रोश करीत विराट नगरींत जाऊन विराटाला हें वृत्त सांगितलें. तो अस्वस्थ होऊन सचिवास म्हणाला,

" कीचकानंतर आतां मत्स्यराज्य कोण सांभाळील ? "

" कोण सांभाळील ? "

" आपला कंक, बल्लव, तंतिपाल आणि ग्रंथिक हे वीर या प्रसंगीं आपल्याला उपयोगी पडतीलसें वाटतें. त्यांना बोलावून आणा. "

त्या चौघांनीं मोठ्या आनंदानें युद्ध करण्यास संमति दिली. उत्तम कवचें लेऊन आणि रथांवर बसून ते सशस्त्र वीर विराटासह सुशर्म्याच्या सेनेवर जाऊन कोसळले. तुंबळ युद्ध सुरू झालें. विराट ज्या ठिकाणीं लढत होता, तिथलें सैन्य मारून सुशर्म्यानें विराटाला बंदी करून आपल्या रथांत घेतलें, आणि तो विजय घोष करीत चालला.

ही वार्ता कानीं पडतांच कंक बल्लवाला म्हणाला,

" वीरा, आतां तुझा पराक्रम दाखवायचा समय प्राप्त झाला आहे. "

अत्यंत उल्हासानें बल्लव म्हणाला,

" तो समोरचा वृक्ष उपटून या सेनेला झोडपून काढूं काय ? "

" नको. तशानें लोक तुला पटकन् ओळखतील. साध्या शस्त्रांनींच लढून तूं वृद्ध विराटास सोडवून आण. "

भीम आवेशानें त्या झुंजींत शिरला. समोर आलेलें सैन्य सैरावैरा पळवीत तो सुशर्म्यावर चालून गेला, आणि त्याला विरथ करून त्यानें विराटाची मुक्तता केली. सुशर्मा रथ सोडून पळूं लागला. त्याला धरून बुकलीत भीम म्हणाला,

" वा वा ! तूं असा पळून चाललास, तर विराटाच्या गाई कोण पळवील ? "

भीमानें त्याला बांधून युधिष्ठिरासमोर आणलें. त्याची अशी दुर्दशा पाहून युधिष्ठिर हंसत म्हणाला,

" बल्लवा, तो दीन झाला आहे; त्याला सोडून दे. "

नंतर विजय-दुंदुभी वाजवीत विराट परत निघाला. मार्गांत तो सद्गदित होऊन कंकास म्हणाला,

" महात्म्या कंका, तुम्हीं होतांत म्हणूनच आज मी माझ्या नगरास सुखानें परतत आहें. "

पण ते नगरास परतले नाहींत, तोंवर इकडे एक वेगळा प्रकार घडत होता.

## बृहन्नला--विजय—

सुशर्म्याशीं संकेत केल्याप्रमाणें दुसरे दिवशीं पहांटेस विराटाच्या दुसऱ्या एका विशाल घोषावर कौरवांनीं आक्रमण केलें. कौरवांची विशाल सेना गोपालांना झोडीत गाई हांकीत चाललेली पाहून कांही गोपाल छाती बडवीत नगरांत पोंचले. तिथें केवळ विराटपुत्र उत्तरच काय तो होता. मुलींमध्यें बसून तो आपल्या पराक्रमाच्या विविध कथा ऐकवीत प्रौढी मिरवीत होता. गोपांच्या तोंडून गोग्रहणाची कथा ऐकतांच तो उभा राहून आवेगानें म्हणाला,

" कौरव ? कुठें आहेत ते ? किती जण आहेत ? थांबा ! आत्तां त्यांना चांगली शिक्षा लावून येतों."

तोंच त्याला आपल्या मृत सारथ्याचें स्मरण झालें. तो खालीं बसत म्हणाला,

" पण काय करूं ?"

मुलींनीं विचारलें,

" काय झालें ? "

" माझा सारथी ! तो गेल्या युद्धांत मरण पावला ! जर तो असता तर–तर कौरव म्हणजे काय वस्तु !"

त्या स्त्रीसमूहांत बसलेली सैरंध्री स्मित करीत म्हणाली,

" ऐकावें राजपुत्रा ! आपली बृहन्नला–"

" तिचें काय ?"

" ती कांहीं दिवस अर्जुनाचें सारथ्य करीत होती. तिला आपण सांगितलें तर या वेळीं ती आपलेंहि सारथ्य करूं शकेल. "

" पण तिला सांगेल कोण ?"

शेवटीं उत्तरा बृहन्नलेकडे गेली. तिनें आग्रह केल्यावर आढेवेढे घेत एकदांची बृहन्नला उत्तराजवळ आली. सज्ज झालेल्या उत्तरानें एक चिलखत दाखवीत तिला म्हटलें,

" बृहन्नले, तूं अर्जुनाप्रमाणें माझेंही सारथ्य कर. म्हणजे या सर्व कौरवांना दे माय धरणी ठाय करायला लावतों."

बृहन्नलेनें तें कवच उलटेंच अंगावर घालायची धडपड चालविली. सर्व मुली हंसूं लागल्या. तेव्हां उत्तरानें तिच्या अंगावर तें चढवून चार उत्तेजक शब्द बोलून तिला धीर दिला. नंतर उत्तर रथारूढ झाला. बृहन्नलेनें त्याचा रथ हळूहळू नगराबाहेर काढला, आणि मग अत्यंत वेगानें तो कौरवसेनेजवळ आणून उत्तराला म्हटलें,

" राजपुत्रा, ते बघ कौरव, आणि त्या तुझ्या गाई ! एकालाही आतां अव्रण स्थितींत परत जाऊं देऊं नकोस !"

उत्तरानें एखाद्या सागराप्रमाणें पसरलेलें तें कौरवसैन्य बघितलें, आणि त्याचें उसनें अवसान गळून पडलें ! तो बृहन्नलेला रथ माघारी वळविण्याविषयीं विनवीत म्हणाला,

" बृहन्नले, माझ्यावर कृपा कर ! मी मघां बोललों ती केवळ थट्टा होती. लहानसा दुर्बल राजपुत्र मी ! एवढ्या सेनेशीं एकटा कसा झुंजूं शकेन ? शिवाय माझे तात मला नगर अरक्षित अवस्थेंत सोडून आल्याबद्दलही रागावतील. तेव्हां रथ माघारा वळव. "

बृहन्नलेनें तें ऐकून क्षणमात्र कोपानें उत्तराकडे पाहिलें. मग म्हटलें,

" अरे विराटपुत्रा, तुझा तो आवेश केवळ स्त्रीसमुहापुरताच मर्यादित होता तर ! "

उत्तर न देतां राजपुत्र रथांतून उतरून पळूं लागला. बृहन्नलेनें त्याला धरून म्हटलें,

" थांब. असा पळूं नकोस. मी बरोबर असतां तुला चिंता करायचें कारण नाहीं. तुझ्याऐवजीं मी युद्ध करीन. मात्र तूं माझें सारथ्य कर म्हणजे झालें. अश्वांना स्मशानभूमीकडे वळव. "

उत्तराला बृहन्नलेनें रथांत बसविलें. आणि रथ स्मशानभूमीकडे वळविण्यास लावलें. तिथें पोंचल्यावर ती त्याला म्हणाली,

" राजपुत्रा, आतां या शमीवृक्षावर चढून पांडवांनीं त्यावर ठेवलेलीं दिव्य आयुधें खालीं काढ. त्यांच्या साहाय्यानें मी या कुरुसेनेचा सहजच पराभव करीन. "

कसाबसा उत्तर शमीवृक्षावर चढला. त्यानें तीं आयुधें खालीं काढून त्यांच्यावरील आवरण मोकळें केलें. तीं दिव्य आयुधें पाहून तो अत्यंत विस्मित झाला. त्यानें विचारलें,

" बृहन्नले, हीं आयुधें कोण वापरीत असे ? "

त्या तेजस्वी आयुधांचा परिचय सांगून त्यांतलें गांडीव धनुष्य बृहन्नलेनें उचललें. तें हातीं येतांच अत्यंत आवेशानें गुण चढवून तिनें त्याचा टणत्कार केला, उत्तर आश्चर्यानें म्हणाला,

" बृहन्नले, पांडव कोठें आहेत ? युधिष्ठिर, भीम आणि तो पराक्रमी अर्जुन कोठें ? "

सिंहनाद करीत स्त्रीवेशधारी अर्जुन म्हणाला,

" होय रे मुला ! मीच अर्जुन ! कंक हा युधिष्ठिर ! बल्लव हा भीम ! "

त्याचा तो आवेश पाहून उत्तराची खात्री पटली. तो हतगर्व होऊन म्हणाला,

" अर्जुना, मला क्षमा कर ! "

" क्षमा केलेलीच आहे. आतां केवळ रथ कौरव सेनेसमोर उभा कर आणि कौतुक पहा ! "

अर्जुनानें आपला देवदत्त शंख उचलून त्याचा गंभीर नाद केला. तो कौरवांच्या कानीं पडतांच ते चपापले. द्रोण म्हणाले,

" खचितच हा अर्जुन आहे ! दुर्योधना, आतां सांभाळ ! अप्रतिम धनुर्धर पार्थ येत आहे !"

दुर्योधन म्हणाला,

" अर्जुन ? तो येऊं शकत नाहीं. त्यांचीं तेरा वर्षे अजून पूर्ण झालीं नाहींत. भीष्मानींच काय तो निर्णय द्यावा. "

भीष्मांनीं चान्द्रमासाप्रमाणें तेरा वर्षे पूर्ण झालीं असल्याचा निर्णय दिला. द्रोण म्हणाले,

" अर्जुन अधर्म करणार नाहीं. तेरा वर्षे वनवास आणि अज्ञातवास भोगून आतां तो देवदत्त शंख फुंकीत चालून येत आहे. तेव्हां आतां दुर्योधना, काय ती व्यवस्था कर. "

कर्ण चिडून म्हणाला,

" दुर्योधना, कदाचित् हा अर्जुनही असेल. असेना कां ! त्याला एवढें भ्यायचें काय कारण आहे ? द्रोणासारखे आचार्य युद्धांत अगदीं कुचकामाचे. यांनीं देवालयें, उद्यानें, यांत बसून चित्रविचित्र गोष्टी सांगत लोकांना हंसवावें. यज्ञयागांतलीं वैगुण्यें काढावींत, अथवा पंक्तींतील अन्न चांगलें कीं वाईट होतें, यावर भरल्या पोटीं चर्चा करावी. राजा, तूं यांच्या नादीं न लागतां युद्धसज्ज हो. असेना कां अर्जुन ! बरेंच झालें. शेवटीं त्याची व माझी एकदांची गांठ पडेल. "

यावर कौरवांत बरीच वादावादी झाली. अश्वत्थामा आपल्या पित्याची ही निंदा ऐकून संतापानें कर्णाची निर्भत्सना करूं लागला. शेवटीं भीष्मांनीं त्याची समजूत काढीत सर्वांना युद्धास सज्ज होण्याविषयीं आज्ञापिलें.

कौरव युद्धभूमीवर सज्ज होऊन उभे राहिले, तों त्यांना प्रबलप्रतापी अर्जुन पुढें धनुष्य सज्ज करून चालून येत असलेला दिसला.

त्याला पाहतांच दुर्योधन म्हणाला,

" होय ! तो अर्जुनच आहे ! शेवटीं इथें दडले होते ना पांडव ! "

भीष्म बोलले,

" दुर्योधना, खवळलेल्या वासुकीसारखा पार्थ चालून येत आहे. आतां माझें ऐक. चतुर्थांश सैन्य घेऊन तूं हस्तिनापुराच्या दिशेनें पुढें हो. चतुर्थांश गाई बरोबर असूं दे. अर्धें सैन्य घेऊन आम्हीं अर्जुनाशीं युद्ध करतों."

भीष्मानें आज्ञापिल्याप्रमाणें सर्व व्यवस्था झाली. दुर्योधनाचा रथ हस्तिना-पुराकडे वळलेला पाहातांच अर्जुन उत्तरास म्हणाला,

" राजपुत्रा, तो बघ, दुर्योधन तर रणभूमि सोडून निघाला. रथ तांतडीनें त्याच्याकडे चालव."

भीष्मद्रोणादिकांस वळसा घालून वारंवार शंखनाद करीत अर्जुनाचा रथ त्या दिशेनें वळलेला पाहतांच कर्ण त्वेषानें अर्जुनावर धांवून आला. तो अर्जुनाला हांकारीत म्हणाला,

" थांब ! अर्जुना, तेरा वर्षे युद्ध न केल्यामुळें शिथिल झालेले तुझे बाहु पुनः शस्त्रधारणास सज्ज झाले नाहींत, तोंच तुला यमलोकीं धाडतों. थांब."

पण अर्जुनानें असीम चपलतेनें त्याच्यावर असा कांहीं अद्भुत शरवर्षाव केला कीं, शेवटीं रथ व सारथी यांच्या विनाशामुळें कर्णाला रण सोडून पळावें लागलें ! तें पाहतांच सर्व कौरव त्याच्यावर तुटून पडले. आपल्या बाणांच्या वर्षावानें त्यांनीं कांहीं काळ अर्जुनाला झांकून टाकल्यासारखें केलें.

तरी पण आपल्या सहस्र किरणशरांनीं मेघमाला अस्ताव्यस्त करून पुनः प्रकाशमान होणाऱ्या सूर्याप्रमाणें अर्जुन त्या सर्वांना पराभूत करून समरांगणांत इकडून तिकडे तळपूं लागला. भीष्मद्रोण आदि श्रेष्ठांना त्यानें अगोदर बाणांनीं वंदन करून मग त्यांच्यावर शरवर्षाव केला. दुर्योधन, दुःशासन आदि महारथींनाही त्यानें नको तें युद्ध म्हणायला लावलें. शेवटीं संमोहन

अस्त्राचा प्रयोग करून त्यानें त्या सर्वांना कांहीं काळ मूर्छित केलें. नंतर तो उत्तराला म्हणाला,

" राजपुत्रा, आतां भीष्माव्यतिरिक्त या सर्व कौरवांचीं उपवस्त्रें हिरावून घेऊन ये."

" कशासाठीं ? "

" राजकन्येच्या बाहुल्यांना लेववण्यासाठीं. तिनें मला तसें सांगितलें आहे."

उत्तरानें सर्व उपवस्त्रें गोळा केलीं. नंतर अर्जुन त्याला म्हणाला,

" राजपुत्रा, आतां रथ पुनः स्मशानाकडे घे. तिथें हें गांडीव ठेवून देऊन आपण परत फिरूं. मात्र तुला एक गोष्ट केली पाहिजे."

" काय ? "

" तूं तातांना माझा परिचय न देतां तूंच कौरव सेनेचा पराभव करून गाई परत आणल्यास असें सांग ! "

" कां ? "

" योग्य काल येतांच आम्ही सर्वजण प्रगट होऊं. तूं माझें अत्यंत प्रिय सारथ्यकर्म करून माझा आवडता झाला आहेस. पण आणखी कांहीं काळ–"

" अर्जुना, केवळ तुझी आज्ञाच आहे म्हणून. एरव्हीं माझ्याच्यानें हा माझा न केलेला पराक्रम वानवानून सांगवला गेला नसतां."

गांडीव स्मशानांत ठेवून मग ते दोघेजण नगराकडे परतले.

## प्रकटीभवन—

तोंवर इकडे नगरांत आकांत झाला होता. विराट नगरांत परतला, तों त्याला कळलें कीं उत्तर एकटाच कौरवसेनेवर चालून गेला आहे. घाबरून जाऊन तो म्हणाला,

" अमात्य, जा ! लगेच निघा ! उत्तराची सहाय्यता करण्यासाठीं हातीं असेल तें सर्व सैन्य घेऊन तुम्ही लगेच तिकडे धांव घ्या. "

कंकाला बृहन्नलेची वार्ता कळली होती. तो राजाला म्हणाला,

" राजा, एवढें चिंतातुर होण्याचें कारण नाहीं. "

" नाहीं ? "

" ऊं हूं ! उत्तराबरोबर बृहन्नला गेली आहे. "

उपेक्षेनें त्याच्याकडे पाहात राजा म्हणाला,

" ऐका या ब्राह्मणाचें ! एकूण याला सारासार विचार कमीच ! अरे, तिथें युद्ध करायचें आहे. ती कांहीं नृत्यशाला नव्हे ! "

तोंच वार्ता आली, कीं उत्तर जय मिळवून परत आला आहे. राजा अत्यानंदित होऊन म्हणाला,

" अरे, जा ! त्या माझ्या पराक्रमी लाडक्याला अगोदर इकडे घेऊन या. तो आज एक अपूर्व कृत्य करून आला आहे. "

किंचित् हंसून कंक म्हणाला,

" बृहन्नला बरोबर असल्यावर कांहींही अशक्य नाहीं. "

संतापून राजा म्हणाला,

" ब्राह्मणा, आतां गप्प बसला नाहींस तर अनर्थ होईल. "

" राजा, एवढं संतापायचें कांहींच कारण नाहीं. खरोखरच बृहन्नला असीम पराक्रमी आहे. ती बरोबर होती, म्हणूनच उत्तर जय मिळवून परत येऊं शकला. "

क्रोधानें भान विसरून राजा विराटानें हाताशीं असलेला द्यूत खेळण्याचा फासा उचलून कंकाच्या मुखावर मारला. कंकाच्या नाकांतून भळभळां रक्त वाहूं लागलें. तें त्यानें आपल्या ओंजळींत धरून पलीकडे उभी असलेल्या सैरंध्रीला खूण केली. धांवत येऊन तिनें त्या रक्ताच्या धारेखालीं सुवर्ण-पात्र धरलें.

विराट इकडे लक्ष न देतां दूताला म्हणाला,

" जा. लवकर उत्तराला इकडे घेऊन ये. "

दूत निघाला असतां कंकानें त्याला खूण करून आपल्याकडे बोलावून म्हटलें,

" बाबा, एकट्या उत्तरालाच इकडे आण. "

" कां ? "

" बृहन्नलेला आणूं नकोस. "

" पण कां ? "

" तुला कसें सांगितलें असतां कळेल ? रणभूमि व्यतिरिक्त इतर ठिकाणीं जो माझ्यावर आघात करून माझें रक्त सांडील, त्याचा वध करायचा, अशी तिची प्रतिज्ञा आहे."

कांहीं वेळानें उत्तर सभेंत उपस्थित झाला. विराटानें हर्षनिर्भर होऊन त्याला आलिंगन देत म्हटलें,

" पुत्रा, कुशल तर आहेस ना ? "

" होय तात. "

" आतां तुझ्या पराक्रमाचें अद्‌भुत वर्णन कां करीनास ?

" तात, कौरवांचा पराभव माझ्यामुळें झाला नाहीं. "

" मग ? "

" एक देवपुत्र रणभूमीवर उपस्थित झाला. त्यानें क्षणार्धांतच सर्व कौरव-सेनेला सळो कीं पळो करून सोडलें. "

कृतज्ञतेच्या स्वरांत विराट म्हणाला,

" तो देवपुत्र कुठें आहे ? माझी त्याची भेट घडणार नाहीं काय ? "

" योग्य वेळीं तो इथें प्रगट होईल. "

नंतर उत्तरानें बरोबर आणलेलीं वस्त्रें राजकन्येला देऊन बृहन्नलेशीं कांहीं हितगुज केलें.

तिसरे दिवशीं शुभ प्रभातीं कंक, बल्लव, बृहन्नला, सैरंध्री आदींनीं आप-आपल्या छद्मवेषाचा त्याग करून उत्तम वस्त्रें परिधान केलीं. नंतर ते तेजस्वी पांडव राजसभेंत उच्चासनावर जाऊन बसले.

विराटानें सभेंत प्रवेश केला. या वीरांना तिथें उच्चासनावर बसलेलें पाहून तो किंचित् क्रुद्ध होऊन म्हणाला,

" ब्राह्मणा, तुला मीं माझा मित्र म्हटलें, याचा अर्थ तूं माझ्या आसनावर बसावेंस असा मुळींच नव्हे ! आणि बह्लवा, ही काय पाकशाळा आहे ? "

अर्जुन हंसत उभा राहिला आणि म्हणाला,

" राजा, ज्यानें कंक या नांवानें आपला परिचय करून दिला होता, त्याची योग्यता तर इन्द्राच्या आसनावरही बसावें अशी आहे. "

आश्चर्यानें विराट म्हणाला,

" तूं बृहन्नला नव्हे का ? काय म्हणालास ? "

" मी इतकेंच म्हणालों, कीं महाराज युधिष्ठिरांची योग्यता फार मोठी आहे, हें तुलाही माहीत आहे. "

व्यग्र होऊन विराटानें विचारलें,

" कुठें आहेत महाराज युधिष्ठिर ? "

" ज्यांच्याशीं तूं कंक या नांवानें परिचित होतास– "

" काय ? "

" होयं– "

" आणि मग भीम ? अर्जुन ? नकुल ? सहदेव ? कमलनयना द्रौपदी ?"

" ऐक राजा, तुझ्या पाकशालेंत ज्याला कणीक तिंबावी लागली तो हा प्रबलप्रताप भीम. तुझ्या अश्वशालेचा अधिकारी तो नकुल, मुख्य गोपाल तो सहदेव आणि जिच्यामुळें कीचकाला आपले प्राण गमवावे लागले, ती ही मृगनयना महाराज्ञी द्रौपदी ! "

" आणि तूं– "

" होय राजा ! तुझ्या कन्यांना नृत्य शिकवीत असणारा मी पृथापुत्र अर्जुन ! "

विराट कांहीं क्षण आश्चर्यानें दिङ्मूढ झाला. तोंच उत्तर सभेंत आला. त्यानें अर्जुनाचें समर्थन करीत म्हटलें,

" होय महाराज. प्रबल पराक्रम अर्जुनानेंच परवां कौरवांचा पराभव करून—"

लज्जेनें विगलित होऊन विराट वारंवार हात जोडीत म्हणाला,

" आतां मीं काय केलें म्हणजे माझ्या अपराधांचें परिमार्जन होईल ? "

युधिष्ठिर बोलला,

" छे छे ! राजा, पश्चात्ताप करण्याजोगें कांहीं घडलेंच नाहीं. "

" नाहीं कसें– "

" खरोखरच तुझ्या राज्यांत आम्हीं अज्ञातवासाचें वर्ष फारशीं विघ्नें न येतां व्यतीत केलें. याबद्दल आम्हीच तुझे उपकृत आहोंत. "

उत्तराशीं कांहीं संकेत करून विराट म्हणाला,

" अर्जुना, माझी एक प्रार्थना तूं मान्य करावीस. "

" कोणती ? "

" माझी कन्या उत्तरा मी तुला समर्पित करीत आहें. "

" मान्य. पण—"

" नव्हे. तूं आतां पर्याय काढूं नयेस. "

" ऐक राजा, उत्तरा माझी पुत्रवधू म्हणून मी स्वीकारीन. "

" कां ? "

" मीं तुझ्या अन्तःपुरांत एक वर्ष राहिलों. हा सर्व काल मीं तुझ्या कन्येला नृत्य शिकवीत व्यतीत केला. तिचा माझ्यावर पित्यासारखा विश्वास होता. तेव्हां अशा स्थितींत जर मीं तिच्याशीं विवाह केला, तर एक तर मर्यादाभंग होईल. दुसरें असें कीं, तिचा माझा पूर्वीपासूनच संबंध होता, असा लटका जनप्रवाद रूढ होईल. तेव्हां ही तुझी लाडकी कन्या आणि माझा आवडता पुत्र यांचाच विवाह होऊं दे. "

विराटाला हें मान्य झालें. लगेच द्वारकेस श्रीकृष्णाकडे संदेश धाडला गेला. श्रीकृष्ण, बलराम, अभिमन्यु आदि वीर मोठ्या वैभवानिशीं द्वारकेहून निघाले.

पांडव विराटनगरीच्या शेजारीं असलेल्या उपप्लव्य नगरांत जाऊन राहिले होते. श्रीकृष्ण येतांच त्यांनीं स्नेहभरानें त्याचें स्वागत केलें. त्याला आलिंगीत युधिष्ठिर म्हणाला,

" कृष्णा, कुशल तर आहे ना ? "

" होय. "

नंतर श्रीकृष्णानें द्रौपदीला भेटून तिला अभय दिलें, व अर्जुनाबरोबर गुजगोष्टी केल्या. श्रीकृष्णाबरोबरच बलराम, कृतवर्मा, सात्यकि, अक्रूर, सांब आदि वीरही तिथें उपस्थित झाले होते. तसेंच द्रुपद, काशिराज, शैब्य, धृष्टकेतु, धृष्टद्युम्न, शिखंडी, द्रौपदीचे पांची पुत्र वगैरे अनेक वीर अमूप सेनेसह विराटनगरीस आले. सर्वांच्या भेटी होऊन त्या आनंदाच्या वातावरणांतच उत्तरा आणि अभिमन्यु यांचा विवाहही मोठ्या थाटानें साजरा झाला.

## विचारविनिमय —

दुसरे दिवशीं विराटाच्या सभेंत सर्व वीर बसले असतां श्रीकृष्ण उठून हास्यवदनानें म्हणाला,

" वीर हो, पांडवांनीं पणाप्रमाणें बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास अशीं तेरा वर्षें पूर्ण केलीं आहेत. तेव्हां इथून पुढें आपला सर्वांचा काय विचार तो सांगा. "

ते सर्व वीर आपापसांत बोलूं लागले.

" आतां पुढें काय ? "

" युद्ध ? "

" कीं साम ? "

" पण युद्धापूर्वीं दुर्योधनाचा विचार कळणें इष्ट नाहीं काय ? "

" या श्रीकृष्णालाच काय तें ठरवूं द्या. "

श्रीकृष्ण म्हणाला,

" वीर हो, तुम्ही म्हणतां तें उचितच आहे. युधिष्ठिर धर्ममार्गावरून एक रेंसभरही ढळणार नाहीं. त्याला त्याचे न्याय्य अधिकारच काय ते हवे आहेत. पण दुर्योधनही काय म्हणतो तें कळलें पाहिजे. तेव्हां माझा विचार असा कीं कोणी एक वृद्ध सभासद सामासाठीं कौरवांकडे धाडावा. "

श्रीकृष्णाचें हें वचन सर्वांना मान्य झालें. बलराम म्हणाला,

" होय. असेंच करावें. कौरवांनींही पांडवांचें राज्य कांहीं अन्यायानें मिळविलें नाहीं. "

सात्यकि उसळून म्हणाला,

" काय ? "

" होय. या युधिष्ठिरानें द्यूताचें ज्ञान नसतां उगीच भरीला पडून द्यूत खेळावें कशाला ? बरें. तिथें इतर किती तरी खेळणारे होते. त्यांशीं न खेळतां हा त्या शकुनीशींच खेळायला बसला. तेव्हां तो हरला हें न्यायसंगतच झालें. तेव्हां दूतानें गोडीगुलाबीनेंच दुर्योधनाशीं बोलणें करावें. "

सात्यकि संतापून म्हणाला

" बलरामा, तूं हें जें भ्याडासारखें तोंडाला येईल तें बोलत आहेस, याबद्दल मी तुला दोष देत नाहीं. या सभासदांचें मात्र मला आश्चर्य वाटतें."

" कां ? "

" हे तुझें बोलणें मुकाट्यानें ऐकून कसें घेतात ? "

" सात्यकि— "

" होय रे होय ! युधिष्ठिराला बळें बळें द्यूताचें निमंत्रण देऊन कपटद्यूतानें त्याचें सर्वस्व हिरावून घेणें, हा काय धर्म झाला ? युधिष्ठिर काय आपल्या घरीं कौतुकानें शकुनीशीं द्यूत खेळायला प्रवृत्त झाला होता ? त्या पाप्यांना या त्यांच्या अधर्माचें योग्य तें प्रायश्चित्त मिळालें पाहिजे. "

द्रुपद पुढें सरसावून म्हणाला,

" सात्यकि, मी तुझ्या भाषणाचें पूर्णपणें समर्थन करतों. दुष्टबुद्धि दुर्योधनाशीं गोडीगुलाबीनें बोलायची मुळींच आवश्यकता नाहीं. गादवाला

गोंजारून काय लाभ? तें कधीं दूध देईल काय? तेव्हां रोखठोक प्रश्न विचारावा. आणि किंचित्‌ही विरुद्ध वारा वाहतांच युद्धाची सिद्धता करावी. आपल्या मित्रांना अगोदरपासूनच दूत पाठवून आपल्या साहाय्यास येण्याचें निमंत्रण देऊन ठेवावें."

"पण हें दूतकर्म करील असा कोण आहे?"

"हा माझा विद्वान् पुरोहित—"

श्रीकृष्ण बोलला,

"द्रुपदांचें म्हणणें अगदीं योग्य आहे. ते पांडवांचे परम हितकर्ते आहेतच. आणि कौरवांचेही मित्र आहेत. तेव्हां त्यांच्या पुरोहितानें जाऊन उचित रीतीनें संधियत्न करावा. आणि युद्धच ठरलें, तर आम्हांला निमंत्रण धाडावें."

श्रीकृष्णादि वीर परतल्यावर द्रुपद व विराट या दोघांनीं आपापले दूत देशभरच्या राजांकडे धाडले. निमंत्रण मिळतांच ते राजे सैन्यभारासह रथांनीं उडणाऱ्या धुळीनें आकाश भरून टाकीत उपप्लव्याकडे निघाले.

नंतर द्रुपद आपल्या पुरोहितास म्हणाला,

"महाराज, आतां आपलें कौशल्य पणास लावणें आवश्यक झालें आहे."

"राजा, तूं सांगशील तसें मी करीन."

"तर मग आपण हस्तिनापुरीं जाऊन अगोदर धृतराष्ट्राशीं बोलणें सुरू करावें. भीष्म, द्रोण, कृप आदि वृद्धांच्यासमोर पांडवांची न्यायसंगत बाजू विस्तारानें मांडावी. म्हणजे त्यांच्यांतले धर्मबुद्धि सभासद पांडवांचा पक्ष न्यायाचा आहे, हें मनोमनीं मान्य करतील."

"उत्तम!"

"आणि आपण त्यांच्यांत अशी फूट पाडली, म्हणजे पुनः त्यांचें ऐकमत्य करण्यांत कौरवांचा बराच वेळ खर्च होईल. तोंपर्यंत इकडे पांडवांना द्रव्य आणि सैन्य सिद्ध करण्यास वेळ मिळेल. आपण तिकडे असाच सामोपचाराचा घोळ घालून बसलांत म्हणजे त्यांना धड काय तो निर्णय घेणें जड जाईल. शिवाय आपलें वृद्धत्व, विद्वत्ता या सर्वांची भीड पडून आपल्याला कोणीही अडवूं शकणार नाहीं. तेव्हां लगेच निघून एवढें हें कार्य यशस्वी करावें."

द्रुपदाचा पुरोहित बरोबर अनेक विद्वज्जन घेऊन हस्तिनापुराकडे निघाला आणि इकडे स्वतः अर्जुन द्वारकेस निघाला.

श्रीकृष्ण द्वारकेस परतला, हें दुर्योधनास गुप्तचरांकडून कळलेंच होतें तोही तांतडीनें थोड्याशा सैन्यानिशीं द्वारकेला आला. हे दोघे प्रतिपक्ष ज्यावेळीं श्रीकृष्णाच्या मंदिरांत पोंचले, त्यावेळीं श्रीकृष्ण वामकुक्ष करीत होता. तेव्हां दुर्योधनानें श्रीकृष्णाच्या उशीजवळ असलेल्या आसनाव ठाण मांडलें. मात्र अर्जुन श्रीहरीच्या पायथ्याशीं बसून राहिला.

थोड्या वेळानें श्रीकृष्ण जागा झाला. त्याला अगोदर अर्जुन दिसला हंसून त्याचें स्वागत करतो, तों दुर्योधन उठून श्रीकृष्णाला म्हणाला,

" कृष्णा, मीहि आलों आहें. "

हंसून त्याच्याकडे पाहात श्रीकृष्ण म्हणाला,

" दुर्योधना, तुझेंही स्वागत आहे. "

" तर मग श्रीकृष्णा लक्षांत ठेव, मी अगोदर आलों आहें "

" पण मला तर अगोदर अर्जुन दिसला! असूं दे, तुझें का म्हणणें आहे ? "

" जर उद्या युद्ध झालेंच, तर त्यांत मला तुझ्याकडून सहाय्य हवें आहे."

अर्जुन म्हणाला,

" श्रीहरी, मीहि त्याच उद्देशानें आलों आहें."

" श्रीकृष्ण स्मित मुखानें म्हणाला,

" दोघेही ऐका. तुम्ही दोघे नात्यानें माझे भाऊ आहांत आणि दोघे साहाय्य मागण्यासाठीं आलांत. मी कोणालाच असंतुष्ट करूं शकत नाह ऐक दुर्योधना, मी एकाकडे जाईन, आणि एकाकडे माझें अमित पराक्रमी गो सैन्य. मात्र मी निःशस्त्र आहें, हें लक्षांत घ्या."

दुर्योधनानें घाई केली.

" तर मग—"

" थांब दुर्योधना. अर्जुन मला अगोदर दिसला. त्यानें अगोदर काय तें घ्यावें."

अर्जुन संतोषयुक्त स्वरानें म्हणाला,

" मुकुंदा, निःशस्त्र असलास तरी मला तूं हवास !"

दुर्योधनानें आनंदित होऊन म्हटलें,

" तेव्हां सैन्य मजकडे ओघानेंच आलें !"

" होय दुर्योधना."

दुर्योधन गेल्यावर श्रीकृष्णानें अर्जुनास विचारलें,

" अर्जुना, शस्त्रशून्य अशा मजकडून तूं काय करविणार आहेस ?"

" माझ्या रथाचें सारथ्य ! श्रीहरि, तूं नेहमीं माझ्या समोर असल्यावर मग मी कल्पांतालाही भीत नाहीं."

" तसेंच होवो !"

नंतर अर्जुन श्रीकृष्णासह उपप्लव्याकडे निघाला. इकडे दुर्योधन बलरामाकडे गेला असतां त्यानें आपण कोणत्याच पक्षाचा अभिनिवेश घेणार नसल्याचें प्रगट केलें. दुर्योधन हस्तिनापुराकडे जात असतां त्याला मद्रराज शल्य युधिष्ठिराच्या साहाय्यास जात असल्याची वार्ता कळली. लगेच त्यानें मार्गांत नाना प्रकारचीं सुखसाधनें उपस्थित करून शल्याचें मन सुप्रसन्न करविलें. आणि अचानक शल्यापुढें प्रगट होऊन त्याच्या साहाय्याची याचना केली.

चकित शल्य म्हणाला,

" हीं सुखसाधनें तूं योजिलीं होतींस तर ! ठीक आहे. तुझी काय इच्छा आहे ?"

" आपण मला साहाय्य करावें."

" ठीक आहे. मात्र मी एकदां युधिष्ठिरास भेटून येतों."

शल्यानें युधिष्ठिराकडे जाऊन त्याला दुर्योधनानें केलेलें कपट सांगितलें. युधिष्ठिर म्हणाला,

" हे मातुला, कांहीं चिंता नाहीं. मात्र आम्हासाठीं तूं एक करावेंस."

" काय ? "

" बहुधा श्रीकृष्णाचा समकक्ष म्हणून तुझ्याकडे कर्णाचें सारथ्य करण्याचें काम येईल."

" होय. "

" तर मग त्या वेळीं तूं कर्णाची निंदा करून त्याला हतप्रभ करावेंस ! "

" अवश्य ! कर्णानें नाना प्रसंगांच्या निमित्तानें तुम्हाला जो मनस्ताप दिला, तो माझ्या हृदयांत कांट्यासारखा सलत आहे. "

शल्य दुर्योधनाकडे परत गेला, त्याच दिवशीं सात्यकि अमित चतुरंग सैन्य घेऊन युधिष्ठिराकडे आला. त्याचप्रमाणें धृष्टद्युम्न, जयत्सेन, पांड्य, द्रुपद आदींचा सर्व सेनासंभार मिळून पांडवांकडे एकूण सात अक्षौहिणी सैन्य एकत्र झालें.

कौरव तर गर्भश्रीमंतच होते. त्यांच्याकडे भगदत्त, भूरिश्रवा, शल्य, कृतवर्मा, अंधक, कुकुर, जयद्रथ, कांबोजाधिपति सुदक्षिण, नील, विंद, अनुविंद कैकय, आदि राजांच्या मिळून अकरा अक्षौहिणी सेना जमल्या. या सर्व सेनांच्या अश्वांनीं आणि गजांनीं हास्तिनापुराजवळील भूमि आक्रांत करून टाकली. गजांचे चीत्कार, अश्वांचें खिंकाळणें, रथांचा घडघडाट हे सर्व ध्वनी एकत्र होऊन जणूं भूकंपच होत असल्याचा भास होऊं लागला.

शेवटीं या सेनेला सुखानें राहातां यावें म्हणून दुर्योधनानें तिची अन्यान्य स्थळीं योजना केली. पंचनद, कुरुजांगल, मरुभूमि, गंगातीर, वारण, यामुन पर्वत आदि स्थळें सेनेच्या कोलाहलानें गजबजून गेलीं.

## दौत्य —

द्रुपदाचा पुरोहित हें सर्व सैन्य न्याहाळीत हास्तिनापुरीं जाऊन पोंचला. त्यानें राजसभेंत आपण आलों असल्याचें कळविलें. धृतराष्ट्र, भीष्म आदि वृद्ध दुर्योधनादिकांसह राजसभेंत उपस्थित झाल्यावर तो वृद्ध पुरोहित गंभीर स्वरांत बोलला,

" राजा धृतराष्ट्रा, तुझें कुशल असो. मी इथें कां आलों आहें, हें तुम्हांला माहीत असेलच. "

दोन–चार तरुण कौरव ओरडले,

" नाहीं नाहीं ! "

" ऐका तर. मी पांडवांच्या वतीनें सामाचा संदेश घेऊन आलों आहें. "

" उत्तम आहे ! "

त्या उतावळ्या कौरवांकडे दुर्लक्ष्य करीत पुरोहित म्हणाला,

" धृतराष्ट्रा, मला थोडं अप्रिय बोलावें लागेल, याबद्दल क्षमा करा. पांडवांचा पिता पांडु हा तुझा सख्खा भाऊ. वस्तुतः तुमच्या तातांच्या राज्यांतला अर्धा भाग हा पांडवांचा न्याय्य दायभाग होता. पण तो त्यांना न देतां तुम्हीं त्यांना वंचित केलेंत !

" त्यानंतर जें कांहीं अरण्य तुम्हीं मोठ्या औदार्यानें त्यांना दिलेंत तिथें स्वपराक्रमानें त्यांनीं विशाल आणि समृद्ध राज्य निर्माण केलें. पण कपटप्रयोग करून तुम्हीं तेंही त्यांच्याजवळून हिसकून घेतलेंत !

" तरी युधिष्ठिर आणि त्याचे भ्राते या सर्वांनीं आपल्या पत्नीसह बारा वर्षे वनवासाचे कष्ट धैर्यानें सहन केले. अज्ञातवासांत तर त्या राजस जीवांना दास्यभावाचे सर्व सोहाळे भोगावे लागले. हेंही त्यांनीं धरित्रीच्या सहनशीलतेनें सोसलें.

" आतां ते अज्ञातवासांतून प्रगट झाले आहेत. तुमची अट त्यांनीं पूर्ण केली आहे. तेव्हां त्यांचें राज्य त्यांना परत करून तुम्ही सुखानें आपल्या वैभवाचा उपभोग घ्या. विनाकारण कुलक्षयाचें कारण होऊं नका. युद्धच व्हावयाचें असें ठरलें, तर पांडवांचे पराक्रम ध्यानीं आणा, आणि त्यामुळें तरी युद्धापासून निवृत्त व्हा, असा माझा तुम्हांला आग्रह आहे. "

भीष्मानीं उठून पुरोहिताच्या बोलण्याचें समर्थन करीत म्हटलें,

" हे ब्रह्मन्, आपण बोललांत तें उचितच आहे. "

तोंच संतापानें खवळून कर्ण मध्येंच उद्धटासारखा म्हणाला,

" अहो भटजीबुवा, आपण जें चर्वितचर्वण केलेंत, तें अनेकदां बोलून आणि ऐकून झालें आहे. पण दुर्योधनानें द्यूतांत जिंकून पांडवांना वनांत धाडलें, यांत त्याचें कांहींच चुकलें नाहीं. पांडव मात्र अज्ञातवासाचा काल संपण्यापूर्वीच प्रगट झाले आहेत. तेव्हां पणाप्रमाणें त्यांनीं पुनः बारा वर्षें वनवास व एक वर्ष अज्ञातवास अशी शिक्षा भोगून यावें, आणि मग खुशाल दुर्योधनाच्या मांडीवर डोकें ठेऊन झोंपावें. युद्धाच्या वल्गना करीत असाल, तर माझ्याशीं गांठ आहे म्हणावें ! "

हें कर्णाचें अद्वातद्वा भाषण ऐकूण भीष्मांनीं त्याची निर्भत्सना केली. तिचें समर्थन करीत धृतराष्ट्र म्हणाला,

" ब्रह्मन्, आपण आतां असें करावें. "

" कसें ? "

" युधिष्ठिराचें कुशल विचारून त्याला सांगावें, कीं सामसाधनासाठीं संजय तुम्हाकडे येत आहे. "

पुरोहित परतल्यावर संजयास बोलावून धृतराष्ट्र म्हणाला,

" बाबा संजया, तुझ्या विद्वत्तेवर माझा विश्वास आहे. "

" राजा तुझ्या मनांत मला एखादें कठिण कर्म करायला लावावें असा विचार निर्माण झाला आहे काय ? "

" होय. तुला माहीतच आहे, की पांडवांच्या बलाविषयीं माझ्या मनीं फार मोठें भय वसती करून आहे. "

" तर मग–"

" ऐक. त्यांत त्यांचा पाठीराखा बुद्धिमतांत श्रेष्ठ असलेला कृष्ण ! "

" याचा अर्थ तुझी इच्छा विग्रह न व्हावा अशी आहे. "

" होय. तेव्हां काय वाटेल तें करून तूं एवढें घडवून आण. "

" राजा, तुझीच आज्ञा असेल, तर मला निरुपाय म्हणून हें काम करणें भाग आहे. "

संजय तांतडीनें उपप्लव्यास आला. त्याच्या आगमनाची वार्ता कळतांच युधिष्ठिरानें अगत्यानें त्याचें स्वागत केलें. नंतर तो म्हणाला,

" महात्म्या संजया, तुला पाहून मला तात धृतराष्ट्राची भेट झाल्याइतका संतोष झाला आहे. हस्तिनापुरचे सर्व लोक कुशल आहेत ना ? "

" होय. युधिष्ठिरा, तूं खडतर कष्ट भोगून सुरक्षित परत आलास, हें राजा धृतराष्ट्राला कळलें, तेव्हां त्याला मोठा आनंद झाला. त्यानें वारंवार तुझें आणि तुझ्या भ्रात्यांचें कुशल विचारलें आहे. त्याबरोबरच तुझ्यासाठीं त्यानें शमाचा संदेशही धाडला आहे . "

" तातांचा संदेश ऐकायला मी सादर आहें. "

" मात्र दूतकर्म करीत असतां मला कांहीं कटु बोलावें लागलें, तर तुम्ही राग मानूं नका. "

" संजया, तुझ्या विद्वत्तेविषयीं आमच्या मनांत तिलप्राय शंका नाहीं. काय इच्छेला येईल तें तूं निश्चिंत मनानें बोलूं शकतोस."

नंतर नाना प्रकारांनीं पांडवांचा बुद्धिभेद करीत संजय म्हणाला,

" युधिष्ठिरा तुझ्या मनांत तरी काय आहे ? "

" ही शंका तुझ्या मनांत कां निर्माण झाली ? "

" माझें मन शंकाकुल न होईल तर आश्चर्य ! अरे हें तुम्हीं मांडलें आहे तरी काय ? एकमेकांत युद्ध करून तुम्ही कुलक्षय करणार आहांत काय ? तें केवढें मोठें पातक आहे ! अरे, पितर नाना प्रकारचीं पुण्यकृत्यें करून त्यांचें फल म्हणून कुलवृद्धीची इच्छा करतात. आणि तूं हातीं कुऱ्हाड घेऊन तो विस्तीर्ण कुलवृक्ष खंडित करीत आहेस ? हें पाप कुठें फेडशील ? "

" संजया— "

" ऐक युधिष्ठिरा ! यापेक्षां तुम्हीं अंधक व वृष्णि यांचे राज्यांत भीक मागून उदरनिर्वाह करावा हें अधिक बरें. विचार असा कर, कीं या कुलक्षयाचें फल जें राज्याच्या रूपानें तुझ्या पदरांत पडणार आहे, तें तरी तूं किती दिवस भोगूं शकशील ? तुझें आयुष्य कितीसें आहे ? अत्यंत अस्थिर अशा

आयुष्यांत कुलनाशासारखें पाप करून सुख भोगण्यापेक्षां ज्या धर्ममार्गावर तूं आजपर्यंत स्थिर राहिलास, तोच धर्ममार्ग आचरलास, तरी परलोकीं तुझें कल्याण होईल."

"ऐक संजया !"

"थांब. माझा वागौघ असा अडवूं नकोस. आणि जर तुला भातृनाशच करायचा होता, तर एवढे दिवस धर्मपालनाचें सोंग तरी कशाला केलेंस ? तूं तो द्यूतप्रसंगींच करूं शकला असतास. पण तें न करतां एवढे दिवस अकारण वनवासाचे कष्ट भोगलेस, आणि आतां हें महापाप करून एका नव्या कष्टप्रद जीवनाचा प्रारंभ करणार आहेस. तेव्हां तुला काय म्हणावें ? आणि ज्यांना तूं मारूं इच्छीत आहेस, ते तरी कोण ? तर तुमचा पितामह भीष्म ! तुमचा गुरु द्रोण ! कृप ! वा वा ! युधिष्ठिरा, तूं धन्य आहेस !"

गोंधळून जाऊन युधिष्ठिर म्हणाला,

"ऐक संजया. माझें म्हणणें नीट ऐकून घे."

"काय ?"

"अधर्मानें मिळालेलें त्रिभुवनाचेंही राज्य मला नको. तुझें तर मत युद्ध केल्यानें मी स्वधर्म मार्गापासून च्युत होईन असें आहे. तेव्हां आतां बुद्धिमतांत सर्व श्रेष्ठ अशा श्रीकृष्णालाच काय तो निर्णय देऊं दे."

श्रीकृष्ण उभा राहून म्हणाला,

"संजया, आम्हांलाच युद्धाची खुमखुमी आहे, ही तुझी कल्पना व्यर्थ आहे. पांडव आणि कौरव हे दोघेही माझे नातलग आहेत. तेव्हां शांतीनेच जर कार्य भाग होत असेल, तर तो मला इष्ट आहे. आतां तूं भिक्षा मागण्याविषयीं जें काय म्हणालास, तें सर्वथा अनुचित आहे. क्षत्रियांना तें मुळींच इष्ट नाहीं. क्षत्रियाचें कल्याण धर्ममार्गानें युद्ध करूनच होतें, टाळून नव्हे. कौरवांनीं केलेलीं पापें एवढीं भयंकर आहेत, कीं त्याबद्दल त्यांना द्यावी ती शिक्षा कमीच ठरेच आणि तुला आतांच हें पांडित्य कुठून सुचलें ? द्यूतसभेत पांचाली कौरवांकडून अपमानिली जात असतां तुझी ही धर्मबुद्धि कुठें हारपली होती ?

" कांहीं कां असेना ? मीही शममार्गाचाच यात्रेकरू आहें. धृतराष्ट्राला सांग कीं मी स्वतः हास्तिनापुरास येऊन यांतून मार्ग निघतो कीं काय तें पाहीन. "

युधिष्ठिराचा निरोप घेऊन संजय हास्तिनापुरास आला, त्यावेळीं रात्र झाली होती. तरी त्यानें धृतराष्ट्राची भेट घेऊन त्याची निंदा करीत म्हटलें,

" राजा, युधिष्ठिराला त्याच्या न्याय्य दायभागापासून वंचित करणें, हें नरकाचें साधनच आहे. त्यामुळें इहलोकीं तर तुझी निंदा होत आहेच. पण परलोकींहि तुला सुख मिळणार नाहीं. तुझ्या मंत्र्यांच्या बुद्धीचें वर्णन काय करावें ? भीष्म, विदुर, द्रोण, या सर्वांस एका बाजूला सारून तूं कर्ण आणि शकुनि यांना आपलें मंत्रिपद बहाल केलें आहेस ! तेव्हां तुझ्या पक्षाचा नाश होणार आहे, हें निश्चित ! "

घाबरलेला धृतराष्ट्र म्हणाला,

" अरे संजया—"

" जाऊं दे ! मी प्रवासाच्या कष्टांनीं अत्यंत शिणलों आहें. उद्यां सकाळीं राजसभेंत मी युधिष्ठिरांचा संदेश सांगेन. "

संजय निघून गेला. पण धृतराष्ट्र मात्र अत्यंत अस्वस्थ होऊन तळमळूं लागला. शेवटीं त्यानें विदुराला बोलावणें धाडलें. तो आल्यावर धृतराष्ट्र त्याला म्हणाला,

" क्षत्त्या, तूं मला धर्म व अधर्म यांच्या व्याख्या कां सांगेनास ? "

मग विदुरानें त्याला विस्तारपूर्वक पंडित, मूर्ख, क्षमा, सुख, दुःख, नम्रता, पाप, पुण्य, आदि अनेक विषय ऐकविले. विदुराच्या प्रार्थनेनें महानज्ञानी सनत्सुजात हे श्रेष्ठ तपस्वी तिथें आले, आणि त्यांनीं सांगोपांग धर्माधर्माचें तत्त्वज्ञान धृतराष्ट्राला ऐकविलें.

**कर्ण-संताप—**

दुसरे दिवशीं सकाळीं संजय राजसभेंत उपस्थित झाला. धृतराष्ट्र त्याला म्हणाला,

" संजया, या सर्व वीरांसमक्ष तूं युधिष्ठिराचा संदेश कथन कर."

युधिष्ठिराकडे घडलेलें एकंदर वृत्त सांगून नंतर संजय म्हणाला,

" शेवटीं मी श्रीकृष्णास मुद्दाम भेटण्यासाठीं अर्जूनाच्या मंदिरांत गेलों. तिथें मधुर मद्य प्राशन केलेले अर्जुन आणि श्रीकृष्ण, द्रौपदी व सत्यभामा यांच्यासह आसनांवर बसले होते. मला बसावयास आसन देऊन श्रीकृष्ण म्हणला,

' संजया, जर हा सामाचा संदेश कौरवांना मानवत नसेल, तर त्यांना म्हणावें, तुम्ही दान, दाक्षिणा, आदि पुण्यकृत्यें करून घ्या. आपापल्या स्त्रियांसह नानाप्रकारचीं सुखेंही भोगून घ्या. कारण पार्थ अर्जुन आतां गांडीव धनुष्याचा टणत्कार करीत तुम्हावर चालून येत आहे! भीम आतां आपल्या प्रचंड गदेनें तुमच्या मत हत्तींचीं मस्तकें विदीर्ण करण्यासाठीं येत आहे! द्रौपदीची ती हृदयाला भिडणारी द्यूतसभेंतील हांक मी अजूनही विसरू शकत नाहीं. '

" तेव्हां धृतराष्ट्रा, पांडवरूप अग्नीनें तुझ्या वंशवनांत प्रवेश केला नाहीं, तोंवरच तूं श्रीकृष्णाचें स्वागत करून त्याच्या मंत्रणेप्रमाणें साम करायला सिद्ध हो."

भीष्म म्हणाले,

" होय! हाच धर्म आहे. हाच कल्याणाचा मार्ग आहे."

द्रोण म्हणाले,

" असेंच! असेंच! "

पण कर्ण म्हणाला,

" काय असेंच! हे वृद्ध भीष्म आकारण आमचा तेजोभंग करीत आहेत."

भीष्मांनीं विचारलें,

" कर्णा, तूं हेंही साहस करूं शकतोस! "

" कां? मीं माझ्या प्रबल भुजांनीं सोडलेले बाण पांडवांच्या शरिरास स्पर्श करीत नाहींत, तोंवरच त्यांच्या या वल्गना! पण एकदां मीं माझें तेजस्वी धनुष्य सज्ज केलें कीं – "

भीष्म तिरस्कारानें म्हणाले,

" पुरे ! तुझें शौर्य घोषयात्रेच्या प्रसंगीं आणि विराट राजाच्या गाई-हरण करतांना दिसून आलें. त्यावेळीं कां पळ काढलास रे ? "

या मर्मभेदक भाषणानें भडकून जाऊन कर्ण बोलला,

" असें ? तर मग दुर्योधना, जोंपर्यंत भीष्म तुझ्या बाजूनें लढत आहेत, तोंपर्यंत मी शस्त्र उचलणार नाहीं, ही माझी प्रतिज्ञाच आहे असें समज ! "

असें म्हणून तो दाणदाण पाय आपटीत सभेंतून निघून गेला. दुर्योधन चिडून म्हणाला,

" पितामह, आम्हीं युद्ध आपल्या भरंवशावर मांडलेलें नाहीं ! "

" मग ? "

" महारथी कर्णाच्या बाहुबलावरच मीं या प्रचंड कार्याचा विस्तार मांडला आहे. आणि जेव्हां मी माझ्या अस्त्रविद्येसह माझी गदा घेऊन रणांत उभा राहीन, तेव्हां तातांनाही दिसेल कीं आपण व्यर्थच पांडवांचें भय बाळगीत होतो ! "

## कृष्ण शिष्टाई—

इकडे पांडवांच्या शिबिरांतून श्रीकृष्ण हस्तिनापुरीं निघण्याची सिद्धता करीत होता. युद्धिष्ठिरादि पांडवांच्या मनावर संजयाच्या भाषणाचा जो परिणाम झाला होता, तो अजून नीटसा पुसला गेला नव्हता. युधिष्ठिर कृष्णाला म्हणाला,

" श्रीहरि, तूं चतुर आहेस, तुला मींच कांहीं फारसें सांगावें असें नाहीं. पण होतां होईतों युद्ध टळेल तर बरें, हें तुझे लक्षांत असूं दे. मात्र तूं तिकडे जातोस, हें कांहीं फारसें माझ्या मनास येत नाहीं. "

" कां ? "

" दुर्योधनाच्या दुष्टबुद्धीशीं तूंही चांगला परिचित आहेस. तो तुझें ऐकेल ? "

" न कां ऐकेना ?"

" मग जातोस तरी कशाला ? "

" ऐक युधिष्ठिरा, शेवटीं, युद्ध तर ठरलेंच आहे. पण आपण आपल्याकडून शक्य ते सर्व प्रयत्न करावेत, हा माझा प्रामाणिक हेतू आहे. माझ्यावर पुढें येणारा आक्षेप टाळण्यासाठींच मी हस्तिनापुरीं जात आहें. "

आतांपर्यंत भीम स्वस्थ बसून हें सर्व ऐकत होता. पण संजयाच्या मंत्रानें जणूं तोहि हतबलच झाला असावा. इकडे तिकडे फेऱ्या घालीत असतां एकदम थांबून तो म्हणाला,

" श्रीकृष्णा तूं आपलें असेंच कर. "

" काय ? "

" युद्धाचा परिणाम कांहीं फारसा बरा होणार नाहीं. व्यर्थ दुर्योधनाला भडकावून आणि युद्ध अंगावर ओढवून घेऊन कुलक्षय करण्यापेक्षां त्याच्याशीं गोडीगुलाबीनेंच बोल. तें महापाप न करतां वेळीं कौरवांचे दास होऊन राहाणें मला पत्करेल. "

भीमाची ही अनाठाई क्षमा पाहून श्रीकृष्णाला मोठें आश्चर्य वाटलें. तो किंचित् हंसतच भीमाला म्हणाला,

" भीमा, आतां हें सर्व तूंच बोललास काय ? "

" हो, कां ? "

" नव्हे, मला खरें वाटलें नाहीं. "

" पण कां ? "

त्याचा अधिक्षेप करीत कृष्ण बोलला,

" तर मग तूं मागें केलेल्या दुर्योधन आणि दुःशासन यांना ठार मारण्याच्या प्रतिज्ञा व्यर्थच होत्या तर ! तुमच्या धर्मपत्नीचा, कमलनयना द्रौपदीचा भरसभेंत ओढला गेलेला पदर, दुर्योधनानें तिला दाखविलेली मांडी, त्या नरपशूंनीं तिची केलेली विटंबना—"

" कृष्णा ! "

" भीमा, तें सर्व व्यर्थच गेलें तर ! आजपर्यंत तूं दांत ओंठ खात केलेले संकल्प, केलेल्या गर्जना, टाकलेले निःश्वास—! छे ! भीमा, खरें वाटत नाहीं. मला वाटतें कीं पर्वतच आपलें स्थान सोडून चळला आहे ! "

" थांब श्रीकृष्णा ! एकदम थांब. माझ्या म्हणण्याचा तूं विपर्यास करीत आहेस. लक्षांत ठेव, या बाहूंतील सामर्थ्य त्या माझ्या शत्रूंच्या प्राणांचा घोट घेण्यासाठीं जणूं काय अधीर झालें आहे. केवळ उतावीळपणाचा आरोप यायला नको, म्हणूनच मीं तुझ्याजवळ संधि करण्याची गोष्ट काढली. "

त्याला थोपटीत श्रीकृष्ण बोलला.

" असूं दे भीमा. संधि करण्याचा सर्वतोपरि प्रयत्न करण्यांत मी कसलीहि उणीव ठेवणार नाहींच. पण जर तो प्रयत्न असफल झाला, तर मात्र पांडवांची सेना तुझ्या मागें आपला मार्ग शोधीत विजयाकडे जाईल, हें लक्षांत ठेव. "

अर्जुन, नकुल, सहदेव, सात्यकि या सर्वांनींच आपलें मत युद्धाच्या बाजूनें दिलें. भीम मात्र अजून मान खालीं घालूनच बसला होता. हें पाहून एवढा वेळ आपल्या आसनावर स्वस्थ बसलेली द्रौपदी भरलेल्या गळ्यानें म्हणाली,

" मुकुन्दा. लक्षांत असूं दे, माझी लाज केवळ तुलाच आहे ! तूं माझें एकान्तिक विश्वासाचें स्थान आहेस. श्रीहरि माझ्यासारखी दुर्दैवी स्त्री या अवनीतलावर मला तर दुसरी कोणीच दिसत नाहीं. अरे, मी अयोनिजा ! धृष्टद्युम्नाची भगिनी ! प्रत्यक्ष तुझी भगिनी ! या पांच वीरांची पत्नी ! महात्म्या पंडूची सून ! पण तुम्हा सर्वांच्या देखत मला रजःस्वलेला केशांनीं धरून जेव्हां त्या नीचानें फरफटत राजसभेंत नेलें—तेव्हां—

" कृष्णा, अरे तेव्हां हे माझे वीरपुंगव पती केवळ माना खालीं घालून बसून कीं रे राहिले ! शेवटीं त्या चाण्डाळानें जेव्हां माझ्या वस्त्रास हात घातला, तेव्हां केवळ तूंच काय तो धाऊन आलास ! आणि आतां—आतां झुंजायचा प्रसंग प्राप्त झाला असतांही हे सामाच्याच रडकथा गात आहेत ! "

कृष्णा आपल्या आसनावरून उठली. आपला अत्यंत सुंदर काळा मुक्त केशभार हातीं धरून आंसवें ढाळीत ती कृष्णाजवळ आली; आणि म्हणाली,

" श्रीहरि, दुःशासनानें या केसांशीं केलेली झोंबाझोंबी विसरूं नकोस. आणि जर हे पांच वीर सोंवळीं नेसून संधि करण्यासाठीं उत्सुक झाले असतील, तर–तर —"

" बोल बोल कृष्णे ! "

" तर माझा वृद्ध पिता, मी ज्यांना कुशींत वाहिलें ते माझे पांच पराक्रमी पुत्र, माझा अभिमन्यु हे एवढेच कौरवांशीं झुंजतील ! शरिरांत प्राण असेतोंवर ! यांना बसूं दे भस्म चर्चून धर्माधर्माची चिकित्सा करीत ! "

द्रौपदीच्या नेत्रांतून अविरत अश्रुधारा वाहूं लागल्या. श्रीहरि रोमांचित होऊन तिचें सांत्वन करीत म्हणाला,

" शोक आवर कृष्णे ! तुझ्या मनांत आहे तेंच होईल. माझ्यावर तुझा विश्वास आहे ना ? तर मग कौरवांच्या स्त्रिया तुझ्याप्रमाणेंच केशभार मोकळा सोडून धायधाय रडतील, आणि तुझे पति पुन्हां: वैभवास प्राप्त होतील. "

तोंवर रात्र संपून पहाट झाली होती. त्या सकाळींच श्रीकृष्ण उत्तम रथांत बसून सात्यकीसह हस्तिनापुराकडे निघाला.

इकडे हस्तिनापुरांत जेव्हां श्रीकृष्णाच्या आगमनाची वार्ता कळली, तेव्हां सर्व नागरिक अत्यंत उत्सुक होऊन त्या शुभ प्रसंगाची वाट पाहूं लागले. सर्व नगर सडे, रांगोळ्या, तोरणें, पताका आदींनीं सुशोभित झालें. श्रीकृष्णाच्या स्वागतार्थ असंख्य जनसमुदाय नगराच्या बाहेर येऊन तिष्ठत राहिला. भीष्म, द्रोण आदि वृध्दही त्या समुदायांत होते.

शेवटीं श्रीकृष्णाचा रथ हास्तिनापुराच्या परिसरांत प्रवेशला.आनंदाच्या आरोळ्यांनीं नगर दुमदुमून गेलें. भीष्मादिकांनीं केलेल्या हृदयस्पर्शी स्वागताचा सत्कार करून श्रीकृष्णानें त्यांचें कुशल विचारलें. नंतर वृद्ध धृतराष्ट्राची भेट घेऊन श्रीकृष्ण विदुराच्या घरीं वस्तीला आला. तिथें शोकाकूल कुंतीचें सांत्वन करून त्यानें विदुराशीं सभेंतील दूतकर्माविषयीं हितगुज केलें.

इकडे श्रीकृष्णाच्या सत्कारासाठीं सगळी नगरी झटत असतां तिकडे दुर्योधनादि नीचांनीं श्रीकृष्णासच कारागारांत टाकायचा बेत चालविला ! त्याप्रमाणें त्यांनीं सर्व सिद्धताही करून ठेवली.

दुसरे दिवशीं प्रभातीं प्रातःकर्मे आटोपून श्रीकृष्णानें स्नान-संध्यावंदनादिकृत्यें संपन्न केलीं. नंतर उत्तम वेष करून मोठ्या समारंभानिशीं तो राजसभेंत जायला सिद्ध झाला. तोंच दुर्योधनानें स्वतः येऊन त्याला नमस्कार करीत राजसभेंत चलण्याची प्रार्थना केली.

सर्व राजे आपापलीं आसनें ग्रहण करून मोठ्या उत्सुकतेनें श्रीकृष्णाची वाट पाहात होते राजसभेंत मुंगीलाही शिरायला रिघाव नव्हता, आणि सात्यकीसह श्रीकृष्णानें मोठ्या गौरवानें सभेंत प्रवेश केला !

सर्व राजे आणि विद्वज्जन यथास्थानीं बसल्यावर श्रीकृष्ण उठून गंभीर स्वरांत धृतराष्ट्राला म्हणाला,

" राजा, मी पांडवांकडून सामसंदेश घेऊन आलों आहें !

" आजपर्यंत या तुझ्या दुर्योधनानें पांडवांचा अपमान करायची एकही संधी दवडली नाहीं, एकही प्रसंग वाया जाऊं दिला नाहीं. अंगीं असीम साहस आणि पराक्रम वास करीत असूनही पांडव केवळ धर्मबुद्धीनेंच याला क्षमा करीत आले आहेत.

" त्यानंतर तो अत्यंत खेदजनक द्यूतप्रसंग घडला, नव्हे, घडवून आणला गेला. त्यावेळीं तुझ्या पुत्रांनीं जें गर्ह्य आचरण केलें, त्याची निंदा करावी तितकी थोडीच आहे. एवढेंच नव्हे, तर पांडवांची धर्मपत्नी पांचाली-तिचाही करूं नये तसला अपराध तुझ्या पुत्रांकडून घडला आहे.

" आणि आज पणाचे सर्व नियम आणि अटी अत्यंत न्यायानें पुऱ्या करून पांडव तुझ्या सेवेस उपस्थित झाले आहेत. अजून त्यांचा धर्मबुद्धीवर विश्वास आहे; म्हणूनच त्यांनीं अत्यंत आदरानें तुला नमस्कार करून असें सांगितलें आहे कीं, जाऊं दे राज्य ! न मिळूं दे वैभव ! आमच्यांत सामर्थ्य असेल, तर तो सर्व थाट आम्ही पुन्हां उभा करूं. आम्हाला केवळ पांचच गांवें दायभाग म्हणून तूं दे. त्यांच्या या लीनत्वाची प्रशंसा करण्यासाठीं मला तर शब्दच सांपडेनासे झाले आहेत ! "

थोडें थांबून श्रीकृष्णानें सभेकडे एक दृष्टि टाकली. सगळी सभा साधु साधु असें गर्जली. पुनः श्रीकृष्ण बोलूं लागला,

" राजा, पांडवांच्या पराक्रमाशीं तुलना करूं जातां केवळ अनामिकाच सार्थ होते ! असे ते तुझे पुतण्ये केवळ तुझ्याच कृपाकटाक्षाची वाट पाहात आहेत. तूं जर त्यांना आश्रय दिलास, तर तुझ्या भाग्याला पारावार उरणार नाहीं हें तूं निश्चित समज. तुझें आजचें वैभव शतगुणित होऊन प्रत्यक्ष इन्द्रालाही तुझा हेवा करावासा वाटेल. मात्र यासाठीं तुला एक केलें पाहिजे. "

" काय ? "

" या तुझ्या उद्दाम पुत्राच्या अनावर पापवासनेला पायबंद घातला पाहिजे ! "

पुनः एकदां क्षणभर थांबून श्रीकृष्ण बोलला,

" आणि हें न घडलें, तर–तर तुला तुझ्या कुलाच्या विनाशासाठीं सज्ज असलें पाहिजे ! काय तो निर्णय घेणें तुझ्या स्वाधीन आहे. हे तुझे वृद्ध धर्मज्ञ सभासद तुला योग्य तें गुज सांगोत. "

श्रीकृष्णाच्या भाषणानें सर्व सभा मुग्ध झाली. सभेंत उपस्थित असलेल्या परशुरामादि तपस्व्यांनींहि श्रीकृष्णाच्या वचनाचेंच समर्थन केलें. धृतराष्ट्र एक निःश्वास टाकून श्रीकृष्णास म्हणाला,

" कृष्णा, तुझ्यासारखा पथ्यकर असेल तेंच बोलणारा वक्ता मिळणें अत्यंत दुर्लभ आहे; पण हा दुर्योधन माझें ऐकलसें मला वाटत नाहीं. तूंच याला चार हिताचीं वचनें कां सांगत नाहींस ? "

श्रीकृष्णानें परोपरीनें दुर्योधनास उपदेश केला. भीष्म, द्रोण आदि वृद्धांनींही त्याला हिताचे बोल ऐकविले. पण एखाद्या खुंटाप्रमाणें बसून राहिलेला दुर्योधन शेवटीं कृष्णाला म्हणाला,

" पुरे झालें कृष्णा ! मीं फार ऐकलें. पांडवच काय ते धर्मज्ञ, आणि मी काय पाप पांघरून जन्माला आलों आहें ? द्यूतांत पांडव हरले, हा काय माझा अपराध ? संधीविषयीं म्हणशील, तर युद्धाच्या नांवानें तेच डुरकाळ्या फोडीत आहेत. त्यांनाच युद्धाची अधिक खुमखुमी आहे. तर मग मीही क्षत्रियच आहें.

" काय होईल ! युद्धांत मी मरेन ! एवढेंच ना ? क्षत्रियाला याहून भाग्याची दुसरी गोष्ट नाहीं.

" मी तुला एकदांच आणि शेवटचें सांगून ठेवतों. अर्ध्या राज्याची गोष्ट तर सोडूनच दे; पांच गांवेंच काय, सुईच्या अग्रावर राहील, इतकीही भूमि मी पांडवांना देणार नाहीं. त्यांना पाहिजे तें त्यांनीं युद्ध करूनच घ्यावें. "

हें त्याचें उद्धट भाषण ऐकून श्रीकृष्ण म्हणाला,

" ठीक आहे. तुझी तीही हौस पुरी होईल. "

दुःशासन खुणेचें वाक्य बोलला,

" दुर्योधना, सांभाळ, तूं जर संधि न केलास, तर हे वृद्ध तुला, मला व कर्णाला बांधून कृष्णाचे स्वाधीन करतील ! "

हें ऐकतांच दुर्योधन उद्धटासारखा दाणदाण पाय आपटीत सभेंतून चालता झाला. हें पाहून चिंतित विदुरानें धृतराष्ट्राच्या सांगण्यावरून गांधारीला सभेंत बोलावून आणलें. तिच्या आग्रहावरून तो दुर्योधनालाही परत घेऊन आला.

पण गांधारीचा तळमळीचा उपदेशही निष्फळ ठरून दुर्योधन व दुःशासन शकुनीसह श्रीकृष्णासच बांधण्याचीं खलबतें करूं लागले. याचा सुगावा लागतांच सावधान सात्यकी कृतवर्म्याला म्हणाला,

" कृतवर्म्या, तूं सज्ज अस. कदाचित् युद्ध करावें लागणार आहे. "

विदुराला ही वार्ता कळली, तत्क्षणीं धांवत धृतराष्ट्राकडे जाऊन तो म्हणाला,

" राजा, तुझा दिवटा पुत्र काय करीत आहे ? "

" काय ? "

" तो कमललोचन जगदेकवीर श्रीकृष्णालाच बांधून घालण्याच्या खटपटींत आहे ! "

हें ऐकून किंचित् हास्य करीत श्रीकृष्ण धृतराष्ट्राला म्हणाला,

" धृतराष्ट्रा, आतां तूं एक कर—"

" काय ? "

" मी दुर्योधनास जें शासन करीन तें स्वस्थ बसून पहा मात्र. उगीच मध्यें पडूं नकोस. मी आतांच या मूर्खाला पाशबद्ध करून युधिष्ठिराच्या स्वाधीन करतों.

धृतराष्ट्र घाबरून जाऊन उतावळ्या स्वरांत विदुराला म्हणाला,

" विदुरा, जा बाबा ! अत्यंत त्वरेनें त्या राज्यलोभी मूर्खाला समजावून इकडे घेऊन ये ! "

विदुरानें मोठ्या कष्टानें त्या सर्व पाप्यांना राजसभेंत आणलें. ते आले हें कळतांच धृतराष्ट्र ओरडून म्हणाला,

" मूर्खा दुर्योधना, तूं हें कसलें साहस करीत आहेस ? "

" काय झालें ? "

" अरे, तूं सूर्य आपल्या मुठींत धरूं पहातोस काय ? महासागर बाहुबलानें तरून जायची खटपट करतोस काय ! मूढा, तूं काय त्रिभुवनैकवीर केशवाला बांधून ठेवण्याचे संकल्प करीत आहेस ? "

विदुरानें आणि इतर वृद्धांनींही दुर्योधनाची समजूत घालण्याचे यत्न केले. पण तो खुंटासारखा केवळ बसूनच राहिला. हें पाहून श्रीकृष्ण म्हणाला,

" दुर्योधना, तुला काय वाटलें ? मी इथें एकटा आहें ? बघ बघ ! क्षण-भर इकडे लक्ष दे ! सांभाळ. शुद्धि हारपूं देऊं नकोस म्हणजे झालें. "

असें बोलून श्रीकृष्णानें अट्टहास्य केलें. तों वीज चमकावी, तसा चमत्कार होऊन सभेंत उपस्थित असलेल्या सर्वांस एक अत्यंत अद्‌भुत दर्शन घडलें. जणूं श्रीकृष्णाचे भोंवतीं पांडवांसुद्धां सर्व देव अगणित संख्येनें शस्त्रास्त्रांसहित उपस्थित आहेत, असें त्यांना दिसलें. तें दृश्य पाहून भीष्म, द्रोण, विदुर, संजय व ऋषिगणांव्यतिरिक्त इतर सर्वच सभाजनांना जणूं झांज झाल्या-सारखें झालें.

कांहीं क्षणांनीं त्या अद्‌भुत दृश्याचा तिरोभाव आपल्या रूपांत करीत सात्यकीच्या हातांत हात घालून श्रीकृष्ण सभेबाहेर पडला. त्याचा रथ बाहेर उपस्थित होताच. धृतराष्ट्रादि सर्व वृद्ध घाईघाईनें त्याच्याकडे आले. धृतराष्ट्र हात जोडून म्हणाला,

" श्रीकृष्णा, तूं पाहिलेंच आहेस—दुर्योधन माझें ऐकत नाहीं ! "

" होय. आणि हा संदेश युधिष्ठिरापर्यंत पोंचविण्याचें काम मी करीन. "

" पण— "

" पण काय ? "

" तूं मला मात्र दोषी ठरवूं नकोस ! "

श्रीकृष्णानें हंसत आपला रथ विदुराच्या घराकडे चालविला. तिथें कुंती अत्यंत आतुर होऊन त्याची वाट पाहात होती. ती श्रीकृष्णाला पाहातांच म्हणाली,

" काय ठरलें ? "

" तुझ्या मनासारखें ! "

" म्हणजे ? "

" युद्ध ! "

" उत्तम झालें ! त्या युधिष्ठिराला म्हणावें, तूं काय वेदांताची चर्चा करणारा कोणी भिक्षुक आहेस काय ? अरे, तूं क्षत्रिय ! लढणें हाच क्षत्रियांचा धर्म. व्यर्थ धर्माधर्माचा घोळ घालून काय बसलास ? "

त्यानंतर वीरमाता विदुलेची कथा श्रीकृष्णास ऐकवून कुंती म्हणाली,

" माझ्या वीरपुत्रांना ही कथा सांग. आणि म्हणावें, त्या माझ्या लाडक्या सुनेचा जो घृणास्पद अपमान या चांडाळानीं केला, त्याची तरी थोडी लाज धरा ! अरे, त्या पोरीच्या दुर्दशेचें स्मरण झालें, म्हणजे मलाही त्या मेल्यांना खाऊं कीं गिळूं असें होऊन जातें. तुम्ही तर पुरुष आहांत म्हणावें ! कांहीं थोडा तरी चेव येऊं द्या !

" श्रीकृष्णा, तूं त्या माझ्यांना खडबडून जागें कर. म्हणावें, तुमची आई त्या कृत्याच्या प्रतिशोधाची वाट पाहात आहे ! "

कुंतीला वारंवार आश्वासन देत श्रीकृष्ण आपल्या परिवारासह नगराबाहेर पडला. त्याला पोंचविण्यास आलेल्या कौरवांपैकीं एकट्या कर्णाला त्यानें आपल्या रथांत बोलाविलें, आणि तो नगरापासून थोडा दूर गेल्यावर त्याला स्नेहभावानें म्हणाला,

" कर्णा, हें तूं काय मांडलें आहेस ? "

" काय ? "

" पांडवांचा द्वेष करून तूं कशाची साधना करीत आहेस ? "

" मला तुझें बोलणें उमजलें नाहीं. "

" तूं कुणाचा पुत्र हें तुला माहीत आहे काय ? "

" मी ? मी राधेचा पुत्र ! अधिरथाचा–"

" नव्हे कर्णा. माझ्यावर विश्वास ठेवशील कां ? "

कर्ण अत्यंत आश्चर्यानें श्रीकृष्णाकडे पाहात म्हणाला,

" नव्हे ? "

" मुळींच नव्हे. "

" मग कुणाचा ? "

" कुंतीचा ! "

आश्चर्यानें दिङ्मूढ झालेल्या कर्णाला त्याच्या जन्माची कथा ऐकवून श्रीकृष्ण म्हणाला,

" आतां काय कर्णा ? "

डोळ्यांत दाटलेलीं आंसवें परत आंत लोटीत कर्ण भरलेल्या गळ्यानें म्हणाला,

" श्रीकृष्णा—! "

" काय ? "

" नाहीं नाहीं ! हें खोटें आहे ! "

" खोटें ? "

" होय ! माझी माता राधा ! माझा पिता अधिरथ. मी कुणाच्या पोटीं जन्माला आलों ? कुंतीच्या ? कदाचित् हें खरेंही असेल. कदाचित् नसेलही–! पण लोकलज्जेमुळें तुझ्या म्हणण्याप्रमाणें जिनें जन्मतःच माझा त्याग केला, त्या कुंतीचा मी कोणीही नव्हें ! मी राधेचा पुत्र कृष्णा ! मी राधेय. "

" अरे, असा भ्रमिष्ट होऊं नकोस. एकदां या सत्याचा स्वीकार कर, कीं मग सर्व पांडव आपला ज्येष्ठ भ्राता या नात्यानें तुझा आदर करतील, तुझी सेवा करतील आणि मग ज्येष्ठ पांडव या नात्यानें आम्ही सर्व तुझें आधिपत्य मान्य करूं. "

कर्ण निग्रहानें म्हणाला,

" फार उशीर झाला आहे रे कृष्णा ! फार उशीर–"

" उशीर ? "

" होय. सूतकुलाशीं जडलेले माझे संबंध आतां मी तोडूं शकत नाहीं. एवढेंच नव्हे तर–"

" काय ? "

" राजा दुर्योधनानें हा रणयज्ञ केवळ माझ्या भरंवशावर मांडला आहे. तो काय म्हणेल ? म्हणेल कीं ऐन वेळीं आपण पांडव असल्याचें घोषित करून कर्णानें माझा निरातिशय विश्वासघात केला ! कृष्णा, आतां तूं एक कर. "

" सांग. "

" युधिष्ठिराला हें माहीत आहे काय ? "

" नाहीं."

" तर मग त्याला हें सांगूं नकोस. "

" कां ? "

" हें कळतांच तो धर्मनिष्ठ पुरुष राज्याचा स्वीकार करणार नाहीं. आणि त्यानें मला राज्य समर्पित केलें, म्हणजे एका अर्थानें दुर्योधनाचाच जय झाला. कारण मी तें दुर्योधनासच समर्पण करणार ! नव्हे कृष्णा ! "

" ऐक रे कर्णा !"

" नाहीं ! आतां युद्धच होणार ! तें होऊं दे ! पण माझ्या अन्तर्मनांत फार मोठें वादळ निर्माण झालें आहे रे ! "

" कसलें वादळ ? "

" छे छे ! जेव्हां मी माझ्या भात्यांतून नवनिशित शर काढून शत्रुसैन्यावर त्यांचा वर्षाव करण्यासाठीं सिद्ध होईन, तेव्हां—तेव्हां कृष्णा, माझ्यापुढें पांडव उभे नसतील-तर—"

" तर काय ? "

" माझ्या मातेचे पुत्र ! कृष्णा, त्यांच्या अपमानाची एकही संधि मीं वाया दडवली नाहीं ! मला किती पश्चात्ताप होतो आहे म्हणून सांगूं ? "

कांहीं क्षण स्तब्ध राहून नंतर वादळानें थरथरां कांपत असलेल्या वृक्षा-सारखा हलून कर्ण बोलला,

" एक करशील कृष्णा ? "

" काय ! "

" युद्ध तर होणारच. ज्या अर्थी तूं पांडवांचा साहाय्यकर्ता आहेस, त्या अर्थी त्यांचा जय होणार. या रणयज्ञांत आम्हा सर्वांच्या आहुती पडणार. पण एक गोष्ट न विसरतां घडवून आण."

" कोणती ! "

" अर्जुनाचा रथ माझ्या समोर आण. माझ्या दुष्कृत्यांचें प्रायश्चित मला त्याच्या हातानें मिळूं दे." पुन्हां एकदां श्रीकृष्णाला घट्ट आलिंगन देऊन डोळे पुशीत कर्ण रथाखालतीं उतरला.

## माता-पुत्र—

कुंतीनें श्रीकृष्णास युद्धासंबंधीं प्रेरणा केली खरी. पण नंतर तीही अत्यंत अस्वस्थ झाली. विदुरालाही झोप येईना. तो कुंतीकडे जाऊन म्हणाला.

" श्रेष्ठे, काय केलें असतां यांतून मार्ग निघेल ? "

" एक केलें तर ? "

" काय ! "

लज्जेशीं झुंजत मोठ्या प्रयत्नांनीं कुंतीनें कर्णजन्माचा इतिहास विदुराला ऐकविला. नंतर ती म्हणाली,

" तेव्हां मी स्वतः कर्णाकडे जात्यें."

" पण तो ऐकेल? "

" यत्न तर करूं या ! "

" ठीक आहे."

कर्णाचा शोध घेत कुंती गंगातीरीं जाऊन पोंचली. तिथें कर्ण एकतान होऊन स्नानोत्तर सूर्याचा जप करीत उभा होता. बराच वेळ तो संपण्याची वाट पाहिल्यावर उन्हानें त्रस्त झालेली कुंती शेवटीं त्याच्या उपरण्याच्या सावलींत जाऊन बसली.

जप समाप्त झाल्यावर कर्ण मागें वळला, तों त्याला कुंती दिसली. क्षणभरच त्याच्या दृष्टीसमोर वीज चमकून गेली. नंतर स्वतःला सांभाळीत मोठ्या मर्यादेनें कर्ण म्हणाला,

" राजमाते, राधेचा पुत्र कर्ण तुला नमस्कार करीत आहे."

अत्यंत व्याकुळ होऊन कुंती म्हणाली,

" नव्हे नव्हे कर्णा ! "

" नव्हे ? "

" नव्हे रे ! राधेचा पुत्र नव्हे ! कुंतीचा पुत्र ! "

नंतर तिनें अडखळत अडखळत कर्णाला त्याच्या जन्माची कथा सांगितली. कर्ण पाषाणवत् उभा राहून तें स्वतःचें जन्मवृत्त आपल्या जन्मदात्रीच्या मुखानें ऐकत होता. शेवटीं कुंती म्हणाली,

" आणि माझ्या बाळा, अशा रीतीनें एका आईनें जरी समाजभयानें आपल्या पोटच्या गोळा थरथरत्या हातांनीं गंगेंत सोडून दिला असला, तरी तेवढ्यानें तो राधेय होऊं शकत नाहीं. तूं कौंतेयाला उचित असा वाग."

कर्ण स्थिर शब्दांत म्हणाला,

" राजमाते, आतां फार उशीर झाला आहे, असें तुला वाटत नाहीं ? "

" कर्णा— ! "

" होय, तुझ्या त्या रात्रीं अंधारांत केल्या गेलेल्या पुत्रत्यागामुळें काय झालें माहीत आहे ? "

" काय ? "

" मी क्षत्रिय असूनही सूत ठरलों ! माझें केवढें मोठें अहित झालें आहे ! आणि आतां तूं मला जी ही जाणीव द्यायला आली आहेस, ती केवळ तुझ्या स्वार्थासाठीं— "

" नव्हे रे कर्णा— ! "

" होय ! तुझे पुत्र जिवंत रहावेत म्हणूनच— "

" ऐक रे बाळा— ! "

" तूंच ऐक, मी युद्धांत तुझ्या पुत्रांशीं प्राणपणानें लढेन ! मात्र ही माझी जन्मकथा कळल्यामुळें मी एक करीन. "

" काय ? "

" अर्जुनास सोडून तुझ्या इतर पुत्रांना मी मारणार नाहीं. अर्जुन माझ्याशीं समकक्ष आणि समबल आहे. येत्या घनघोर संग्रामांत एक तर—"

" बोल कर्णा ! तुझे कठोर शब्द ऐकायला मी आतां सिद्ध झाल्यें आहें."

" एक तर अर्जुन अथवा मी, कोणीतरी रणभूमीवर शयन करील ! कोणत्याही प्रकारें तुला एक समाधान लाभेल. "

" कोणतें ? "

" तुझे पांच पुत्र जिवंत राहातील ! मी अथवा अर्जुन—कोणीही धाराशायी झाला तरी ! क्षमा कर माते ! "

कुंतीनें थरथरत आपल्या त्या पाहिल्या पुत्राला घट्ट आलिंगन दिलें—पहिलें आणि शेवटचें.

## सिद्धता—

पांडव श्रीकृष्णाची वाट अत्यंत आतुरतेनें पाहत होते. तो येतांच कांहीं वेळ त्याला विसावा घ्यायला लावून ते सर्व एकत्र झाले, आणि त्याला म्हणाले,

" श्रीकृष्णा, काय घडलें तें सर्व ऐकण्यासाठीं आम्हीं अत्यंत उत्सुक आहोंत."

श्रीकृष्णानें हस्तिनापुरीं घडलेलें सर्व वृत्त विस्तारपूर्वक सांगितलें. धृतराष्ट्रानें दुर्योधनाची काढलेली समजूत, भीष्म-द्रोणांनीं त्याला केलेला उपदेश, आपण त्याला सांगितलेली वस्तुस्थिति, केलेलें भविष्यकथन इत्यादि सर्व निवेदिल्यावर श्रीकृष्ण म्हणाला,

" युधिष्ठिरा, पण यांपैकीं एकही गोष्ट त्याच्या मनास आली नाहीं. मला बांधून घालण्याचा अयशस्वी प्रयत्न केल्यावर शेवटीं दुर्योधन डोळे गरगर फिरवीत त्याच्याशीं एकनिष्ठ असलेल्या नृपांना म्हणाला,

' राजे हो ! आज पुष्य नक्षत्र आहे. आजच्या शुभ योगावरच तुम्ही सर्व आपापलीं सैन्यें सुसज्ज करून कुरुक्षेत्रावर चला. '

" तेव्हां युधिष्ठिरा, आतां एकच कर्तव्य आणि एकच गंतव्य."

" कर्तव्य काय ? "

" युद्ध ! "

" आणि गंतव्य कोणतें ? "

" कुरुक्षेत्र ! "

सर्व वीरांनीं तें वचन ऐकून सिंहनाद केला. तो नाद ऐकून दुर्बलांचे बाहूही स्फुरण पावले. गलबला शांत झाल्यावर युधिष्ठिर म्हणाला,

" वीर हो ! श्रीकृष्ण काय म्हणाला तें सर्व तुम्ही ऐकलेंच आहे. सामाचे सर्व उपाय निरुपयोगी ठरल्यावर शेवटीं युद्ध हाच निर्णय ठरला आहे. तेव्हां आमच्याकडील द्रुपद, विराट, धृष्टद्युम्न, शिखंडी, सात्यकि, चेकितान आणि भीम या वीरांपैकीं सेनापति-पदाचा भार कोणाकडे सोंपवावा ? "

सर्व वीर गर्जले,

" आम्हाला कोणीही सेनापति चालेल. "

" तरीपण कोणी तरी नेता हवाच. "

मग प्रत्येक जण निरनिराळीं नांवें सुचवूं लागला. शेवटीं युधिष्ठिरानें श्रीकृष्णास विचारलें,

" श्रीकृष्णा, याविषयीं काय तो निर्णय तूंच कां देत नाहींस ! "

क्षणमात्र विचार करून श्रीकृष्ण म्हणाला,

" ऐक युधिष्ठिरा. कौरवांकडील प्रमुख वीर द्रोणाचार्य-त्यांच्या वधासाठींच ज्याचा जन्म, तो धृष्टद्युम्नच तूं सेनापति करावास. "

सर्व वीरांनीं उद्घोष करून या विधानाला संमति दिली. नंतर मग मोठाच उठाव करून धृष्टद्युम्नाच्या आधिपत्याखालीं ती सर्व सेना कुरुक्षेत्राकडे निघाली. त्या प्रबल, चतुरंग सेनेबरोबर युद्धसामग्रीनें भरलेले गाडे, व्यापारी, अपार संपत्ति, शतघ्नी, भृशुंडी आदि यंत्रायुधें आणि शल्यवैद्य होते.

दुर्योधनानें मार्ग रोखण्यासाटी धाडलेल्या सैनिकांची वाट लावीत तो सात अक्षौहिणींचा सेनासमूह जलद गतीनें कुरूक्षेत्रावर आला. हिरण्वती नदीच्या तट्टावरील रेती व चिखल यांनी रहित अशी सुरेख जागा पाहून तिथें श्रीकृष्णानें त्या सेनेसाठीं अपार शिबिरें सिद्ध करविली.

भोंवतालीं असलेला प्रदेश सपाट, सुपीक, गवत आणि धान्य आदि पदार्थांनीं युक्त असा होता.

त्या प्रदेशांत कांहीं काळ विसावून सर्व सेना युद्धास सज्ज झाली.

हें वृत्त जेव्हां दुर्योधनास कळलें, तेव्हां त्यानेंही आपल्या सर्व सेनाप्रमुखांना एकत्र केलें. नंतर तो म्हणाला,

" पितामह, पांडवांची सेना युद्धास सज्ज झाली आहे. तेव्हां आपण आमच्या सेनेचें आधिपत्य स्वीकारून भावी महायुद्धांत आम्हाला विजय मिळवून द्यावा, अशी माझी प्रार्थना आहे. "

भीष्मांनीं क्षणमात्र चिन्तन करून म्हटलें,

" दुर्योधना, ऐक. अर्थदास या नात्यानेंच तुझ्या पक्षांत सम्मीलित होणें भाग पडत आहे. एऱ्हवीं पांडव आणि तुम्ही दोघेही मला सारखेच आहांत. तूं सांगत आहेस, म्हणून मी तुझी इच्छा मान्य करीन. मात्र दोन अटींवर. "

" त्या कोणत्या ? "

" पहिली अट, मी प्रत्येक दिवशीं दशसहस्र योद्धयांस यमसदनास पाठवीन. मात्र मी पांडवांस मारणार नाहीं. "

" आणि दुसरी ? "

" दुसरी अशी कीं, मीं किंवा कर्ण या दोघांपैकीं कोणींतरी युद्ध करावें !"

कर्ण ताडकन् उठून म्हणाला,

" तसेंच होईल—तसेंच होईल—"

" कर्णा—"

" होय दुर्योधना. हा गांगेय मारला जाईपर्यंत मीही धनुष्य उचलणार नाहीं. "

एक निःश्वास सोडून दुर्योधन म्हणाला,

" ठीक आहे. तसेंच होवो. "

नंतर त्यानें स्वस्तिवाचनादि मंगल क्रिया करवून भीष्मांस सेनापतिपदाचा अभिषेक केला. मग भीष्मांच्या आधिपत्याखालीं ती कुरूंची प्रचण्ड सेना कुरुक्षेत्राकडे निघाली.

भारतांतील बहुधा सर्व राजे आपापल्या सेनांसह त्या दोन्ही पक्षांत युद्धाच्या इच्छेनें एकत्र झाले होते. केवळ बलरामच कोणताही पक्ष न स्वीकारतां तीर्थयात्रेस निघून गेला. तसेंच रुक्मिणीचा गर्विष्ठ भाऊ रुक्मी, हाही कुरुक्षेत्रावर येऊनही आपल्या अहंकारामुळें दोन्ही पक्षांकडून उपेक्षा होऊन ससैन्य आपल्या नगरीकडे परतला.

पुनः दुर्योधनानें उलूक नांवाचा दूत पांडवांकडे पाठवून त्यांना नाना कटु वचनांचे द्वारें हतोत्साह करण्याचा प्रयत्न केला. पण पांडवांनीं त्याला परत धाडून सांगितलें,

" उलुका, तुझ्या त्या गर्विष्ठ राजाला सांग, कीं त्याच्या या कटु वाग्बाणाचें उत्तर आमच्या नवनिशित बाणांनीच दिलें जाईल. "

## नियम—

पांडव आणि कौरव, या उभय पक्षांच्या नेत्यांनीं युद्धासंबंधीं कांहीं नियम केले. रथीनें रथीशीं, गजारूढानें गजारूढाशीं, अश्वारोह्यानें अश्वारोहीशीं आणि पदातीनें पदातीशींच युद्ध करावें. युद्धांतून परावृत्त झालेल्या योद्धयाला मारूं नये. असावध वीराला सावध करून मगच प्रहार करावा. असम बल असलेल्याशीं युद्ध करूं नये. अश्व, शस्त्रें पुरविणारे सेवक, भेरी आदि रणवाद्यें वाजविणारे वादक, यांच्यावरही कोणीं प्रहार करूं नये. तसेंच युद्ध संपल्यावर सर्वांनीं परस्परांशीं स्नेहभावानें वर्तन करावें.

असे नियम घालून दिल्यावर दुसऱ्या दिवशीं होणाऱ्या युद्धाचें चिंतन करीत ते सर्व वीर आपापल्या शिबिरांत विसांवले.

## संजय उवाच—

धृतराष्ट्र आंधळा खरा. पण युद्धांतील सर्व प्रकार कळावा, अशी त्याची तीव्र इच्छा. ती व्यासांना कळल्यावर ते त्याला म्हणाले,

" पुत्रा, तुझी इच्छा असेल, तर हें युद्ध पाहतां येण्यासाठीं मी तुला दृष्टिदान करीन."

क्षणभर धृतराष्ट्राला तो मोह झाला. पण नंतर विचार करून तो म्हणाला,

" नको ! "

" कां ? "

" या युद्धांत माझ्या पुत्रांचा नाश होईल काय ? "

" होय. चिन्हें तेंच भविष्य वर्तवीत आहेत."

" तर मग माझ्या पुत्रांचा नाश पाहाण्यापेक्षां मी आंधळा आहें तोच बरा !"

" तर मग तुला इथें बसूनच युद्धवार्ता कळूं शकेल, अशी व्यवस्था मी करतों. "

" कोणती ? "

" हा संजय —हा धर्मात्मा आणि बुद्धिमान् आहे. याला इथें बसूनही युद्धांतील सर्व व्यापार कळूं शकतील, अशी दिव्य दृष्टि मी देतों. "

व्यासांनीं संजयाच्या मस्तकावर हात ठेवतांच त्याचा जणूं पुनर्जन्म झाला! युद्धासाठीं सज्ज असलेल्या त्या सर्व वीरांचे कायिक, वाचिक आणि मानासिक व्यवहारही त्याला करतलांतील आवळ्याप्रमाणें दिसूं लागले.

व्यास गेल्यावर संजय हर्षित स्वरांत म्हणाला,

" राजा, मला कुरुक्षेत्रावरील सर्व घडामोडी जणूं माझ्या समोरील प्रांगणांतच घडत असल्याप्रमाणें पाहतां येत आहेत. तेव्हां मी तुला त्यांतील कोणता भाग सांगूं, तें बोल. "

धृतराष्ट्र धडधडत्या छातीवर एक हात ठेवीत म्हणाला,

" संजया, धर्मक्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या कुरुक्षेत्रांत माझे पुत्र आणि पांडव युद्धाच्या इच्छेनें एकत्र झाले आहेत. त्यांनीं काय केलें तें मला सांग. "

संजय म्हणाला,

" पांडवांच्या सैन्याची अपूर्व व्यूहरचना पाहून तुझा ज्येष्ठ पुत्र आचार्य द्रोणांजवळ गेला. त्यांना त्यांचा शिष्य धृष्टद्युम्न यानें व्यूह रचून सिद्ध केलेली पांडवांची सेना दाखवून दुर्योधनानें त्या सेनेंतील वीरांचें तसेंच आपल्या पक्षांतील प्रमुख योद्ध्यांचेंही वर्णन करून सांगितलें.

नंतर भीमानें रक्षण केलेल्या पांडवांच्या सेनेविषयीं तुच्छतादर्शक उद्गार काढीत भीष्माच्या सेनापतित्वानें सुरक्षित असलेल्या आपल्या सैन्याविषयीं त्यानें प्रौढीही मिरविली. मग त्यानें भीष्मांचें रक्षण करण्याविषयीं द्रोणांची प्रार्थना केली.

तें ऐकून भीष्मांनीं आपला शंख वाजविला. त्याबरोबर कौरवसेनेंतील वाद्यसमूहानें त्याची साथ करीत गगन गर्जून टाकलें.

हा ध्वनि ऐकतांच शुभ्र अश्व जोडलेल्या रथावर बसलेले माधव आणि पांडव अर्जुन यांनीं आपले दिव्य शंख फुंकले. पांडवांनींही त्यांचें अनुकरण केलें. तो महाघोष ऐकतांच कौरवसेनेंतील भीरूंचीं हृदयें क्षणमात्र थांबलीं.

मग अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला,

" अच्युता, युद्धाच्या इच्छेनें एकत्र झालेल्या या राजांच्या मध्यभागीं माझा रथ नेऊन उभा कर. म्हणजे यांपैकीं माझ्याशीं युद्ध करण्याच्या योग्यतेचे कोण कोण आहेत, तें एकदां मी पाहून घेईन."

श्रीकृष्णानें मोठ्या कौशल्यानें अर्जुनाचा दिव्य रथ कांहीं क्षणांतच उभय सैन्यांच्या मध्यभागीं नेऊन उभा केला. नंतर तो म्हणाला,

" अर्जुना, युद्धासाठीं उतावळे झालेले हे कौरव पहा."

युध्दापूर्वी संजयानें पांडवांना धृतराष्ट्राच्या ज्या भ्रष्ट संदेशाचें कथन केलें होतें, त्याचा परिणाम अजून पुरतेपणीं नष्ट झाला नव्हता, तोंच अर्जुनाच्या दृष्टीस ते युध्देच्छु कौरव पडले. त्याला तिथें कोण कोण दिसले?

पितामह भीष्ण, आचार्य द्रोण, मामा शल्य, भ्राता दुर्योधन आणि असेच अनेक संबंधी!

त्यानें भ्रमित होऊन क्षणमात्र आपल्या सेनेकडे दृष्टि वळविली. तों त्याला मरण्यामारण्याच्या इच्छेनें युद्धास उतावळे झालेले अभिमन्यु आदि पुत्र, द्रुपद आणि इतर सखे दिसले!

त्या क्षणीं त्याचें मन मोहाच्या आवर्तांत सांपडून गटंगळ्या खाऊं लागलें!

तो श्रीकृष्णास अति व्यथित स्वरांत म्हणाला,

" श्रीकृष्णा, युद्धाच्या इच्छेनें रणभूमीवर एकत्र झालेल्या या स्वजनांस पाहून माझें मन व्याकुळ झालें आहे. माझीं गात्रें शिथिल झालीं आहेत. तोंडास कोरड पडली आहे. गांडीव धनुष्य हातांतून गळून पडत आहे. मी उभाही राहूं शकत नाहीं.

" या स्वजनांस युद्धांत ठार मारल्यावर त्रिभुवनाचें राज्य मिळालें, तरी त्याचा काय लाभ?

" ज्यांच्यासाठीं राज्यें मिळवायचीं, ते हे--"

" ते हे आचार्य, पितर, पुत्र, पितामह, मातुल, श्वशुर, मेहुणे, संबंधी--

" मधुसूदना, यांना मी ठार मारूं? केवळ पृथ्वीच्या राज्यासाठीं?

" छे ! हा विचार तर यांनींहि करायला पाहिजे होता. पण त्यांच्या मनांतून विवेकच परदेशी झाला आहे. "

" म्हणून काय आम्हीही हें कुलक्षयाचेंच पाप करावें ? "

" कुलक्षयानें होणारा कुलधर्माचा नाश—अधर्माचा प्रसार—कुलस्त्रियांचें पतन—वर्णसंकर—पितरांची दुर्दशा आणि शेवटीं नरकवास. ही परंपरा आम्हांला चांगली माहीत आहे. "

" छे छे ! हें महापाप करण्यापेक्षां कौरव मला ठार मारोत ! तेंच माझ्यासाठीं अंतिम कल्याणास्पद ठरेल."

अर्जुनानें उद्विग्न होऊन धनुष्यबाण खालीं ठेवून दिलें, आणि तो रथाच्या मागील भागांत जाऊन बसून राहिला !

श्रीकृष्णाला अर्जुनाची मोहाकुलता पाहून अत्यंत आश्चर्य वाटलें. तो त्याला म्हणाला,

" अर्जुना, श्रेष्ठांना न शोभणारी ही पापबुद्धि ऐन हातघाईच्या वेळीं तुझ्या मनांत कशी निर्माण झाली ? अरे, दुर्बलासारखा हातपाय कां गाळतोस ? हा क्लीबपणा तुला शोभतो का ? ऊठ, हृदयाची दुर्बलता निग्रहानें दूर सारून युद्धास तयार हो. "

अर्जुन खिन्न स्वरांत म्हणाला,

" भीष्म आणि द्रोण यांच्याशीं युद्ध करायला तयार होऊं ?

" अरे माधवा, हे आमचे गुरुजन आहेत रे !

" यांना मारण्यापेक्षां भीक मागितलेली बरी. नवनिशित बाणांनीं यांचीं शरिरें वेधून त्यांच्या रक्तानें माखलेले भोग आम्हीं भोगीत बसावें काय ?

" श्रीकृष्णा, मी काय करूं ? काय न करूं ? मला कांहींच कळत नाहीं.

" माझ्या बुद्धीभोंवतीं कार्पण्याचें पडळ झांकोळून आलें आहे. तेव्हां आतां मला माझें इहपरलोकीं कल्याण करणारें कर्तव्य तूंच सांग.

" तुला सोडून मी कुणाकडे जाऊं ? तूं माझा परम गुरुजन आहेस. तेव्हां माझ्या इंद्रियांचें बल हरण करणारा हा शोक दूर होईल, असा उपाय तूंच मला सांग. "

अर्जुनाचें तें अरण्यपांडित्य पाहून श्रीकृष्णास हंसूं आलें. तो जणूं त्याचा उपहासच करीत त्याला म्हणाला,

" वा वा ! अर्जुना, वस्तुतः जे शोक करण्यास योग्य नाहींत, त्यांच्यासाठीं तूं रडायला बसला आहेस ! आणि पुनः गोष्टी मात्र एखाद्या वाक्पंडिताला शोभतील अशा बोलत आहेस ! अरे, जे खरोखर धर्म जाणतात, ते या मर्त्य मानवांबद्दल शोक करीत बसत नाहींत.

" कारण असें, कीं तूं मी व हे सर्व राजे जन्मण्यापूर्वी आणि मृत्यूनंतरही असूंच असूं—आत्मरूपानें. या मर्त्य शरिरांत वास्तव्य करणारा देही आत्मा कौमार्य, यौवन आणि जरा या तीन अवस्थाप्रमाणेंच देहान्तर या चौथ्या अवस्थेलाही प्राप्त होत असतो. त्याबद्दल शोक करण्याचे कारण काय ? "

त्यानंतर अविनाशी आत्मतत्वाचें सांगोपांग विवरण करून श्रीकृष्ण म्हणाला,

" अर्जुना, जेवढ्या सहजपणें मनुष्य आपल्या शरीरावरून जुनीं वस्त्रें काढून त्यावर नवीन वस्त्रें चढवितो, तेवढ्या सहजपणें हा चैतन्यनाथ देहान्तराचा स्वीकार करीत असतो.

" याला शस्त्रें मारूं शकत नाहींत, अग्नि जाळूं शकत नाहीं, पाणी भिजवूं शकत नाहीं, आणि वारा वाळवूं शकत नाहीं.

" असा हा अव्यक्त, अचिन्त्य, अविकार्य आत्मा— भल्या माणसा, याचे करितां शोक करतोस ?

" अथवा कल्पना करूं कीं तुझ्या म्हणण्याप्रमाणें हा मरतोच. तरी शोक करायला जागा कुठें ?

" जन्माला आला तो मरणारच. मेलेला पुनः जन्माला येणार. याबद्दल शोक करीत बसायचें ? "

त्यानंतर अर्जुनाच्या स्वधर्माकडे वळून श्रीकृष्ण म्हणाला,

" अर्जुना, तुला धर्म काय सांगतो ?

" युद्धापेक्षां अधिक हितकर असें क्षत्रियाला दुसरें काय आहे ?

" आणि हें स्वधर्म्य युद्ध न करतां जर तूं भिक्षा मागूं जाशील, तर पापाचा भागी तर होशीलच पण तुझ्या अपकीर्तीला पारावार राहील काय ?

" हे कौरव गदगदां हंसून म्हणतील, अर्जुन आम्हाला भिऊन पळाला ! याहून अधिक दुःखकर दुसरें काय आहे ?

" अर्जुन, या रणांत जर तुला मृत्यु प्राप्त झाला, तर स्वर्गलाभ होईल. जर जय मिळाला, तर पृथ्वीचें राज्य प्राप्त होईल.

" म्हणून ऊठ, युद्धासाठीं उभा रहा.

" सुख आणि दुःख, लाभ आणि हानि, जय आणि पराजय हीं दोन्ही सारखीं मानून युद्ध करशील, तर तुला पापाचा स्पर्श होणार नाहीं. "

त्यानंतर कर्मयोगाचा प्रपंच मांडीत श्रीकृष्ण म्हणाला,

" अर्जुना, तुला केवळ कर्म करण्याचाच अधिकार आहे. फलाची चिंता तूं करूं नयेस. कर्मफलाचा हेतूही तूं होऊं नकोस, आणि कर्मत्यागही तूं करूं शकत नाहींस.

" अशा निर्विकार बुद्धीने कर्म करीत गेलास, तर तुझी बुद्धि स्थिरावेल. स्थितप्रज्ञ अवस्था तुझें घर पुसत येईल. "

अर्जुनानें जिज्ञासेनें प्रश्न केला,

" केशवा, स्थितप्रज्ञ कसा असतो ? कसा वागतो ? कसा व्यवहार करतो ?

" अर्जुना, मनांतील सर्व वासनांचा त्याग केलेल्या आणि आत्मस्वरूपाचे ठिकाणींच संतुष्ट असलेल्या पुरुषास स्थितप्रज्ञ म्हणतात. "

त्यानंतर विस्तारानें स्थितप्रज्ञाचीं लक्षणें सांगून श्रीकृष्ण म्हणाला,

" अर्जुना, अशा प्रकारें सर्व इच्छांचा त्याग केलेला, ममता आणि वृथा अहंकार यांचा स्पर्शही न झालेला पुरुष—त्यालाच अन्तीं मनःशांति लाभते.

" आणि ही ब्राह्मी स्थिति प्राप्त झाली असतां मोह त्या माणसाला भुरळ पाडूं शकत नाहीं. "

निष्काम अवस्थेची ही प्रशंसा ऐकून अर्जुन म्हणाला,

" श्रीहरि, तुझ्या मतानें जर हा बुद्धियोगच श्रेष्ठ आहे तर मग मला निष्कारण युद्धास कां प्रवृत्त करीत आहेस ! असा माझ्या बुद्धीला भ्रम कां पाडतोस ? एक काय तें सांग ना ! "

श्रीकृष्ण म्हणाला,

" अरे, कर्मयोग आणि ज्ञानयोग असे हे दोन मार्ग दिसायला दोन असले, तरी वस्तुतः ते दोन नाहींत. "

यानंतर सतत चालूं असणारें कर्म, कर्मत्याग्याचा मिथ्याचार, कर्मांचें सनातनत्व, श्रेष्ठत्व आदि सर्व सविस्तृत विवेचन करून श्रीकृष्ण म्हणाला,

" कर्ममार्गानेंच जाऊन जनकादि महर्षींनीं मोक्ष प्राप्त करून घेतला. आणि लोकसंग्रहाचा विचार केला असतांही तुला कर्मत्याग उचित नव्हे.

" कारण या जगांत सामान्य माणसें श्रेष्ठ पुरुषांचें अनुकरण करीत असतात. माझेंच उदाहरण बघेनास ! वस्तुतः मला कांहीं करायचें अथवा मिळवायचें आहे असें नाहीं. पण तरी मी कर्मे करीतच असतों. म्हणून विद्वान् पुरुषानें सामान्यांचा बुद्धिभेद न करतां निरलसपणें कर्म करीत असावें.

" आणि दुसऱ्याच्या सुकर भासणाऱ्या धर्मापेक्षांही स्वतःचा कष्टप्रद धर्म अधिक लाभप्रद आहे. स्वधर्माचें आचरण करीत असतां प्राप्त झालेलें मरणही निश्चितच श्रेयस्कर आहे. "

अर्जुन कुतुहलानें म्हणाला,

" तर मग विद्वान् मनुष्यही वेळीं पाप कां करतो ? "

" कारण अगदीं सोपें आहे. "

" कोणतें ? "

" त्याच्या अंतरांत वसणारे काम आणि क्रोध !

" या दोघांचा नाश केल्याशिवाय मनांत सद्बुद्धीचा उदय होऊं शकत नाहीं. "

त्यानंतर श्रीकृष्ण या सनातन ज्ञानमार्गाची परंपरा सांगत असतां म्हणाला,

" तुझ्या पूर्वी विवस्वानादि अनेक राजर्षींना मीं हा योग सांगितला होता. पण फार काल लोटल्यानें तो आज विस्मृतप्राय झाला आहे. "

" श्रीकृष्णा, हें कसें ! "

" काय ? "

" तूं तर माझा समवयस्क आहेस. आणि मग तूं विवस्वान आदि राजर्षींना—"

श्रीकृष्ण हंसून म्हणाला,

" अर्जुना, तुझे आणि माझे या पूर्वी अनेक जन्म उलटून गेले आहेत. केवळ तुला त्यांचें स्मरण नाहीं, एवढेंच काय तें. "

" आणि तुला—"

श्रीकृष्ण गंभीर स्वरांत म्हणाला,

" ऐक अर्जुना, मी या सर्वांचें आदिकरण आहे !

" माझ्या प्रकृतीचें साहाय्य घेऊनच मी वारंवार या पृथ्वीवर अवतीर्ण होत असतों.

" मुख्यतः त्या वेळीं—

" जेव्हां धर्मास ग्लानी येते—

" अधर्मास जोर चढतो—

" तेव्हां—"

" साधूंचें संरक्षण करण्यासाठीं—

" दुर्जनांचें निर्दालन करण्यासाठीं—

" धर्माचें पुनरूत्थान करण्यासाठीं—

" युगायुगांचे ठिकाणीं—

" अर्जुना, मी अवतार घेत असतों ! "

अर्जुनानें श्रद्धेनें विगलित होऊन प्रश्न केला,

" जनार्दना, मी तुला नमस्कार करतों. तूं मला एक काय तें सांग. कर्मसंन्यास कीं कर्मयोग ? "

" पार्था, अरे जें स्थान कर्मसंन्यासानें प्राप्त होतें, तेंच कर्मयोगानेंही लाभतें. कर्मसंन्यास म्हणजे कर्माचा संन्यास नव्हे. तर कर्महेतूचा संन्यास. "

श्रीकृष्णानें अर्जुनाला कर्मसंन्यासाची नेटकी आणि सुगम व्याख्या विस्तारपूर्वक सांगितली, आणि नंतर म्हटले,

" केवळ क्रियांचा त्याग केलेला तो संन्यासी नव्हे. तर कर्मफलाचाच काय तो त्याग करून जो सतत सावधानतेनें कर्में करीत राहतो, त्यालाच संन्यासी म्हणायचें, आणि तोच योगी."

यानंतर योगी होण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या ध्यान–धारणादि क्रियांचा विस्तार करून श्रीकृष्ण बोलला,

" सतत, नियमपूर्वक या क्रियांचें अनुष्ठान केलें असतां सर्वत्र प्रभुदर्शन होऊं लागतें. जो योगी मला असा सर्व भूतमात्रांत भरलेला पाहतो तो नेहमीं माझ्या मध्येंच वास्तव्य करीत असतो."

अर्जुन सावधान मनानें युद्धसिद्धतेच्या त्या कोलाहलांतही हें प्रभुवचन ऐकत होता. तो म्हणाला,

" श्रीहरि, तूं माझ्या कल्याणासाठीं हा योग सांगितलास खरा, पण—"

" पण काय अर्जुना ?"

" हें मन ! श्रीरंगा, हें मन अत्यंत अस्थिर आहे रे ! या चंचलस्वभाव मनानें हा योग कसा साध्य होऊं शकेल ?"

श्रीहरी हंसून म्हणाला,

" होय अर्जुना. मन हें चंचल तर खरेंच. पण अभ्यासानें तेंही स्वाधीन करतां येतें. केवळ एकान्त, नियमपूर्ण आणि सुकर अशा अभ्यासानें मन सहज म्हणूं तें करूं लागतें.

" अभ्यासानें तें हस्तगत करून तत्पर होऊन राहिलें, म्हणजे माझ्या वास्तव स्वरूपाचा उकल होऊं लागतो.

" माझी अष्टधा प्रकृती कशी, या विश्वमात्रांत माझी ती चित्‌शक्ति कोणकोणत्या स्वरूपांत वास्तव्य करीत आहे, मायेचें स्वरूप कसें, ती कशानें सहज तरून जातां येतें, आदि सर्व गोष्टी अगदीं सहज उलगडूं लागतात."

अर्जुनानें प्रश्न केला,

" श्रीकृष्णा, ब्रह्माचें स्वरूप काय ? अध्यात्म म्हणजे काय ? मला नीट उलगडा करून सांग. "

अर्जुनाच्या त्या शंकांचें समाधान केल्यावर श्रीकृष्ण म्हणाला,

" आतां विषयच सुरू झाला आहे, युद्धाची सिद्धताही होत आहे. तोंपर्यंत मी तुला विज्ञान आणि ज्ञान या दोन्हींचा उलगडा करून सांगतों.

" अर्जुना, अव्यक्त अशा मीं हें सर्व चराचर व्यापलेलें आहे. सर्व भुतें माझा आश्रय करून आहेत. मात्र मी त्यांच्या पुण्यपापानें लिप्त होत नाहीं. माझ्याच सूत्रचालनामुळें प्रकृति हें सर्व विश्व निर्माण करते, आणि त्याचा संहारही करते.

" मात्र ज्यांना हें उमगत नाहीं, ते मनुष्य शरीर धारण केलेला, तेवढाच मी असें समजून माझी अवहेलना करतात.

" जे शुद्ध बुद्धीनें युक्त महात्मे आहेत, ते सर्व भूतांचें उगमस्थान असलेल्या मला यथार्थत्वानें ओळखून कीर्तन, भजन, नमन आदि नाना प्रकारांनीं माझी उपासना करतात.

" तेव्हां जें कांहीं करशील, खाशील, हवन करशील, देशील, तप करशील, तें सर्व मलाच उद्देशून करीत जा.

" असें केल्यानें तूं कर्मबन्धनापासून मुक्त होशील. "

अर्जुन म्हणाला,

" श्रीहरि, तुझ्या या अचिंत्य स्वरूपाविषयी मागें मीं अनेकांकडून ऐकलें आहे. नारदादि देवर्षी मला असेंच सांगत. असित, देवल, व्यास इत्यादि मुनिश्रेष्ठांनींही तुझ्या स्वरूपासंबंधीं अनेकदां बोलणें केलें आहे.

" पण तो तूं स्वतःच ज्याअर्थी हें सर्व उलगडून सांगत आहेस, तेव्हां मला माझी शंका फेडून घेऊं दे. तुला मीं कोणकोणत्या रूपानें उपासावें ? "

श्रीकृष्ण कौतुकानें अर्जुनाकडे पाहत म्हणाला,

" अर्जुना, माझ्या विभूतींचा विस्तार किती सांगूं ?

" ऐक. आकाशस्थ ग्रहांत सूर्य मी. नक्षत्रांत चन्द्र मी. वेदामध्यें सामवेद, ांत इन्द्र, इन्द्रियामध्यें मन, भूतांमधील चेतना.

" रुद्रामध्यें मी शंकर. शिखरामध्यें मेरू. स्थावरांतील मी हिमालय. र्षींतील नारद. सिद्धांमध्यें मी कपिल. आयुधांतील मी वज्र. गणकांमध्यें मी ाल. पशूंमध्यें मी सिंह, तर पक्षांमध्यें गरुड. शस्त्रधाऱ्यांमध्यें मी राम, तर वाहांमध्यें मी गंगा.

" मृत्यु मी, कीर्ती मी, मेधा मी, क्षमा मी.

" मासामध्यें मार्गशीर्ष मी. वृष्णींतला कृष्ण मी. पांडवांतला अर्जुन मी, ुनींमध्यें मी व्यास. कवींत मी शुक्राचार्य. सर्व गुह्यांतलें मौन मी.

" फार काय सांगू! अर्जुना, जिथें जिथें जें जें श्रेष्ठत्व दिसेल, तें तें माझें ्प आहे, असें तूं समज."

पण हें सर्व ऐकून अर्जुनाची जिज्ञासा अधिकच वाढली. तो म्हणाला,

" मुकुंदा, तूं जो उपदेश केलास, त्यामुळें माझा मोह तर नष्ट झाला. मात्र एक इच्छा माझ्या मनांत तीव्रतेनें निर्माण झाली आहे."

" ती कोणती?"

" श्रीहरी, तुझें हें दिव्य रूप एकसमयावच्छेदेंकरून मी पाहूं इच्छीत आहें. ुद्ध सुरू होण्यास अजून बराच वेळ आहे. तोंपर्यंत माझी ही इच्छा तूं कां ुरी करीत नाहींस?"

श्रीकृष्ण आपलें तें मधुर हंसू हंसला, आणि म्हणाला,

" अर्जुना, तुझी इच्छा पुरी होऊं दे. मात्र तूं या लौकिक नेत्रांनीं माझें देव्य रूप पाहूं शकणार नाहींस."

" मग?"

" थांब. मी तुला दिव्य दृष्टि देतों, तिच्यानें संपन्न होऊन तूं हें अद्भुत रूप पाहा."

अर्जुनाच्या मस्तकावर आपला कमलकर ठेवून श्रीकृष्णानें त्याला दृष्टिदान केलें, आणि आपलें अलौकिक रूप त्याला दाखविलें.

तें दिव्य रूप पाहून अर्जुन जणूं स्तिमितच झाला. हात जोडून तो म्हणाला,

" प्रभो, तुझ्या रूपांत मी सर्व देव, ऋषी, मनुष्यें आदि चराचर सृष्टि पहात आहें !

" हें तुझें रूप कसें आहे ?

" त्याला सहस्र सहस्र पाय, तितकेच हात, तोंडें आणि डोळे आहेत. याचा प्रारंभ कुठें ? अंत कुठें ? छे छे ! काहींच कळत नाहीं !

" अहो ! हें कसें ? केवढें ? दृष्टि फाटून जावी एवढा याचा विस्तार !

" तुझ्या मुखांत या केवढाल्या दाढा ! हे सर्व कौरव अत्यंत त्वरेनें त्या दाढांत प्रवेश करीत आहेत !

" तूं भुकेनें खवळलेल्याप्रमाणें या सर्वांना चाटून टाकून पुनः आपल्या शतशत जिभा जणूं अधिक कांहींतरी खाण्यासाठीं लळलळा फिरवीत आहेस !

" हे श्रेष्ठा, तूं आहेस तरी कोण ? "

तो जगद्रुप श्रीहरी गदगदा हसून म्हणाला,

" ऐक अर्जुना !

" मी सर्वभक्षीं काल आहें !

" तूं न मारतांही हे सर्व योद्धे माझ्या मुखांत प्रविष्ट होत आहेत !

" जयाची इच्छा आहे ?

" तर मग ऊठ !

" मीं अगोदरच मारलेल्या या सर्वांना मारून तूं पृथ्वीच्या राज्याचा उपभोग घे ! "

थरथरा कांपत अर्जुन म्हणाला,

" हे आदिकारणा, तूं या सर्व चराचराचें उत्पत्तिस्थान आहेस !

" तुला सर्व बाजूंनीं नमस्कार.

" आजपर्यंत सख्यभावानें तुझी थट्टा केली, तुला उपहासपूर्ण वचनें बोललों, तुझ्याशीं अत्यंत सलगीनें वागलों, त्या सर्व अपराधांबद्दल मला सर्वांतःकरणानें क्षमा कर !

" हे चराचराच्या पित्या, हें तुझें दिव्यरूप पाहून मी भयचकित झालों आहें. तेव्हां आतां याचा उपसंहार करून आपलें तें प्रसन्न रूप पुनः एकदां प्रगट कर.

" मस्तकीं तो सुशोभित किरीट, हातीं उदार गदा, चक्र, कंठांत सुगंधी पुष्पमाला, मुखावर तें सुप्रसन्न हास्य—

" अशा तुला मी पाहूं इच्छीत आहे ! "

मग श्रीकृष्णानें आपल्या त्या अमानुष रूपाचा उपसंहार केला, आणि तो पुनः पहिल्यासारखा झाला. अर्जुन जणूं तेजाच्या महासागरांत बुडत असतां पुनः कांठावर आला. नंतर तो अत्यंत कृतज्ञ होऊन विगलित वाणीनें म्हणाला,

" श्रीहरि, तुला वारंवार नमस्कार ! —

" पण आतां आणखी एक शंका ! "

" कोणती ? "

" तुझें हें चतुर्भुज सगुण रूप आणि अव्यक्त अचिंत्य असें निराकार—या दोन्ही रूपांची उपासना करणाऱ्या भक्तांमध्यें श्रेष्ठ कोण ? "

श्रीकृष्णानें मोठ्या संतोषानें अर्जुनाचें समाधान केलें. तो म्हणाला,

" नित्य माझ्या स्वरूपीं लक्ष लागलेला, परम श्रद्धेनें युक्त होऊन माझी उपासना करणारा, तो मला अधिक आवडतो. "

नंतर त्याला साधनेची सोपानपरंपरा सांगून श्रीकृष्ण म्हणाला,

" अर्जुना, ज्याच्या मनांतून द्वेष नेहमींकरितां निघून गेला आहे, तो सर्व भूतांचा मित्र आहे, असा निर्मम, निरहंकार, सुखदुःखांचे ठिकाणीं समबुद्धि असणारा दृढनिश्चयी भक्त मला अत्यंत आवडतो. "

नंतर या ज्ञानी भक्ताचे ठिकाणीं वसणाऱ्या ज्ञानाची चिकित्सा करीत असतां श्रीकृष्णानें अर्जुनाला प्रकृति पुरुष विचार, प्रकृतीच्या गुणांचा विस्तार, पुरुषोत्तमाचीं लक्षणें, दैवी संपत्ति, आसुर संपत्ति, तीन प्रकारच्या श्रद्धा, ब्राह्मण—क्षत्रिय—वैश्य—शूद्र यांचीं कर्में आदि सर्व विषय सहज समजूं शकतील अशा भाषेंत सांगितले.

नंतर तो म्हणाला,

" तर अर्जुना, सर्वात्मक ईश्वराची पूजा करण्याचा एकच एक उपाय आहे. "

" तो कोणता ? "

" फलाशा सोडून शास्त्रानें सांगितलेलीं कर्में करीत राहणें !

" तेव्हां आतां युद्ध करणें हेंच तुझें कर्तव्य आहे. तें त्यागूं म्हणशील तर तेंही तुझ्याच्यानें व्हायचें नाहीं. कारण तुझी प्रकृति तुला युद्ध करायला लावीलच. तेव्हां ईश्वराला शरण जाऊन तूं युद्ध कर.

" तुला पापाचें भय वाटतें ?

" त्याची गरज नाहीं.

" कर्मफलाचा भार माझ्याकडे सोंपवून तूं निश्चिन्त मनानें युद्ध कर.

" मग मी तुझी सर्व पापांपासून मुक्तता करीन ! "

योगेश्वर कृष्ण योगाच्या परिणत अवस्थेच्या पैलथडीस उभा राहून हें असें धीरगंभीर वचन बोलला. नंतर त्यानें प्रश्न केला,

" अर्जुना, हें सर्व तूं एकाग्र चित्तानें ऐकलेंस ना ? तुझा मोह नष्ट झालाना ?

डोळ्यांतून गळणारी आनन्दाचीं आंसवें मोठ्या प्रयत्नानें सांभाळीत अर्जुन गदगद स्वरांत बोलला,

" होय अच्युता ! माझा मोह नष्ट झाला आहे. स्मृतीचा पुनर्लाभ झाला आहे. तुझ्या प्रासादानेंच हा अपूर्व चमत्कार झाला आहे. आतां मी काय करूं ?

" तूं सांग ! तत्क्षणीं मी तें करीन ! "

संजय पुढें म्हणाला,

" श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचा तो अत्यंत अद्‌भुत संवाद मी आपल्या श्रवणांनीं ऐकला ! माझ्या अंगप्रत्यंगावर हर्षानें वारंवार रोमावळी उठत आहेत."

धृतराष्ट्रानें मध्येंच प्रश्न केला,

" तें राहूं दे संजया ! पण तुझ्या मतानें जय कुणाला मिळेल ? "

संजय स्पष्ट शब्दांत उत्तरला,

" जय ? जिथें योगेश्वर कृष्ण, जिथें धनुर्धर पार्थ, तिथें जय, श्री आणि वैभव यांचा चिरकाल वास असणार ! हें माझें निश्चित मत आहे."

## कृतज्ञता—

धृतराष्ट्रानें श्वास सोडीत विचारलें,

" असूं दे. आतां युद्धांतील वृत्त सांग."

" ऐकावें राजन्. हा वेळपर्यंत सर्व वीर आपापल्या ठिकाणीं सज्ज होत होते. तोंच एक लहानसा चमत्कार घडला.

" युधिष्ठिरानें आपलें धनुष्यबाण व कवच खालीं ठेवून दिलें. नंतर तो पायउतार होऊन कौरवांच्या सेनेकडे निघाला. दोन्हींकडील वीर आश्चर्यानें दिङ्मूढ झाले. चौघेही पांडव त्याच्या मागें धांवत त्याला विचारूं लागले,

" श्रेष्ठा, तूं हें काय करीत आहेस ? "

" ऐन युद्धाच्या प्रारंभीं तूं हें काय मांडलें आहेस ? "

" जर तुला हेंच करायचें होतें, तर–"

" पण त्यांपैकीं एकालाही उत्तर न देतां युधिष्ठिर पुढें चालला. कौरव सेना तर आनंदानें गदारोळ करूं लागली. तिकडील सैनिक हांसत म्हणूं लागले,

" अहा रे कुलकलंका ! "

" हा तर अगदींच ढिला दिसतो ! "

" आमच्या नुसत्या दर्शनानेंच हा गर्भगळित झाला ! "

" तिथें मुळांतलेंच थोडे पौरुष लागतें–"

" याच्याजवळ तें नाहीं ! "

ते सर्व सैनिक आनंदानें वस्त्रें उडवूं लागले. पण युधिष्ठिरानें तिकडेही लक्ष दिलें नाहीं. तो सरळ भीष्मांच्या रथाकडे गेला. त्यांना अभिवादन करून तो म्हणाला,

" तात ! "

आनंदानें गद्गद होऊन भीष्म म्हणाले,

" काय वत्सा ! "

" युद्ध सुरू करीन म्हणतों. आपला आशिर्वाद असावा. "

" आहे रे आहे ! सहस्रवार आशिर्वाद आहे ! तुझा विजय होईल ! "

भीष्मांचे चरण आपल्या आंसवांनीं भिजवून काढीत युधिष्ठिर तियून द्रोणांच्या रथाकडे निघाला. त्यांच्या पायीं मस्तक ठेवून तो म्हणाला,

" गुरुदेव, युद्ध सुरू होत आहे. आपला आशिर्वाद द्यावा. "

" युधिष्ठिरा, जिथें हरि आहे, तिथें विजयहि आहे ! जा, तुझें कल्याण होईल. "

कृपाचार्यांकडे जाऊन त्यांना नमस्कार करीत युधिष्ठिर बोलला,

" आचार्य—"

पुढें त्याच्यानें बोलवेनासें झालें. कृप त्याच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणाले,

" वत्सा, तुझा जय व्हावा, यासाठीं मी रोज सकाळीं प्रार्थना करीत जाईन ! "

नंतर युधिष्ठिर शल्याकडे गेला. त्याला नमस्कार करून तो बोलला,

" मातुला, तुझें वचन— "

" होय, मीं तें विसरलों नाहीं. "

" तर मग कर्णाचें सारथ्य करून—"

" होय. मी त्याचा तेजोभंग अवश्यमेव करीन. तूं निश्चिंत अस. "

सर्व श्रेष्ठांकडून आशिर्वाद घेऊन युधिष्ठिर उभय सेनेच्या मध्यभागीं उभा राहिला. त्याला पाहतांच सेनेचा कोलाहल स्थिरावला. युधिष्ठिर उच्च स्वरानें म्हणाला,

" वीर हो ! जो कोणी अजूनही आमच्या पक्षांत येऊं इच्छित असेल, त्यांचें मी स्वागत करीन, कुणीहि यावें. "

धृतराष्ट्रपुत्र, युयुत्सु हा प्रारंभापासूनच पांडवांना अनुकूल होता. युधिष्ठिराची हांक ऐकतांच तो हर्षानें म्हणाला,

" युधिष्ठिरा, मीं तुझ्या बाजूनें लढेन म्हणतों. "

" कौरवांशीं ? "

" नव्हे. "

" मग ? "

" असत्पक्षाशीं. "

" युयुत्सो, तुझें स्वागत आहे ! "

युयुत्सु आपल्या सैनिकांसह युधिष्ठिराकडे येऊन मिळाला. "

## युद्धारंभ—

धृतराष्ट्रानें विचारलें,

" संजया, अगोदर शस्त्र कुणीं उचललें ? "

" तुझ्या पुत्रांनीं. "

" कां ? "

" भीमाला भिऊन. "

" भिऊन ? "

" होय, उभयसेना सज्ज झाल्यावर भीम उग्र रूप धारण करून वीरांचींही मनें थरकांपवीतील अशा हांका फोडीत आपल्या सैन्याच्या अग्रभागीं उभा ठाकला. त्याच्या गर्जनांनीं तुझ्या पुत्राच्या सेनेंतील अश्व आणि गज भेदरून जाऊन जागच्या जागींच खिळून उभे राहिले, आणि देहधर्म करूं लागले !

हें पाहून दुःशासनादि वीरांनीं त्रस्त होऊन भीमावर शस्त्रवर्षाव सुरूं केला."

" मग ? "

" मग संकुल युध्द सुरूं झालें. पदाती पदातीशीं भिडला. गज गजावर चाल करून गेला. अश्वारोह्यानें अश्वारोह्याशीं झुंज सुरूं केली. रथी रथीशीं घे देमार

करूं लागला. उमय पक्षांतील वीर एकमेकांच्या नांवानें हांका फोडूं लागले, आव्हानें देऊं लागले.

त्यांतच शंख, भेरी कर्णे आदि रणवाद्यांचा ध्वनि. हा सर्व गदारोळ एवढा वाढला, कीं त्यामुळें आकाश खाली कोसळून पडतें कीं काय असा भ्रम निर्माण झाला.

भाऊ भावाशीं भिडला. चुलत्यानें पुतण्याशीं झुंज मांडली. मामावर भाचा प्रहार करुं लागला. सगळे वीर परस्परांशीं असलेली नातीं विसरून जाऊन एकमेकांचे प्राण घेण्याविषयीं आतुर झाले.

नाराच आदि तीक्ष्ण, नुकतें पाणी दिलेल्या, विजेसारखे लखलखणाऱ्या बाणांनीं आसमन्त झाकोळून गेलें. जणूं काय त्या बाणांचा मांडवच घातला आहे असा भास होऊं लागला.

मदोन्मत्त गज आपल्या सोंडांनीं आणि विशाल दन्तांनीं पास्परांशीं झुंजूं लागले. त्यापैकी कांहीं गज दन्ताचे आघात सहन न होऊन चीत्कार फोडीत मागें पळण्याचा प्रयत्न करूं लागले. पण त्यांच्या मागें ही एकच रणघाई असल्यामुळें मागें सरावयास वाव न मिळाल्यानें ते आपलीच सेना तुडवूं लागले. त्यांच्या पायाखालीं चिरडले जाणाऱ्या योद्धयांच्या आरोळ्या या एकंदर कोलाहलांत मिसळून त्याची तीव्रता अधिकच वाढली.

योद्धे नाना प्रकारचीं शस्त्रें वापरीत होते. गदा, पट्ट, मुसळें, दण्ड, खड्गें, तोमर, शृंखला, ऋष्टि आदि तेजस्वी शस्त्रें वापरलीं जात असतां सूर्याच्या किरणांमुळें लखलखत होतीं. त्यामुळें पृथ्वीवरच विद्युल्लतेचें नृत्य होत असल्याचा भास होत होता.

हळूंहळूं विद्ध झालेल्या वीरांची संख्या वाढूं लागली. कुणाला रथाच्या खिळयामुळें व्रण झाला होता, तर कोणी खड्गाच्या घावानें एखादा अवयव कापला जाऊन धरणीवर कोसळला होता. कुणाचा गदेच्या प्रहारानें मस्तक-भेद झाला होता, तर कुणाला नतपर्व बाणानें जखमी केलें होतें. हळूंहळूं त्यांच्या किंकाळ्याही त्या प्रचण्ड ध्वनीची उग्रता वाढवूं लागल्या.

ते वीर गयावया करीत ओरडूं लागले,

"पाणी ! कुणी एक घोटभर पाणी द्या रे ! "

"अरेरे ! तूं मला मारलेंस ?"

"थांब !"

"चांडाळा –"

"कोणी माझ्या घरीं जाऊन माझ्या नवपरिणीता पत्नीला सांगा — "

"आता पुढील जन्मीं –"

"अरे कुणीतरी त्याला थांबवा रे !"

"तो आला !"

"भीम –"

"भीम नव्हे–महाकाल !"

"अरे या शेवटच्या क्षणीं –"

"कोण काका ?"

"अरेरें ! मीं तुला विद्ध केलें ?"

हे सर्व ध्वनीं त्या ध्वनींच्या महासागरात मिसळले. खवळलेल्या समुद्राप्रमाणें तो कोलाहल शेरावत महारथींच्याही मनांत क्षणभर भय निर्माण करूं लागला.

## उत्तर–वध—

अभिमन्यु सेनापति भीष्माच्या रथाशीं जाऊन भिडला. त्याच्या सहाय्यास अनेक योद्धे धावून आले. त्या लहानग्या वीरानें मोठ्या आत्मविश्वासानें भीष्माशीं झुंज घेतले. भीष्मही मोठ्या कौतुकानें त्याच्या युद्धकौशल्यास प्रोत्साहन देत त्याच्याशीं लढूं लागले.

तों इकडे उत्तर शल्यावर चालून गेला. बराच वेळ त्या दोघांचें तुंबळ युद्ध झालें. आणि शेवटीं उत्तरानें आपला गज शल्याच्या रथावर घालून त्याचे अश्व ठार मारलें. तेव्हां शल्यानें एक सर्पतुल्य शक्ति वेगानें उत्तरावर सोडली. ती कवचाचा भेद करून उत्तराच्या शरिरांत शिरली, आणि तो कुमार गतप्राण होऊन गजावरून खालीं कोसळला.

हें पाहून अत्यंत त्वेषानें उत्तराचा भ्राता विराटपुत्र श्वेत शल्यावर चालून आला. त्यानें फार मोठा पराक्रम करून असंख्य वीरांना ठार मारलें. शल्य पुत्र रुक्मरथाचा श्वेतानें एक तीक्ष्ण बाण सोडून प्राण घेतला.

मग भीष्मादि वीर शल्याच्या साहाय्यास धांवून आले. एकदां तर श्वेतानें भीष्माचा ध्वजदंडही तोडून टाकून अपूर्व पराक्रम केला. तो वृद्ध वीर नाटोपेसा झाला, हें पाहून पराक्रमी श्वेतानें त्याच्यावर एक अपूर्व तेजस्वी शक्ति सोडली. पण भीष्मांनी तीक्ष्ण बाण सोडून आकाशांतच तिचे तुकडे करून टाकले.

शेवटीं भीष्मांनीं ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रित केलेल्या एका बाणानें श्वेताचा प्राण घेतला !

सायंकाळ झाल्यानें दोन्ही सैन्यें आपापल्या शिबिराकडे परतलीं.

## प्रतिज्ञाभंग

आपल्या सेनेंतील दोन प्रबल वीर अशा रीतीनें युद्धाच्या पाहिल्याच दिवशीं धराशायी झालेले पाहातांच युद्धिष्ठिराला अत्यंत खेद झाला. तो आपल्या भ्रात्यांसह वासुदेवाकडे येऊन त्याला म्हणाला,

" मुकुंदा, भीष्मांसारख्या अप्रतिम योध्याविरुद्ध मी झुंजण्यास उभा राहिलों, ही माझी अत्यंत मोठी चूक झाली ! "

" कां ? "

" त्यांनीं आमच्या सेनेची कशी धूळदाण उडविली, तें तूं पाहिलें नाहींस काय ! "

" होय- — "

" नव्हे मुकुन्दा ! माझे दोन पराक्रमी वीर आज मृत्युमुखीं पडले ! "

" मग तुझा काय विचार आहे ? "

" हें युद्ध इथेंच थांबवून मी वनांत निघून जातों ! "

" एकदम वनांत ? "

"तर मग काय करूं? अर्जुन तर कांहीं मनापासून लढलाच नाहीं! केवळ भीमानेंच काय तें सावेश युद्ध केलें. अशा स्थितींत मी काय करूं?"

असें बोलून तो उसासे टाकीत स्तब्ध राहिला. तेव्हां स्मित करीत गोविंद म्हणाला,

"राजा, पहिल्याच दिवशीं तूं एवढा हताश झालास?"

"पण——"

"नव्हे युधिष्ठिरा, अरे हें तर युद्ध आहे. रणदेवता वीरांच्या प्राणांचा नैवेद्य भक्षूनच संतुष्ट होत असते. तूं असें पाहाशील, कीं आज आपल्या शिबिरांत जयघोष करीत जाणारे कौरव समरांगणांत आर्त आक्रोश करीत मृत्यूची वाट पाहात आहेत."

"पण केव्हां?"

"युद्धाला रंग भरल्यावर. अरे, आम्ही एवढे आतिरथी तुझ्या सेवेस उपस्थित असतां असा खिन्न कां होतोस?"

धृष्टद्युम्नानें युद्धिष्ठिराला आश्वासन दिल्यावर मग त्याचें मन थोडें स्वस्थ झालें.

दुसरे दिवशीं युद्ध सुरू झाल्यावर अर्जुनानें श्रीकृष्णाला संकेत करून आपला रथ भीष्मांच्या रथाशीं भिडविला. जवळजवळ तो सबंद दिवस अर्जुनानें भीष्मांना गुंतवून ठेवलें. त्यांना दुसरीकडे कुठेंही लक्ष देणें अर्जुनानें अशक्य करून टाकलें.

आणि मग या संधीचा लाभ घेऊन भीम कल्पांतासारखा हातीं गदा घेऊन चौफेर वावरूं लागला. कलिंग व त्याचा पुत्र शक्रदेव या दोघांनीं आपली सेना भीमावर घातली. त्या सेनेनें भीमाला चौ दिशांनीं वेढून टाकलें. अनेक बाण लागल्यामुळें अंगांतून रक्त येऊं लागून भीम एखाद्या पुष्पांच्या भारानें सुशोभित झालेल्या पलाशवृक्षासारखा दिसूं लागला.

पण मग त्या वीरानें अद्भूत पराक्रम करीत त्या दोन्ही कलिंग वीरांचा वध तर केलाच; पण त्यांच्या सेनेचाही इतका नाश केला कीं सर्व कौरव सेनेनें धाव घेऊन रणभूमींतून पलायन सुरू केलें.

दुसराही दिवस कांहीं निर्णय न लागतांच संपला.

तिसरे दिवशीं नव्या उत्साहानें युद्ध सुरू झालें. आज पांडव अत्यंत आवेशानें लढत होते. मध्येंच एकदां भीम आणि दुर्योधन हे एकमेकांसमोर आले. भीमानें त्वेषानें एका बाणानें दुर्योधनास मूर्च्छित केलें. तेव्हां त्याच्या सारथ्यानें त्याचा रथ रणभूमींतून बाहेर काढला.

दुर्योधनाचा रथ परत फिरलेला पाहून त्याचें सैन्यही त्याच्यामागें पळ काढूं लागलें. शुद्धीवर आल्यावर जेव्हां दुर्योधनानें हा प्रकार पाहिला, तेव्हां दांतओठ खात त्यानें आपला रथ भीष्माजवळ नेण्यास सांगितलें. तिथें पोंचल्यावर तो ओरडून म्हणाला,

" तात, हें काय घडत आहे ? "

" काय ? "

" तुम्हीं अजून जिवंत आहांत ? "

" तुला शंका वाटते कीं काय ? "

" होय ! "

" कां ? "

" हें आमचें सैन्य तुम्ही इथें उपस्थित असतांही पळत आहे ! "

" हा काय माझा अपराध ? "

" असें कां ? तर मग हें तुम्हीं मला पूर्वीच कां सांगितलें नाहीं ? "

" तूं काय केलें असतेंस ? "

" मी आणि कर्ण दोघांनींच काय तो विचार ठरविला असता ! पितामह, केवल तुमच्याच बोलावर विसंबून मी एवढा मांड मांडला ! आणि तुम्हीं पांडवांची अशी अुपेक्षा करावी ? "

ओठ चावून भीष्म म्हणाले,

" ऐक दुर्योधना, पांडव अजिंक्य आहेत, असें मीं तुला पूर्वीच सांगितलें होतें. पण आतां बघ माझा पराक्रम ! "

भीष्मांनीं आपला रथ बाजूला काढला आणि अत्यंत वेगानें तो पांडवांच्या सैन्यावर नेऊन घातला. अनेक वीरांचीं शरीरें भीष्मांच्या अपूर्व शरवर्षावामुळें खण्डविखण्ड होऊन धरणीवर लोळत पडलीं.

चित्रविचित्र कवचें, तुटलेले किरीट, मृत वीरांनीं अजून आपल्या हातीं धरून ठेवलेलीं शस्त्रें, रुधिर, मांस, आंतडीं या सर्व वस्तूंमुळें रणांगणाचें रौद्र स्वरूप अधिकच भीषण झालें.

तेव्हां मग अर्जुनानें पुनः श्रीकृष्णास सांगून आपला रथ भीष्मांच्या रथाशीं भिडविला. पण आज भीष्मांचा आवेश कांहीं विलक्षण होता. त्यांनीं अपूर्व आणि अद्‌भूत असा शरवर्षाव करून अर्जुनाचें क्षणभर हस्तचापल्य बंद पाडलें !

पांडवांची सेना हलूं लागली. हें पाहून सात्यकि श्रीकृष्णास ओरडून म्हणाला,

" श्रीकृष्णा, पांडव सैन्याचा ठाव सुटला आहे—"

श्रीकृष्णानें शरवर्षाव करण्यास असमर्थ झालेल्या अर्जुनाकडे क्षणभर पाहिलें. आणि मग स्मित करून तो स्वतःशींच बोलला.

" युद्धांत शस्त्र उचलणार नाहीं, अशी प्रतिज्ञा केली होती खरी, पण बहुधा मला ती या अद्‌भुतपराक्रम भीष्मामुळें मोडावी लागणार !

" हातीं सुदर्शन चक्र उचलून मला भीष्मांचा वध केला पाहिजे.

" अन्यथा कदाचित् पांडवांचा पराभव होण्याची शक्यता आहे !

" शिवाय—

" महाभक्त भीष्मानेंही 'मी श्रीकृष्णाला हातीं शस्त्र धरायला लावीन' अशी प्रतिज्ञा केली आहे, तीही मला खरी केली पाहिजे ! त्या श्रेष्ठाची प्रतिज्ञा वृथा होतां उपयोगाची नाहीं.

" मग माझी प्रतिज्ञा मोडली तरी चालेल ! "

श्रीकृष्णानें उग्ररूप धारण करून आपलें अमोघ चक्र उचललें, आणि रथाखालीं उतरून तो वेगानें भीष्मांच्या रथाकडे चालला !

दोन्ही बाजूंचे वीर आश्चर्यानें विस्मित झाले. आपापलीं अस्त्रें क्षणैक थांबवून ते श्रीकृष्णाकडे बघूं लागले.

स्वत: श्रीकृष्ण आपल्याकडे हातीं चक्र उचलून चालून येत आहे, हें पाहून वृद्ध भीष्मना अत्यंत आनंद झाला. त्यांच्या सुरकुतलेल्या डोळ्यांतून आंसवें वाहूं लागलीं. शस्त्र खालीं ठेवून आणि हात जोडून ते म्हणाले,

" ये ! मुकुंदा ! ये !

" भक्त प्रतिज्ञा खरी करण्यासाठीं तूं आपली प्रतिज्ञाही वृथा केलीस !

" मी म्हाताऱ्यानें सहज हंसत हंसत उच्चारलेले बोल–

" मी श्रीहरीला शस्त्र उचलायला लावीन !

" ते सार्थ व्हावेत—

" म्हणून तुला केवढी तळमळ !

" ये अच्युता !

" तें चक्र उचललेंस एवढेंच पुरे झालें.

" तूं माझ्या रथावर आलास, की मी माझें हें पाजळलेले खड्ग तुझ्या हातीं देईन.

" याच्या एकाच घावानें–

" क्षत्रियाचें साध्य–

" समरांतलें मरण–

" तूं तें आपल्या कमलकरांनीं माझ्या पदरांत टाक !

" ये मुकुंदा ये ! "

तोंवर पार्थ सावध झाला होता. त्याला जेव्हां हातीं चक्र उचलून भीष्मांकडे जात असलेला श्रीकृष्ण दिसला तेव्हां व्याकुळ होऊन त्यानें रथांतून खालीं उडी टाकली. धांवत तो कृष्णाला हांका मारूं लागला,

" थांब ! मुकुंदा थांब ! "

पण श्रीकृष्ण पुढेंच चालला, हें पाहून वेगानें त्याच्यापर्यंत पोंचून अर्जुनानें त्याला मिठी मारली, आणि सगद्गद स्वरांत म्हणाला,

" थांब ना मुकुंदा ! मला क्षमा कर. तातांच्या अमोघ शरवृष्टीमुळें क्षणैक मला झांबळल्यासारखें झालें होतें. पण आतां मी सावध झालों आहें."

" तुला शस्त्र उचलायचें काय कारण ? तुझी असीम कृपाच काय ती मजवर असूं दे. मग मी या सर्व कौरवांचा खचितच संहार करीन. चल, परत चल. "

अर्जुनाचें वचन ऐकून संतुष्ट झालेल्या श्रीकृष्णानें परत त्याच्या रथावर आरूढ होऊन आपला दिव्य शंख आस्फुरला. मग अर्जुनानें असीम कौशल्यानें शरवृष्टि करून कौरव पक्षीयांचा संहार केला.

भीमानेंही स्फुरण पावून कौरवांच्या गजसेनेंत शिरून तिची दाणादाण उडविली. धृष्टद्युम्नानें मोठा पराक्रम करीत सांयमनिचा पुत्र त्यावर धावून आला होता, त्याचा एका नाराच बाणानें वध केला, हें त्याचें अद्‌भुत कृत्य पाहून कौरवसेना भयग्रस्त होऊन ठाव सोडून पळूं लागली.

मग दिवसभर उभयपक्षांचे वीर परस्परांशीं भिडले. कोणीं पराभव पावून युद्धभुमींतून पलायन केलें, तर त्याचा शत्रु त्यानें केलेल्या व्रणांनीं व्यथित होऊन आपल्या ध्वजदंडाला धरून कसाबसा प्राण सांभाळीत राहिला. असें फार मोठें संकुल युद्ध होऊनही निर्णय कांहींच लागला नाहीं.

दुसरे दिवशीं दुर्योधन भीमावर चालून आला, पण भीमानें त्याचा पराभव करून त्याला रणभूमि सोडायला लावली. आणि जलसंधादि चौदा कौरवांना त्यानें ठार मारलें.

तिसरा, चौथा, पांचवा आणि आठवा दिवसही उलटून गेला. भीमपुत्र घटोत्कच, पार्थपुत्र इरावान, शिखंडी, भगदत्त, आदि उभयपक्षीय वीरांनीं या नऊ दिवसांत मोठाच पराक्रम केला. उलुपीचा पुत्र इरावान आपल्या सैन्यानिशीं कौरवांशीं झुंजत असतां मृत्युमुखीं पडला. दुर्योधनाच्या कांहीं भावांचाही भीमसेनानें वध केला.

पण अजून प्रमुख वीरांपैकीं सर्वच प्रतिदिनीं नव्या उत्साहानें झुंजायला उभे ठाकत. त्यांच्यांतल्या एकाचाही वध करणें उभयपक्षीयांना संभवनीय दिसेना.

दुर्योधन भीष्मांच्या शिबिरांत जाऊन विषादानें म्हणाला,

" तात, व्यर्थच मी हा युद्धाचा प्रपंच मांडला."

आश्चर्यानें भीष्मांनीं विचारलें,

" कां ? "

" अजून पांडव तर पहिल्याच दिवसाच्या उत्साहानें आमच्या सेनेचा नाश करीत आहेत ! "

" मग ? तुला काय म्हणावयाचें आहे ? "

" आपण सेनापती असतां–"

" मी युद्धांत कुचराई करतों, असा आरोप तुला करायचा आहे काय ? "

" नेमकें तसेंच नव्हे–पण–"

भीष्म किंचित क्रुद्ध होऊन म्हणाले,

" ऐक दुर्योधना ! श्रेष्ठांचे वचनाचा अनादर करून जो एखादें अघटित साहस करायला प्रवृत्त होतो, त्याच्या पदरांत याहून वेगळें फारसें कधीं पडत नाहीं. पांडव अजेय आहेत, असें मी तुला वारंवार सांगितलें होतें."

" तात, आपण असें कां करीत नाहीं ? "

" काय ? "

" आपण बाजूला होऊन कर्णाला सेनापतित्व– "

वृद्ध सिंहाप्रमाणें खवळून हुंकार टाकीत भीष्म म्हणाले,

" ऐक मूढा ! तूं विजयलोभानें आज आदरणीयांचा अपमान केला आहेस. असूं दे. ऐक माझी प्रतिज्ञा. केवळ शिखंडीवरच काय तो मी शस्त्र उचलणार नाहीं. इतर पांचाल आणि पांडव सेनेचा मी आज अपरिमित संहार करीन ! "

त्या दिवशीं भीष्मांच्या रूपानें जणूं काय रुद्रच अवतरला होता. त्यांनीं पांडवसेनेचा न भूतो न भविष्यति असा संहार केला. भीम, अर्जुन अथवा कोणीही वीर त्यांच्यासमोर त्या दिवशीं फार काळ उभा राहूं शकला नाहीं.

युद्ध संपलें. सर्व वीर आपापल्या शिबिरांत परतले. पांडवांच्या शिबिरांत त्या रात्रीं खेदप्रदर्शक सुस्काऱ्यांपलिकडे कांहींही ऐकूं आलें नाहीं.

## भीष्मवध—

युधिष्ठिर खिन्न होऊन श्रीकृष्णास म्हणाला,

" श्रीकृष्णा, एखाद्या मत्त गजानें कमळांनीं भरलेल्या तळ्याचा विध्वंस करावा, तसे भीष्म आमच्या सेनेचा संहार करीत आहेत ! भीष्मांशी व्यर्थच झुंज घेतलें, असें मला वाटूं लागलें आहे."

श्रीकृष्ण समजावणी करीत म्हणाला,

" युधिष्ठिरा, हातपाय गाळून कसें चालेल ? "

" मग काय करूं ? "

" भीष्मांचें तुम्हांवर प्रेम आहे, हें खरें ना ? "

" होय. तातांची आम्हांवर निरतिशय कृपा आहे."

" तर मग आतांच भीष्मांकडे चला. त्यांच्या वधाचा उपाय आपण त्यांनाच विचारूं म्हणजे झालें. "

इतस्ततः पसरलेलें सैन्य पार करीत पांडव आणि कृष्ण कौरवाच्या शिबिराकडे चालले. वाटेंत कुणींही त्यांना अडविलें नाहीं.

भीष्म चिंताग्रस्त अवस्थेंत आपल्या शय्येवर पहुडले होते. त्यांना झोंप लागेना. भविष्य काय आणि कसें, हेंही त्यांच्यापुढें स्पष्ट होईना.

तों शिबिराचा पडदा बाजूला सारीत सहा जण आंत शिरले.

" कोण ? " भीष्मांनीं आश्चर्यानें विचारलें.

" मी युधिष्ठिर आपणांस नमस्कार करीत आहें."

" वत्सा ! तुझें कल्याण असो ! "

" कल्याण ? तें केव्हां आणि कसें घडणार आहे ? "

तेव्हां मग मात्र भीष्म उठून बसले. निरखून पाहात त्यांनीं विचारलें,

" तुझ्याबरोबर कोण कोण आहे ? "

उत्तर श्रीकृष्णानें दिलें. तो म्हणाला,

" मी वासुदेव आणि युधिष्ठिराचे चार भ्राते-"

हर्षभरित होऊन श्रीकृष्णाला अत्यादरानें आसनावर बसवीत भीष्म म्हणाले,

" मुकुन्दा, तूं कां आलास तें मला कळलें."

युधिष्ठिर म्हणाला,

" ताता, जोंपर्यंत आपण भगवान् पशुपतिप्रमाणें युद्ध करीत आहांत, तोंपर्यंत आमचा विजय कसा व्हावा ? "

" युधिष्ठिरा, तुझें म्हणणें मान्य आहे. मीही आतां थकलों आहें. तेव्हां तुम्ही मला बाजूला सारून विजयाकडे अग्रेसर व्हा."

" पण उपाय ? "

" ऐक युधिष्ठिरा. स्त्री, षंढ, विकलांग, अशांशीं युद्ध करणें मला रुचत नाहीं."

" पण-"

" आतां तुला उपाय सांगतों, द्रुपदपुत्र शिखंडी हा अगोदर स्त्री होता. गंधर्वाच्या प्रसादानें त्याला पुरुषत्व प्राप्त झालें. तेव्हां त्याच्यावर मी बाण टाकणार नाहीं."

" याचा अर्थ शिखंडीनें आपणांशीं युद्ध करावें, असा आहे काय ? "

हंसून भीष्म म्हणाले,

" माझा पराभव दोघेच करूं शकतात-अर्जुन किंवा वासुदेव ! इतर कोणांतही तें सामर्थ्य नाहीं."

" आपल्या सूचनेचा अर्थ — "

" सांगतों. शिखंडीला पुढें करून अर्जुनानें माझ्यावर बाण सोडावेत ! "

पुनः एकदां भीष्मांना नमस्कार करून पांडवांसह श्रीकृष्ण आपल्या शिबिराकडे निघाला. अर्जुन अत्यंत खिन्न होऊन म्हणाला,

" छे छे ! हें मजकडून घडणार नाहीं ! "

श्रीकृष्णानें विचारलें,

" काय ? "

" तातांशीं युद्ध — "

" पुनः मोहाचा फेरा ? "

" नव्हे श्रीकृष्णा. पण तातांचें मजवर अकृत्रिम प्रेम होतें रे ! लहानपणीं अनेकदां मी अंग मातीनें माखून त्यांच्या मांडीवर बसत त्यांना तात म्हणून हांक मारीत असें. तेव्हां ते मला हृदयाशीं धरून म्हणत, बाळा, मी तुझ्या ताताचा तात आहें ! "

" पार्था, आपली प्रतिज्ञा विसरलास काय ?

" कोणती ? "

" मी कौरवसेनेचा वध करीन — "

" पण मला तातांचा वध करावा लागेल ? "

" अर्जुना, भीष्म जाणतेपणीं कौरवसेनेचे सेनापतित्व स्वीकारून तुम्हाशीं युद्ध करायला सिद्ध झाले आहेत. तेव्हां भ्रांत मोहाच्या आहारीं न जातां त्यांनीं सांगितलेल्या मार्गानें त्यांचा वध करणेंच तुझें कर्तव्य आहे. "

दहावा दिवस उजाडला. दोन्हीं सैन्यें युद्धप्रवृत्त झालीं. भीष्म स्थिर मनानें सैन्याच्या अग्रभागीं जाऊन उभे राहिले. त्यांनीं असीम युद्धकौशल्य प्रदर्शित करून पांडवसेनेचा नाश आरंभिला. तेव्हां युधिष्ठिरानें प्रेरणा केलेला शिखंडी भीष्मासमोर उभा राहून त्यांच्यावर शरवर्षाव करूं लागला.

पण भीष्म प्रतिकार करीत नाहींत, हें पाहून तो ओरडला,

" कौरवसेनापते असें कां ? "

भीष्मांनीं स्मित करीत उत्तर दिलें,

" कारण स्पष्ट आहे. "

" काय ? "

" मी तुला अजून शिखंडिनीच समजतों."

क्रुध्द शिखंडी दांतओठ खात म्हणाला,

" वृध्दा, मजवर प्रहार कर किंवा करूं नकोस. मी मात्र आज तुझा वध करणार हें निश्चित ! "

शिखंडीबरोबरच अन्य पांडवपक्षीय वीरही भीष्मावर चालून आले. भीष्मांनीं त्यांना आपल्या प्रखर बाणांनीं यथायोग्य उत्तर दिलें. त्या दिवशीं भीष्मवधाची चाहूल लागल्यानें पांडवपक्षीय वीर मोठ्या उत्साहानें लढत होते. अन्यान्य वीरांनीं कौरवांशीं झुंज घेऊन त्यांना त्राहि भगवान् करून सोडलें.

द्रोण अश्वत्थाम्याला म्हणाले,

" अश्वत्थाम्या, आज चिन्हें बरीं दिसत नाहींत ! "

" कां ? "

" सूर्याला खळें पडलें आहे. आकाशांतून अशनिपात होत आहे. दिवसांच सुर्यमंडलांतून एक प्रचंड उल्का पडलेली मला दिसली. घुबडें भेसूर स्वर काढीत आहेत. भालू भर दिवसां रोदन करीत आहेत. "

" पण या अशुभाचा अर्थ काय ? "

" अर्थ ? ऐक. आज सेनापति भीष्म जणूं प्राणपणानें युद्ध करीत आहेत, पण शिखंडी वारंवार त्यांच्या समोर उभा राहात आहे. पार्थही धनुष्याचा टणत्कार करीत तिकडेच निघाला आहे. तेव्हां तूं जाऊन त्याला अडवून धर. "

पण हा उपायही निष्फल ठरला. अर्जुन जेव्हां गांडीव धनुष्याला बाण जोडीत भीष्मांकडे गेला, तेव्हां त्याला कोणीही अडवूं शकला नाहीं.

भीष्मांनीं त्याला पाहून शेवटच्या निकरानें शरवर्षाव सुरू केला- तेव्हां अर्जुनानें शिखंडीस पुढें करून त्याच्या आडून अत्यंत प्रखर बाण मारणें सुरू केलें. त्या बाणांचें तेज भीष्मांना जाणवलें. त्यांनीं आपलें धनुष्य उचलायचा प्रयत्न करतांच अर्जुनानें तें तोडून टाकलें. भीष्म नवें धनुष्य उचलायला हात घालीत, तों त्यांना कळून येई, कीं अर्जुनानें तें तोडून टाकलें आहे !

शेवटीं त्यांनीं स्वस्थ राहण्याचा निश्चय केला. शिखंडीच्या आडून अर्जुनाचे कठिण बाण सपासप येऊन त्यांचें शरीर व्यथित करूं लागले. ते हंसत दुःशासनाला म्हणाले,

" दुःशासना, ऐक, हे बाण शिखंडीचे नव्हेत. "

" तर मग ? "

" छे ! ज्यांचा स्पर्श वज्रासारखा आहे, असे हे बाण निश्चितच पार्थाचे आहेत. हे शिखंडीचे नव्हेत. यांचा असह्य वेग मला सहन होत नाहीं. हे शिखंडीनें सोडलेले नव्हेत. खेकडीचीं पिलें जन्मतांक्षणींच आपल्या जननीची पाठ विदीर्ण करतात. तसे हे बाण माझें शरीर विदीर्ण करीत आहेत. शिखंडी-मध्यें एवढा पराक्रम कुठला ? हे निश्चितच अर्जुनाच्या धनुष्यापासून सुटलेले आहेत. हे प्राणहारक बाण माझी संज्ञा घेऊन मला अंधःकाराकडे लोटीत आहेत. हे बाण शिखंडीचे नव्हेत ! "

भीष्मांचा शरवर्षाव बंद पडला हें पाहतांच पांडवांनीं त्यांच्या भोंवतीं एकच गर्दी केली. अर्जुनानेंही आपला वेग पराकोटीला नेऊन पोंचविला.

शेवटीं सूर्य अस्ताचलावर जाऊन टेंकण्याच्या बेतांत आहे अशा समयीं पूर्वेकडे तोंड करून महात्मा भीष्म रथांतून कोसळून धराशायी झाले ! मात्र त्यांच्या शरिराचा स्पर्श भूमीस झाला नाहीं. कारण अर्जुनाचे बाण त्यांच्या शरिरांत एवढ्या अधिक प्रमाणांत रुतून बसले होते कीं, जणुं त्यांची शरशय्याच निर्माण झाली होती !

खालीं कोसळतांच भीष्मांना दाक्षिण दिशेकडे कललेला सूर्य अस्तास जात असलेला दिसला. त्यांना दक्षिणायन चालू असल्याचें स्मरण झालें. ते जणूं काय स्वतःशींच निग्रहानें बोलले,

" नाहीं ! उत्तरायण सुरू होईपर्यंत हें शरीर सोडूं पाहणाऱ्या प्राणांना मी रोधून ठेवीन ! "

भीष्म खालीं कोसळले ही वार्ता क्षणार्धात रणांगणावर पसरली. त्वरित उभय पक्षीय योद्ध्यांनीं युद्ध थांबविलें. पांडवांना क्षणभर संतोष झाला खरा, पण मग तेही खिन्न होऊन भीष्मांचे भोंवती गोळा झाले. कौरवांचें सैन्य अत्यंत विषाद पावून भीष्मांना बघण्यासाठीं त्यांचेजवळ आलें.

उभय पक्षीय वीर आपापली शस्त्रें आणि कवचें एकीकडे ठेऊन नत-मस्तकांनीं आपल्या भोंवती एकत्र झालेले पाहून भीष्म खोल गेलेल्या शब्दांत म्हणाले,

" या मुलांनो ! असे जवळ या. "

कुणाच्यानेंही वर मस्तक करून क्षीण हास्य करणाऱ्या भीष्मांकडे बघवेना. भीष्म म्हणाले,

" माझें डोकें खाली लोंबत आहे. कोणी मला उशी द्याल काय ? "

त्वरित राजे मऊ उशा आणण्यासाठी धांवपळ करूं लागले. तें पाहून भीष्म म्हणाले,

" मला आतां त्या मऊ उशा काय करावयाच्या ? "

कोणालाच कांहीं कळेना. तेव्हां मग भीष्म अर्जुनाकडे पाहून म्हणाले,

" धनंजया, मला वीरोचित अशी उशी—"

अर्जुनानें आंसवें पुशीत म्हटलें,

" जशी आज्ञा ! "

त्वरित अर्जुनानें गांडीव धनुष्याला तीन बाण जोडून ते भूमींत अशा खुबीनें मारले कीं, त्यांवर सहजच भीष्म मस्तक ठेऊं शकले !

तोंच दुर्योधनानें बोलाविलेले कुशल शस्त्रवैद्य भीष्मांजवळ उपस्थित झाले. पण भीष्म म्हणाले,

" नाहीं दुर्योधना, माझ्या शरिरांतले बाण काढायचा यत्न करूं नकोस. "

" पण— "

" छे ! वीराला उचित अशी शय्या मला सहजच प्राप्त झाली आहे. उत्तरायण लागेपावेतों मी हिच्यावरच पडून राहीन.

दुसरे दिवशीं पुनः सर्व वीर उपस्थित झाले असतां भीष्म म्हणाले,

" मला तहान लागली रे ! "

दुर्योधनानें शीतल सुवासिक जल आणण्यासाठीं दूत दवडले. पण भीष्मांनीं सहेतुक अर्जुनाकडे पाहात म्हटलें,

" अर्जुना ! पाणी "

तो संकेत कळून अर्जुनानें जवळच भूमींत एक बाण पाताळापर्यंत मारला. त्वरित शीतल जलधारा वर उसळून आली. तें जल पिऊन तृप्त झालेल्या भीष्मांनीं दुर्योधनाला अत्यंत स्नेहानें म्हटलें,

" दुर्योधना, मला वाटतें, आतां पुरे झालें."

" काय ? "

" तुमच्यांतलें वैर. माझ्या मरणानें त्याचा अंत होऊं दे. तूं आणि युधिष्ठिर, दोघेही सुखानें एकत्र नांदून या सुजल सुफल भूमीवर धर्मानें राज्य करा. ये युधिष्ठिरा ! "

युधिष्ठिर भीष्मांजवळ जाऊन उभा राहिला. त्याचा हात आपल्या हातीं घेत भीष्म म्हणाले,

" दुर्योधना, ऐक माझें. ये इकडे. व्यर्थ या सर्व वीरांच्या नाशाचें कारण होऊं नकोस. ये."

पण दुर्योधन मान खालीं घालून बसून राहिला ! भीष्म श्वास सोडून म्हणाले,

" इच्छा तुझी ! "

भीष्मांच्या रक्षणाची व्यवस्था करून उभयपक्षीय वीर पुनः युद्धाच्या इच्छेनें समरांगणाकडे निघाले.

## द्रोणपर्व—

भीष्म धारातीर्थी पडले यामुळें दुर्योधनाच्या मनाला अत्यंत विषाद तर झालाच, पण आता कर्ण हाती शस्त्र घेऊन समरांगणावर तळपूं शकेल, या विचारानें तो संतुष्टही झाला.

शरशय्येवर पहुडलेल्या भीष्मांजवळ जाऊन कर्णानें त्यांना नमस्कार केला आणि आतांपर्यंत त्यांना उद्देशून आपण काढलेल्या ब-यावाईट उद्गारांबद्दल त्यांची क्षमा मागितली. भीष्मांनीं उदार मनानें त्याला म्हटलें,

" कर्णा, माझ्या मनांत तुझ्याविषयीं मुळींच किंतु राहिला नाहीं. तूं निश्चिंत मनानें युद्ध कर. "

मग कर्ण शस्त्रसज्ज होऊन आपल्या रथावर आरूढ होत दुर्योधनाच्या शिबिराकडे निघाला. त्याला आलिंगन देत दुर्योधनानें विचारलें,

" मित्रोत्तमा, आतां तुझ्या बळावर विसंबून मी निश्चिन्त मनानें युद्ध करूं ना ? "

" होय राजा पण केवळ युद्ध नव्हे--"

" मग ? "

" तूं विजयानंतर कराव्या लागणाऱ्या समारंभाची सिद्धताही कर ! "

कर्णाचें हें उत्साहजनक बोलणें ऐकून दुर्योधनपक्षीय वीरांनीं आनंदून आपापले शंख वाजविले. नंतर दुर्योधन कर्णाला बोलला,

" कर्णा, आतां सेनापति कोणीं व्हावें ? "

क्षणभर विचार करून कर्ण म्हणाला,

" आचार्य द्रोण ! सेनापतित्व त्यांना दिल्यानें त्यांचा आपण उचित सन्मान केला असें होईल. "

" जशी तुझी इच्छा. "

दुर्योधनानें द्रोणांजवळ जाऊन आपली इच्छा प्रगट केली. द्रोण म्हणाले,

" दुर्योधना, तुझी इच्छा असेल, तर सेनापतिपद स्वीकारायला माझी ना नाहीं. मात्र तुझ्या एक गोष्ट लक्षांत असूं दे "

" कोणती ? "

" द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न—"

" तुमचा शिष्य—"

" होय ! पांडवांचा सेनापति. त्याचा वध मजकडून घडणार नाहीं. "

" कां ? "

" त्याचा जन्म माझ्या वधासाठीं झाला आहे ! "

" असे ना कां ? आपण केवळ सेनेचं संचलन करावें. धृष्टद्युम्नाचें आम्ही पाहून घेऊं. "

नंतर सेनेची रचना करून द्रोण तिच्या अग्रभागीं आपल्या रथांत आरूढ होऊन पांडव सेनेकडे निघाले. त्यांच्या पाठोपाठ कर्णही रथारूढ होऊन शंखनाद करीत चालला. त्याला पाहून कौरवपक्ष आनंदानें गदगदां ओरडूं लागला.

" आतां पांडवांना युद्धांतला आनंद कळेल ! "

तोंच दुर्योधन द्रोणांच्या रथाजवळ आपला रथ नेऊन म्हणाला,

" आचार्य, आपण माझें एक प्रिय करावें. "

" काय ? "

" पांडवांचा वध आपल्या हातून न घडला तरी चिंता नाहीं. मात्र युधिष्ठिराला आपण धरून मजकडे आणावें. "

पांडवांचेविषयीं दुर्योधनाचे मनीं अचानक सद्बुद्धीचा उदय झालेला पाहून द्रोणांना आनंद झाला. त्याचें कौतुक करीत द्रोण म्हणाले,

" पुत्रा, पांडवांविषयींचा तुझ्या मनांतला द्वेषभाव मावळल्याचें पाहून मला किती बरें वाटलें म्हणून सांगूं ? तुझें काम मी अगदीं सहज करीन. मात्र अर्जुन युधिष्ठिराजवळ नसला पाहिजे. पण ही इच्छा तूं कां करीत आहेस ? "

" कारण—कारण पांडवांवर जय मिळवायचा असेल तर—"

" तर काय ? "

" तर एकटा युधिष्ठिर हस्तगत झाला कीं पुरे ! पुनः त्याच्याशीं कपटद्यूत खेळून त्याच्यासह पांडवांना दीर्घकाळपर्यंत वनांत धाडतां येईल ! "

दुर्योधनाची ही पापवासना ऐकून आचार्यांना मोठा विषाद झाला. पण ते युधिष्ठिराला धरण्याची प्रतिज्ञा करून चुकले होते. श्वास सोडून ते म्हणाले,

" तुझी इच्छा ! मात्र अर्जुन—"

" तेवढी व्यवस्था मी करतों. "

त्या दिवशीं मोठें अपूर्व युद्ध झालें. भगदत्तादि वीरांनीं क्षणभर असा धाक निर्माण केला, कीं आतां शत्रुसेनेचा पराभव होऊन युद्ध आजच संपतें कीं काय ! पण अर्जुनानें त्याचा वध करून तें भय नाहींसें केलें.

द्रोणांनीं दिवसभर युधिष्ठिराला धरण्याचा कसोशीचा प्रयत्न केला. पण पार्थ अर्जुन त्याच्या भोंवतीं दक्षतेनें रणसंचार करीत असल्यामुळें त्यांचा उपाय चालेना, हें पाहून चिंतातुर झालेल्या दुर्योधनाला त्रिगर्ताधिप म्हणाला,

" ऐक दुर्योधना, आमची प्रतिज्ञा ऐक. "

" बोला. "

" आज अनेक दिवस आम्ही भ्राते अर्जुनवधाची कामना मनीं बाळगून आहोंत. आज ती आम्ही पुरी करूं. त्याचा वध तरी करूं अथवा प्राणत्याग तरी करूं अशी अग्नीसमोर प्रतिज्ञा करून आज आम्ही त्याला आव्हान देत रणभूमीवर उभे ठाकूं. "

दुर्योधनानें अत्यानंदानें त्यांच्या प्रतिज्ञेचें समर्थन केलें. ते भ्राते आणि त्यांचें सैन्य असे संशप्तक प्रतिज्ञाबद्ध होऊन अर्जुनाला रणयज्ञाचें आवाहन देत दक्षिणेकडे निघाले. अर्जुन युधिष्ठिरास म्हणाला,

" राजा, युद्धासाठीं मला पाचारण केलें गेलें आहे—"

" मग ? "

" तें वृथा करणार नाहीं, अशी माझी प्रतिज्ञा आहे–"

" पण द्रोणांची प्रतिज्ञा–तिचें काय ? "

" असूं दे. धृष्टद्युम्न तुझ्याजवळ असेपर्यंत तुला अगदीं कल्पांतापासूनही भय नाहीं. मला संशप्तकांशीं झुंज घेण्याची आज्ञा दे. "

युधिष्ठिराची संमति मिळतांच अर्जुनानें संशप्तकांशीं झुंज घेऊन त्यांपैकीं अनेकांचा संहार केला. बाकीचें काम दुसऱ्या दिवसावर ठेवून तो सूर्यास्त झाल्यामुळें परत फिरला.

## अभिमन्युपर्व—

दुसरे दिवशीं पुनः अर्जुन संशप्तकांकडे गुंतला. त्या दिवशीं आचार्य द्रोणांनीं मोठ्या कौशल्यानें आपली सेना चक्रव्यूह मांडून त्यांत उभी केली. ती दुर्भेद्य रचना पाहून युधिष्ठिर चिंतित झाला. कारण चक्रव्यूहांत प्रवेश कसा करावा, हें अर्जुनाशिवाय इतरांस माहीत नव्हतें.

तोंच त्याला बालवीर अभिमन्यूचें स्मरण झालें. तो सौभद्रेयही अर्जुनासारखाच युद्धशास्त्रपटु होता. त्याला आपल्याजवळ बोलावून युधिष्ठिर म्हणाला,

" वत्सा, हें कसें धर्मसंकट उभें राहिलें तें बघ ! "

" काय झालें ? "

" आचार्य द्रोणांनीं त्यांचें सैन्य चक्रव्यूहांत रचलें आहे. अर्जुन, श्रीकृष्ण व त्याचा पुत्र प्रद्युम्न यांशिवाय दुसरा कोण या व्यूहाचा भेद करूं शकेल ? "

तत्क्षणीं तो बालवीर उत्तरला,

" तात, चक्रव्यूहांत मीही शिरूं शकतों–"

" होय ! तें मला माहीत आहे–"

" तर मग आपण मला अनुमति द्या ! आज या कौरवसेनेचा पराभव करून त्यांना असा धडा शिकवितों— मात्र–तुम्हाला एक केलें पाहिजे–"

" काय ? "

" मला केवळ चक्रव्यूहांत शिरणेंच माहीत आहे–"

भीम मोठ्या गौरवानें बोलला,

" असूं दे रे असूं दे ! माझ्या मुला, तूं चक्रव्यूहाचा भेद करीत केवळ पुढेंच काय तो हो म्हणजे झालें. आम्ही सगळे पांडवपक्षीय वीर तुझ्या रथाशीं रथ भिडवून तुझ्या नेतृत्वाखालीं कौरवसेनेचा नाश करूं ! "

अत्यंत उत्साहानें उत्स्फूर्त होऊन आपलें धनुष्य लीलया उचलीत अभिमन्यूनें सारथ्याला आपला रथ कौरवसेनेकडे वळविण्यास सांगितला. भीम, सात्यकी, धृष्टद्युम्न, पांच द्रौपदीपुत्र आदि वीर त्याचें अनुसरण करीत त्याच्यामागें चालले. तो वीरांचा झंझावातासारखा प्रवाह अडविण्यास कोणीच समर्थ होईना !

दुःशासन, दुर्योधन, कर्ण आदि वीरांनीं अभिमन्यूला थोपविण्याची पराकाष्ठा केली. पण आज त्या बालवीराच्या रूपानें जणूं मृत्यूच रणभूमीवर वावरत होता. या सर्व वीरांचा पराभव करून त्यानें दुर्योधनपुत्र लक्ष्मण आणि कर्णाचा भ्राता या प्रमुख वीरांचा लीलया वध केला. आपल्या धनुष्यापासून तीक्ष्ण धारेच्या नाराच बाणांचा वर्षाव विजेच्या गतीनें करीत तो वीर कौरवसेनेचा नाश करूं लागला.

अशा वेळीं जयद्रथ पुढें सरसावला. त्यानें अपूर्व पराक्रम करून अभिमन्यूची पाठराखणी करून चालून येणाऱ्या भीम, सात्यकी आदि वीरांना अडवून धरलें. एकटा अभिमन्यूच फार पुढें निघून गेला. कोसलाधिप बृहद्बलानें त्याला अडवायचा प्रयत्न केला, पण त्या प्रयत्नांत त्याला आपलें मस्तक मात्र गमवावें लागलें !

त्याचा अत्यद्भुत पराक्रम पाहून दुर्योधन द्रोणांना म्हणाला,

" आचार्य, आतां कसें ? "

" काय ? "

" हा पोर तर कल्पनेबाहेर प्रलयंकर दिसत आहे ! याचा पराभव करणें अशक्यच आहे काय ? "

"राजा, मला असें दिसतें, कीं या बालवीराशीं एकेकटा योद्धा झुंजूं शकणार नाहीं–"

"असें ? तर मग–"

कर्णानें विचारलें.

"तर मग काय ?"

"तर मग आपण सगळे याच्यावर तुटून पडूं या ! नाहीं तर मला आज कौरवांची शुभगति दिसत नाहीं !"

"तसेंच होवो !"

एकटा अभिमन्यु सिंहासारखा कौरवसेनेशीं झुंजत असतां द्रोण, दुर्योधन, दुःशासन, कर्ण आदि अतिरथी एकत्र होऊन त्याच्याशीं झुंजायला उभे ठाकले ! त्या सर्वांनीं त्याच्याभोंवतीं गर्दी करून त्याचें धनुष्य तोडलें. सारथी व अश्व यांचा वध केला. त्यानें खड्ग उचलतांच तीक्ष्ण बाणांनीं तेंही खण्डविखण्ड करून टाकलें !

शेवटीं चवताळून त्या सिंहाच्या छाव्यानें गदा उचलली, आणि सुबलपुत्र कालिकेय, गांधारवीर, दहा वसातीय, इतक्या वीरांचा तिच्या साहाय्यानें चेंदामेंदा केला.

आणि मग त्यानें दुःशासनपुत्राच्या रथावर उडी घेऊन त्याच्या अश्वांना परलोकीं धाडून दिलें. तेव्हां दौश्शासनि व अभिमन्यु या दोघांचें गदायुद्ध सुरू झालें. अनेक मंडलें आणि रंगणें रचीत त्या वीरांनीं कांहीं काळ सभोंवतालच्या वीरांनाही धन्य धन्य म्हणावयास लाविलें, आणि मग एकमेकांच्या गदाप्रहारांनीं ते दोघेही मूर्छित होऊन पडले. कांहीं वेळानंतर दौःशासनि शुद्धीवर आला.

त्याला आपल्या शेजारीं मूर्छितावस्थेंत पडलेला अभिमन्यु दिसला. दांत ओठ खात त्यानें गदेचा एक अजस्र प्रहार त्याच्या मस्तकावर केला, आणि अशा रीतीनें श्रीकृष्णाचा आवडता भाचा, अर्जुनाचा प्रिय पुत्र, पांडवकुलभूषण अभिमन्यु धारातीर्थीं पतन पावला ! सहा वीरांनीं एकाचा बळी घेतला !

कौरवांनीं शंखध्वनीचा गदारोळ करीत आपला विजय प्रकट केला !

## जयद्रथवध —

संशप्तकांचा वध करून अर्जुन परतत होता, तों त्याला अशुभ शकुन होऊं लागले. तो श्रीकृष्णास सचिंत होऊन बोलला,

" गोविंदा, आज मला अशी अस्वस्थता कां वाटत आहे ? "

" काय झालें ? "

" माझे नेत्र अकारण अश्रूंनीं भरून येत आहेत. माझा मार्गही वावटळीनें धुंद झाला आहे. माझा ज्येष्ठ भ्राता कुशल आहे ना ? "

" अर्जुना, तूं त्याच्याविषयीं मुळींच चिंता करूं नकोस."

" माधवा, तरी पण अश्व जरा वेगानें चालूं दे. मला अशुभाची चाहूल लागत आहे."

श्रीकृष्णानें अत्यंत त्वरेनें रथ शिबिरांत आणून उभा केला. ते दोघे युधिष्ठिराजवळ आले, तों त्यांना दिसलें कीं, सर्व वीरांवर पराकाष्ठेची औदासीन्याची छाया पसरली आहे !

अर्जुन साशंक स्वरांत म्हणाला,

" श्रेष्ठा, तुम्ही सर्व जण म्लान कां झालां आहांत ? "

युधिष्ठिर गद्गद स्वरांत बोलला,

" अर्जुना, आतां मी तुला कसें सांगूं ? "

" काय ? "

" आम्हा पांडवांच्या पराक्रमाचें यश वृद्धिंगत करीत—"

" काय ? "

" तुझा—नव्हे—माझा अत्यंत आवडता बाळ—"

" कोण ? "

" अ--भि--म--न्यु—"

ते शब्द कानीं पडतांच अर्जुनावर जणूं आकाशींचें वज्रच कोसळून पडलें ! कांहीं काळ तो स्तब्ध उभा राहिला. नंतर आपल्या त्या मदनोपम पराक्रमी बाळाचे अनेकविध गुण आठवीत तो म्हणाला,

" सांग ! राजा, सांग ! माझा तो शूर पुत्र खचितच वीरोचित मृत्यूस प्राप्त झाला असेल !

" कदाचित् त्याला शेवटच्या क्षणीं असें वाटलें असेल कीं, यावेळीं माझा पिता असता तर–

" पण त्याला असेंही वाटलें नसावें. त्यानें एकट्यानें प्रबळ झुंज देऊन मृत्युमुखांत प्रवेश केला असेल. अत्यंत गौरवानें त्यानें स्वर्गद्वार उघडून आंत पाऊल टाकलें असेल–

" पण राजा, सांग ! आतां मी द्रौपदीला काय सांगूं ? सुभद्रा जेव्हां माझा बाळ कुठें सोडलात, असें आर्त स्वरानें मला विचारील, तेव्हां मी तिला काय उत्तर देऊं ? आणि–

" आणि राजा, माझी प्रिय शिष्या आणि स्नुषा उत्तरा भयभीत हरिणीच्या डोळ्यांनी माझ्या त्या आवडत्याचा निष्फळ शोध घ्यायची धडपड करील, तेव्हां तिचें समाधान मी कसें करूं ?

" सांग राजा ! सांग ! "

आणि युद्धिष्ठिरानें जेव्हां साश्रु नयनांनीं अभिमन्युवधाची कथा त्याला सांगितली, तेव्हां संतापानें थरथरत अर्जुन बोलला,

" अरेरे ! सहा जणांनीं एकत्र होऊन माझ्या बाळाचा वध करण्याचें पापकृत्य करावें ना ? आणि अभिमन्यूबरोबर असलेलें भीमादिवीरांचें कवच जयद्रथानें अडविल्यामुळें हा लाजिरवाणा प्रकार घडला काय ? ऐका तर !

" उद्यां सूर्यास्त होण्याच्या आंत एक तर मी त्या नीच जयद्रथाचा वध करीन, अथवा–

" अथवा अग्निकाष्ठें तरी भक्षण करीन !"

अर्जुनाच्या या प्रतिज्ञेला पांडववीरांनीं शंख वाजवून साथ केली.

गुप्तचरांनीं पार्थप्रतिज्ञेचें हें वृत्त कौरवशिबिरांत सांगितलें मात्र जयद्रथ भयानें पिवळा पडला. तो दुर्योधनाला म्हणाला,

" राजा, आतां मला स्वगृहीं जाण्याची आज्ञा दे ! "

' कां ? "

" अर्जुनापासून माझें रक्षण कोण करूं शकेल ? "

द्रोण त्याला अभय देत म्हणाले,

" जयद्रथा, मरण कोणालाच चुकत नाहीं. आम्ही सर्वच वीर कधींतरी मरणाधीन होणार आहोंत. तेव्हां तूं मृत्युभयानें असा धर्मपराङ्मुख होऊं नकोस. "

" मग काय करूं ? "

" चिंता करूं नकोस. मी तुझें अर्जुनापासून रक्षण करीन. "

दुसरे दिवशीं सकाळीं द्रोणांनीं अभेद्य व्यूह रचून त्याच्या मध्यभागीं जयद्रथाची स्थापना केली. अर्जुनानें रथारूढ होत सात्यकीला म्हटलें,

" मित्रा, आज मी माझी प्रतिज्ञा पूर्ण करीन–"

" निश्चितच–"

" मात्र तूं एक काम कर. "

" कोणतें ? "

" राजा युधिष्ठिराजवळ तूं असलास कीं मी निश्चित मनानें जयद्रथाचा मागोवा काढूं शकेन. "

" ठीक आहे. "

श्रीकृष्ण अर्जुनाचा रथ वेगानें हांकीत कौरवसेनेच्या मुखापाशीं पोंचला तिथें स्वत: आचार्य द्रोण शस्त्रसज्ज होऊन उभे होते. कांहीं क्षण त्यांच्यांशीं युद्ध करून अर्जुन त्यांना उजवी घालून पुढें निघाला, तेव्हां द्रोण हंसून म्हणाले,

" कां रे अर्जुना ! "

" आचार्य, आपण मला वंद्य अहांत, वध्य नव्हेत ! "

दिवसभर कौरवसेनेनें अर्जुनास अडवायचा शर्तीचा प्रयत्न केला. पण त्यानें श्रुतायुध, सुदक्षिण, अम्बष्ठ, विंदानुविंद, भूरिश्रवा आदि वीरांचा वध करीत पुढें मजल मारलीच. घटोत्कचानें अलंबुषाचा वध केला, तर भीमानें कांहीं धार्तराष्ट्रांचा बळी घेतला. अनेकदां संकुलयुद्ध झालें, त्यांत अनेकानेक कौरव वीर बळी पडले.

शेवटीं सूर्यास्त अगदीं जवळ आला, तरी अजून जयद्रथ दिसेना, हें पाहून अर्जुन खिन्नपणें म्हणाला,

" श्रीकृष्णा, सूर्याचा अस्त होत आहे, आणि–आणि अर्जुनाचाही ! "

" नाहीं. अस्त होईल जयद्रथाच्या जीविताचा ! "

" पण कसा ? केव्हां ? "

" ऐक अर्जुना, या कौरवांनीं तुझा पुत्र कपटानें मारला. तेव्हां जयद्रथालाही मारतांना थोडा कपटाचार करणें पाप नाहीं. मी या सूर्यमंडलाभोंवतीं माझ्या मायेचें आवरण घालतों. सूर्यास्त झाला, असें समजून आनंदानें लपून बसलेला जयद्रथ समोर येईल. तो दिसतांक्षणींच तूं एका तीक्ष्ण बाणानें त्याचा शिरच्छेद कर. मात्र एक गुह्य लक्षांत ठेव. "

" कोणतें ? "

" या सैंधव जयथद्राच्या पित्यानें तपश्चर्या करून एक वर मिळविला आहे. ज्या कुणाच्या हातून याचें शिर भूमीवर पडेल, त्याचें मस्तक शतधा विदीर्ण होईल. "

" मग मी काय करूं ? "

" शास्त्रविद्येंत तूं निपुण आहेस. कुरुक्षेत्रापलिकडे यमुना तटांकीं जयद्रथाचा पिता आतांच संध्यावंदन करीत असेल. तूं बाणामागें बाण अशी मालिका निर्माण करून या पाप्याचें मस्तक त्याच्याच मांडीवर पडेल असें कर, म्हणजे त्याच्याच हातून त्याला भूमिस्पर्श होईल ! "

श्रीकृष्णानें योगमायेनें सूर्य झांकोळून टाकला. जणूं तो अस्तासच गेला आहे, अशी धारणा होऊन दुर्योधनादिकांस अत्यंत आनंद झाला. आतां अर्जुन चिताप्रवेश करणार, या कल्पनेनें प्रोत्साहित होउन जयद्रथानेंही लपलेल्या स्थानांतून डोकें वर उंचावून अर्जुनाकडे बघितलें.

अकस्मात् श्रीकृष्णानें आपली योगमाया संहरिली, आणि तो अर्जुनास म्हणाला,

" अर्जुना, तो बघ सूर्य, आणि हा जयद्रथ ! "

एका क्षणाचाही विलंब न लावतां अर्जुनानें एका तीक्ष्ण बाणानें जयद्रथाचें शिर आकाशांत उडविलें, आणि त्या बाणामागोमाग अनेक बाणांची शृंखलाच निर्माण करून तें शिर त्याच्या पित्याच्या अर्घ्यदान करण्यासाठीं जोडलेल्या अंजुळींत पाडलें !

अपूर्व असा शंखनाद करून अर्जुन-माधवांनीं तो विजय उभय सैन्यांच्या कानीं पोंचविला !

## घटोत्कच-वध—

जयद्रथाच्या संरक्षणाची एवढी व्यवस्था करूनही शेवटीं अर्जुनानें आपली प्रतिज्ञा पुरी केलीच, हें पाहून दुर्योधन अत्यंत संतप्त झाला. तो ओरडून म्हणाला,

" चिंता नाहीं ! हें युद्ध असेंच चालूं द्या–"

" पण सूर्यास्त झाला आहे ! "

" होऊं द्या ! आतां कोणता तरी एक पक्ष पराभूत होईपर्यंत युद्ध आणि युद्ध ! "

दिवसभरच्या युद्धानें भागलेलीं तीं दोन्ही सैन्यें चेकाळून पुनः त्या अंधाऱ्या रात्रीं एकमेकांशीं भिडलीं. धड रथ्याला रथी दिसेना. पदात्याला पदाती ओळखूं येईना. केवळ नामोच्चार आणि शंखध्वनि या दोनच साधनांनीं वीरांची ओळख पटूं लागली.

दुर्योधनानें प्रार्थिलेला अश्वत्थामा आपला रथ विजेच्या गतीनें चहूं दिशांना फिरवीत रणांगण गाजवूं लागला. भीम, सात्यकि आदि पांडव पक्षीयही रक्ताचे घोट गिळून अपूर्व युद्ध करूं लागले.

धड एकमेकांचीं शरिरेंही दिसेनात, सगळाच गोंधळ उडाला. तेव्हां दुर्योधन ओरडून आपल्या सेनेस म्हणाला,

" तुम्ही एका हातांतील शस्त्रें खालीं ठेवून त्यांत पाजळलेले पोत धरा. "

तेव्हां मग असंख्य पेटलेल्या पोतांनीं तें सर्व रणांगण जणूं अलौकिक झालें. त्या प्रकाशांत अन्यान्य वीरांचीं शस्त्रें लकलकूं लागलीं. एवढा वेळ अंधारामुळें गुदमरलेलें युद्ध आतां दुप्पट उत्साहानें सुरू झालें.

रात्रीची वेळ राक्षसांच्या मायायुद्धास फार सोईची. यामुळें घटोत्कच श्रीकृष्णाच्या प्रोत्साहनानें द्विगुणित उत्साहानें नाना प्रकारच्या माया रचून कौरवसेनेंतील अनेक वीरांना भ्रमित चित्त करूं लागला. कधीं तो आकाशांत उड्डाण करून तिथें प्रचंड आकार धारण करी., आणि कौरवसेनेवर कोसळे. तर कधीं अनेकविध अभ्रें आणि विजा कडकडवून तो त्या सेनेला भयानें अक्रांत करून टाकी.

कर्ण, बकासुराचा भाऊ अलायुधासुर या दोघांशींही घटोत्कचानें झुंज घेतली. अलायुधाशीं प्राणांतिक युद्ध करून तर घटोत्कचाने त्याचा वधही केला. कर्णालाही क्षणभर त्यानें भ्रामिताचित्त करून टाकलें.

तेव्हां मग कौरव भयानें विवर्ण होऊन कर्णाला म्हणाले,

" कर्णा, आतां तूंच या राक्षसभयापासून आमची मुक्तता करूं शकतोस ! "

" मीच ? "

" होय ! सूर्यानें तुला दिलेली अमोघ वासवीशक्ति—ती आठव ! तूं आतांपर्यंत ती अर्जुनवधासाठीं जपून ठेवली आहेस खरी, पण आजच्या या प्रलयांतून वांचलों तर अर्जुनाचें पुढें बघून घेऊं. कर्णा, कर एवढें आमच्यासाठीं—"

घटोत्कचाची माया तर उत्तररात्रीं अधिकाधिक उग्र रूप धारण करूं लागली. शेवटीं निरुपाय होऊन कर्णानें ती दिव्य वासवी शक्ति हातीं घेतली, आणि मोठ्या वेगानें ती घटोत्कचावर सोडली.

घटोत्कचाला तिचा स्पर्श होतांच त्यानें आपला प्राणांत ओळखला. गगन-भेदी आक्रोश करीत आणि अति प्रचंड स्वरूप धारण करून तो मरतां मरतां कौरवसेनेवर कोसळला. मरतांनाही त्यानें आपल्या विशालकाय शरिराखालीं असंख्य कौरवसैन्य चिरडून ठार मारलें !

घटोत्कच मरण पावला. हें पाहून पांडव सेनेंत एकच हाहाःकार उडाला. केवळ एकटा श्रीकृष्णच वारंवार सिंहनाद करीत हंसूं लागला. अर्जुन अत्यंत आश्चर्यानें म्हणाला,

" श्रीहरि ! काय हें ! अरे ही आनंदाची का वेळ आहे ? "

" निःसंशयच ! मला फारच संतोष होत आहे ! "

" कशामुळें ? "

" घटोत्कचाच्या मरणामुळें."

" श्रीकृष्णा, तूं मला अधिकच गोंधळांत टाकीत आहेस—"

" ऐक अर्जुना, घटोत्कचानें मरणाचें स्वागत करून तुला निर्भय केलें आहे ! "

" मला ? कशापासून ? "

" कर्णाच्या वासवी शक्तीपासून ! अरे, त्यानें केवळ तुझ्यावर उपयोग करतां यावा, म्हणूनच ती अमोघ शक्ति आजपर्यंत जपून ठेवली होती. आतां त्या शक्तीचा क्षय होऊन कर्ण तुझ्यापुढें कःपदार्थ झाला आहे ! "

घटोत्कचाच्या वधामुळें उभय सैन्यें जणूं निष्प्रभ झालीं. कौरवसेनेचा अपरंपार नाश झाला होता, तर पांडवसेना एका महावीराला गमावून बसली होती. तेव्हां मग अर्जुनाच्या आज्ञेवरून पांडवसेनेनें शस्त्र चालविणें थांबविलें. कौरवसेनेनेंही तिचेंच अनुकरण केलें.

## द्रोणवध—

दुसरे दिवशीं सकाळीं युद्ध सुरू होतांच द्रोणांनीं विराट आणि द्रुपद या दोघांना ठार मारून पांडवांच्या क्रोधाग्नीत आणखी एक आहुती टाकली !

हें वृत्त कानीं पडतांच धृष्टद्युम्न खादिरांगारासारखा पेटला. दुःख आणि संतापाचीं आंसवें वाहवीत कटकटा दांत खात तो ओरडला,

" आज जर द्रोण माझ्या हातून जिवन्त सुटला, तर माझें पुण्य नष्ट होऊन मला चिरकाल नरक भोगावा लागो ! "

पुनः एकदां रणधुमाळी पेटली. अत्यंत निकरावर येऊन उभय पक्षीय वीर झुंजूं लागले. पण द्रोणांपुढें उभें राहणें कोणालाच शक्य होईना ! अर्जुन आपल्या पूज्य गुरुंवर मनापासून बाण सोडीना. युधिष्ठिर निराशेनें म्हणाला,

" महान् शस्त्रवेत्त्या द्रोणांकडून आम्हा सर्वांचा संहार होणार आहे काय ? "

श्रीकृष्ण म्हणाला,

" हातीं शस्त्र घेऊन उभा असतां या वृद्धाचा पराभव करणें कोणालाच शक्य नाहीं. याच्या वधाचा एकच उपाय आहे. "

" कोणता ? "

" याच्याकडून शस्त्रत्याग करवून मग याला मारावें ! "

" हें अशक्य शक्य कसें होईल ! "

" अश्वत्थाम्याच्या मृत्यूचें वृत्त याच्या कानीं पडलें तर– "

सिंहनाद करून भीम उसळला. आपल्याच सेनेंतील मालवाधिपतीच्या अश्वत्थामानामक गजाला त्यानें ठार मारलें, आणि द्रोणांजवळ जाऊन तो म्हणाला,

" आचार्य, अश्वत्थाम्याचा वध झाला ? "

वृद्ध द्रोणांचें हृदय त्या वार्तेनें शतशः विदीर्ण झालें. पण त्या वृत्ताची सत्यासत्यता पडताळून पाहण्यासाठीं त्यांनीं आपला रथ युधिष्ठिराच्या रथाजवळ नेऊन त्याला विचारलें,

" पुत्रा, मीं ऐकलें तें खरें काय ? "

द्रोणांचा तो व्याकुळ प्रश्न ऐकून युधिष्ठिराचें मन चलबिचल झालें. वस्तुस्थिति काय ती तो द्रोणांना सांगून टाकणार, तों त्याच्या मागें असलेल्या श्रीकृष्णानें त्याला म्हटलें,

" राजा, आतां तुला सत्यवादित्वाची खोळही कांहीं क्षणांसाठीं अंगावरून उतरून ठेविली पाहिजे ! नाहींतर सत्पक्षाचा नाश झालाच म्हणून समज ! "

निरुपाय होऊन युधिष्ठिर द्रोणांकडे वळून म्हणाला,

" होय आचार्य ! अश्वत्थामा मारला गेला, हें खरें आहे–

नंतर तो हळूंच म्हणाला,

" पण तो हत्ती होता ! "

परंतु त्याचे हे नंतर उच्चारलेले शब्द असह्य गोंगाटापुढें द्रोणांच्या कानीं पडलेच नाहींत. विमनस्क होऊन त्यांनीं शस्त्रें खालीं ठेवून दिलीं !

विजेच्या वेगानें धृष्टद्युम्न पुढें झाला. त्यानें द्रोणांच्या रथावर चढून त्यांचे पिकलेले केस एका हातानें धरले आणि खड्गानें त्यांचा शिरच्छेद करून त्यांचें मस्तक कौरवसेनेच्या समोर फेंकून दिलें !

" हें त्याचें भयंकर कृत्य पाहून दोन्ही सैन्यें भयानें विस्मित झालीं. भीमानें मात्र धृष्टद्युम्नाला आलिंगन देत म्हटलें,

" धन्य धृष्टद्युम्ना ! तूं धन्य आहेस ! "

पण इतर पाडवांनीं व त्यांच्याकडील वीरांनीं धृष्टद्युम्नाच्या या कृत्याची निंदा करीत म्हटलें,

" धृष्टद्युम्ना, तूं आपल्या आचार्यांचा अधर्मानें वध केला आहेस. हें पुण्यकृत्य खचितच नव्हे ! "

शोकानें विव्हळ झालेल्या अश्वत्थाम्यानें विचार न करतां नारायणास्त्र अभिमंत्रून तें पांडवसेनेवर सोडलें. भीम त्याचा प्रतिकार करण्यासाठीं पुढें निघाला, पण श्रीकृष्णानें त्याला रथांतून ओढून त्याच्याकडून इतरांप्रमाणेंच शस्त्रत्याग करविला.

सर्व पांडवसेना शस्त्रविहीत होऊन हात जोडून उभी राहिली. तेव्हां नारायणास्त्रही सहजच उपशम पावलें !

## कर्णपर्व—

उदास दुर्योधन रात्रीं वीरांच्या सभेंत म्हणाला,

" जणूं काय माझें सुकृतच संपावें, तसे आज आचार्य द्रोण निजधामास गेले आहेत. आतां आम्हीं काय करावें ? "

अश्वत्थामा तीव्र स्वरांत म्हणाला,

" दुर्योधना, तूं फार लवकर निराश झाला आहेस. अरे, क्षत्रियानें मरेपर्यंत झुंजावें. आतां एखाद्या महारथ्यास सेनापतित्वाचा अभिषेक करून तूं पुनः युद्ध सुरू कर. "

" मित्रा सेनापतित्वाचा भार मीं कोणावर सोंपवावा ? "

" महारथी कर्णावर. नाना अस्त्रांनीं आणि शस्त्रांनीं संपन्न असा कर्ण तुझ्या या अपार सेनेला शोभेसा सेनापति आहे. "

मोठ्या संतुष्ट मनानें दुर्योधन कर्णाकडे जाऊन म्हणाला,

" मित्रा, मी तुझ्याकडे एक मागणें मागणार आहे. "

" आणि मी तुला तें देणार आहें. "

" ऐक तर. भीष्म आणि द्रोण हे दोघेही सेनापति वृद्ध होते. दोघांच्याही मनांत आमच्या शत्रुविषयीं स्नेहभाव होता. एकाचे नातू तर एकाचे शिष्य अशा नाजूक बंधनांनीं पांडव त्या दोघांशीं बांधले गेले असल्यामुळें त्यांच्याकडून पांडवांचा वध घडूं शकला नाहीं. तेव्हां–"

" तुझें म्हणणें काय आहे ? "

" तूं सेनापति होऊन–"

" ऐक दुर्योधना. पांडववधाची तुझी कामना मी पुरी करीन. एवढेंच ना ? "

" होय मित्रा ! "

दुर्योधनानें कर्णास आलिंगन देऊन त्याला सेनापतिपदाचा अभिषेक केला. कौरवपक्षीय वीर या घटनेनें अत्यंत संतुष्ट होऊन भुजा थोपटूं लागले. दुर्योधनानें तर जणूं त्याचा जयच झाला असें मानलें.

कर्णानें एक दुर्भेद्यव्यूह रचून त्यांत सेनेची मांडणी केली. युद्ध सुरू झालें. त्या दिवशीं पहिल्या सपाट्यासच गजारूढ होऊन आव्हान देत पुढें आलेल्या क्षेमधूर्तीचा भीमानें वध केला. लगेच पाठोपाठ सात्यकीनें विन्द आणि अनुविन्द या दोघा भावांस परलोकीं धाडलें. चित्र आणि चित्रसेन हे दोघेही धारातीर्थी पडले.

अर्जुन आणि कर्ण हे दोघे एकदां समोरासमोर उभे ठाकले. पण अर्जुनानें कर्णाचा पराभव करून त्याला पळवून लावलें. सायंकाळीं जेव्हां कौरव आपल्या शिबिराकडे परतले, तेव्हां आपल्या सेनेची अतिशय हानि झाली असल्याचें त्यांना आढळून आलें.

रात्रीं दुर्योधन कर्णास म्हणाला,

" मित्रा, हें कसें ? "

कर्ण उसळून म्हणाला,

" तो श्रीकृष्ण ! त्याच्यामुळेंच हें घडतें आहे ! "

" म्हणजे काय ? "

" ऐक राजा. अस्त्र आणि शस्त्रविद्या, पराक्रम, साहस, धैर्य आदि गुणांत अर्जुन माझी बरोबरी कधींच करूं शकणार नाहीं. या सर्व बाबतींत मी त्याच्यापेक्षां खचितच श्रेष्ठ आहें. पण-- "

" पण काय ? "

" त्याच्यासारखा सारथी– "

" मी माझा सारथी तुला देऊं काय ? "

" मित्रा, श्रीकृष्णाशीं सारथ्य कर्मांत स्पर्धा करूं शकेल, असा एकच पुरुषोत्तम मला माहीत आहे. "

" कोण ? "

" मद्रराज शल्य ! जर त्यानें माझें सारथ्य स्वीकारलें, तर आज अर्जुनाचा वध झाला असेंच समज. "

" मित्रा कर्णा, तुझ्यासाठीं मी हेंही करीन."

नंतर दुर्योधन त्वरेनें शल्याकडे गेला. त्याच्या शिबिरांत गेल्यावर आसनस्थ होऊन दुर्योधन मोठ्या आदरानें त्याला म्हणाला.

" मद्रराजा, आज मी तुझ्याकडे एका विशिष्ट हेतूनें आलों आहें. "

" सांग. दुर्योधना, मी तुझें काय प्रिय करूं ? मी आज अर्जुनाशीं झुंज घेऊं काय ? युधिष्ठिराला बांधून आणूं काय ? भीमाशीं गदायुद्ध करूं काय ! "

" पराक्रमी नृपाळा, तूं माझ्यासाठीं एवढें खचितच करशील. पण माझें मागणें अगदीं वेगळें आहे. "

" काय ? "

" तूं कर्णाचें सारथ्य करावेंस ! "

संतापून शल्य म्हणाला,

" दुर्योधना, तूं मला सूताची सेवा करायला सांगत आहेस–"

" ऐक राजा– "

" काय ऐकूं ! तूं मला आज कोणत्याही वीराशीं युद्ध करायला सांगून घरीं परतायची अनुज्ञा दे. मी परत जाईन ! तूं मला त्या सूतपुत्रापेक्षां उणा समजलास काय ? अरे, युद्धांत माझी बरोबरी प्रत्यक्ष श्रीकृष्णही करूं शकणार नाहीं–"

" राजा, तें मला माहीत आहे ! "

" मग ? "

" आणि हेंही माहीत आहे, कीं केवळ युद्धांतच नव्हे, तर अश्वपरीक्षेंतही तो तुझी बरोबरी करूं शकणार नाहीं ! "

" हें मात्र खरें ! "

" होय मद्राधीशा ! तूं ज्याचा सारथी आहेस, त्याचा पराभव करण्याचें सामर्थ्य त्रिभुवनांत कोणांतही नाहीं. म्हणूनच तर मी तुला ही प्रार्थना करीत आहें ! "

" असेंच असेल, तर तुझें म्हणणें मी मान्य करीन. मात्र एका अटीवर. "

" कोणती ? "

" मी जें जें बोलेन, तें तें कर्णानें सहन केलें पाहिजे. "

" तसेंच होईल. "

संतुष्ट मनानें दुर्योधनानें आपल्या शिबिरांत परतून कर्णाला हें वृत्त निवेदिलें. प्रातःकाळीं सैन्य युद्धास सज्ज झाल्यावर पुनः दुर्योधनानें शल्याची प्रार्थना केली. तो ती मान्य करून रथ हांकावयास बसला, आणि कर्णाला बोलला,

" ये कर्णा. रथारूढ हो. "

दुर्योधनानें वारंवार कर्णाची प्रशंसा करीत म्हटलें,

" सेनापते, आतां तूं पांडवांचा वध निश्चित करूं शकशील ! "

" होय ! आतां अर्जुन, भीम आणि युधिष्ठिर जिवंत नाहींत, असेंच समज ! "

शल्याला तें अहंकारयुक्त प्रौढीचें बोलणें आवडलें नाहीं. तो म्हणाला,

" कर्णा, जेव्हां अर्जुनाच्या नवनिशित बाणांशीं गांठ पडेल, तेव्हां कदाचित् तुझ्याच्यानें हें बोलणें कांहीं बोलवणार नाहीं. "

कर्ण संतापून शल्याकडे पाहात म्हणाला,

" शल्या, तूं रथ नीट हांक ! "

रथ उभय सैन्यांच्या मध्यभागीं जाऊन उभा ठाकल्यावर कौरववीरांनीं केलेल्या प्रशंसेमुळें गौरवान्वित होऊन कर्ण मोठ्यानें घोषणा करीत बोलला,

" वीर हो ! तुम्ही चिंता करूं नका. आज अर्जुनच काय, पण प्रत्यक्ष इन्द्रदेखील माझ्या बाणांचे आघात सहन करूं शकणार नाहीं. "

उसळून शल्य म्हणाला,

" पुरे रे ! काय करायचें तें करून दाखव. कुठें अर्जुन ! कुठें तूं ! आजपर्यंत अनेकदां त्याच्याकडून पराभव पावून तूं पळून परत आला आहेस. "

पुनः कर्णानें जणूं धिःकारच करीत शल्याला म्हटलें,

" शल्या, रथ नीट हांक ! "

मग प्रत्येक पांडवपक्षीय वीराला कर्ण विचारूं लागला,

" तो अर्जुन कुठें आहे ? माझी त्याची भेट घडवून द्याल तर मी तुम्हांला अमित द्रव्य देईन. तो अर्जुन आणि तो कृष्ण कुठें आहेत ? माझ्याजवळ असलेली सर्व संपत्ति घेऊन केवळ तुम्ही, माझी व त्याची गांठ घालून द्या ! "

शल्य हंसून म्हणाला,

" कर्णा, तुझें हें औदार्य अनाठायीं प्रगट करीत आहेस. "

" कां ? "

" अर्जुनाची आणि तुझी गांठ पडेलच. त्यासाठीं एवढें उतावीळ होण्याची कांहीं आवश्यकता नाहीं. पण एक मात्र लक्षांत ठेव, कीं सिंहाची आणि कोल्ह्याची गांठ पडल्यावर कोल्हा जीवंत राहिल्याचें आम्हीं कधीं ऐकलें नाहीं."

" म्हणजे ? "

" म्हणजे तुझा अंतकाळ जवळ आला आहे. "

" शल्या, तूं माझा अपमान करीत आहेस ! "

" या एकाच अटीवर मी तुझें सारथ्य करायचें मान्य केलें आहे. "

" मद्रदेशांतील नागरिकांच्या कीर्तिला साजेसेंच तूं वागत आहेस. माद्रांविषयीं आम्ही आजपर्यंत तर कुणाकडूनच कांहीं चांगलें ऐकलें नाहीं. तूंही एक सामान्य माद्रच काय तो आहेस. सरळ रथ हांक म्हणजे झालें. "

" अरे दुर्बुद्धे ! ऐक. मी तुझें सारथ्य स्वीकारलें, तेव्हां तुझें हिताहित तुला नीट समजावून सांगणें हें मी माझें कर्तव्य मानतों. आतां एक कथा ऐक."

" तुला काय बडबडायचें तें बडबड."

" समुद्रतीरीं एक वैश्य राहात असे. तो चांगला संपन्न असून परोपरीचे ाग करीत असे. त्याच्या घराशेजारीं असलेल्या झाडावर एक कावळा राही. श्यपुत्राचें उच्छिष्ट खाऊन तो चांगलाच माजला. सर्व श्रेष्ठकनिष्ठ पक्ष्यांना ो नाहीं नाहीं तें बोलत असे.

" एकदां कांहीं हंस त्या झाडावर येऊन बसले. वैश्यपुत्र सहज थट्टेनें त्या ावळ्यास बोलले,

' मित्रा, आम्हांला तर या हंसापेक्षां तूंच अधिक श्रेष्ठ दिसतोस ! '

त्या स्तुतीनें फुगून जाऊन तो मूर्ख कावळा हंसाजवळ जाऊन त्यांना म्हणाला,

' हंस हो ! चला, आपण उड्डाणाची स्पर्धा लावूं. '

" आश्चर्यानें हंस म्हणाले,

' तूं ? '

' कां ? मी तुमच्यापेक्षां अधिक श्रेष्ठ आहें. तुम्हाला उड्डाणाच्या किती गती येतात ? '

' आम्हाला एकच गती ठाऊक आहे. '

' अरेरे ! मला ही तुमची स्थिति पाहून अनुकम्पा वाटते ! मला तर उड्डीन, अवडीन, प्रडीन, डीन. संडीन, निडीन तिर्यन्डीन या आणि इतर अशा शंभर गती ठाऊक आहेत ! '

' हंस मनांतल्या मनांत हंसून म्हणाले,

' तूं खचितच आम्हापेक्षां अधिक विद्वान् आहेस. '

' पण हें स्पर्धेंत सिद्ध होऊं द्या. चला ! '

" हंस आणि कावळा आकाशमार्गानें निघाले. कावळा निरनिराळ्या गंमती करूं लागला. हंस मात्र संथपणें एकाच गतीनें त्याच्या मागें चालले. तेव्हां इतर कावळे कावकाव करून ओरडले,

' छे ! हंस कावळ्याची बरोबरी कशी करूं शकेल ? '

" हें ऐकून हंस मग समुद्रावरून झेंपावत पुढें झाले. सोसासोसानें कावळाही त्यांच्या मागें उडत चालला. पण त्याला कुठें लहानसेंही आश्रयस्थान दिसेना ! शेवटीं घाबरून आणि थकून तो वारंवार समुद्रावरच पाय टेकविण्याची धडपड करूं लागला.

" तो पाण्यांत बुडून मरणार, हें पाहून हंस त्याच्या जवळ जाऊन म्हणाले,

' मित्रा, तूं अनेक उड्डाणांचीं नांवें आम्हाला सांगितलींस. पण पंख आणि पायांनीं समुद्रास स्पर्श करण्याच्या या उड्डाण पद्धतीचें नांव काय ? '

" प्राणांत जवळ दिसूं लागलेला कावळा आक्रंदून कसाबसा बोलला,

' हंस हो ! उष्टें खाऊन माजलेला मी ! मूर्खपणानें तुमचा अपमान केला आतां मला तुम्हीच वांचवूं शकतां ! '

" तेव्हां मग दया येऊन त्या हंसांनीं मरणोन्मुख कावळ्याला आपल्या पाठीवर घेऊन तीरावर आणून सोडलें.

" कर्णा, त्या कावळ्यासारखा तूं कौरवांचें उष्टें खाऊन माजला आहेस पण अर्जुनाच्या तीक्ष्ण बाणांनीं तुझ्या देहांत घर केल्यावर मग तुला तुझें वास्तव मूल्य कळून येईल ! "

अशा प्रकारें वाग्बाणांनीं परस्परांना घायाळ करण्याचा प्रयत्न करीत असत कर्ण शल्याला म्हणाला,

" चल, दोन्हीं सैन्यें युद्ध सुरू करीत आहेत ! मुकाट्यानें रथ पांडवसेनेव नेऊन घाल. "

शल्यानें कर्णाचा रथ युधिष्ठिरासमोर उभा केला. त्या दोघांचें प्रकर्षानें यु सुरू झालें. नाना प्रकारचे तीक्ष्ण बाण मारून त्या दोन्हीं वीरांनीं परस्परां पराभूत करण्याचा प्रयत्न केला. पण शेवटीं कर्णानें युधिष्ठिराचें धनुष्य तोडले त्याचा सारथी मारला आणि रथ उध्वस्त केला.

निरुपाय होऊन युधिष्ठिर दुसऱ्या रथांत बसून रण सोडून निघाला. त त्वरेनें धांवत जाऊन कर्ण त्या रथावर चढला. युधिष्ठिराच्या खांद्यावर ह ठेऊन तो उपहास करीत त्याला म्हणाला,

" जा जा ! युधिष्ठिरा, रण सोडून असाच निघून जा. तूं क्षात्रधर्मापेक्षां वादांतच अधिक कुशल आहेस. मात्र इथून पुढें एक कर. माझ्यासारख्या क्षत्रियासमोर युद्धास उभा राहात जाऊं नकोस ! जा, आणि तुझ्या कृष्णार्जुनांना इकडे धाडून त्यांना सांग, कीं कर्णानें मला जीवदान दिलें आहे ! "

कर्णानें युधिष्ठिराला सोडून दिलें, पण तेंच शल्य युधिष्ठिराच्या मनांत कांट्याप्रमाणें सलूं लागलें.

हें पाहून भीम दांत ओंठ खात कर्णावर चालून आला. त्यानें अपूर्व शरवर्षाव करून कर्णाला असें आच्छादून टाकलें, कीं त्याला धड आपल्या भोंवतालीं असलेलें सैन्यही दिसेना ! शेवटीं भीमाच्या एका बाणानें कर्ण मूर्च्छित होऊन रथांत कोसळला, तेव्हां शल्यानें त्वरेनें रथ मागें घेऊन कर्णाला उपचार करविले.

भीमानें आपणावर धावून आलेल्या सहा धार्तराष्ट्रांचा लीलया वध केला. जसा एखादा मत्त मातंग कमळांनीं भरलेल्या तळ्यांत शिरून तें तळें उध्वस्त करीत सुटावा, तसा भीमानें कौरवसेनेचा संहार केला.

अर्जुन संशप्तकाशीं लढण्यांत गुंतला होता. त्याचा नाश करून तो परत फिरला. तों त्याला पांडव सैन्यांत युधिष्ठिराचा ध्वज कुठें फडकता दिसेना. चिंतित होऊन तो श्रीकृष्णास बोलला,

" माधवा, मला माझ्या त्या ज्ञानी भ्रात्याचा ध्वज कुठें दिसत नाहीं. त्याचें कुशल आहेना ? त्वरेनें माझा रथ तो जिथें असेल तिथें घेऊन चल. "

मार्गात भीम युद्ध करीत असलेला दिसला, त्याच्याजवळ अर्जुनानें युधिष्ठिराची चौंकशी केली. भीम म्हणाला,

" कर्णाच्या बाणांनीं विव्हल होऊन तो मागें फिरून शिबिरांत गेला आहे. मला त्याची मोठी चिंता वाटते. "

" तर मग युद्धाचा भार माझ्यावर सोंपवून तूं त्याचा समाचार घेऊन येतोस काय ? "

" नको. तूंच जाऊन त्याचें कुशल विचारून ये."

श्रीकृष्णानें अर्जुनाचा रथ त्वरेनें युधिष्ठिराच्या शिबिराजवळ नेला. युधिष्ठिर व्रणांना उपचार करीत पर्यंकावर पहुडला होता. त्यानें या दोघांस पाहिलें आणि बहुधा अर्जुन कर्णाचा वधच करून आपल्या भेटीस आला असावा, अशा कल्पनेनें त्याला अत्यंत आनंद झाला. उठून बसत तो म्हणाला,

" ये अर्जुना ! मला कडकडून भेट ! "

अर्जुनानें आश्चर्यानें विचारलें,

" कां ? "

" कां ? तूं त्याचा वध करून आलास ही किती संतोषाची गोष्ट आहे ! "

" दादा— "

" नव्हे अर्जुना ! अरे आज त्यानें माझा किती अपमान केला म्हणून सांगूं ? आजचें एक राहूं दे, पण गेलीं तेरा वर्षें मला त्याच्या चिंतेनें सुखाची झोंप मिळाली नाहीं ! "

" तूं कुणाविषयीं हें बोलत आहेस ? "

" तूं ज्याच्या वधाचें वृत्त सांगायला आला आहेस, त्या कर्णाविषयीं ! "

" थांब दादा. मी तुझ्याजवळ कर्णवधाबद्दल आशीर्वाद मागण्यासाठी आलों आहें. "

" म्हणजे तूं अजून त्याला ठार मारलें नाहींस ? "

" नाहीं— "

" केवळ भीमावर युद्धाचा भार टाकून तूं इकडे आला आहेस ? "

" पण दादा— "

पराकाष्ठेचा उद्विग्न होऊन युधिष्ठिर अर्जुनाची निर्भर्त्सना करीत बोलला,

" तर मग व्यर्थ तुझें पौरुष आणि व्यर्थ तुझा पराक्रम ! मी एकटा कर्णाचा वध करीन, अशी द्वैत वनांत मारे फुशारकी सांगितली होतीस, ती मिथ्या होती हें मला आतां कळून आलें. अरे, प्रत्यक्ष श्रीकृष्ण तुझा सारथी ! हनुमान तुझ्या ध्वजस्तंभावर आरूढ झालेला ! असें दैवी साहाय्य

उपलब्ध असूनही तूं कर्ण वध न करतां परतलास ? तर मग तें दिव्य गांडीव धनुष्य कशाला वागविलें आहेस ? देऊन टाक तें दुसऱ्याला ! जो कर्ण वध करूं शकेल, अशा कोणा समर्थाला ! "

गांडीव दुसऱ्याला देऊन टाक, अशी युधिष्ठिराची आज्ञा ऐकतांच पार्थानें क्रोधानें डोळे गरगरा फिरवीत आपलें खड्ग उपसलें. तत्काल त्याचा हात धरून समयज्ञ श्रीकृष्ण म्हणाला,

" अर्जुना, इथें तुझा शत्रु तर कोणीच दिसत नाहीं. मग खड्ग कोणावर उपशीत आहेस ? "

" मुकुंदा, गांडीव दुसऱ्याला देऊन टाक, असें जो कोणी मला सांगेल, त्याचा तत्काल वध करण्याचा मी निश्चय केला आहे. "

तेव्हां त्याची समजूत काढून श्रीकृष्ण म्हणाला,

" अर्जुना, अजून तूं अपरिपक्व बुद्धीमुळें काय वाटेल तें करायला प्रवृत्त होतोस. युधिष्ठिराचा वध करून क्षणभर तरी जगणें तुला शक्य होईल काय ?--

" तर मग या संकटांतून तूं मला मार्ग दाखव."

" उपाय सोपा आहे. श्रेष्ठांचा अपमान केला तर त्यांचा वध झाल्यासारखेंच होतें. तूं युधिष्ठिराचा अपमान कर म्हणजे झालें."

तेव्हां अर्जुन युधिष्ठिराला निंदावचनें ऐकवीत म्हणाला,

" युद्धांतून पळून आलेला तूं माझी अशी निर्भत्सना करतोस ? "

पण त्या ग्लानीनें खिन्न होऊन पुनः अर्जुनानें खड्ग उपसलें, हें पाहून श्रीकृष्ण म्हणाला,

" आतां खड्ग कशासाठी ? "

" ज्येष्ठ भ्रात्याचा अपमान केल्यावर मला प्रायश्चित म्हणून आत्महत्याच केली पाहिजे."

श्रीकृष्ण हसून म्हणाला,

" वेडा आहेस झालें ! "

" कां ? "

" अरे, आत्मस्तुति ही आत्महत्त्येइतकीच दोषास्पद असते."

तेव्हां मग निरुपायानें अर्जुनानें आत्मस्तुति करून युधिष्ठिराला नमस्कार करीत म्हटलें,

" श्रेष्ठा, आतां मी परतेन, तो कर्णवध करूनच. मी या माझ्या संकल्पांत यशस्वी होईन, असा मला आशिर्वाद दे ! "

श्रीकृष्णाचें प्रोत्साहन आणि युधिष्ठिराचा आशिर्वाद, यांनीं उत्साहित होऊन अर्जुन पुनः शंखनाद करीत युद्धभूमीकडे निघाला.

## दुःशासनवध—

इकडे रणभूमीवर युद्धाचा गदारोळ सुरूच होता. उभयपक्षीय वीर एकमेकांचा पराभव करण्यासाठीं शिरकमलें हातावर घेऊन लढत होते. तोंच दुःशासन जणुं मृत्यूनेंच निमंत्रण दिल्याप्रमाणें भीमावर धांवून आला. त्याला पाहतांच गगनभेदी सिंहनाद करीत भीम म्हणाला,

" ये ये ! आज माझी अनेक दिवसांची इच्छा पुरी होत आहे ! "

मग त्या दोन्ही वीरांनीं नानाप्रकारचीं अस्त्रें वापरून एकमेकांचा वध करण्याचा कसोशीचा प्रयत्न चालविला. कधीं भीमाच्या प्रखर बाणांनीं क्षणभर दुःशासन मूर्छित होई, तर कधीं दुःशासनाच्या शरसंभारानें भीमाची शुद्धि हारपे.

शेवटीं दुःशासनानें एका तीक्ष्ण बाणानें भीमाला विध्द केलें. तेव्हां चवताळून भीमानें आपली अमोघ गदा उचलली, आणि रथाखालीं उडी टाकली. त्यानें एका गदाप्रहारानेंच दुःशासनाचें अर्धे बळ ग्रस्त केलें. नंतर गर्जना करीत तो म्हणाला,

" रे कर्णा, दुर्योधना, कृपाचार्य, अश्वत्थामा, आतां दुःशासन माझ्या तावडींतून सुटत नाहीं ! "

त्याला एक हिसडा देऊन भीमानें खालीं पाडलें, आणि त्याच्या छातीवर पाय देऊन आपलें खड्ग उपशीत तो म्हणाला,

" दुरात्म्या, आम्हाला गाय रे गाय म्हणणारा तूंच ना ? द्रौपदीचे केश धरून ओढणारा तूंच ना ? तिच्या वस्त्रास हात घालणारा तूंच ना ? थांब ! आतां मूर्छित न होतां तुला मिळत असलेलें शासन पहा ! "

नंतर उग्र गर्जना करीत भीमानें दुःशासनाचा उजवा हात एका हिसक्यासरशीं उपसून बाहेर काढला. मग त्याचें वक्षःस्थल विदारण करीत तो उग्रकर्मा तेथील ऊन ऊन रक्त पीत म्हणाला,

" माता कुंतीचें स्तन्य, मध, मदिरा, लोणी, अमृत या सर्वांपेक्षां शत्रुरुधिराची रुचि अधिक चविष्ट आहे ! "

नंतर त्याचा कंठनाळ छेदीत भीमानें त्याचें मस्तक कौरवसेनेकडे फेकून दिलें. तें त्याचें रौद्रकृत्य पाहून अनेकांच्या वाचा बसल्या. भीम वारंवार स्मित करीत म्हणाला,

" दुःशासना, शेवटीं मृत्यूच्या साहाय्यानेंच तूं माझ्या या पुष्ट भुजांच्या मगरामिठींतून सुटलास ! एऱ्हवी–"

नंतर तो रणावेशानें नाचत अर्जुनाजवळ गेला आणि म्हणाला,

"अर्जुना, आतां दुसरा यज्ञीय पशु–दुर्योधन ! त्याचें मस्तक मी असेंच विदीर्ण करीन ! "

**कर्णवध—**

इकडे कर्णपुत्र वृषसेन आणि नकुल यांचें युद्ध सुरू असून त्यांत नकुल पराजित होतोसें वाटूं लागलें. तेव्हां अर्जुन वृषसेनावर धांवला. तों कर्णपुत्र नकुलास सोडून अर्जुनावर बाण टाकूं लागला. तेव्हां अर्जुन गर्जना करून म्हणाला,

" कर्णा, मी उपस्थित नसतां तुम्हीं सहा वीरांनीं माझा पुत्र ठार मारलांत ! आतां पहा. तुझ्या समक्ष मी एकटाच तुझ्या पुत्राचा वध करतों. सामर्थ्य असेल तर त्याचा प्राण वांचव ! "

मग त्यानें उग्र मुद्रेनें धनुष्याला एक तीक्ष्ण बाण जोडला, आणि वृषसेनाचें मस्तक आकाशांत उडविलें !

हें कृत्य पाहून कर्ण अत्यंत क्षुब्ध झाला. शल्य त्याला म्हणाला,

" कर्णा, तो बघ अर्जुन ! आतां तुझ्या वीरवृत्तीची शर्थ कर ! "

श्रीकृष्णाचें प्रोत्साहन लाभलेला अर्जुन कर्णापुढें उभा ठाकला, आणि त्या दोघांचें तुमुल युद्ध सुरू झालें. तसलें युद्ध कोणी कधींच पाहिलें नव्हतें. उभय पक्षींचे वीर आपापलीं शस्त्रें हातीं तशीच धरून तें युध्द पाहूं लागले.

दोघेही अस्त्रविद्येंत प्रवीण. दोघेही शरचाप चालविण्यांत कुशल, दोघेही परस्परांचा प्राण हिरावून घेण्याच्या इर्षेनें पेटलेले. अर्जुनानें सोडलेल्या आग्नेयास्त्राचा कर्णानें वारुणास्त्रानें उपसंहार केला. पुनः अर्जुनानें वज्रास्त्र सोडलें, तों कर्णाच्या भार्गवास्त्रानें तें सहजच उपशम पावलें.

अश्वसेन नांवाचा नाग खाण्डवदाह प्रसंगीं अर्जुनाकडून झालेल्या त्याच्या मातेच्या वधाचा प्रतिशोध घेण्यासाठीं कर्णाच्या शस्त्रसंभारांत लपून बसला होता. कर्णानें एक तेजस्वी बाण हातीं घेतांच त्यावर तो आरूढ झाला.

श्रीकृष्णानें हें जाणून तो बाण अर्जुनाकडे येत आहे, असें पाहून आपला भार रथावर घालून अश्वांना वांकविलें. त्यामुळें तो बाण अर्जुनाच्या किरीटास लागून तो भग्न होऊन खालीं पडला मात्र.

अयशस्वी झालेला नाग कर्णाकडे जाऊन त्याला आपलें वृत्त सांगत पुनः दुसऱ्या बाणावर आपली स्थापना करण्याविषयीं त्यास विनवूं लागला. पण कर्ण म्हणाला,

" जा, परत जा ! कर्ण आपल्या वधासाठीं दुसऱ्याचें साहाय्य घेणार नाहीं.

तेव्हां मग चिडून तो नाग आकाशमार्गानें अर्जुनावर झेंप घेऊन निघाला. अर्जुनानें सहा तीक्ष्ण बाणांनीं त्याचा वध केला, आणि पुनः कर्णावर शरप्रहार सुरू केला. त्यामुळें त्याचें कवच छिन्नभिन्न होऊन तो क्षणभर मूर्छित अवस्थेंत रथांत कोसळला.

तोंच एक अद्‌भुत घडलें. कर्णाच्या रथाचें चक्र धरणींत रुतून बसलें ! त्याचा रथ एके ठिकाणीं स्थिर उभा ठाकला.

कर्णानें खालीं उतरून तें चक्र उपसून वर काढायचा प्रयत्न चालविला. अजून अर्जुनाचे बाण आपल्यावर कोसळताहेतच, हें पाहून तो म्हणाला,

" थांब ! अर्जुना क्षणभर थांब. माझें रथचक्र भूमींत रुतून बसलें आहे. तें काढण्याच्या प्रयत्नांत असल्यामुळें मी तूर्त शस्त्र उचलूं शकत नाहीं. तेव्हां धर्मयुद्धाच्या नियमाप्रमाणें तूंही या वेळीं मजवर शरप्रहार करूं नकोस ! "

ही त्याची धर्मबुद्धि पाहून श्रीकृष्ण गदगदा हांसला. तो म्हणाला,

" कर्णा. शेवटी तुलाही धर्माचें स्मरण झालं हं ! पण द्रौपदीची विटंबना करतांना, कपटद्यूत खेळतांना, भीमावर विषप्रयोग करतांना, लाक्षागृहदाहाचे वेळीं, बालवीर अभिमन्यूचा सहा महारथी मिळून वध करतांना – या सर्व प्रसंगींच नेमकें धर्माचें तुम्हांला विस्मरण झालें ना ! पण आतां धर्माची ढाल तुझ्या उपयोगी पडणार नाहीं.

" अर्जुना, हीच वेळ आहे. धर्माधर्माचा विवेक सावकाश करतां येईल. तूं कर्णाचा निःशंक मनानें वध कर ! "

अर्जुनानें अधिक वेगानें कर्णावर शरप्रहार सुरू ठेवला. कर्णाला झांजावल्या-सारखें झालें. त्यानें परशुरामानें दिलेलें अस्त्र आठविण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्याचा अंतकाळ समोर उभा राहिल्यामुळें त्याची बुद्धि भ्रष्ट झाली. तिच्याभोंवती अंधःकाराचे पाश पडले. हळूं हळूं ते अधिकाधिक घट्ट होऊं लागले.

त्यानें अर्जुनावर शरवर्षाव करण्याचा वृथाच प्रयत्न चालविला. पण त्याचें बलही त्याला सोडून चाललें.

तोंच अर्जुनानें कर्णाचा ध्वज खालीं पाडला, आणि एक परम तेजस्वी आंजलिक बाण काढून धनुष्यास जोडला. नंतर तो म्हणाला,

" मी जर एकान्त मनानें गुरुसेवा केली असेल, तर हा माझा बाण आपलें कार्य सफल करो ! "

अर्जुनाच्या गांडीव धनुष्यावरून महाध्वनि उत्पन्न करीत तो बाण सुटला, आणि त्यानें कर्णाचें मस्तक आकाशांत उडविलें ! तत्क्षणीं कर्णाचें चेतनाहीन शरीर खालीं कोसळून पडलें !

शल्य मोकळा रथ घेऊन दुर्योधनाकडे गेला, आणि म्हणाला,

" राजा, कर्ण धारातीर्थी पतन पावला आहे ! "

हें वृत्त ऐकतांच दुर्योधन मूर्छित होऊन खालीं कोसळला.

## शल्यवध —

युद्धाचा अंत जवळ दिसूं लागला. कौरवसेना दशादिशांना पळूं लागली. सावध झालेल्या दुर्योधनानें हें पाहिलें, तेव्हां तो उच्च स्वरानें म्हणाला,

" वीर हो ! पळून जातां ? कुठें पळाल ? लक्षांत ठेवा, आतां जरी तुम्ही पाताळांतही दडलां, तरी कृष्णार्जुन तुम्हांला शोधून काढून ठार मारतील. मग पळण्यापेक्षां रणांत प्राप्त झालेला मृत्यूच कां स्वीकारीत नाहीं ? "

सैन्यांतले रथी थांबून म्हणाले,

" राजा, सेनापतीच्या अस्तित्वावांचून आम्हीं युद्ध कसें करावें ? "

दुर्योधन बोलला,

" एवढेंच ना ? ठीक आहे. आतां मद्रराज शल्य तुमचा सेनापति होईल."

रात्रीं दुर्योधनानें शल्याची सेनापतिपदाच्या ग्रहणाविषयीं प्रार्थना केली. शल्यानें त्याचा स्वीकार केला. दुसरे दिवशीं उरलेल्या सेनेचा व्यूह रचून शल्य तिच्या अग्रभागीं उभा ठाकला, तेव्हां श्रीकृष्ण युधिष्ठिरास म्हणाला,

" राजा, आजचा सेनापति हा तुझा भाग आहे. "

" पण तो तर आमचा मामा आहे ! "

" युधिष्ठिरा, युद्धांत एकमेकांचे प्राण हरण करण्यासाठीं उभे ठाकलेल्या वीरांनीं आप्तसंबंधाचे हे विचार करावयाचे नसतात. रणांत समोर आलेल्या वीराचा वध करणें, एवढेंच क्षत्रियाचें कर्तव्य असतें. तेव्हां हा विचार बाजूला ठेवून तूर्त तूं शल्याच्या वधाचा विचार कर. "

" जशी तुझी आज्ञा. "

रणधुमाळी सुरू झाली. भीमाला तर जणुं काय रणावेश चढला होता. धार्तराष्ट्रांना शोधून काढून ठार मारणें, हा त्याचा आवडता छंद होता. त्याप्रमाणें त्यानें कौरव वेंचून ठार मारण्याचा सपाटा चालविला.

मद्रराज शल्याशीं युधिष्ठिरानें झुंज सुरू केली. कांहीं काळ एकमेकांनीं परस्परांना बाणांनीं विद्ध केल्यावर शेवटीं युधिष्ठिरानें शल्यावर एक अमोघ शक्ति सोडली. शल्याचा मस्तकभेद करून ती पाताळांत शिरली.

म्लेंछाधिपति शाल्व एका महान् गजावर आरूढ होऊन पांडव सेनेंत शिरला. तो गज आपल्या पायांनीं आणि सोंडेनें असंख्य पदातींचा नाश करूं लागला. कोणालाही तो आटोपेना. शेवटीं धृष्टद्युम्न गदा उचलून त्याच्यावर धांवला. त्यानें एकाच गदाघातानें त्या मत्त मातंगाचा शिरोभेद करून शाल्वाचाही एका बाणानें बळी घेतला.

भीमाचें धार्तराष्ट्र हनन सुरूच होतें. त्यानें एका दमांतच अकरा धार्तराष्ट्रांना धराशायी केलें. तोंच सहदेवाला शकुनि दिसला. त्याला हांक घालीत सहदेव म्हणाला,

" थांब ! दुर्बुद्धे ! तुझ्या त्या आवडत्या विषवृक्षाचीं फळें आतांपर्यंत या सर्व मृत वीरांना चाखावीं लागलीं आहेत. आतां तूंही माझ्या हातून जिवंत सुटूं शकत नाहीस ! थांब ! "

शकुनीशीं झुंज घेऊन सहदेवानें एका तीक्ष्ण बाणानें त्याचें मस्तक उडविलें. हें पाहातांच कौरवसैन्यांत एकच हाहाःकार उडाला.

## दुर्योधनपलायन—

दुर्योधनानें कौरवसेनेचा हा भयंकर नाश आपल्या डोळ्यांनीं पाहिला. त्या सेनेला कोणीच वाली उरला नाहीं, असें जेव्हां त्याच्या ध्यानीं आलें, तेव्हां त्यानें समरांगणाचा त्याग करण्याचें ठरविलें. कौरवसेनेला रणांत मरून स्वर्गप्राप्ति करण्यास सांगणारी त्याची बुद्धि भ्रमित झाली. चहूं दिशांस त्याला अंधःकार दिसूं लागला, आणि एका दुर्दैवी क्षणीं केवळ आपली गदा घेऊन अठरा अक्षौहिणी सेनेचा तो स्वामी पायींच पूर्व दिशेस पळत सुटला !

पूर्वेस एक विस्तीर्ण जलाशय असून त्याचे मध्यभागीं एक लहानसें द्वीप होतें. जलाशयाजवळ पोंचून दुर्योधनानें जलांत प्रवेश केला. त्या मधल्या द्वीपावर ज्या वेळीं तो जाऊन विसांवला त्या वेळीं धरणीवर अंग टाकण्यापलिकडे त्याच्याच्यानें दुसरें कांहींही करवेना ! त्याचा देह आणि बुद्धि यांना पराकाष्ठेचें वैकल्य आलें होतें.

कौरवसेनेंत केवळ अश्वत्थामा, कृपाचार्य आणि कृतवर्मा हे तीनच्च वीर काय ते अवशिष्ट राहिले होते. दुर्योधन दिसेनासा झाला, तेव्हां शोध घेत ते रणांतून बाहेर पडले. धृष्टद्युम्न, अर्जुन, सात्यकि आणि भीम यांनीं शेष कौरवसेनेचें संपूर्ण निर्दाळण करून टाकलें. युद्धांत काय घडलें तें सांगण्यासही कोणी वीर जिवंत राहिला नाहीं !

हे तिघे दुर्योधनाचा तपास करीत निघाले असतां त्यांना त्या जलाशयाचा शोध लागला. तेव्हां त्याच्या कांठावर जाऊन ते उभे राहिले. अश्वत्थामा उच्च स्वरानें म्हणाला,

" राजा दुर्योधना, ऊठ. आम्ही आलों आहोंत."

दुर्योधनानें त्यांना कसेंबसें म्हटलें,

" माझ्या अठरा अक्षौहिणी सैन्यांतून केवळ तुम्ही तिघेच वांचलांत ? "

" होय राजा. पण पांडवसेनेचा नाश करायला आम्ही तिघेच समर्थ आहोंत. केवळ तूंच आम्हांबरोबर अस म्हणजे झालें."

" नाहीं."

" कां नाहीं ? "

" आज मी अत्यंत शिणलों आहें. आजच्याच दिवस मला विश्रांति घेऊं द्या. तुम्हीही आज कुठें तरी विसांवा घ्या. मग उद्यां—"

हें या वीरांचें भाषण त्या जलाशयावर पाणी पिण्यास आलेल्या कांहीं व्याधांनीं ऐकलें तें प्रतिदिनीं भीमास लागणारें मांस त्याला नेऊन देत असत. ते आनंदित होऊन म्हणाले,

" हा तर राजा दुर्योधन ! "

" होय – लपून बसला आहे."

" तर मग भीममहाराज याला शोधीत असतील--"

" अर्थात्‌च--"

" तर मग आपण धांवत जाऊन त्यांना हें वृत्त सांगूं ! "

" वा वा ! विपुल धन मिळविण्याचा हा उपाय अनायासेच सांपडला ! "

ते व्याध पांडवसेनेकडे निघाले.

तिकडे पांडव दुर्योधनाचाच शोध करीत होते. तो दिसेनासा झाल्यामुळें युधिष्टिर चिंताक्रांत झाला होता. तोंच हे व्याध पांडवांच्या शिबिरांत पोंचून आनंदानें म्हणाले,

" महाराज, ज्याचा आपण शोध करीत आहांत– "

" होय– "

" तो दुर्योधन–"

" कुठें आहे ? "

" पूर्व दिशेस असलेल्या जलाशयांत लपून राहिला आहे ! "

त्या व्याधांना अमित द्रव्य देऊन पांडव श्रीकृष्णासह अवशिष्ट सेनेला घेऊन आनंदानें गदारोळ करीत जलाशयाकडे निघाले. त्यांच्या वाटचालीनें उडणारी धूळ दृष्टीस पडून कृपाचार्य म्हणाले,

" बहुधा पांडवांना दुर्योधनाचा शोध लागलेला दिसतो ! "

" तर मग राजा, आम्ही तिघे उद्यांपर्यंत कुठें तरी विसांवतों."

दुर्योधन म्हणाला,

" होय. ते मला शोधून काढूं शकणार नाहींत. तुम्ही जा."

कृप, कृतवर्मा आणि अश्वत्थामा हे तिघे जण जलाशयापासून निघून गेले. थोड्याच वेळांत युद्धेच्छु पांडव तिथें येऊन पोंचले. दुर्योधनाची विसांव्याची जागा पाहून युधिष्ठिर श्रीकृष्णास म्हणाला,

" मुकुन्दा, हा पापी जलाशयाच्या आश्रयानें आम्हांपासून लपूं पहात आहे– "

" युधिष्ठिरा, आजपर्यंत हा तुमच्याशीं कपटानें वागत आला आहे. तेव्हां कपटानेंच याचा वध करण्यांत तुला कांहीं दोष लागणार नाहीं. आतां विलंब लावूं नकोस."

तेव्हां मग युधिष्ठिर जलशायीं दुर्योधनास उच्चरवानें म्हणाला,

" दुर्योधना, युद्ध टाकून तूं इथें काय करीत आहेस ? "

" मी विश्रान्ति घेत आहें."

" कां ? "

" युद्ध करून मी फार थकलों आहे."

" तूं एकटाच ? अरे, युद्ध तर आम्हींही केलें आहे. चल युद्धास सिद्ध हो."

" आज नाहीं."

" मग ? "

" उद्यां ! आजचा दिवस तुम्हींही विसांवा घ्या. उद्या प्रक्रास्तिथ होऊन आपण युद्धाचा काय तो निर्णय लावूं."

" दुर्योधना, अरे हें वीराला शोभत नाहीं ! "

" काय ? "

" असें पळून जाणें."

" मी पळून गेलों नाहीं. केवळ विश्रांति घेत आहें."

" अरे, पण तुझ्या पक्षानें लढलेल्या कोण्याच वीरानें अशी विश्रान्ति घेतली नाहीं. युद्धांत धराशायी झालेले ते सर्व योद्धे प्राण पणास लावून लढत होते. तूं ज्या अर्थीं विश्रांतीच्या गोष्टी करीत आहेस, त्या अर्थीं तूं कुरुकुलाचें दूषणच आहेस ! शौर्याच्या गोष्टी तुझ्या तोंडून ऐकल्या त्या केवळ वल्गनाच होत्या ! "

" या तुझ्या भाषणाचें उत्तर मी उद्यां रणांत शस्त्राघातानें देईन. "

" उद्यां ? नव्हे. आजच. युद्धाचा निर्णय आजच लागूं दे. तूं ज्या अर्थी हट्टाला पेटून एवढा संहार करविला आहेस–"

" होय युधिष्ठिरा ! माझ्यासाठीं युद्ध केलेले ते सर्व वीर रणांत धराशायी झाले आहेत ! "

" तुलाही तीच गति इष्ट आहे ! "

युधिष्ठिराच्या त्या मर्मस्पर्शी वाक्याकडे दुर्लक्ष करून उदास दुर्योधन म्हणाला,

" ज्यांच्यासाठीं मीं राज्यसुखाची इच्छा केली, ते वीर आतां या लोकांत दिसणार नाहींत. मग मी राज्य घेऊन तरी काय करूं ? युधिष्ठिरा, तूं असेंच कर. "

" काय ? "

" या वैराण पृथ्वीचा तूं सम्राट् हो ! "

" आणि तूं ? "

" मी ? मी मृगाजिन परिधान करून वनांत जाईन. या पृथ्वीचा तूं सुखेनैव उपभोग घे. माझ्या मनांत कोणाही विषयीं यत्किंचित्‌ही किल्मिष राहिलें नाहीं. "

" येवढें औदार्य हं ? "

" होय युधिष्ठिरा–"

" अरे, पण ही जी पृथ्वी तूं मोठ्या उदार मनानें मला दान करीत आहेस ती कुणाची ? तुझी तर निश्चितच नव्हे ! आणि आतांच तुझ्या अंगीं एवढें औदार्य संचरलें ना ? आम्हीं मागत होतों, तेव्हां तर सुईच्या अग्रावर राहील, एवढीही भूमि तूं आम्हाला नाकारली होतीस ! दुर्योधना, हें होणार नाहीं– मुळींच नाहीं ! "

" युधिष्ठिरा–"

" आतां तुझें कल्याण होईल, असा एकच उपाय मला दिसतो. "

" एकच ? कोणता ? "

" युद्ध ! तेंही या क्षणीं ! चल ! भीरूसारखा लपून बसूं नकोस. बाहेर ये ! "

क्षुब्ध होऊन दुर्योधन म्हणाला,

" अरे, पण मी एकटा, रथविहीन, कवचहीन, श्रान्त – तुम्ही तर पुष्कळ अहांत ! तुम्हीं अनेकांनीं मज एकस्याशीं युद्ध करणें धर्म्य होणार नाहीं. "

" वा वा ! तूंही धर्मावर प्रवचनें करूं लागलास ना ? अभिमन्यु-वधाच्या वेळींच नेमकें तुम्हांला धर्माचें विस्मरण झालें होतें ! असूं दे. चल, बाहेर ये. आम्हांपैकीं कोणीही एकटाच तुझ्याशीं युद्ध करील – तूं म्हणशील तें आयुध घेऊन. "

" तर मग गदायुद्ध–"

" होय, गदायुद्ध. "

तेव्हां मग फूत्कार टाकणाऱ्या क्रुद्ध नागाप्रमाणें खवळून दुर्योधन आपली गदा घेऊन पाण्याबाहेर येऊन उभा राहिला. त्याच्या अंगावरून पाणी निथळत होतें. त्याला पाहून पांडव वीर गदगदा हंसत एकमेकांच्या हातावर हात मारूं लागले.

दुर्योधन संतापून म्हणाला,

" लक्षांत ठेवा, मला हंसत अहांत खरे – "

" बरें मग "

" तुम्हाला याचें फळ माझ्या हातून लवकरच मिळेल ! "

युधिष्ठिर म्हणाला,

" दुर्योधना, काय तो निर्णय आतां लवकरच लागेल. एवढा उतावळा कां होतोस ?

" आपलें कवच धारण कर. कैंस नीट पुसून बांध. आणखी एक गोष्ट तुझ्या इच्छेप्रमाणें होऊं दे. "

" काय ? "

" तूंच आम्हांपैकीं कुणाशीं युद्ध करायचें तें ठरव. हें युद्ध निर्णायक ठरेल. जो यांत विजयी होईल, तोच पृथ्वीचें राज्य उपभोगील ! "

हें युधिष्ठिराचें युक्तिशून्य भाषण ऐकून श्रीकृष्णास राग आला. तो रुष्ट स्वरांत युधिष्ठिरास म्हणाला,

" युधिष्ठिरा, तूं दयेनें पुनः मोहास बळी पडला आहेस. दुर्योधन ही काय वस्तु आहे, हें तुला माहीत आहे काय ? "

" माधवा – "

" ऐक ! गेलीं तेरा वर्षे भीमाचा पोलादी पुतळा करून हा सतत त्याशीं गदायुद्ध करीत आहे. भीम बलवान् तर खराच, पण त्याच्याजवळ याच्यासारखा अभ्यास नाहीं. धर्मयुक्त गदायुद्ध केलें, तर हा भीमालाही जिंकूं शकेल, तिथें तुमची काय कथा ! अशा दुर्योधनापुढें पुनः तूं पूर्वीच्याच भोळेपणानें काय मनास येईल तो पण मांडून उभा राहिला आहेस ! मला वाटतें कीं, पांडवांच्या नशिबीं सतत दुःखच भोगणें लिहिलें आहे. "

भीम श्रीकृष्णाला शांत करीत म्हणाला,

" गोविंदा, तूं चिंता करूं नकोस. मी दुर्योधनाचा खचितच वध करीन."

भीम आपली गदा पेलीत दुर्योधनासमोर उभा ठाकला, त्याच्याकडे पाहून दुर्योधन म्हणाला,

" ठीक आहे. भीमाशींच युद्ध होऊं दे."

" होईल रे होईल ! तुलाच युद्धांत ठार मारून मी द्रौपदीच्या अपमानाचा सूड घेईन. "

" काय तें कृतीनें करून दाखव कीं ! वल्गना कशाला ? "

" वल्गना आजपर्यंत तूंच केल्या आहेस ! "

नंतर गदायुद्धासाठीं समतल अशी सरोवराकांठची भूमि पाहून तिथें ते दोघे वीर उभे ठाकले. पांडव पक्षीय वीर त्या स्थलाभोंवतीं रिंगण करून बसले. भीम व दुर्योधन वारंवार दंड थोपटून आपलीं पुष्ट मनगटें पिळूं लागले.

तोंच त्या ठिकाणीं बलराम उपस्थित झाला. पांडव व श्रीकृष्ण यांनीं मोठ्या आदरानें त्यांचें स्वागत केलें. तो म्हणाला,

" गेले बेचाळीस दिवस मी अन्यान्य तीर्थांचें भ्रमण करीत आहें. पुष्य नक्षत्रावर मी तीर्थाटनास प्रारंभ केला. आज श्रवण नक्षत्र आकाशांत स्थित आहे. मी मोठ्या सुयोगावर इथें आगमन केलेंसें मला वाटतें. "

श्रीकृष्ण म्हणाला,

" होय रामा ! आतां या तुझ्या दोन्ही शिष्यांचें गदायुध्य तूं पहा. "

" पाहीन रे पाहीन. मात्र इथें नव्हे. "

" मग ? "

" ही इथें पलिकडे समंतपंचक नांवाची पुरातन पुण्यभूमि आहे. तिथें जो युध्दांत पतन पावतो तो स्वर्गांत सहजगत्या प्रवेश करतो. तर आपण तिथें जाऊं या. "

बलरामाच्या आदेशाप्रमाणें ते सर्व वीर समंतपंचकांत जाऊन पोंचले. तिथें सर्व वीर मंडलाकार बसल्यावर बलरामास नमस्कार करून भीम आणि दुर्योधन दोघेही युध्य प्रवृत्त झाले.

पुष्ट वृषभाप्रमाणें डुरकाळी फोडून दुर्योधनानें भीमाला आवाहन केलें. भीमानें सिंहनाद करीत त्याला उत्तर दिलें. नंतर खळी घेतलेल्या व्याघ्राप्रमाणें ते एकमेकांवर तुटून पडले. कधीं ते विचित्र मंडलें घेत, तर कधीं अपसव्य घालून ते पुनः एकमेकांसमोर उभे ठाकत. कधीं अपसरण करून ते अवसान घेत, तर कधीं एकमेकांवर धडक घेत.

कधीं भीमाच्या गदाप्रहारानें दुर्योधन मूर्छीत होई, तर कधीं दुर्योधनाच्या प्रहारामुळें भीम रक्त ओकूं लागे. दुर्योधनाच्या गदाप्रहारांत कौशल्य दिसे. तर भीमाचे प्रहार अधिक वजनदार असत.

अर्जुन शंकित होऊन कृष्णास म्हणाला,

" माधवा, तुझ्या मताप्रमाणें या दोघांत अधिक कुशल कोण आहे ? "

" दुर्योधन. "

" मग ? आमच्या जयाचें करें काय ? "

" भीमानें आपली प्रतिज्ञा खरी करावी. "

" म्हणजे ? "

" धर्मयुद्धाचे संकेत सोडून त्यानें दुर्योधनाच्या मांडीवर गदा प्रहार करावा. "

दोघेही घामाघूम होऊन झुंजत होते. भीमाचें लक्ष आपणांकडे वेधून अर्जुनानें आपल्या मांडीस स्पर्श केला. भीमानें तो संकेत जाणला. दुर्योधनाचे अघात चालूंच होते. भीम कांहींसा क्षीण झाल्याचा भास होतांच दुर्योधनान त्याच्या मस्तकावर प्रहार करण्यासाठीं वर उसळी मारली.

तत्क्षणीं भीमानें अत्यंत वेगानें त्याच्या दोन्ही मांड्यांवर आपल्या अमोघ गदेचा जबर प्रहार केला. त्यानें मांड्यांचें चूर्ण होऊन दुर्योधन खालीं कोसळला !

दुर्योधन पडला, हें पाहातांच पांडव पक्षीयांनीं हर्षानें गदारोळ केला. हर्षानें उन्मत्त होऊन भीम दुर्योधनाजवळ गेला. त्याच्या मस्तकास डाव्या पायानें लाथ मारून भीम म्हणाला,

" अरे मंदा, ' गाय गाय ' असें म्हणून तूं आम्हाला सभेंत चिडविलें होतेंस ! त्याचें हें प्रायश्चित्त घे ! "

नंतर पुनः त्याच्या डोक्यावर पाय देत भीम युधिष्ठिराकडे वळून म्हणाला,

" ज्यांनी रजस्वला द्रौपदीला सभेंत आणून विवस्त्र केलें, त्या सर्वांचा द्रौपदीच्या तपश्चर्येनें वध झाला आहे ! आतां या कृत्याबद्दल आम्हाला स्वर्गलाभ होवो, कीं नरकप्राप्ति होवो. मी त्याची चिंता करीत नाही ! "

तें भीमाचें कृत्य पाहून युधिष्ठिर विव्हल होऊन म्हणाला,

" भीमा, आतां पुरे. दुर्योधनाचा प्राणांत जवळ आला आहे. आतां त्याचा असा अपमान करणें बरें नव्हे. "

नंतर दुर्योधनाजवळ बसत साश्रु नयनांनीं युधिष्ठिर म्हणाला,

" बंधो ! तूं तर रणांत मृत्युलाभ होऊन स्वर्गात जाशील. आणि आम्ही-आम्ही मात्र आतां उदासवाणा काळ कंठीत कसे तरी जगूं ! "

भीमाचें तें कृत्य बलरामासही आवडलें नाहीं. तो गर्जना करून नांगर उचलीत म्हणाला,

" या दुरात्म्या भीमानें असें अपकृत्य करून क्षत्रिय धर्माला काळोखी फांसली आहे. आतां मी याला चांगली शिक्षा लावतों. "

तों श्रीकृष्णानें त्याला कव घालीत मृदु शब्दांत म्हटलें,

" ऐक दादा ! भीमानें दुर्योधनाचा उरूभंग करीन अशी प्रतिज्ञाच केली होती. तूं त्याच्यावर क्रुध्द होऊं नकोस. "

" तूंच त्याचें समर्थन करीत असलास तर उपायच खुंटला. मात्र हें कांहीं बरें झालें नाहीं. "

असंतुष्ट बलराम आपल्या रथांत बसून द्वारकेकडे निघून गेला. हें पाहून पांडवपक्षीय वीर आपापलीं उत्तरीयें आकाशांत फेंकीत शंखध्वनि करण्यास उद्युक्त झाले. ते एकमेकांस मिठ्या मारीत भीमास म्हणूं लागले.

" भीमा, तूं धन्य आहेस ! "

" आपल्या दोन्ही प्रतिज्ञा पूर्ण करून तूं कृतकृत्य झाला आहेस. "

" इन्द्रानें वृत्राचा वध करावा, तसें हें झालें. "

" तूं दुर्योधनाला ठार मारल्यानें आम्हाला जो आनंद झाला आहे, तो सांगतां पुरवत नाहीं. "

हीं त्यांचीं प्रलापयुक्त वचनें ऐकून श्रीकृष्ण म्हणाला,

" वीर हो ! रणांत पडलेल्या शत्रूवर एक तर असे वाक्प्रहार करणें उचित नाहीं. दुसरें, हा दुरात्मा आपल्या कुकृत्यांनीं अगोदरच मृत झाला आहे. तेव्हां आतां रथावर आरूढ होऊन तुम्ही आपापल्या स्थानीं चला. "

हें श्रीकृष्णाचें वचन ऐकून संतापानें पेटलेला दुर्योधन दोन्ही हात खालीं टेकून क्रूद्ध दृष्टीनें त्याच्याकडे पाहात उठायची धडपड करूं लागला. तो श्रीकृष्णास परोपरीचीं दुर्वचनें बोलला. पण श्रीकृष्ण म्हणाला,

" दुर्योधना, या तुझ्या प्रलापांनीं कांहींही लाभ होणार नाहीं. तूं तुझ्या दुष्कृत्यांचें उचित तें प्रायाश्चित्तच भोगीत आहेस. "

नंतर पांडव आपापल्या रथांत बसून शिबिराकडे परत निघाले. शिबिरांत पोंचल्यावर श्रीकृष्ण अर्जुनास म्हणाला,

" अर्जुना, गांडीव धनुष्य घेऊन तूं रथांतून खालीं उतर. "

अर्जुनानें श्रीकृष्णाची आज्ञा मानली. त्याच्या पाठोपाठ श्रीकृष्ण खालीं उतरतांच रथ धडधडा जळूं लागला.

आश्चर्यचकित युधिष्ठिरानें विचारलें,

" श्रीकृष्णा, हें काय ? "

" राजा, अनेक वीरांनीं अर्जुनावर टाकलेल्या अमोघ अस्त्रांचा हा परिणाम आहे. आजपर्यंत रथावर मी आरूढ असल्यामुळेंच तो सुरक्षित राहिला. आतां त्याचें काम संपलें आहे. "

" तुझी इच्छा ! "

## भयाण काळोख्या रात्रीं --

दुर्योधन रणांत पडला, हें वृत्त अश्वत्थाम्यादि तिघां वीरांना गुप्तचरांनीं जाऊन सांगितलें. तें ऐकतांच ते तिघे तांतडीनें दुर्योधनाजवळ आले. तेरा वर्षे भारतावर एकाधिपत्य गाजविलेला तो सम्राट ऊरुभंग होऊन धुळींत लोळत पडला होता. मांस खाण्याच्या इच्छेनें त्याच्याभोंवतीं घोटाळणाऱ्या वन्य पशूंना तो कसा तरी दूर हांकीत होता !

ती त्याची दशा पाहून अश्वत्थाम्यास अत्यंत वाईट वाटलें. तो म्हणाला,

" राजा, काय ही तुझी अवस्था ! भारताचें साम्राज्य तुझ्या आधीन ! त्याला कांहीं फार काळ लोटला नाहीं. सर्व प्रकारचीं सुखें ज्याच्या दाराशीं केवळ संकेताचीच वाट पाहात उभीं होतीं, त्या तुला वन्य पशूंचेंही निवारण स्वतःच करावें लागावें ना ? दैवगति मोठी विचित्र आहे, हेंच खरें."

" अश्वत्थाम्या, हें दैवगतीचें फळ नव्हे. "

" मग ? "

" पांडवांच्या कुटिल मतीचें ! "

" काय झालें ? "

" भीमानें कपटानें अधर्मयुद्ध करून माझ्या मांड्यांवर प्रहार केल्यामुळेंच मी ही विपन्नावस्था भोगीत मृत्यूची वाट पाहात आहें ! "

अश्वत्थामा दांत रगडून संतापानें म्हणाला,

" असें ? राजा, ऐक माझी प्रतिज्ञा ! "

" बोल अश्वत्थाम्या ! "

" ज्यांनीं अधर्मानें भीष्मांना मारलें, ज्यांनीं अधर्मानें तातांचा वध केला, ज्यांनीं अधर्मानें कर्णावर शस्त्र चालविलें, ज्यांनीं अधर्मानें तुझा उरुभंग केला, त्या पांडवांचा संहार मी तेंच शस्त्र वापरून करीन."

तशाही अवस्थेंत दुर्योधनाला अत्यंत संतोष झाला. तो कृपाला म्हणाला,

" आचार्य, जलानें भरलेला कलश आणा ! माझ्याकरितां तुम्ही अश्वत्थाम्याला सेनापतिपदाचा अभिषेक करा ! "

अभिषेक झाल्यावर अश्वत्थामा म्हणाला,

" मित्रा, आतां मी पुनः येईन, तो पांडवांच्या नाशाची वार्ता सांगण्यासाठीं. मात्र तोंवर—"

" होय रे होय ! तोंवर मी माझी प्राणशक्ति हारपूं देणार नाहीं."

ते तिघे अश्वारोही पांडवशिबिराजवळ आले, तोंवर सायंकाळ झाली. मग ते बिकट झाडी पाहून तिथें लपून बसण्यासाठीं आश्रय शोधूं लागले. त्यांना एक घनदाट, चौदिशांना पसरलेला वटवृक्ष दिसला. ते त्याच्याखालीं विसांवले.

दिवसभर अत्यंत परिश्रम करून शरीर आणि मनही श्रमलें असल्यामुळें कृप आणि कृतवर्मा, या दोघांना झोंप लागली. एकटा अश्वत्थामा मात्र तळमळत राहिला. संतापामुळें झोंप कशी ती त्याच्याजवळ येईना !

संतापाच्या भडक्यानें होरपळून जाऊन विचार करीत पडला असतां अश्वत्थाम्याला एक भीषण अद्‌भुत दिसलें.

त्या वटवृक्षावर असंख्य कावळे राहात असत. ते शांत मनानें निद्रासुख अनुभवीत झोंपले होते. तोंच एक भयाण, भलें मोठें घुबड गुपचुप वडाच्या फांदीवर येऊन बसलें, आणि मग त्यानें त्या झोंपलेल्या कावळ्यांचा संहार करावयास प्रारंभ केला. कांहींच्या माना मुरगळून, कांहींचे पंख उपटून, कांहींच्या अंगाचे लचके तोडून, असा त्यानें सर्व कावळ्यांचा नाश केला !

हें त्याचें कृत्य पाहतांच अश्वत्थाम्याला मार्ग सांपडला. तो थरकांपून म्हणाला,

" बा उलूका, तूं माझा गुरु झाला आहेस !

" शत्रूंचा निःपात कसा करावा, हें तूं मला शिकविलें आहेस !

" आतां मी असाच उठून सर्व पांडवसेनेचा निःपात करून ती वार्ता दुर्योधनाच्या कानीं घालीन ! "

त्यानें कृपाचार्यांना व कृतवर्म्याला उठविलें. तो घोगऱ्या आवाजांत बोलला,

" आचार्य, उठा ! मला मार्ग सांपडला आहे."

" कशाचा ? "

" शत्रु हननाचा ! "

घुबडानें केलेलें भीषण कृत्य त्यांना सांगून अश्वत्थामा म्हणाला,

" आतां पांडव विजयाच्या मदानें धुंद होऊन गाढ झोंपले आहेत. अशा वेळीं मी उलूकमार्गानें त्यांचा वध करून कृतकृत्य होईन ! "

हें त्याचें बोलणें कृपाचार्यांच्या मनास आलें नाहीं. ते म्हणाले,

" पुत्रा, हें बरें नव्हे रे ! "

" कां ? "

" हें अधर्मयुद्ध आहे. आजपर्यंत कुणीं असें केलें नाहीं. उद्यां सकाळीं तूं रथारूढ होऊन पांडवांना हांका घालीत त्यांचा संहार कर. आम्ही दोघे तुझी पाठ सांभाळूं. "

" मुळींच नाहीं. आतांच – याच क्षणीं– "

" ऐक अश्वत्थाम्या ! "

" मामा, या नीचांचीं कृत्यें आठवतात ? यांनीं कधीं धर्मयुद्ध केलें, तर यांच्याशीं धर्मयुद्धाचा घोळ घालावा ? अधर्म्यांचा संहार मी अधर्मानेंच करीन ! "

कृप निरुपायानें म्हणाले,

" ठीक आहे ! तूं सेनापति आहेस. आम्हांला तुझें अनुसरण करणें प्राप्त आहे."

मग ते तिघे अश्वांवर आरूढ होऊन पांडवांच्या शिबिराकडे निघाले. मध्यरात्रीचा सुमार. पांडव आणि श्रीकृष्ण सात्यकीसह शिबिराबाहेर गेले होते. धृष्टद्युम्न, द्रौपदीचे पांच पुत्र, शिखंडी, पांचाल हे सर्व वीर विजयानें धुंद झाल्यामुळें उत्तम मद्य पिऊन स्वस्थ मनानें आपल्या पर्यंकावर पहुडले होते.

हे तिघे रौद्ररूपधारी वीर शिबिराजवळ पोंचले, तों अश्वत्थाम्याला शिबिराच्या दाराशीं एक विक्राळ रूप दिसलें. अश्वत्थाम्यानें त्याच्यावर बाण टाकले, पण ते गिळून टाकून तें रूप अधिकच भयानकपणें नाना आकारांनीं त्याच्यापुढें प्रगट झालें. अश्वत्थाम्यानें त्याच्यावर जवळचीं सर्व शस्त्रें टाकलीं, पण तीं सगळीं त्या रूपानें आपल्या अंगांत सामावून घेतलीं.

मग मात्र अश्वत्थामा अस्वस्थ झाला. त्यानें अनन्य भावानें शंकराची प्रार्थना करून आपलें शरीरच त्याला समर्पित करण्याचा कृतनिश्चय केला. समोर अग्नि पेटवून सोमदैवत्य मंत्र म्हणत त्यानें अग्नींत उडी घेतली मात्र, तोंच भगवान् पशुपति प्रगट होऊन त्याला म्हणाले,

" पुत्रा, मी तुझ्यावर प्रसन्न आहें. वासुदेवाच्या अनन्य भक्तीनें संतुष्ट होऊन हीं नानाविध रूपें मींच प्रकट केलीं होतीं. पण आतां पांचालांचा मृत्युसमय प्राप्त झाल्यानें मी त्या रूपांचा संकोच करीत आहें. "

शंकरांनीं दिलेलें खड्ग घेऊन त्यांना नमस्कार करीत अश्वत्थाम्यानें शिबिरांत प्रवेश केला. कृपाचार्य आणि कृतवर्मा या दोघांस तो म्हणाला,

" तुम्ही दोघे इथेंच थांबा. माझ्या तडाक्यांतून वांचून जो कोणी बाहेर येईल त्याला तुम्ही ठार मारा. "

प्रथम तो धृष्टद्युम्नाच्या प्रासादांत शिरला. पर्यंकावर स्वस्थ मनानें शयन करीत असलेल्या धृष्टद्युम्नाच्या कमरेंत एक लाथ घालून त्यानें त्याला जागें केलें. धृष्टद्युम्न चकित होऊन ओरडला,

" कोण ? "

" तुझा काळ ! अश्वत्थामा ! "

धृष्टद्युम्न उठूं लागतांच अश्वत्थाम्यानें केश धरून त्याला खालीं पाडलें, आणि त्याच्या उरावर बसून तो त्याचा गळा दाबीत त्याला बुकलूं लागला.

" अश्वत्थाम्या हें बरें नव्हे–"

" तुला हेंच योग्य आहे ! तूं असाच मर. "

" मरणाला मी भीत नाहीं. पण मला शस्त्रानें तरी मार ! "

" तुला ? गुरु घातकाला ? छे ! तुला मी असेंच मारीन ! "

गुडघ्यांनीं मर्मस्थळीं प्रहार करून आणि गळा दाबून अश्वत्थाम्यानें यज्ञीय पशूप्रमाणें धृष्टद्युम्नाचा वध केला !

नंतर गर्जना करीत तो त्या शिबिराबाहेर पडला. आरडाओरडा ऐकून पांचाल जागे झाले. ते हातीं शस्त्रें उचलीत म्हणूं लागले,

" कोण तो ? त्याला धरा ! "

पण अश्वत्थाम्यानें पशूपतीनें दिलेल्या खड्गानें त्या सर्वांचा वध केला. युधामन्यु, प्रभद्रक, शिखंडी आदि वीरांनीं त्याचा प्रतिकार करायचा प्रयत्न केला, पण त्या सर्वांचा अश्वत्थाम्यानें वध केला. पांचालीचे प्रतिविंध्यादि पांच पुत्र अश्वत्थाम्यावर धावून आले. पण त्यांनाही अश्वत्थाम्यानें ठार मारलें. कांहीं वीर त्याच्या हातून सुटून शिबिराबाहेर धांवत सुटले त्यांना कृप आणि कृतवर्मा या दोघांनीं ठार मारलें.

धृष्टद्युम्नाच्या सारथ्याशिवाय कोणीही त्या भीषण संहारांतून जिवन्त सुटला नाहीं. तो सारथीच काय तो कृपाच्या तडाख्यांतून सुटून पांडवांकडे रडत ओरडत निघाला. बाकी सर्व असावध वीरांना कण्ठस्नान घालीत, त्या प्रेतांची विटंबना करीत, मनुष्यांनीं गजबजलेल्या त्या शिबिरांत स्मशानाचा

भास होईल, अशी भयाण शांतता निर्माण करीत क्रूरकर्मा अश्वत्थामा रक्तानें न्हाऊन उन्मत्तपणें हंसत बाहेर पडला.

बाहेर उभ्या असलेल्या कृपाचार्यानें त्याला विचारलें,

" सगळें संपलें ? "

गडगडाट झाल्याचा आभास व्हावा, असें भेसूर हंसूं हंसत अश्वत्थामा बोलला,

" होय ! सगळें संपलें ! एकही पांचाळ जिवन्त राहिला नाहीं ! "

" एकही ? "

" एकही ! युधिष्ठिराला ही वार्ता सांगेल, असा कोणीही तिथें नाहीं ! "

कृतवर्म्यानें अश्वत्थाम्याला आलिंगन देत म्हटलें,

" गुरुपुत्रा, तूं धन्य आहेस ! तूं एकट्यानें सर्व पांडवसेनेचा संहार केला आहेस ! "

कृतकृत्य अश्वत्थामा बोलला,

" चला, जर राजा दुर्योधन अजून प्राण धरून राहिला असेल—"

" होय ! खचितच राहिला असेल !

" तर त्याला हें वृत्त ऐकवूं ! "

ते तिघेजण अश्वांवर बसून तातडीने दुर्योधनाजवळ गेले, तोंवर उषःकाल झाला होता. अत्यंत दयनीय अवस्थेंत मरणाशीं झुंजत असलेला दुर्योधन त्यांनीं पाहिला.

रात्रभर गृद्ध, कोल्हे, लांडगे आदि वन्य पशू त्याच्या शरिराचे लचके तोडायची धडपड करीत होते. कशीतरी संज्ञा जागी ठेवायची धडपड करीत तो त्यांना दूर हांकीत होता. कधीं क्षणभरासाठीं त्याचें मन मृत्यूच्या काळ्या विवराच्या दाराशीं जाऊन उभें राही. पुनः मोठी जबर झुंज देऊन दुर्योधन त्याला जागृतीच्या हारपत्या रंगभूमीवर खेचून आणी.

अशा अत्यंत विकल स्थितींत पडलेल्या त्या सम्राटाला पाहून त्या तिघांनाही रडूं फुटलें. अश्वत्थामा आंसवें पुशीत म्हणाला,

" हा पहा ! आमचा स्वामी ! "

कृपानें दुर्योधनाच्या मुखावरील रक्त पुशीत म्हटलें,

" हाय ! दैव कसें निष्ठुर आहे ! "

" अत्यंत उदार असा हा आमचा मित्र–"

" रात्रभर त्याला मरणाशीं युद्ध करीत या वार्तेची वाट पाहावी लागावी ना! "

" धिःकार असो त्या श्रीकृष्णाला–"

" त्यानें समक्ष उपस्थित असतां भीमाकडून हा अन्याय होऊं दिला ! "

" आतां आमचें काय ? "

" आम्हाला कोणीही मित्र उरला नाहीं ! "

" आम्ही असेच तोंडें लपवीत उदासवाणी जीवनें जगत असूं ! "

" राजा धृतराष्ट्राचें काय ? "

असा नानापरींनें अपरंपार शोक केल्यावर दुर्योधनाचें शिर आपल्या मांडीवर घेऊन त्याच्या कानाशीं तोंड नेत अश्वत्थाम्यानें त्याला हृदयस्पर्शी स्वरांत हांका मारल्या. शेवटच्या क्षणीं शुद्धीवर येऊन खोल गेलेल्या स्वरांत दुर्योधन कसा तरी बोलला,

" कोण ? "

" राजा, तुझा यशस्वी सेनापति अश्वत्थामा ! "

" यशस्वी ? "

" होय राजा ! अठरा अक्षौहिणींपैकीं केवळ दहा जण जीवंत आहेत ! "

" कोण कोण ? "

" आम्ही तिघे, पांच पांडव, श्रीकृष्ण व सात्यकि–"

" केवळ दहा ? "

" होय ! "

" बाकी सगळे– "

" मी ठार मारले ! "

" अश्वत्थाम्या ! "

" होय राजा ! शिखंडी जीवन्त नाहीं ! धृष्टद्युम्न जिवन्त नाहीं ! पांचाल तर सर्व मारले गेले आणि द्रौपदीचे पुत्रही ! "

" अरे -जें भीष्मांकडून घडलें नाहीं– "

" होय ! "

" द्रोणांकडून– "

" होय ! "

" कर्णही जें करूं शकला नाहीं– "

" होय राजा ! तुझ्या या शेवटच्या सेनापतीनें तें केलें आहे ! साक्षी आहेत कृपाचार्य आणि कृतवर्मा ! "

एक पाऊल मृत्यूच्या दारांत टाकून दुसरेंही उचललेल्या दुर्योधनाच्या नेत्रांतून आंसवें वाहूं लागलीं. तो अडखळत अडखळत बोलला,

" सेनापते, तूं धन्य आहेस ! "

" राजा– "

" मी कृतार्थ आहें ! "

" मित्रा ! "

आतां तुमची आमची भेट—तिथें–"

" दुर्योधना–"

" स्वर्गद्वारीं ? "

ज्याच्या हट्टामुळें महाभारतीय युद्ध पेटलें, तो दुर्योधन एवढे शब्द उच्चारून नेहमींकरितां शांत झाला !

अश्वत्थाम्यानें दुर्योधनाच्या मृत शरिरास मिठी मारली. बराच वेळ त्या अवस्थेंत राहिल्यावर कृतवर्मा म्हणाला,

" ऊठ अश्वत्थाम्या ! "

" उठूं ? आणि काय करूं ? "

" चल. दुर्योधन स्वर्गाचा अधिकारी झाला आहे. "

कृपानें मान हलवीत म्हटलें,

" होय ! निश्चितच ! "

" आणि आम्ही ? आम्ही कशाचे अधिकारी ? "

" उत्तर कोणींही दिलें नाहीं. अश्वत्थाम्याला घेऊन ते दोघे वाट फुटेल तिकडे निघाले."

हें युद्धवृत्त संजय दिव्य दृष्टीनें युक्त होऊन धृतराष्ट्रास कथन करीत होता.

धृतराष्ट्रही वारंवार उसासे टाकीत, जीव मुठींत धरून तें ऐकत होता. हा प्रसंग सांगितल्यावर संजय व्याकुल होऊन म्हणाला,

" राजा धृतराष्ट्रा, माझी दिव्य दृष्टि नष्ट झाली आहे ! मी कांहींच अपूर्व पाहूं शकत नाहीं. आतां सामान्य मनुष्याला जितकें दिसतें, तितकेंच मला दिसूं लागलें आहे ! "

पण पुत्रशोकानें विव्हल झालेल्या धृतराष्ट्राचें लक्ष संजयाच्या या खिन्न भाषणाकडे गेलें नाही. तो तसाच उसासे सोडीत बसून राहिला.

## प्रायश्चित—

धृष्टद्युम्नाचा सारथी पांडवांना शोधीत त्यांच्यापर्यंत जाऊन पोंचला. युधिष्ठिरानें आश्चर्यानें त्याला विचारलें,

" सूता, तूं असा विव्हल कां झाला आहेस ? "

" सर्वनाशामुळें ! "

" कुणाचा सर्वनाश ? "

सूतानें जेव्हां युधिष्ठिराला शिबिरांत उडालेला कल्पांत सांगितला, तेव्हां तिथें उपस्थित असलेल्या सर्वांवर दुःखाची विक्राळ छाया पसरली. युधिष्ठिर वारंवार आंसवें पुशीत म्हणाला,

" जें भीष्म, द्रोण अथवा कर्णाला साध्य झालें नाहीं, तें घडलें—आणि आमच्या हयगयीमुळें ! युद्धांत जय मिळवूनही आमचा पराजयच झाला आहे ! "

नंतर तो नकुलाला म्हणाला,

" नकुला, तूं जा बाळा ! "

" कुठें ? "

" द्रौपदीकडे ! "

" द्रौपदीकडे ? "

" होय ! तिला शिबिराकडे आणण्याचें सामर्थ्य माझ्यांत उरलें नाहीं. कदाचित् तूंच तें करूं शकशील ! "

शोकमग्न नकुल रथांत बसून द्रौपदीकडे निघाल्यावर युधिष्ठिर इतरांसह मोठ्या कष्टानें शिबिराकडे गेला. तेथील वीरांचीं मृत शरीरें पाहून त्याला मूर्च्छा आली, व तो धरणीवर कोसळला !

नकुलाबरोबर द्रौपदी कशीबशी शिबिरापर्यंत आली खरी, पण तेथील दृश्य डोळ्यांनीं पाहतांच ती केळीच्या झाडाप्रमाणें थरथरा कांपूं लागली. ती खालीं कोसळणार, हें पाहून धांवत जाऊन भीमानें तिला धरलें. तिनें आपले ओंठ दातांखालीं घट्ट आवळून धरले. कांहीं वेळानें ती थरथरत म्हणाली,

" महाराज, आतां ही निष्कंटक पृथ्वी आपल्याला लाभली आहे ! हिच्यावर सुखेनैव राज्य करा ! "

" द्रौपदी—"

" होय ! अभिमन्यु, माझे पुत्र, यांचें आपल्याला स्मरण होण्याचें कांहींच कारण नाहीं ! त्यांच्या प्राणांचें मोल देऊन मिळालेलें हें राज्य–आनंदानें त्याचा उपभोग घ्या ! "

" द्रौपदी, तुझ्याच्यानें हें बोलवतें तरी कसें ? "

कल्पांतींचा शोक करीत द्रौपदी म्हणाली,

" काय करूं हो ! पुत्रशोकानें मी अंध झालें आहें ! माझ्या पुत्रांचा वध करणाऱ्या त्या नीचाचे प्राण त्याचें शरीर सोडून कधीं जातील ? ऐका महाराज ! "

" काय ? "

" मला त्याचा वध झाल्याची वार्ता कळेपर्यंत मी माझ्या पुत्रांच्या शवां-पासून मुळींच हलणार नाहीं ! "

ती आपल्या पुत्रांच्या छिन्नभिन्न झालेल्या शवांना कुरवाळूं लागली. युधिष्ठिर पेचांत सांपडून तिला म्हणाला,

" कृष्णे, तुझ्या पुत्रांना वीरगति प्राप्त झाली आहे. यांपैकीं एकही रणांगण सोडून पळाला नाहीं. पण अश्वत्थाम्याची गांठ कशी पडणार ? आणि तो मारला गेल्याबद्दल तुझी खात्री कशी पटूं शकणार ? "

क्षणभर चिंतन करून द्रौपदी म्हणाली,

" त्यावरही उपाय आहे. "

" कोणता ? "

" अश्वत्थाम्याच्या मस्तकावर असलेला बहुमूल्य मणि ! तो तुमच्या मस्तकावर शोभूं लागेल, तरच मी जीवित धारण करीन—"

एकदम भीमाकडे वळून ती आर्तस्वरानें म्हणाली,

" पुरुषोत्तमा, एवढी माझी इच्छा तुम्ही पुरविणार नाहीं काय ? एवढी एकच—शेवटची—"

तिची आर्तता पाहून भीम भुजा थोपटीत उठला. धनुष्यबाण उचलून तो म्हणाला,

" नकुला, चल, तूं सारथ्य कर, कृष्णेचें एवढें काम केलेंच पाहिजे ! "

ते दोघे रथारूढ होवून मोठ्या वेगानें निघालेले पाहून श्रीकृष्ण म्हणाला,

" युधिष्ठिरा, तूं भीमाला जाऊं दिलेंस ? "

" मग काय करूं ? "

" लक्षांत ठेव. ब्रह्मशिर–अस्त्र हस्तगत असलेल्या महत्त्वाकांक्षी अश्वत्थाम्याशीं त्याला युद्ध करावें लागेल ! अरे, त्या मूर्खानें तर एकदां मजजवळ एक अविचारी मागणें मागितलें होतें. "

" कसलें ? "

" माझें चक्र—जें प्रिय सख्या अर्जुनानेंही मागितलें नाहीं ! तें हस्तगत करून मलाही युद्धांत पराजित करण्याचा अश्वत्थाम्याचा विचार होता ! "

" मग आतां कसें श्रीकृष्णा ? "

" अर्जुनाला तूं भीमाच्या सहाय्यास धाड. बरोबर मीही जाईन. "

" तर मग मीही—"

" ठीक आहे. "

ते तिघे रथारूढ होवून अत्यंत वेगानें अश्वत्थाम्याचा मागोवा काढीत गंगातीरीं पोंचले. भीमाचा रथ त्यांच्यापुढें धांवत होता. तिथें भगवान् व्यास आणि इतर ऋषींच्या समूहांत बसलेला अश्वत्थामा त्यांना दिसला. भीम धनुष्याला बाण जोडीत संतापानें म्हणाला,

" थांब ! अश्वत्थाम्या थांब ! "

त्या महारथ्यांना पाहून अश्वत्थामा भेदरला. त्याला कांहीं सुचेनासें झालें. शेवटीं त्यानें तेजस्वी ब्रह्मशिरास्त्र जपून तें सोडीत म्हटलें,

" या अस्त्रानें पांडवांचा नाश होवो ! "

तें महाभयंकर अस्त्र त्रिभुवन आंदोळीत येत असलेलें पाहून श्रीकृष्णाच्या प्रेरणेनें अर्जुनानेंही तेंच अस्त्र त्याचा प्रतिकार करण्यासाठीं सोडलें. दोन्हीं अस्त्रांच्या संघर्षानें पृथ्वीवर कल्पांत होणारसें भासूं लागलें. तेव्हां व्यास अर्जुनास म्हणाले,

" अर्जुना, तुझा विचार काय आहे ? तुझ्या मनांत त्रिभुवनाची राखरांगोळी व्हावी, असें आहे काय ? "

व्यासांना नमस्कार करून अर्जुन म्हणाला,

" मीं तर केवळ अश्वत्थाम्याच्या अस्त्राचा प्रतिकारच केला आहे. आपली आज्ञा असेल, तर मी माझें अस्त्र परत घेतों. "

परम आचार्यभक्त असल्यामुळें अर्जुनाला त्याचें अस्त्र परत घेणें शक्य झालें. मात्र अश्वत्थाम्याला आपलें अस्त्र माघारी घेतां येईना ? तो काळंजून व्यासांना म्हणाला,

" मला अस्त्र परत घेतां येणार नाहीं—"

" पण पांडव तुझ्याकडून अवध्य आहेत ! "

" तर मग त्यांच्या वंशावर मी तें सोडतों ! मात्र मला त्यांनीं प्राणदान दिलें पाहिजे "

" त्याबद्दल तुला तुझ्या मस्तकावरील मणि पांडवांना दिला पाहिजे. "

निरुपायानें अश्वत्थाम्यानें तो अमूल्य मणि काढून भीमाचे हातीं ठेवला. जळत तो म्हणाला,

" लक्षांत असूं द्या ! माझें अस्त्र—"

श्रीकृष्ण हंसून बोलला,

" अरे, तें निष्फळ होईल ! पांडवांच्या वंशाचें रक्षण मी करीन; मात्र अश्वत्थाम्या, तूं अमित कालपर्यंत मस्तकांतून दुर्गन्धि वाहात असलेल्या अवस्थेंत रानावनांतून भटकत राहाशील ! "

मणि घेऊन तांतडीनें ते वीर द्रौपदीजवळ आले. भीम द्रौपदीला म्हणाला,

" भद्रे, अश्वत्थाम्याच्या मस्तकावर शोभणारा हा मणि बघ ! "

" आणि तो पापकर्मा ? "

" कृष्णे, गुरुपुत्र या नात्यानें तो अवध्य आहे ! "

कांहीं क्षणानंतर द्रौपदी म्हणाली,

" असूं द्या. तो मलाही तुमच्याचप्रमाणें वंद्य आहे. मात्र हा मणि आतां राजानें मस्तकीं धारण करावा. "

" तसेंच होईल. "

## शोकपर्व—

व्यास आणि विदुर या थोर तत्त्वज्ञांनीं धृतराष्ट्राला नानाप्रकारच्या कथा सांगून त्याचें कसेंबसें समाधान केलें. त्यानंतर कुरुक्षेत्रावर जाण्याची सिद्धता करून धृतराष्ट्र विदुराला म्हणाला,

" भ्रात्या, आतां गांधारी, कुंती आणि इतर भारतांच्या गतधवा स्त्रियांना रणभूमीवर तूंच आणूं शकशील."

विदुर गांधारीकडे गेला, आणि त्यानें धृतराष्ट्राचा संदेश तिला सांगितला. शोकाच्या सागरांत बुडूं पाहणाऱ्या त्या सर्व स्त्रिया देहभान विसरून अस्ताव्यस्त वेषांत धृतराष्ट्राबरोबर कुरुक्षेत्राकडे निघाल्या. त्यांचा शोक पाहून पाषाणालाही द्रव फुटला असता !

राजा धृतराष्ट्र कुरुक्षेत्रावर येत आहे, हें कळतांच पांडवही त्याला भेटण्यास निघाले. त्या दोन्ही समूहांची गांठ पडतांच अनाथ झालेल्या कौरवस्त्रियांनीं युधिष्ठिराला वेढलें. आक्रोश करीत त्या त्याला विचारूं लागल्या,

" धर्मबुद्धि युधिष्ठिरा, आमचे पति कुठें आहेत ? "

" तुझ्याच्यानें त्यांचा वध करवला कसा ? "

" तुझी धर्मपरायणता कुठें वनवासी झाली काय ? "

" आतां या वैराण भूमीवर तुझ्याच्यानें राज्य करवेल काय ? "

त्या व्याकुळ स्त्रीसमूहांतून आपली कशीबशी सुटका करून घेऊन युधिष्ठिर धृतराष्ट्राकडे गेला. त्याला आपलें नांव सांगून युधिष्ठिरानें नमस्कार केला.

संतापानें तांबडा लाल होत धृतराष्ट्र म्हणाला,

" तुझें कल्याण असो ! पण माझा तो आवडता पुत्र भीम कुठें आहे ? "

पुढील भविष्य जाणून श्रीकृष्णानें दुर्योधन ज्यांशीं गदायुद्ध खेळत असे तो भीमाचा लोखंडी पुतळा या प्रसंगीं उपस्थित ठेवला होता. तो त्यानें पुढें केला. भीमच आपल्या समोर उभा आहे, असें समजून धृतराष्ट्रानें त्याला एवढ्या जोरानें आवळलें, कीं तो लोखंडाचा पुतळाही चेपून गेला !

त्या श्रमांनीं स्वतः धृतराष्ट्रही रक्त ओकूं लागला. संजय अस्वस्थ होवून पुढें होत म्हणाला,

" राजा हें काय केलेंस ! "

आपले अनेक पुत्र ठार मारल्यामुळें, भीमावर धृतराष्ट्राचा दांत होता. पण आपल्या मगरमिठींत तो चुरडला गेला, असें वाटून आतां मात्र धृतराष्ट्राला पश्चात्ताप होवून तो विव्हल स्वरांत बोलला,

" हाय हाय ! मीं हें काय केलें ! माझा भीम !"

श्रीकृष्ण पुढें होऊन म्हणाला,

" राजा, भीम सुरक्षित आहे."

" छे छे ! मीं तर त्याला या पुष्ट बाहूंनीं– "

" नव्हे राजा, तूं मर्दन केलास तो भीमाचा लोखंडी पुतळा होता. तुझा भाव जाणून मी आयत्यावेळीं तो पुढें केला होता. "

गदगदून धृतराष्ट्र बोलला,

" श्रीकृष्णा, तूं पाठीशीं उभा असल्यावर पांडवांचें सदैव कल्याणच होईल. मात्र आतां मला भीम भेटव. "

भीम, अर्जुन, नकुल, सहदेव हे चारीजण धृतराष्ट्राला नांवें सांगून नमस्कार करूं लागले असतां धृतराष्ट्रानें त्यांना आलिंगन दिलें. श्रीकृष्ण म्हणाला,

" राजा, तुझा कोप मला उमगतो. पण विचार कर, झालें त्याहून वेगळा मार्गच उपलब्ध राहिला नव्हता. तुझ्या पुत्रानें ठेवला नव्हता. एवढेंच नव्हे, तर या दोषांचा कांहीं भार तुझ्याही माथ्यावर आहे. तूं वेळींच आपल्या पुत्राला धाकांत ठेवतास, तर हें रणकंदन झालें नसतें. "

पश्चात्तापानें पोळलेला धृतराष्ट्र म्हणाला,

" श्रीकृष्णा, तूं म्हणतोस तें खरें आहे. या मुलांचा कांहीं अपराध नाहीं."

" तर मग हे तुझेच आहेत असें म्हण –"

" होय ! हे माझेच आहेत. "

नंतर पांडव गांधारीला भेटण्यास निघाले. त्यांच्या अगोदरच व्यास गांधारीची समजूत करीत तिथें बसले होते. पण गांधारी म्हणाली,

" महर्षे, माझ्या पुत्रांचा अपराध मला कळतो. ते आपल्या पापांनींच दग्ध झाले. पण या भीमानें दुर्योधनाला अधर्मानें कां मारलें ? "

तोंवर भीम तिथें उपास्थित झाला होता. तो म्हणाला,

" माते, त्या तुझ्या बलवान् पुत्राचा वध माझ्या हातून अन्यथा घडलाच नसता. त्याचें बल आणि पटुता माझ्यापेक्षां निःसंशयच अधिक होती. म्हणून आणि माझ्या प्रतिज्ञेची पूर्ति करण्यासाठीं मी त्याच्या मांडीवर प्रहार केला."

गांधारी किंचित शांत होवून म्हणाली,

" भीमा, तूं माझ्या पुत्राची जी स्तुति केलीस, ती ऐकून माझा कोप निवाला आहे. पण दुःशासनाचें रक्त—"

" माते, तेंही केवळ प्रतिज्ञेच्या पूर्तीसाठीं ! त्यानें भरसभेंत द्रौपदीला विवस्त्र—"

" असूं दे भीमा. तुझें म्हणणेंही खरें आहे. पण माझ्या मुला, शंभरांपैकीं एकही बंधु तुला जिवन्त ठेवावासा वाटला नाहीं ? आम्हां वृद्धांच्यासाठीं एकही आश्रय तूं शिल्लक ठेवला नाहींस, याचेंच मला अत्यंत दुःख होतें ! "

थोडा वेळ थांबून गांधारी अत्यंत विव्हल स्वरांत म्हणाली,

" तो युधिष्ठिर कोठें आहे ? "

शोकमग्न युधिष्ठिर पुढें होत म्हणाला,

" देवी, हा अपराधी युधिष्ठिर तुझ्यापुढें उभा आहे. माते, उघड आपले नेत्र ! या पाप्याला भस्म करून टाक ! "

युधिष्ठिरानें तिला नमस्कार केला, तों डोळ्यांवर बांधलेल्या वस्त्रांतूनही गांधारीला, त्याची नखें दिसलीं. तत्काल पोंवळ्याप्रमाणें रक्तवर्ण असलेलीं तीं नखें काळीं ठिक्कर पडलीं ! पण थोड्या वेळानें तिनें आपला शोक आवरून पांडवांना अभय दिलें.

मग कुंती आणि द्रौपदी यांची भेट झाली. कुंतीला पाहातांच द्रौपदी तर जणूं शोकानें वेडीच झाली ! ती म्हणूं लागली,

" आर्ये, अभिमन्यु कुठें आहे ? माझे पुत्र कुठें आहेत ? तुम्हाला इथें आलेल्या पाहूनही नमस्कार करण्यासाठीं ते अजून कां येत नाहींत ? मला नको हें राज्य ! माझी माझ्या लाडक्यांशीं भेट घडवा. एवढें कराल कां ? "

कुंती तिला घेऊन गांधारीकडे गेली. तिला पाहून द्रौपदीचा शोक जणूं महापूर आलेल्या सिंधुनदीप्रमाणें वाहूं लागला. तिचें सांत्वन करीत गांधारी म्हणाली,

" पुरे माझ्या मुली ! अगे माझ्याकडे तरी बघ ! काय करायचें वैभव ? कुणी भोगायचें राज्य ? राज्य करणारे करोत, तुला आणि मला मात्र आकाश फाटल्यासारखें झालें ! चल बाळे ! आपण दोघी समदुःखीनी कुठें तरी जाऊन शोक करीत बसूं ! "

श्रीकृष्ण म्हणाला,

" देवि, शांत हो ! "

" शांत होऊं ? श्रीकृष्णा, बघ एकदां कुरुक्षेत्राकडे बघ ! मला जणूं सगळें कुरुक्षेत्र करतलांतील आंवळ्यासारखें दिसूं लागलें आहे ! हे मृत होऊन पडलेले वीर बघ ! आणि त्याहीपेक्षां अति दारुण विलाप करणाऱ्या या भारताच्या लेकीसुना बघ ! "

" भद्रे–"

" बघ कृष्णा ! अरे, या आपापले प्रासाद सोडून कधींही बाहेर पडल्या नाहींत. वडिलांसमोर आपल्या पतींशीं बोलण्यासही लाजणाऱ्या या मंदभागिनी कोमलांगी आतां आपल्या पतींचीं कलेवरें वारंवार कवटाळीत कसा हृदयस्पर्शी आक्रोश करीत आहेत ! त्यांच्यासाठीं सगळ्या मर्यादा आतां एकाकार झाल्या आहेत. कोणी आपल्या पतीचें शिर शोधीत आहेत, कोणी तीं शरीरें खाण्यासाठीं हपापलेल्या वन्यपशूंशीं झुंजत आहेत ! "

" सगळ्यांत करुण दृश्य त्या उत्तरेचें ! ती कळी तर अजून उमललीही नाहीं ! मृत अभिमन्यूस आलिंगन देत ती म्हणत आहे–

' नाथा, आपण इथें केवळ भूमीवर शयन करीत आहांत ! ही कठोर भूमि आपल्याला खुपत नाहीं ? युद्धांत झालेल्या श्रमांनीं आपल्याला ही दीर्घ निद्रा लागली आहे ! बोला ना हो ! केवळ एकदांच माझ्या हांकेला साद द्या. मीं असा काय अपराध केला आहे ? अहो, आपलें तें सुमधुर, सुगंधी मीलन त्याला तर केवळ सहाच महिने झाले आहेत ! एवढ्यांत माझ्यावर रुसलांत ? "

"बोल कृष्णा ! तूं स्वतः उपस्थित असतां हा दारुण संहार कां घडूं दिलास ? माझी खात्री आहे, कीं हें तूं हेतुपूर्वक घडविलें आहेस ! ऐक मुकुंदा, माझा अपत्यहीनेचा शाप ऐक !"

संतापानें थरथरत गांधारी बोलली,

"तुझ्याही कुलाचा तुझ्या हातून असाच संहार घडेल ! त्यानंतर तूं वनांत एकटा थकून बसला असतां एका वनचराकडून मारला जाशील. तुझ्याही स्त्रिया असाच दारुण शोक करतील !"

श्रीकृष्ण शांत स्वरांत म्हणाला,

"देवि, अदृष्ट कोणी टाळूं शकत नाहीं—मीही नाहीं !"

## अन्त्यक्रिया—

धृतराष्ट्रानें युधिष्ठिरास विचारलें.

"युधिष्ठिरा, या असंख्य वीरांच्या अन्त्येष्टीचें काय ?"

"जशी आपली आज्ञा."

"मला वाटतें, कीं या सर्वांचें विधिपूर्वक दहन करावें."

मग युधिष्ठिरानें धौम्य, संजय, विदुर, युयुत्सु या सर्वांच्या साहाय्यानें त्या वीरांच्या दाहाची व्यवस्था केली. असंख्य चंदनागुरुचीं काष्ठें, तूप, तेल, लांकडांचे मोठमोठे ओंडके, मोडकेतोडके रथ आदि वस्तू एकत्र करून मोठमोठ्या चिता रचल्या, आणि त्या सर्व वीरांचें दाहकर्म संपन्न केलें. त्या चिता धडधडा पेटत असतां निर्माण झालेल्या धुरानें वातावरणांतलें औदासिन्य अधिकच वाढविलें.

नंतर ते सर्व जण गंगेवर गेले, आणि मृत वीरांना तिलांजली देऊं लागले. या वेळपर्यंत कुंतीनें आपलें रहस्य कसेंबसें झांकून ठेवलें होतें. पण युधिष्ठिर हातीं गंगाजल घेऊन उभा राहतांच ती जणूं एखादें प्राचीन गुप्त दुःख उघडें करण्याची पाळी यावी, तशा स्वरांत म्हणाली,

" युधिष्ठिरा ! "

" काय माते ? "

" अरे–कर्णाला–"

" त्याचें काय ? "

" त्यालाही तूं तिलांजली दे ! "

विस्मयानें युधिष्ठिरानें विचारलें,

" कां ? "

" तो–तो तुझा थोरला भाऊ होता ! "

आश्चर्य सागरांत बुडूं पाहाणाऱ्या युधिष्ठिरादि पांडवांनीं जेव्हां कुंतीकडून कर्ण जन्माची कथा ऐकली, तेव्हां शोक दुणावून युधिष्ठिर म्हणाला,

" आई ! आई तूं हें काय केलेंस ! "

" युधिष्ठिरा, मी असहाय्य होतें रे ! "

" पण तुझ्या या रहस्यगोपनामुळें आमची केवढी हानि झाली आहे ! आम्हीं आमच्या सख्या भावाचा शत्रू म्हणून वध केला ! छे छे ! हें युद्धच झालें नसतें ! जर मला हें अगोदर कळतें तर–छे छे आई, तूं फार मोठी गोष्ट आम्हापासून झांकून ठेवलीस–फार मोठी ! "

## विरक्ति—

उत्तरक्रिया संपल्यावर दोषपरिहारार्थ पांडव नगराबाहेरच एक मास वास्तव्य करून राहिले. मोठमोठे आचार्य आणि ऋषिश्रेष्ठ येवून त्यांच्याजवळ राहिले. त्यांच्या समागमांत नानाप्रकारच्या कथा सांगितल्या आणि ऐकल्या जात.

पण युधिष्ठिराचें उदास मन मात्र कांहीं केलें तरी ठिकाणावर येईना. एक दिवशीं द्रौपदीसह पांच बंधु एकत्र बसले असतां युधिष्ठिर म्हणाला,

" भीमा, माझा निश्चय झाला आहे. "

" कसला ? "

" विरक्त होऊन वनांत जाण्याचा. "

" काय ? "

" होय भीमा. मीं काय कुणाचें बरें केलें ? राज्यलोभानें मी अठरा अक्षौहिणी सेनेचा नाश करविला आहे. लोभामुळें कोणालाही कधींच सद्गति मिळाली नाहीं. त्यापेक्षां अरण्यांत जावून परिग्रहशून्य अवस्थेंत राहण्यांत अधिक सुख आहे. "

" आणि राज्य ? "

" त्याशीं मला कांहींही करायचें नाहीं, "

भीमाचा संताप बरेच दिवस एकत्र सांठत होता. या निमित्तानें तो बाहेर पडला. तो क्षुब्ध होऊन म्हणाला,

" राजा, केवळ वेदाची घोकमपट्टी करून एखाद्याची बुद्धि जड होत असते, तसें तुझें झालें असावेंसें मला वाटूं लागलें आहे. "

" भीमा ! "

" होय ! तुझें चित्त आळसामुळें भ्रमित झालें आहे. तुला जर राज्यलाभानंतर डोई फोडून वनांतच जायचें होतें, तर मग आम्हाला हें आधींच कां सांगितलें नाहींस ? "

" मग काय झालें असतें ? "

" आम्हीं विनाकारण हा नरसंहार तरी केला नसता ! भिक्षा मागून दिवस घालविले असते !"

" ऐक भीमा—"

" आजपर्यंत पुष्कळ ऐकलें ! तुझ्यासारख्या मंदबुद्धि पुरुषाचें ऐकत आलों, म्हणूनच आम्हाला हे अनंत कष्ट भोगावे लागले आहेत. अरे, कर्मभोग कुणाला चुकला आहे ? तूं वनांत जाण्यापेक्षां मन आणि बुद्धि ताळ्यावर ठेवून राज्य करशील, तर तें अधिक बरें होईल. "

अर्जुन, नकुल आणि सहदेव यांनींही भीमाचेंच समर्थन केलें. द्रौपदी युधिष्ठिराला म्हणाली,

" आज आपण हें काय मांडलें आहे ? "

" काय ? "

" या आपल्या भावांनीं केवळ आपल्या वचनाचा अवलंब करून आजपर्यंत अनेक संकटें सोसलीं आहेत. आतां एवढा दुस्तर सेनासागर तरून आल्यावरही आपण यांना मुळींच सुख लाभूं देणार नाहीं काय ? "

" काय करूं ? माझें चित्त कशांतच रमत नाहीं. "

" पण पूर्वी द्वैतवनांत तुम्ही काय म्हणाला होतांत ? "

" काय ? "

" या तुमच्या भावांना थंडी, वारा आणि क्षुधा यांपासून कष्ट होत असतां तुम्ही बोलला होतांत, कीं दुर्योधनादि कौरवांचा रणांत वध करून आपण ही निष्कंटक वसुंधरा सुखैनैव उपभोगूं. सुखाचें जाऊं द्या. आतां सुख नेहमीं करितां निर्वासित झालें आहे. पण न्यायासाठीं तरी तुम्ही राज्य करणें इष्ट नाहीं काय ? "

व्यासांनींहि युधिष्ठिराला परोपरींनीं समजाविलें, तेव्हां कुठें युधिष्ठिराचें मन थोडेंसें शांत झालें.

## नगर प्रवेश—

शेवटीं तो मास समाप्त झाल्यावर युधिष्ठिरानें नगरप्रवेश करण्याचें ठरविलें. उत्तम रथ सजवून त्यांत द्रौपदीसह युधिष्ठिर आरूढ झाला. स्वतः भीम त्या रथाचें सारथ्य करीत होता पराक्रमी पुरुषांत सर्व श्रेष्ठ असलेल्या अर्जुनानें युधिष्ठिरावर छत्र धरलें. नकुल व सहदेव मोर्चेल व चवरी ढाळूं लागले. त्याच्या पाठोपाठ एका सुंदर रथांत श्रीकृष्ण विराजमान झाला. अनेक ऋषिगण, महर्षी, मुनि, तपस्वी, विद्वान्, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, यांच्या समुदायासह ती रथयात्रा हस्तिनापुराकडे चालली.

सर्व नगर नागरिकांनीं परोपरीनें शृंगारलें होतें. गुढ्या, पताका, तोरणें, सडे, रांगोळ्या या सर्व उपचारांनीं मार्ग सुशोभित झाले होते. दुतर्फा

असलेल्या अट्टालिका आणि सौधांतून स्त्रिया हातीं आरत्या घेऊन त्या वीरपंचकाला ओवाळायला सिद्ध झाल्या होत्या. युद्धाचें दुःख त्या आनंदापुढें सर्वच्चजण विसरले होते.

नागरिक अत्यंत उत्सुकतेनें म्हणत होते,

" आज सुदीर्घ तेरा वर्षांनंतर–"

" आमचे पांडव–"

" तो धर्मज्ञ युधिष्ठिर–"

" पुरुषसिंह भीम–"

" अप्रतिम धनुर्धर अर्जुन–"

" देखणे नकुल आणि सहदेव–"

" होय–"

" ते नगरांत प्रवेशणार ! किती आनंद ! कसें सद्भाग्य ! "

हळू हळू रथयात्रा नगरांत शिरली. आपल्या त्या पितृभूमींत तेरा वर्षांनंतर पाऊल टाकतांना पांडवांचीं मनें नानाविध भावनांच्या आवेगानें गहिंवरलीं. नागरिकांनीं तर हर्षानें गदारोळच केला. सौध आणि अट्टालिकांतून पुष्पें, अबीर, गुलाल आदि पवित्र आणि सुगंधी वस्तूंचा वर्षावच होऊं लागला. ब्राह्मण स्वस्त्ययन म्हणूं लागले.

पण त्या आनंदाच्या शुभ्र पटावरही विषादाची एक काळी रेषा उमटून गेलीच. दुर्योधनाचा एक राक्षस मित्र चार्वाक सांप्रदायी ब्राह्मणाच्या वेषानें त्या समूहांत उपस्थित होता. तो मध्येंच ओरडला.

" युधिष्ठिराचा धिःकार असो ! "

सर्व लोक चमकून त्याचेकडे पाहूं लागले. ते शब्द कानीं पडतांच युधिष्ठिराची मुद्रा पुनः म्लान झाली. भीमाला रथ थांबविण्यास सांगून तो म्हणाला,

" त्या ब्राह्मणश्रेष्ठाला इकडे येऊं द्या ! "

रथाजवळ येऊन चार्वाक म्हणाला,

" युधिष्ठिरा, तूं दुष्ट आहेस ! "

" कां ? "

" तूं राज्यलोभानें आपलें कुल, ज्ञाति, गुरु, श्रेष्ठ या सर्वांची हत्या केली आहेस ! "

युधिष्ठिर ओढलेल्या स्वरांत म्हणाला,

" असें कुणाचें मत आहे ? "

" कुणाचें ? इथें उपस्थित असलेल्या सर्व ब्राह्मणांचें–क्षत्रियांचें–वैश्यांचें–शूद्रांचें. "

युधिष्ठिरानें समुदायाकडे वळून विचारलें,

" नागरिकहो, सांगा. हें खरें आहे काय ? आपलें मत जर असेंच असेल, तर– "

संतप्त भीमानें विचारलें,

" तर काय ? "

" तर–तर पुनः वनवास ! जीविताच्या अंतापर्यंत ! "

हे युधिष्ठिराचे शब्द कानीं पडतांच खवळलेले नागरिक म्हणाले,

" नाहीं ! युधिष्ठिरा, आतां आम्ही तुम्हाला जाऊं देणार नाहीं ! आम्हाला तुम्ही हवे अहांत ! " आणि नंतर त्या संतापलेल्या समूहानें त्या चार्वाकाला नुसत्या गर्दींतच गुदमरवून ठार मारलें !

## राज्याभिषेक––

एका शुभ मुहूर्तावर श्रीकृष्णानें आपल्या हातानें धरून युधिष्ठिरास सिंहासनाकडे चालविलें. राजसभा उत्तमोत्तम वस्त्रें परिधान केलेल्या नागरिकांनीं गच्च भरून गेलीं होती. वृद्ध धृतराष्ट्र एका बहुमूल्य आसनावर बसला होता. गांधारी, कुंती आदि राजस्त्रिया सौधांत बसल्या होत्या. सर्वच समारंभ गंभीरपणें पार पडत होता.

श्रीकृष्णानें युधिष्ठिरास आसनाधिष्ठित करून आणि पांचजन्यांत सप्तसरिता आणि सागराचें जल घेऊन त्याचा युधिष्ठिराच्या मस्तकावर स्वतः अभिषेक केला. धौम्यानें मंत्र म्हटलें. ब्राह्मणश्रेष्ठांनीं स्वस्तिमंत्र म्हणून युधिष्ठिरास आशीर्वाद दिले.

युधिष्ठिराच्या अर्धासनावर द्रौपदी विराजमान झाली होती. अभिषेक करीत असतां श्रीकृष्णानें सहेतुकपणें तिच्याकडे पाहिलें. डोळ्यांतलीं आंसवें पुशीत कृष्णा पुटपुटली,

" मुकुन्दा, तूं सत्यप्रतिज्ञ आहेस ! "

अभिषेक संपल्यावर युधिष्ठिरानें आसनावरून उठून धृतराष्ट्रास नमस्कार करीत म्हटलें,

" तात, एक इच्छा आहे."

" कोणती ? "

" हें राज्य आपल्या आज्ञेनें चालावें."

क्षणभर थांबून धृतराष्ट्र गदगदलेल्या स्वरांत म्हणाला,

" जशी तुझी इच्छा."

" तर मग आज्ञा व्हावी."

" कशाची ? "

" मृत वीरांचें स्मरण चिरकाल रहावें, या हेतूनें धर्मशाळा, पाणपोया, अन्नछत्रें, तळीं, विहिरी, मार्ग आदि निर्माण करावें, असें मला वाटतें."

" तूं अत्यंत बुद्धिमान् आहेस. तसेंच कर."

" आणखी एक–"

" काय ? "

" अठरा अक्षौहिणी सेना युद्धांत धराशायी झाली. त्या वीरांच्या विधवा स्त्रिया आणि अनाथ मुलें–"

" त्यांचें काय ? "

" त्या सर्वांचें राज्याकडून पालन करण्याची व्यवस्था व्हावी."

" उत्तम आहे."

युधिष्ठिरानें मंत्री, अमात्य, अधिकारी ही सर्व व्यवस्था निर्माण करून त्यांना वरील संकल्प त्वरित पुरे करण्याची आज्ञा दिली.

## उत्तरायण—

एके दिवशीं युधिष्ठिर श्रीकृष्णाच्या प्रासादांत गेला असतां राजसेवक विनयानें त्याला म्हणाले,

" भगवान ध्यानस्थ आहेत."

युधिष्ठिराला अत्यंत आश्चर्य वाटलें. श्रीकृष्ण थोड्या वेळानें उठून युधिष्ठिराला म्हणाला,

" अभिषेकाची गडबड निवारली ? "

" होय — पण —"

" पण काय ? "

" मुकुंदा, एका शंकेचें समाधान—"

" कसली शंका ? "

" आतां तूं कसलें ध्यान करीत होतास ? "

स्मित करीत श्रीकृष्ण म्हणाला,

" भीष्मांचें."

" भीष्मांचें ? "

" होय युधिष्ठिरा. भीष्म सतत मजकडे लक्ष लावून आहेत. त्यामुळें माझें मन सहजच तिकडे आकर्षित झालें."

व्याकुळ होऊन युधिष्ठिर म्हणाला,

" श्रीकृष्णा, त्या वृद्ध ताताला पहावें, असें माझ्या मनांत फार आहे. आपण आजच तिकडे जाऊं या."

रथांत बसून पांडव आणि श्रीकृष्ण भीष्म शरपंजरीं पडले होते, तिकडे निघाले. भीष्म उत्तरायणाची वाट पहात प्राण धरून होते. या सर्वांना पहातांच भीष्मांना अत्यंत संतोष झाला. ते क्षीण स्वरांत म्हणाले,

" ये श्रीहरि ! "

सर्वांनीं भीष्मांस नमस्कार केला. खालीं बसत श्रीकृष्णानें विचारलें,

" मन प्रसन्न आहे ना ? "

" तें तुझें चिंतन करीत आहे."

" आणि शरीर ? "

" तें उत्तरायणाची वाट पहात आहे ! "

श्रीकृष्ण म्हणाला,

" एक इच्छा आहे."

" तुला ? "

" होय. मलाही. "

" कोणती ? "

" आपण ज्ञानवृद्ध आणि वयोवृद्ध अहांत. क्षात्रधर्म, राजधर्म, आश्रमधर्म हे सगळे आपणांस संपूर्णपणें अवगत आहेत. उत्तरायण सुरू होईतोंवर आपण युधिष्ठिराला त्या सर्वांचा उपदेश करावा."

" म्हणजे काय होईल ? "

" त्याचा शोक आणि मोह नष्ट होईल."

श्रीकृष्णा, तूं सर्व ज्ञानाचें विधान. तूंच हें कां करीत नाहींस ? "

" भीष्मा, माझ्या भक्ताचें यश आणि कीर्ति वृध्दिंगत व्हावी असें मला फार वाटतें. भक्तश्रेष्ठ भीष्मांना पुढील पिढ्या राजधर्मनिपुण म्हणून ओळखोत !"

भीष्मांच्या नेत्रांतून अश्रुप्रवाह वाहूं लागला. तो तसाच वाहूं देत ते म्हणाले,

" श्रीकृष्णा, मी असमर्थ आहें रे ! "

" कां ? "

" शरीर बाणांनीं विध्द झालें आहे. मन कसें तरी तुझ्या स्वरूपीं स्थिर ठेवण्याचा मी प्रयत्न करीत आहें. पण मूर्छा वारंवार मजवर आक्रमण करून माझी मन-बुद्धि अंधःकाराच्या महासागरांत बुडवून टाकीत असते. तेव्हां मजकडून हें कसें होईल ? माझ्याच्यानें तर धडपणें बोलवतही नाहीं–"

श्रीकृष्ण गंभीरपणें म्हणाला,

" तुमची मूर्छना, वेदना, मोह, क्लेश हें सर्व नाहींसें होईल. अंतापर्यंत तुमची बुद्धि दर्पणाप्रमाणें स्वच्छ असेल. "

सूर्य अस्तास चालला होता. श्रीकृष्ण भीष्मांस म्हणाले,

" तर मग उद्यां–"

नगरास परतून दुसरे दिवशीं प्रभातकालीं श्रवणेच्छु समूहासह पांडव आणि श्रीकृष्ण भीष्मांजवळ गेले. श्रीकृष्ण म्हणाला,

" कुशल आहे ना ? "

" मुकुन्दा, तुझी कृपा झाल्यावर काय अशक्य आहे ? आतां मला कसलेही क्लेश उरले नाहीत. युधिष्ठिरा, तूं योग्य पृच्छक आहेस. काय शंका असतील त्या विचार. "

त्यानंतर तो अपूर्व संवाद उत्तरायण लागेपर्यंत सुरू होता !

युधिष्ठिर एकेक प्रश्न विचारी आणि भीष्म त्याचें सांगोपांग उत्तर देत. श्रोतृसमूह सर्व अंगांचे कान करून मोठ्या उत्सुकमनानें तें अमृतप्रवचन ऐकत असे.

राजधर्म, राजाचीं कर्तव्यें, क्षात्रधर्म, जनहितांत तत्परता, धर्मयुद्ध, अर्थ, काम, मोक्ष यांसह धर्माचा विस्तार, आश्रमधर्म, समता, इन्द्रियदमन, क्षमा, नम्रता आदि असंख्य विषयांवर शंका विचारल्या गेल्या, आणि अत्यंत रसाळपणें त्यांचीं उत्तरें दिलीं गेलीं.

छप्पन दिवस हें ज्ञानसत्र सुरू होतें. नंतर सूर्यानें दाक्षिण दिशा सोडून उत्तरेंत प्रवेश केला. भीष्म म्हणाला,

" गोविंदा, आतां पुरे."

" कां ? अजून तर आमचे श्रवण अतृप्तच आहेत. "

" पण तूं मजवर सोंपविलेलें कार्य मीं माझ्या बुद्धीप्रमाणें यथासांग पार पाडलें आहे. "

" तर मग आतां पुढें काय ? "

" मीं तुझ्याजवळ शरीर त्यागाची अनुज्ञा मागतों. "

" मी आपल्या इच्छेच्या आड येत नाहीं. "

त्या दिवशीं धृतराष्ट्र सर्व आप्तेष्टांसह भीष्मांच्या दर्शनास आला. त्याला आशीर्वाद देत भीष्म म्हणाले,

" राजा, आतां माझें एक सांगणें ऐक. "

" काय ? "

" पुत्रांचा मोह त्यागून पांडवांवर अकृत्रिम प्रेम करीत जा. "

" जशी आज्ञा. "

" श्रीकृष्णा, असा समोर ये रे ! माझ्याच्यानें वळवत नाहीं ! "

श्रीकृष्ण समोर आल्यावर भीष्म आनंदानें ओतप्रोत होऊन म्हणाले,

" मुकुंदा, तूं योग्यांच्या ध्यानाची वस्तु ! पूर्वजन्मी काय पुण्य केलें होतें, म्हणून तूं सशरीर या क्षणीं समोर उभा आहेस. आतां एकच मागणें आहे."

" काय ? "

" जन्मोजन्मीं हेंच भाग्य लाभूं दे ! "

" हे निष्पापा, तथास्तु ! "

श्रीकृष्णाचेंच ध्यान आणि चिंतन करीत प्रसन्न वदनानें भीष्मांनीं देहत्याग केला तो कुरुकुलश्रेष्ठ अशा रीतीनें शांत मनानें हा लोक सोडून गेला !

## अश्वमेध-संकल्प—

भीष्मांची उत्तरक्रिया करून युधिष्ठिर परतला, आणि शोकभरानें त्यानें धरणीवर अंग टाकून दिलें. पुनः तो मोहानें व्याकुळ झालेला पाहून व्यास म्हणाले,

" पुत्रा, अरे काय हें ! "

" तात, भीष्मांना देहत्याग मजमुळें करावा लागला--"

" अजून तुझा मोह नष्ट झाला नाहीं काय ? "

" मला वनांत जाऊन राहावेंसें वाटतें ! "

" तुझ्या या स्खलनशील बुद्धीचें मला आश्चर्य वाटतें. "

" या क्रूर कृत्यापासून माझी सुटका कधींच होणार नाहीं काय ? "

क्षणमात्र चिंतन करून व्यास म्हणाले,

" पुत्रा, यावर एक उपाय आहे."

" कोणता ? "

" अश्वमेध यज्ञ करून तूं गोरगरिबांस यथेष्ठ दान कर. त्यामुळें तुझ्या मनाला शांति लाभेल. "

" पण दान करण्यास द्रव्य मी कुठून आणूं ? माझा कोष रिता झाला आहे."

" द्रव्याची तूं मुळींच चिंता करूं नकोस. हिमालयाच्या परिसरांत एकदां मरुत्तानें एक महायज्ञ केला होता. त्याच्या त्या यज्ञांत जें अपार धन गोळा केलें गेलें होतें, तें अजून तिथें तसेंच आहे. तें आणवून तूं तुझा यज्ञ सिद्धीस ने. "

श्रीकृष्णानेंही व्यासांच्या म्हणण्याचेंच समर्थन केलें. तेव्हां मग अश्वमेध यज्ञाचा संकल्प करून युधिष्ठिर हस्तिनापुरास परतला. तिथें त्याला पोंचवून त्याचें राज्यशासन सुसूत्र चालूं लागल्यावर एके दिवशीं श्रीकृष्ण अर्जुनास म्हणाले,

" मित्रा, तुमच्या सर्व इच्छा पूर्ण झाल्या आहेत. "

" माधवा, ही कशाची प्रस्तावना आहे ? "

हंसून कृष्ण बोलला,

" मी द्वारकेस जाईन म्हणतों—"

कांहीं काळ विचार करून अर्जुन म्हणाला,

" मुकुन्दा, तुला इकडे येऊन बरेच दिवस झाले आहेत. तेव्हां मी तुला अधिक आग्रह करीत नाहीं. मात्र माझी एक इच्छा पुरवून मग तूं जा. "

" कोणती ? "

" युद्धाच्या ऐन टिपरघाईत तूं मला जो उपदेश केलास, तो जणूं विस्मृतप्राय झाला आहे. तेवढा एकदां पुनः मला सांग. "

मग श्रीकृष्णानें पुनः अर्जुनाला औपनिषद् तत्वज्ञान सांगितलें. कृतार्थ होऊन अर्जुन म्हणाला,

" माधवा, आतां मी कृतार्थ झालों आहें. "

नंतर ते दोघे युधिष्ठिराजवळ जाऊन पोंचले. श्रीकृष्णाचा संकल्प ऐकतांच कष्टी मनानें युधिष्ठिर म्हणाला,

" मी तुला एका अटीवर अनुमति देत आहें. "

" कोणती ? "

" तूं स्वतः यज्ञास उपस्थित राहून त्याची सांगता केली पाहिजेस. "

" ठीक आहे. "

भीम, द्रौपदी आदि सुहृदांचा निरोप घेऊन श्रीकृष्ण द्वारकेस गेला.

नंतर सर्व पांडव ससैन्य हिमालयाच्या पायथ्याशीं जाऊन तेथून अमूप द्रव्यसंभार घेऊन परतले. तें द्रव्य उंट, हत्ती, रथ, बैल, गाढवें अशा अनेक वाहनांवर लादले होतें. त्याच्या स्वागतार्थ नागरिकांचे थवेच्या थवे मार्गांत गोळा झाले होते. जयजयकार करीत त्यांनीं अत्यंत आनंदानें द्रव्य घेऊन आलेल्या पांडवांचा सत्कार केला. सहर्ष पांडव पुढें निघाले.

## परीक्षित जन्म—

थोड्याच दिवसांत श्रीकृष्ण यादवचमूसह हस्तिनापुरास आला. धृतराष्ट्रानें अत्यंत आदरानें त्या सर्वांचें स्वागत करून त्यांना राहाण्यासाठीं उत्तम प्रासाद दिले.

अभिमन्यूची पत्नी उत्तरा युद्धसमयीं गर्भवती होती. युद्धांत अभिमन्यूचा वध झाल्यापासून तिनें अन्न टाकलें होतें. कुंती तिला समजावून म्हणे,

" माझ्या मुली, असें कां ग करत्येस ? "

" उत्तरा विव्हल स्वरांत उत्तर देई,

" मी जगून काय करूं ? "

" कमींत कमी तुझ्या उदरांत असलेल्या गर्भासाठीं तरी—"

" आणि अश्वत्थाम्याचें ब्रह्मास्त्र ? "

कुंती निर्धारानें म्हणे,

" तूं चिंता करूं नकोस. श्रीकृष्णानें तो भार आपल्या शिरावर घेतला आहे. "

लवकरच तो प्रसंग प्राप्त झाला. उत्तरेचें पोट दुखूं लागलें. अन्तःपुरांत एकच गोंधळ उडाला. पांडवांच्या वंशाचा एकमेव तन्तु जन्माला यायचा होता. त्याच्या स्वागतासाठीं सर्व स्त्रिया अत्यंत उत्सुक झाल्या होत्या.

उत्तरा प्रसूत झाली, हें कळतांच बाहेर जमलेल्या समूहानें आनंदानें गदारोळ केला. तोंच एक दासी स्फुंदत बाहेर आली, आणि म्हणाली,

" आतां मी काय करूं ? "

समूहानें विचारलें,

" काय झालें ? "

" काय होणार ? राजकन्येला पुत्र झाला—पण—"

" लौकर कां सांगेनास ? "

" तो प्राणहीन आहे ! "

विषादाच्या छायेनें त्या सर्व नगरींतलें वातावरण जणूं अंधारून टाकलें. एक दूत श्रीकृष्णाच्या प्रासादांत जाऊन घाईघाईनें म्हणाला,

" भगवन् , माता कुंती उत्तरेच्या आवासांत आपलें स्मरण करीत आहेत ! "

" कशासाठीं ? "

" उत्तरा–ती मृत पुत्र प्रसवली ! "

श्रीकृष्ण घाईघाईनें उत्तरेच्या आवासाकडे निघाला. वाटेंत आक्रोश करीत असलेल्या कुंती, द्रौपदी व सुभद्रा त्याला दिसल्या. कुंती त्याला पाहतांच रडत म्हणाली,

" कृष्णा ! कसें झालें रे हें ! "

" शांत हो आते ! "

" अरे कशी शान्त होऊं ? पांडवांच्या वंशाचा दीप आज विझून गेला. "

" असें होणार नाहीं. "

सुभद्रेनें डोळ्यांतलीं आंसवें पुशीत श्रीकृष्णाकडे अत्यंत विव्हळ दृष्टीनें पाहिलें. तिच्या मस्तकावर हात ठेऊन तिला अभय देत श्रीकृष्ण म्हणाला,

" पूस तीं आंसवें–"

" गोविंदा ! "

" मी आहेंना ! "

नंतर त्यानें उत्तरेच्या आवासांत प्रवेश केला. उत्तरा तर जणूं बाण लागलेल्या मृगीसारखी तळमळत होती. श्रीकृष्णाला पाहतांच ती आपलें तें मृत बाळ हातांत घेऊन म्हणाली,

" बाळा, अरे ऊठ ना ! असा उद्धटासारखा झोंपला काय आहेस ? धर्मज्ञ अभिमन्युचा पुत्र ना तूं ? तुझे तात आले आहेत ! त्यांना नमस्कार कर.

" अरे, तुझ्या पित्याचे नेत्र या मधुसूदनाच्या नेत्रांसारखेच अत्यंत सुंदर होते. तुझेही तसेच असतील ! ते उघड ना ! "

पण बाळाच्या अवस्थेंत कांहीं परिवर्तन होत नाहीं, हें पाहून आर्त कुरंगीप्रमाणें ती श्रीकृष्णाशीं बोलूं लागली,

" श्रीहरि, माझ्या मनींचें गुज असें होतें, कीं पुत्राला हातांत घेऊन मी तुला नमस्कार करीन. पण ती कामना तर असफल झाली रे !

" महाराज युधिष्ठिर मज करंटीला विष कां गिळूं देत नाहींत ?

" आतां मी कां जगूं ?

" श्रीहरि, अभिमन्युवर तुझें अत्यंत प्रेम होतें. पण एखाद्या निष्ठुराप्रमाणें ते तुला न विचारतांच रणांत धराशायी झाले—

" हा त्यांचा आणि माझा पुत्रही तूं समक्ष उपस्थित असतां देखील तुझी अनुज्ञा न घेतांच चालता झाला !

" यांच्या या औधत्याबद्दल तूं मला क्षमा कर ! "

श्रीकृष्णाचें अंतःकरण तिचा दारूण शोक पाहून द्रवित झालें. तो तिच्या-समोर उभा राहून नेत्रांना पाणी लावीत म्हणाला,

" ऐक उत्तरे !

" जर आजपर्यंत मी असत्य भाषण केलें नसेल—

" रणांत पाठ दाखविली नसेल,

" धर्म मला अत्यंत प्रिय असेल,

" अर्जुनाशीं कधीं विरोध केला नसेल,

" श्रेष्ठांचा नेहमीं सन्मान केला असेल,

" सत्य व धर्म माझ्या ठिकाणीं स्थित असतील,

" कंस आणि केशी यांचा वध न्यायानें केला असेल,

" तर तुझा हा पुत्र जीवंत होवो !

" ब्रह्मास्त्राचा अभिशाप याच्यावरून नाहींसा होवो !

आणि काय चमत्कार ! उत्तरेचा मृत पुत्र हातपाय हलवूं लागला ! त्याच्या अंगीं चेतना संचरली. ही वार्ता बाहेर पसरायचा अवकाश, सुभद्रा,

द्रौपदी, कुंती या सगळ्या जणी धांवतच इकडे आल्या. आनंदानें गद्गद होऊन द्रौपदी म्हणाली,

" सख्या माधवा, तूं फार चांगला आहेस ! "

सुभद्रा पुटपुटली,

" माझा बन्धु–"

कुंती म्हणाली,

" श्रीकृष्णा, आतां याचें नांव काय ठेवायचें ? "

क्षणैक चिंतन करून श्रीकृष्ण बोलला,

" याचें नांव परीक्षित, "

" कां रे गोविंदा ? "

" पांडवांचें क्षीणप्राय झालेलें कुल–त्याचें याच्यामुळें रक्षण झालें म्हणून. "

आनंदाच्या सरोवरांत सर्व हस्तिनापुरानें जणूं काय निमज्जन केलें. नट, मल्ल, सूत, मागध, ज्योतिषी, चारण, नर्तिका, हे सर्व श्रीकृष्णाचा जयजयकार गाऊं लागले.

मग सर्व नागरिकांनीं अत्यंत उत्साहानें पांडवांच्या स्वागताची सिद्धता केली. पांडव द्रव्य घेऊन परततांच त्यांनीं त्यांचा सत्कार करून ही वार्ता त्यांच्या कानीं घातली. युधिष्ठिर आनंदानें रोमांचित होऊन म्हणाला,

" श्रीहरीची माया अतर्क्य आहे ! "

अर्जुनानें धांवत जाऊन श्रीकृष्णाची पूजा केली, आणि त्याला म्हटलें,

" श्रीहरि , तूं माझ्या जीवींचें निधान आहेस ! "

## अश्वपर्यटण—

चैत्र पौर्णिमेला युधिष्ठिरानें यज्ञदीक्षा घेतली, आणि व्यासांनीं श्यामकर्ण अश्वाची पूजा करून पृथ्वीपर्यटण करण्यासाठीं त्याला मोकळें सोडलें. अर्जुन सैन्य घेऊन त्याच्या रक्षणासाठीं मागोमाग निघाला. या पाळीला युधिष्ठिर त्याला म्हणाला,

" अर्जुना, एक गोष्ट लक्षांत असूं दे. "

" कोणती ? "

" अश्वाचा मार्ग रोधून धरील, त्या राजाला तूं युद्ध करून पराजित कर. पण त्याचा प्राण घेऊं नकोस. "

नाना देश पालथे घालीत, नद्या पार करीत, पर्वत ओलांडीत तो अश्व स्वच्छंदानें फिरूं लागला. त्रिगर्त, सूर्यवर्मा, धृतवर्मा, वज्रदत्त, सिन्धु देशीय वीर, मगधराज, शरभ, गांधार, आदि अनेक नृपांनीं महाभारतीय युद्धांतील पराभवाचें उट्टें काढण्यासाठीं अश्वाला अडवून अर्जुनाशीं युद्ध मांडलें. पण त्या सर्वांचा पराभव करून त्यानें त्यांच्याकडून करभार घेतला.

अश्व मणिपुर राज्यांत शिरला. अर्जुनापासून चित्रांगदेला झालेला पुत्र बभ्रुवाहन तिथें राज्य करीत होता. आपला पिता अश्वाबरोबर येत आहे, हें पाहून तो त्याच्या स्वागतासाठी पुढें झाला.

पण अर्जुन किंचित् रोषानें त्याला म्हणाला,

" पुत्रा, हें तूं काय करीत आहेस ? "

" आपलें स्वागत. "

" अरे, मी सैन्य घेऊन तुझ्या राज्यांत शिरलों असतां माझें स्वागत ? "

चलितचित्त बभ्रुवाहन म्हणाला,

" मग मीं काय करणें आपल्याला इष्ट वाटतें ? "

" युद्ध ! "

" ठीक आहे ! "

बभ्रुवाहन रथांत बसून आपल्या सेवकांना म्हणाला,

" धरा रे तो अश्व ! पांडवांना कळलें पाहिजे, कीं मणिपुरांतही शूरांचें वास्तव्य आहे ! "

सेवकांनीं अश्व धरलेला पाहून अर्जुनास संतोष झाला. तोंच बभ्रुवाहन त्या सेवकांच्या पाठोपाठ शस्त्र उचलीत पुढें झालेला त्याला दिसला. तो गांडीव सांवरीत हर्षानें म्हणाला,

" छान ! आतां हें माझ्या पुत्राला शोभेसें झालें. "

ते दोघेही पितापुत्र परस्परांवर बाण सोडूं लागले. अर्जुन सांभाळून लढत होता, तर बभ्रुवाहन त्वेषानें. शेवटीं एकमेकांचे बाण लागून दोघेही मूर्छित होऊन पडले !

चित्रांगदेला ही वार्ता कळतांच ती धांवतच युद्ध क्षेत्रावर आली. तों तिला तिथें आणखी एक स्त्री हंसत असलेली दिसली.

विव्हल चित्रांगदा म्हणाली,

" तूं कोण आहेस ? "

" मी नागकन्या उलूपी. महारथी अर्जुनाची पत्नी. "

" आणि मग तूं अशी हंसत्येस कां ? अगे, हा बघ ! आपल्या दोघीं-चाही पति रणांत मृत होऊन पडला आहे ! "

चित्रांगदा अर्जुनाजवळ बसून धाय मोकलून रडूं लागली. तोंच बभ्रुवाहनही शुद्धीवर आला. आपल्या हातून झालेला प्रकार कळतांच तोही अपरंपार खेद प्रगट करीत प्रायोपवेशनाच्या निश्चयानें ठाण मांडून बसला.

पण उलूपी म्हणाली,

" चित्रांगदे, ऐक. अर्जुनाला युद्धांत मारण्याचें सामर्थ्य कोण्याही वीराचे अंगीं नाहीं. "

" मग हे असे मृतवत् कां पडले आहेत ? "

" तें भीष्मांना आडून मारल्याचें प्रायश्चित आहे. "

" तर मग हे कसे उठतील ? "

उलूपीनें आपल्या नागकुलांतील संजीवन मणि बभ्रुवाहनला दिला. नंतर ती म्हणाली,

" पुत्रा, हा मणि या महावीराच्या वृक्षःस्थलावर ठेव म्हणजे हा उठून बसेल. "

बभ्रुवाहननें त्याप्रमाणें करतांच अर्जुन उठून बसला. मग चित्रांगदा व उलूपी या दोघींनीं त्याचा सत्कार करीत त्याला सर्व वृत्त ऐकविलें. नंतर

अर्जुनानें बभ्रुवाहनाला जवळ घेऊन आशिर्वाद दिला, आणि त्याला युधिष्ठिराच्या यज्ञास मातेसह येण्याचें निमंत्रण दिलें. बभ्रुवाहन म्हणाला,

" तात, मी तर यज्ञांत उपस्थित होऊन ब्राह्मणांस वाढीनच. पण आपण माझी एक कामना पुरी करावी. "

" कोणती ? "

" आजचा दिवस आपण या माझ्या दोन्ही मातांसह नगरांत व्यतीत करावा. "

" पुत्रा, मला तसें करतां येत नाहीं. कारण मीं अश्वरक्षणाचें व्रत घेतलें आहे. "

त्याची समजूत घालून अर्जुन पुढें निघाला, आणि शेवटीं अनेक देश परिभ्रमण करीत अश्वाबरोबर हस्तिनापुराजवळ आला.

## यज्ञपूर्ति—

इकडे युधिष्ठिरानें यज्ञाची इतर सर्व सिद्धता करून ठेवली होती. अर्जुन अश्वासह परतला आहे, हें ऐकतांच त्यानें नगराबाहेर परिवारासह जाऊन अर्जुनाचें स्वागत केलें.

मग व्यास आणि याज्ञवल्क्य यांच्या देखरेखीखालीं यज्ञ सुरू झाला. यज्ञासाठीं देशोदेशीहून ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असा अपार जनसमूह एकत्र झाला होता. त्यांत अनेक वादकुशल पंडित होते, नट होते, वादक, नर्तक आणि गायकही होते.

आपापलें कलाप्रदर्शन करून ते जनसमूहास रिझवीत असत. त्यांना युधिष्ठिराकडून तर दानें मिळतच, पण जनसमुहांतूनही नाना प्रकारच्या वस्तु मिळवून ते श्रीमंत झाले. त्या यज्ञांत दरिद्री कोणीही राहिला नाहीं.

हवनकर्म यथासांग पार पडलें. अश्वाचा यथाशास्त्र वध करून त्याची वपा, तीळ, तूप, हवनद्रव्य या सर्व वस्तु होमिल्या गेल्या. त्या पवित्र, सुगंधी धुरानें आकाश कोंडून गेलें.

भोजनाचा थाट तर अपूर्वच होता. नाना प्रकारचीं स्वादिष्ट पक्वान्नें युधिष्ठिराचे स्वयंपाकी सिद्ध करीत. यज्ञांत आलेले राजे, ऋषी, पंडित, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, सर्वांसच मोठ्या आदरानें तें अन्न वाढलें जाई. संतुष्ट होऊन याचक म्हणत,

" असा यज्ञ कुठें झाला नाहीं. "

" असें अन्न कुठें मिळालें नाहीं. "

यज्ञ संपल्यावर युधिष्ठिरानें इतरांस तर अगणित दक्षिणा वाटलीच, पण व्यासांना दक्षिणेदाखल सर्व पृथ्वी दान दिली.

व्यास म्हणाले,

" युधिष्ठिरा, पृथ्वी घेऊन मी काय करूं ? "

" मला काय माहीत ? "

" मी क्षत्रिय नाहीं. राज्य नेटकेपणें तूंच करूं शकशील. तर ही पृथ्वी परत घे. "

" एकदां दिलेलें दान परत घेऊं ? "

" तिच्याबद्दल मला सुवर्ण दे म्हणजे झालें. मी तें या सर्व उपस्थितांस वाटीन. "

यज्ञसांगता झाली. शेवटील भोजन सुरू झालें. उपस्थित जनसमूह भोजनानंतर ढेंकरा देत युधिष्ठिराला आशीर्वाद देऊं लागला. युधिष्ठिरालाही कृतार्थ झाल्यासारखें वाटलें.

तोंच एक अद्भुत घडलें.

अर्धें शरीर सोन्याचें असलेलें एक मुंगुस धांवत येऊन त्या भोजनागारांत गडबडा लोळूं लागलें. पण थोड्या वेळानें तें म्हणूं लागलें,

" नव्हे ! नव्हे ! "

मुंगुसाचें तें अद्भुत रूप पाहून त्याच्या भोंवतीं प्रचंड जनसमूह गोळा झाला होता. मुंगुस मनुष्यवाणीनें बोलत असलेलें पाहून आश्चर्यचकित झालेले ब्राह्मण म्हणाले,

" काय नव्हे ? "

" त्या तोलाचा हा यज्ञ नव्हे !

" कोणत्या तोलाचा ? "

" कुरुक्षेत्रांतील उंच्छवृत्तीच्या ब्राह्मणानें मापटेंभर भाताचें हवन करून जो यज्ञ केला होता, त्याच्या तोलाचा ? "

" कां ? "

" कां म्हणून विचारतां ? माझें अर्धें अंग अजून सोन्याचें झालें नाहीं ना ! "

" भल्या मुंगसा, आम्हाला तुझें हें रूप आणि वाणी पाहून अत्यंत आश्चर्य वाटत आहे. तुझी सगळी कथा कां सांगेनास ? "

" ऐका. कुरुक्षेत्रावर एक परम सात्विक वृत्तीचा ब्राह्मण उंछवृत्तीनें राहात असे. शेतकऱ्यांनीं धान्य कापून नेल्यावर मागें जे दाणे उरतील, ते वेंचून हा ब्राह्मण आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालवीत असे. पत्नी, पुत्र व सून असा त्याचा परिवार.

" एकदां दुष्काळ पडला. धान्यच पिकलें नाहीं. मग उंछवृत्ति कशी चालणार ! त्या ब्राह्मण कुटुंबाला उपास पडूं लागले. शेवटीं एक दिवस मोठ्या प्रयत्नानें त्यानें एक प्रस्थ भाताचे दाणे वेंचून आणले.

" पत्नीनें तें अन्न कुटून त्याचा भात केला. जपादि आन्हिक उरकलें. त्या भाताचे चार वाटे करून आतां ब्राह्मण कुटुंब जेवावयास प्रारंभ करणार, तोंच दारीं एक अतिथि ठाकला. उपासामुळें त्याचें पोट व पाठ एक झालीं होतीं.

" अतिथि म्हणाला, ' ॐ भवति भिक्षां देहि ! '

" ब्राह्मणानें कळवळून आपला भाग त्या अतिथिला देऊन टाकला, तरी अतिथीचें पोट भरेना ! मग ब्राह्मणपत्नी म्हणाली,

' माझाही वांटा अतिथीला द्या. '

" तरी अतिथीची क्षुधा तृप्त होईना. मग पुत्र बोलला,

‘ तात, माझाही वांटा अतिथीला अर्पण करा. ’

“ पण अजून अतिथि उपाशीच राहिला. तेव्हां सून आपला वाटा ब्राह्मणाचे हातीं देत म्हणाली,

‘ माझ्या भागानें तरी अतिथि तृप्त होऊं दे ! ’

“ भोजन झाल्यावर अतिथि संतुष्ट होऊन म्हणाला,

‘ भल्या माणसा, तुझ्या या यज्ञाचें महत्त्व अवर्णनीय आहे. यामुळें तुला शुभलोक प्राप्त झाला आहे. ’

“ ब्राह्मण कुटुंब या अपूर्व दानानें स्वर्गास गेलें. अतिथि जेवला त्या ठिकाणीं पाणी सांडून चिखल झाला होता. मी त्यांत लोळलों, तों माझें अर्धे अंग सुवर्णाचें झालें. उरलेलें अर्धे अंगही सोन्याचें व्हावें, म्हणून मी ठिकठिकाणीं झालेल्या यज्ञांत लोळून आलों. कुठेंच माझा हेतु सफल झाला नाहीं.

“ शेवटीं या महायज्ञाची कीर्ति ऐकून मी इथें आलों.

“ ऋत्विजहो, वाईट वाटूं देऊं नका.

“ पण हा यज्ञ कांहीं त्या यज्ञाच्या तोडीचा झाला नाहीं ! ”

इतकें बोलून तें मुंगूस गुप्त झालें. ब्राह्मण चकित होऊन या वृत्ताची चर्चा करीत घरोघर परतले.

## धृतराष्ट्र–वन–गमन—

पांडव धृतराष्ट्राच्या आज्ञेबाहेर तिळभरही जात नसत. ते त्याला व गांधारीला संतुष्ट ठेवावयाचा कसोशीचा प्रयत्न करीत. एक भीम मात्र कधीं कधीं त्यांच्याविरुद्ध बंड करून उठे. तो म्हणे,

“ या दुष्टबुद्धीच्या म्हाताऱ्यानें द्यूताचे वेळीं मोठ्या कौतुकानें आपल्या कुपुत्रांना काय जिंकलें, काय जिंकलें, असें विचारलें होतें. पण त्याचे ते सर्व नीच पुत्र मीं या माझ्या पुष्ट बाहूंनीं ठार मारले ! ”

युधिष्ठिर त्याला समजावीत म्हणे,

" भीमा, असें बोलूं नये, "

" मग कसें बोलावें ? "

" तात आतां वृद्ध झाले आहेत."

" पण मला उगीच खोटें सोंग करतां येत नाहीं. "

भीमाचीं हीं दुरूत्तरें धृतराष्ट्राच्या कानीं पडत. तो उदास होऊन युधिष्ठिराला म्हणाला,

" पुत्रा, आतां माझी वृद्धपणींची इच्छा ऐक, "

" आज्ञा व्हावी. "

" मला वनांत जाण्याची अनुमति दे. "

खिन्न होऊन युधिष्ठिर बोलला,

" चला, आपण सगळेच्च जाऊं. "

" मुला, असें कां करतोस ? "

" आम्हीं आपल्या मनाविरुद्ध वर्तन केलें काय ? "

" मनाविरुद्ध—नाहीं. पण मला जाऊं दे. "

व्यासांनींही धृतराष्ट्राच्या संकल्पाचें समर्थन केलें. तेव्हां मग युधिष्ठिरानें मोठया कष्टानें त्याच्या संकल्पास अनुमति दिली. धृतराष्ट्राच्या इच्छेप्रमाणें विदुर, गांधारी, कृपाचार्य यांनींही त्याच्याबरोबर वनांत जायचें ठरविलें.

सर्व सिद्धता झाल्यावर धृतराष्ट्र युधिष्ठिरास म्हणाला,

" पुत्रा, आतां माझ्या पुत्रांच्या नांवानें श्राद्धें करून शेवटचें दान द्यावें, अशी माझी इच्छा आहे."

" तर मग आज्ञा व्हावी, "

" त्यासाठीं मला द्रव्य हवें आहे. "

" जशी आज्ञा, "

हा संकल्प भीमाला कळतांच तो संतापून म्हणाला,

"आम्हीं भीष्मादिकांच्या नांवानें श्राद्धें करून दान देऊं. पण म्हाताऱ्याला आतां कीर्तीचा लोभ कशाला? दानें देऊन याला कोणते शुभलोक प्राप्त होणार आहेत? आणि नरकांत जाऊं देत याचे दुष्ट पुत्र. आम्हांला त्यांच्याशीं काय करावयाचें आहे?"

युधिष्ठिरानें दटावून भीमाला स्वस्थ बसविलें, आणि धृतराष्ट्राला आपलीं भांडारें उघडून दिलीं. त्यानें भीष्म, द्रोण आदि मृतवीरांचीं श्राद्धें करून याचकांना अमाप संपत्ति वाटून तृप्त केलें.

कुंतीनें मनाशीं कांहीं एक निश्चय करून धृतराष्ट्राबरोबर वनांत जायचें ठरविलें. श्राद्धानंतर दुसरे दिवशीं या सर्व वृद्धांनीं हरिणाजिनें पांघरलीं, आणि शुभ प्रभातीं ती सर्व जणें प्रासादांतून कधींही परत न येण्यासाठीं वनाकडे निघालीं.

अपार जनसमूह द्वाराशीं एकत्र होऊन मूक शोक करूं लागला. तीं वृद्धें बाहेर पडलीं, तेव्हां मात्र युधिष्ठिरादिकांचा शोक हृदय भेदून बाहेर पडला. खालीं कोसळून रडत युधिष्ठिर म्हणूं लागला.

"बाबा, आम्हा अनाथांना टाकून कोठें निघालांत हो!"

भीम, अर्जुन, नकुल, सहदेव, द्रौपदी, सुभद्रा हीं सर्व जणें शोकाच्या पुराबरोबर वाहवत त्यांच्या मागोमाग चाललीं. धृतराष्ट्रानें आपले मन कठोर केलें. तो संथपणें विदुराच्या खांद्यावर हात ठेवून मार्गक्रमण करीत जनसमूहास म्हणूं लागला,

"आम्हावर कृपा करा. विनाकारण आम्हाला मोहांत गुंतवूं नका. आतां इथेंच थांबा."

युधिष्ठिर व भीम कुंतीचा मार्ग रोधून तिला म्हणाले,

"आई, तूंही निष्ठुर झालीस ना? मग आम्हाकडून युद्ध तरी कशाला करविलेंस?"

त्यांचें कसेंबसें समाधान करीत कुंती [illegible] मागोमाग निर्धारानें नगराबाहेर पडली. शेवटीं तो उदास समूह खिन्न मनानें नगरांत परतला.

## विदुर-मुक्ति—

पांडव हस्तिनापुरांत परतले खरे, पण त्यांना मुळींच करमेना. प्रत्येक जण उसासे टाकीत या वृद्धांची आठवण काढूं लागला. द्रौपदी खिन्न होऊन म्हणाली,

" श्रेष्ठा, कुंतीसासूबाईची व माझी आतां कधींच भेट होणार नाहीं काय ?"

" होईल ! अवश्य होईल. "

" केव्हां ? "

" आपण त्यांच्या दर्शनासाठीं जाऊं—आजच. "

त्याच दिवशीं असंख्य नागरिकांसह पांडव धृतराष्ट्र होता, त्या वनांत निघाले. त्या वृद्धानें मोठ्या अगत्यानें या सर्वांचें स्वागत केलें. द्रौपदी कुंती व गांधारीजवळ जाऊन बसली. त्यांच्या कुटींत त्यांची सेवा करून पांडवांना समाधान लाभलें.

पण विदुर कुठें दिसेना. युधिष्ठिरानें विचारलें,

" विदुरकाका कुठें आहेत ? "

धृतराष्ट्र म्हणाला,

" त्यानें शेवट साधला. उन्मनी अवस्थेंत तो कुठें तरी हिंडत असतो. कधीं कधीं तो ऋषींना दिसतो. "

एकटा युधिष्ठिर विदुराचा शोध करीत निघाला. तों त्याला तो महात्मा समोरून येताना दिसला. अंगावर बोटभरही वस्त्र नव्हतें. दाढी व जटा वाढल्या होत्या. सर्वांग धुळीनें माखलें होतें. तोंडांत एक लहानसा दगड धरून धुंद मनोभूमिकेंत तो मार्गानें भटकत होता.

त्याला पाहतांच युधिष्ठिर त्याच्याकडे धांवत त्याला म्हणाला,

" विदुरकाका ! "

उत्तर नाहीं.

" विदुरकाका, मी युधिष्ठिर ! "

विदुर एका झाडाखालीं उभा राहिला, युधिष्ठिराकडे तो स्थिर, शांत दृष्टीनें पाहूं लागला. तसें पाहात असतांच त्याचे नेत्र झांकोळले, आणि प्राण शरीरत्याग करून अनन्त ब्रह्मांडांत विलीन झाले !

## अग्निप्रवेश—

कांहीं दिवसांनीं अचानक हास्तिनापुरीं पांडवांच्या कानीं वृत्त आदळलें—

नारद राजसभेंत उपस्थित झाले. युधिष्ठिरानें त्यांचा यथोचित आदर करून विचारलें,

" नारदा, तात धृतराष्ट्र आणि माता कुंती कुशल आहेत ना ? "

" युधिष्ठिरा, तुझें मन स्थिर आहे ना ? "

" हें असें कां विचारतां ? "

" कारण सर्व जीव मर्त्य आहेत ! "

" महर्षि नारदा—"

" होय युधिष्ठिरा, चित्त स्थिर ठेवूनच पुढील वृत्त तूं ऐकायला हवें आहेस. "

आपलें मस्तक दोन्हीं हातांनीं दाबून धरीत युधिष्ठिर म्हणाला,

" सांगावें ! "

" तर मग ऐक. धृतराष्ट्र, संजय, गांधारी व कुंती अशीं चौघें व्रतें करून अत्यंत कृष झालीं. एके दिवशीं गंगास्नानाहून तीं परतत असतां अचानक चहूं दिशांनीं वणवा भडकला. प्राणांत जवळ आला हें धृतराष्ट्रानें ओळखलें. तों कुंती व गांधारी पूर्वेकडे तोंड करून तिथेंच आसन घालून बसलीं. संजयाला धृतराष्ट्रानें आग्रह करून बाहेर जायला सांगितलें. नंतर अत्यंत स्थिर मनानें तीं तिघें त्या भडाग्नींत जळून भस्म झालीं ! "

हें वृत्त ऐकून पांडवांनीं जो आक्रोश मांडला, तो अवर्णनीय आहे. एकमेकांस मिठ्या मारून ते हंबरडा फोडून रडूं लागले.

"आई ग!"

"हाय ताता!"

"व्यर्थ भीमाचा पराक्रम!"

"व्यर्थ अर्जुनाचें पौरुष!"

"सहदेवा! तुझी माता कुठें आहे?"

"हाय हाय! राजा धृतराष्ट्राला शेवटीं भडाग्नि मिळावा ना!"

कुरुकुलाचें कीर्तिमंदिर ढासळूं लागलें!

## श्रीकृष्ण-निर्वाण—

छत्तीस वर्षे उदास मनानें राज्य केल्यावर एका दुर्दिनी युधिष्ठिराला आणखी एक दुर्वृत्त ऐकावें लागलें.

एकदां विश्वामित्रादि कांहीं ऋषि द्वारकेंत फिरत असतां यादवकुमारांना एक दुर्बुद्धी सुचली. ते कृष्णपुत्र सांबाला स्त्रीवेष देऊन ऋषींसमोर गेले आणि म्हणाले,

"ऋषिश्रेष्ठहो! या मुलीचें गरोदरपणामुळें पोट दुखत आहे. हिला काय होईल तें कृपा करून सांगा.

संतापून ऋषी म्हणाले,

"हिला मुसळ होईल! तें तुम्हां माजलेल्यांचा नाश करील."

आणि तसेंच झालें. दुसरे दिवशीं सांबापासून मुसलोत्पत्ति झाली. श्रीकृष्ण भविष्य जाणून उगा राहिला. वसुदेवानें भीतीनें त्या लोखंडी मुसळाचें चूर्ण करविलें, आणि तें समुद्रांत फेंकून दिलें.

पण अदृष्टापासून कोणीहि यादव कुलाला वांचवूं शकला नाहीं. अशुभ चिन्हें दिसूं लागलीं. वसुदेवाच्या आज्ञेनें सर्व यादव प्रभासक्षेत्रीं जाऊन राहिले.

पण तिथें मद्य पिऊन ते इतके उन्मत्त झाले, कीं त्यांनीं खड्गें उपसून एक-मेकांचा वध केला. सात्यकी, सांब, प्रद्युम्न, कृतवर्मा हे सर्व यादव त्या यादवींत ठार झाले.

संतापून श्रीकृष्णानें समुद्रकांठचे मूठभर लवे उपटून त्यानें यादवांना मारावयास प्रारंभ केला. त्या लव्यांचें लोहमुसळ झालें, आणि ऋषींचा शाप खरा झाला !

उरले केवळ दारुक, बभ्रु आणि श्रीकृष्ण. श्रीकृष्ण अत्यंत गंभीर स्वरांत दारूकाला म्हणाला,

" तूं हस्तिनापुरीं जाऊन अर्जुनाला हें वृत्त कळव. "

दारुकानें बभ्रूस स्त्रियांच्या रक्षणासाठीं द्वारकेस जायला सांगितलें, आणि तो हस्तिनापुरीं गेला. इकडे बभ्रुलाही एका पारध्यानें ठार मारलें. तेव्हां मग श्रीकृष्ण द्वारकेंत गेला आणि त्यानें वसुदेवास हें सर्व वृत्त सांगितलें. नंतर तो द्वारकेंतून बाहेर निघाला.

सत्यभामा आदि श्रीकृष्णाच्या पत्नी त्याला अडवून म्हणाल्या,

" अहो ! तुम्ही निघालांत कुठें ? आमची गति काय ?

निर्मोहीपणें त्यांच्यापासून आपली सुटका करून घेऊन निघत श्रीकृष्ण म्हणाला,

" तें अर्जुनाला विचारा, तो लवकरच इथें येईल. "

" आणि तुम्ही ? "

उत्तर न देतां त्या आक्रोश करणाऱ्या स्त्रियांना तिथेंच सोडून श्रीकृष्ण त्वरेनें निघून बलरामाजवळ गेला. तों त्याला दिसलें, कीं समुद्रतीरीं बलराम आसन घालून बसला असून त्याचे प्राण ब्रह्मरंध्राचा भेद करून निघून गेले आहेत !

शांत मनानें बलरामाचें मृत शरीर तिथेंच सोडून श्रीकृष्ण वनांत गेला. तिथें एका वृक्षाच्या तळाशीं आपलें रक्तकमलासारखें पाऊल जमिनीवर टेकवून त्यावर श्रीकृष्ण आत्मचिंतन करीत बसला. तों एका व्याधानें मृगमुख समजून त्या पावलावर बाण मारला !

त्या निमित्ताचा आश्रय करून महायोगी श्रीकृष्ण मानवी शरीर इथेंच ठेवून निजधामास निघाला ! पूर्णब्रह्म श्रीकृष्णाची अवतारलीला संपली.

अर्जुनास हें वृत्त कळलें, आणि त्याची कंबरच खचली. कसाबसा धडपडत तो द्वारकेस आला, तोंवर वसुदेवाचें देहावसान झालें होतें. त्याच्या स्त्रिया त्याच्याबरोबर सती गेल्या. शेष यादव स्त्रियांना घेऊन अर्जुन द्वारकेबाहेर पडला, तोंच समुद्रानें ती स्वर्णनगरी पोटांत घेतली.

हस्तिनापुराकडे येत असतां पंचनद प्रांतांत अर्जुनास एवढ्या स्त्रियांबरोबर एकटा पाहून दस्यूंनीं त्याच्यावर झडप घातली. महारथी अर्जुनास एकही अस्त्र आठवेनासें झालें ! त्याचा पराभव करून दस्यू अनेक स्त्रिया आणि संपत्ति घेऊन पळून गेलें.

हतप्रभ, निराश, गळलेला अर्जुन कसाबसा उरलेल्या स्त्रियांना घेऊन हस्तिनापुरीं पोंचला. रुक्मिणी आदि श्रीकृष्णाच्या स्त्रिया सती गेल्या, आणि अशा रीतीनें एक उज्वल कीर्तिस्तंभ कोसळून खालीं पडला !

## निर्वाण-यात्रा—

आतां शरिरें धारण करावींत, असें कांहींही राहिलें नाहीं. जिवनाचा लोभ संपला आहे.

युधिष्ठिर म्हणाला,

" अर्जुना, आतां महाप्रस्थानाचा समय आला आहे असें तुला वाटत नाहीं काय ? "

" होय. कालानें देहावर झडप घातली नाहीं, तोंच जागत्या मनानें प्रस्थान ठेवूं या. "

युधिष्ठिरानें परीक्षिताला राज्यावर बसविलें. धृतराष्ट्र पुत्र युयुत्सूला उत्तराधिकारी नेमलें. श्रीकृष्णाच्या कुलाचा तंतु वज्र अर्जुनाबरोबर आला होता. त्याची इन्द्रप्रस्थांत स्थापना केली. शोकमग्न सुभद्रेला त्या दोघांची देखरेख करायला मागें ठेवलें.

आणि मग पुनः एकदां राजवस्त्रें उतरून ठेवून पांडवांनीं वल्कलें धारण केलीं. मात्र या वेळीं गेल्या खेपेसारखा विषाद नव्हता, खेद नव्हता, क्रोधही नव्हता. होती केवळ प्रपंचाविषयींची विरक्ति.

शोकमग्न नागरिकांचें समाधान करून तीं सहाजणें हस्तिनापुराबाहेर पडलीं. बरोबर सातवा होता त्यांचा कुत्रा. त्यांनीं प्रथम पूर्व समुद्राचें दर्शन घेतलें. अर्जुनानें आपलें आवडतें गांडीव धनुष्य समुद्राला अर्पण केलें. नंतर दक्षिण पश्चिम अशा क्रमानें श्रीकृष्णाच्या जलमग्न द्वारकेचें खिन्न मनानें दर्शन घेत ती मंडळी उत्तरापथाच्या मार्गास लागली.

हिमालय जवळ दिसूं लागला. ती तर प्रत्यक्ष प्रभूची विभूति. पांडवांनीं ठरविलें, कीं जाववेल तितकें या महानगाधिराजाच्या कुशीत चालत जायचें. यात्रा संपेल तिथें संपेल.

क्षुधा, तृषा, थकवा या कशाचीही चिंता करणें त्यांनीं सोडून दिलें. त्या महान् पर्वताच्या हिमानें आच्छादिलेल्या अन्तर्भागांत त्यांनीं प्रवेश केला.

हळूं हळूं एकमेकांविषयींचें आकर्षणही कमी झालें. केवळ कर्तव्य म्हणूनच बरोबर चालायचें. मन विरक्तीनें दुथडी भरून वाहात आहे, बुद्धि हरिचरणी स्थिर आहे, एकाहून एक उंच, अशीं दुर्गम गिरिशिखरें समोर उभीं ठाकताहेत. तीं उल्लंघून वर जायचें, एवढेंच या विरक्तांना माहीत आहे.

आणि चालतां चालतां कमलचरणा द्रौपदी एकदम थांबली, तिनें कोणाचाही धांवा केला नाहीं. कोणालाही हांक मारली नाहीं. जीवनाच्या या अथांग सागरांत तिनें आपल्या जीवनाचा बिंदु समर्पित करून दिला.

भीमानें क्षणमात्र मागें पाहिलें, आणि युधिष्ठिराला विचारलें,

"हें असें कां झालें? शेवटपर्यंत ही आपल्याबरोबर राहूं कां शकली नाहीं?"

"तिच्या मनांत अर्जुनाविषयीं पक्षपात होता म्हणून."

कांहीं वेळानें सहदेव खालीं कोसळला. पुनः तोच प्रश्न.

"हे असें कां?"

"ज्ञानीपणाच्या गर्वामुळें."

थोड्याच वेळानें नकुलानें देह ठेवला,

"हे असें कां ?"

"आपल्या अप्रतिम रूपाच्या अभिमानामुळें."

थोडें पुढें गेल्यावर अर्जुनाची पाळी आली.

"हें असें कां ?"

"हा इतर धनुर्धरांना तुच्छ लेखीत असे म्हणून."

आणि शेवटीं पृच्छकाला आढळलें, कीं आपलीही तीच अवस्था झाली आहे ! प्राण शरिरांतून निघून जाण्याची धडपड करीत असतां त्यानें क्षीण स्वरांत प्रश्न केला,

"हें असें कां ?"

"हें खादाडपणाचें प्रायश्चित !"

युधिष्ठिर एकटा पुढें चालला आहे, आणि त्याच्या मागें आहे त्याचा आवडता कुत्रा. ज्या नांवेंतून प्रवास चालला होता ती नांव फुटली. सखे सोबती मागें राहिले.

चिंता नाहीं. आतां थांबणें नाहीं. चालणें आणि चालणें—

तोंच धडधडा ध्वनि होऊं लागला. युधिष्ठिराला दिसलें, कीं इन्द्र रथ घेऊन समोर उभा आहे !

सहस्य वदनानें इन्द्र म्हणाला,

"युधिष्ठिरा, तुझ्यासाठीं हा रथ उपस्थित आहे. यांत आरोहण कर,"

"आणि द्रौपदी ? भीम ? अर्जुन ? नकुल ? सहदेव ?"

"तीं मानव गतीला प्राप्त झालीं आहेत. त्यांची चिंता करूं नकोस. तूं एकटाच रथांत आरोहण करण्याचा अधिकारी आहेस."

युधिष्ठिरानें मागें पाहिलें. त्याला शेपूट हालवीत असलेला त्याचा कुत्रा दिसला. त्यानें म्हटलें,

" हा कुत्रा माझेबरोबर येऊं शकेल ना ? "

" छे छे ! कुत्रा स्वर्गात कसा येईल ? "

निग्रहानें पुढें पाऊल उचलीत युधिष्ठिर म्हणाला,

" तर मग असा स्वर्ग मला नको ! "

त्याच्या मागें जात इन्द्र बोलला,

" असें काय करतोस युधिष्ठिरा ! अरे तुझे आवडते पांडव आणि द्रौपदी हींही तर मागें राहिलीं आहेत—"

" होय. पण आपापल्या कर्मामुळें. "

" मग सोडना कुत्र्याचा लोभ ! "

" नाहीं. या माझ्या एकमेव सोबत्याला सोडून मी स्वर्गातही येऊं इच्छित नाहीं. "

संतुष्ट होऊन इन्द्र म्हणाला,

" ये युधिष्ठिरा ! तूं धन्य आहेस. तुझ्यासारखा दयाळु आणि धर्मनिष्ठ पुरुष या लोकीं झाला नाहीं ! बैस रथांत. "

ते दोघे रथांत बसले. युधिष्ठिर आणि कुत्रा—!

कांहीं क्षणांतच रथ दिसेनासा झाला !

संपलें महाभारत !